म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक

सन

ग्रंथालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

# लालन बैरागीण

अथवा

# पानिपतचा घनघोर युद्धप्रसंग.



हें पुस्तक

**दत्तात्रय गोविंद सडेकर**

लोकमित्र मा. पु. चे मालक मु. खानापूर

यांनीं

"बेळगांव-समाचार" छापखान्यांत छापविलें.

सन् १८९९.

किंमत १। रुपया.

या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचा हक्क

मालक

दत्तात्रय गोविंद सडेकर

पोष्ट–खानापूर, जिल्हा–बेळगांव यांनीं

सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें

आपल्या स्वाधीन ठेविला आहे.

श्रीमंत

# चिंतामणराव रघुनाथ

ऊर्फ

# बाळासाहेब पटवर्धन

## सी० चीफ संस्थान कुरुंदवाड

यांस

( त्यांच्या परवानगीनें )

हा ग्रंथ

कृतज्ञता व सन्मानपूर्वक बुद्धीनें

त्यांचा

आज्ञाधारक ग्रंथकर्ता

यानें

नजर केला आहे.

# प्रस्तावना.

आलीकडे आपल्या लोकांस पाश्चात्य विद्येच्या संस्कारानें ऐतिहासिक कथानकें व चरित्रें लिहिण्याची अभिरुचि लागल्यामुळें दिवसेंदिवस महाराष्ट्र-ग्रंथसमूहास भर पडत चालली आहे; हें देशोन्नतीचें एक सुचिन्हच समजावयाचें. कारण, इतिहास ह्मणजे आधींच केवळ पूर्वानुभवरत्नभांडार. त्यांतून त्या भांडारखान्यामधील निरनिराळीं सोज्वल रत्नें निरनिराळ्या कुशल कारागिरांच्या हातीं जाऊन तीं कोंदणांत बसाविलीं ह्मणजे तर, त्यांच्या पैलूंचा सतेजपणा, त्यांची चित्ताकर्षकता व त्यांच्या ठिकाणची जनमनरंजनशक्ति यांचें मोल वाढलें जाऊन तीं लोकांच्या आदरास विशेषच पात्र होतात. व ह्मणूनच आज चरित्र ग्रंथांची योग्यता सर्व देशांतील रसिक विद्वानांकडून फार मोठी मानिली जात आहे. एखादें महत्वाचें ऐतिहासिक प्रमेय मनांत बिंबल्यानें किंवा एखाद्या प्रसिद्ध पुरुषाच्या चरित्राचा ठसा वाचकांच्या अंतःकरणावर उमटल्यानें त्यापासून किती अलभ्य लाभ होतो व देशोन्नतीचे कामीं तशा ग्रंथाची किती आवश्यकता आहे हें पहाणें असल्यास आपले **शिवछत्रपति** किंवा **अमेरिकेंतील** प्रसिद्ध महात्मा **वाशिंग्टन** यांचीं चरित्रें वाचिलीं असतां सहज लक्षांत येणारें आहे. असो.

एका पुरुषाच्या चरित्रवाचनापासून जर एवढा मोठा

लाभ होतो, तर ज्यांत अनेक वीर्यशाली व चतुरस्त्र पुरुषांच्या चरित्रांचा संग्रह आहे अशा प्रस्तुत कादंबरीसारख्या महत्वाच्या विषयावर निरानिराळे अनेक ग्रंथ होणें किती जरूरीचें आहे आणि मराठ्यांच्या इतिहासांत अग्रगण्य जो सोनपतपानपतचा अघोर व अतुल संग्राम त्याची पूर्ण माहिती आतां महाराष्ट्रियांस होणें किती अगत्याचें आहे हें निराळें सांगावयास नकोच. कारण, इ. स. १७६१ सालापूर्वी सुमारें एका शतकांत महाराष्ट्र जननीच्या पोटीं अनेक मानवरत्नें पैदा होऊन त्यांनीं जगत्प्रलयावधि चमकत राहणारा जो वर्णनीय पराक्रम गाजविला, आपल्या आंगच्या अलौकिक तेजानें महान् महान् शत्रूंस दिपवून जें दिव्य यश संपादिलें आणि स्वराज्यवैभव व स्वातंत्र्य यांस कांहीं कालपावेतों जो माहेरसुखाचा लाभ दिला त्या सर्वांची परमावधि पानिपतांत होऊन तेथूनच महाराष्ट्रियांच्या उत्कर्षाची दिशा पालटली असें ह्मटल्यास चालेल. तेव्हां ज्या पराजयाच्या जबरदस्त आघातामुळें महाराष्ट्र राज्यरूपी वृक्षाच्या बहुतेक फांद्या तुटून पडल्या त्या घोरतर संग्रामाचें खरें स्वरूप व त्यांत ईशसंकेतानुरूप आलेल्या अपयशाचीं एकंदर कारणें वाचकांस समजल्यानें अनेक प्रकारचा बोध होण्यासारखें आहे, यांत बिलकुल संशय नाहीं.

आतां कोणी अशी शंका घेतील कीं, ज्या गोष्टीच्या दुष्ट परिणामामुळें संपूर्ण महाराष्ट्रभर कांहीं कालपर्यंत

दुःखप्रलय माजून शोकयुक्त औदासीन्य पसरलें, ज्या समरकुंडांत भाऊ व विश्वासरावासारख्या वीरकुलोत्पन्न रणशूरांची आहुति पडली, जो दारुण प्रसंग ओढवल्यामुळें स्वराज्यनिष्ठ व स्वामिकार्यासाठीं प्रत्यक्ष काळाच्या तोंडांत उडी टाकण्यासही न डगमगणारे दत्ताजी व जनकोजीसारखे प्रतिभिष्म शरपंजरीं पडून शिंद्याचें घराणें खालावलें आणि पुत्रशोकाच्या प्रखरतर ज्वालेनें अंतःकरण करपून टाकून नानासाहेबासारख्या प्रिय प्रभूवर झडप घालण्यास ज्या युद्धानें निर्दय मृत्यूस आव्हान केलें, त्या शोकपरिणामी कथानकापासून बोध तो काय होणार? पण थोड्याशा विचाराअंतीं वरील शंकेचें समाधान सहज होणारें आहे. कारण, या जगांतील हरएक गोष्ट परमेश्वरइच्छेनुरूप घडून यावयाचीच. कोणत्याही कामांत यशापयश देणें हें त्याच्या स्वाधीन. व्यवहार मात्र असा अनुभवास येतो कीं, ज्याची मसलत ईशकृपेनें सिद्धीस जाते तोच शहाणा व तोच पराक्रमी. आणि तीच ईशकृपा ज्याच्यावर उलटली तो मूर्ख व तोच हतवीर्य. असा जरी दैविक प्रकार पानिपतच्या समरभूमीवर भाऊसाहेब व त्यांच्यासारख्या इतर तेजस्वी योद्ध्यांस भोगावा लागला, तथापि त्यांच्या चरित्रांपासून स्वराज्यनिष्ठा, स्वधर्माभिमान, स्वामिसेवादक्षता, इत्याद्यनेक अवर्णनीय गुण प्रत्येक व्यक्तिमात्रानें घेण्यासारखे आहेत. प्रसिद्ध तत्ववेत्ता जॉन्सन यानें—

"The misfortunes of those, whose eminence drew upon them an universal attention, have been more carefully recorded, because they were more generally observed, and have in reality been only more conspicuous than those of others, not more frequent or smore evere."

असें एके ठिकाणीं लिहिलें आहे. व आजपर्यंत जगावर होऊन गेलेल्या नरपुंगवांच्या चारित्रांत त्यांच्या भरभराट-कालापेक्षां त्यांजवर गुदरून गेलेल्या दारुण प्रसंगाचें वर्णन ग्रंथकार जें जास्त हृदयद्रावक रीतीनें करितात त्याचें कारणही हेंच. तेव्हां पानिपतचें प्रकरण जरी अपयशाला कारणीभूत झालें तरी त्यांत जगास कौतुक वाटावयाजोगें रणपटुत्व गाजवून स्वदेशाभिमानी जनांच्या अभिनंदनास पात्र झालेल्या अनेक कर्तृत्ववान पुरुषांच्या आयुष्यक्रमांतील नानाविध प्रसंगांचें वर्णन व चित्तवेधक देखावे यांची विपुलता आहे. ह्मणून त्या संबंधानें निरनिराळ्या इंग्रजी ग्रंथकारांनीं दिलेली माहिती, काशीरायानें लिहिलेली बखर व काव्येतिहास संग्रहां-तून प्रसिद्ध झालेली भाऊसाहेबांची बखर यांच्या आधारानें लिहिलेली ही ऐतिहासिक कादंबरी इतिहास-प्रिय वाचकांस मी सादर करीत आहें.


याच्या वाचनापासून—मनुष्य स्वार्थपरायणतेच्या स्वाधीन झाला ह्मणजे पूर्व उपकारावर तिलांजली सोड-ण्यास कसा तयार होतो, ऐश्वर्य व सत्ता यांच्या मदानें अंध होऊन एखाद्याची विनाकारण मानहानि करणाऱ्यावर कसकशीं संकटें ओढवतात, आपल्यापेक्षां कमी योग्य-

तेच्या पण अनुभवी सेवकजनाची हितपरिणामी मसलत झुगारून देऊन दुराग्रही वर्तनानें कार्यभागाची हानि कशी होते, स्वतांच्या शहाणपणाविषयींचा गर्व व महत्वाकांक्षा यांचें प्राबल्य झालें ह्मणजे शहाण्या पुरुषाचीही विचारशक्ति मलीन होऊन त्याच्या हातून अनीतीचें वर्तन कसें घडतें, केव्हां केव्हां एका पुरुषाच्या राजनिष्ठाशून्यत्वामुळें व आपमतलबी काव्यामुळें संपूर्ण देशाची दुर्दशा कशी उडते, खरे कुलीनजन प्रसंगीं खासगी द्वेष अथवा परस्परांतील वैरभाव विसरून जाऊन हातीं घेतलेल्या कार्यांत सिद्धि संपादण्यासाठीं किंवा स्वराज्यहितासाठीं किती जिवापाड सायास करितात, दुटप्पी वर्तन व गृहकलह यांचा परिणाम काय, खऱ्या प्रेमाचें लक्षण कोणतें आणि अविचारी वर्तनाचा शेवट कसा भयंकर होतो--इत्याद्यनेक बोधपर सिद्धांत वाचकांच्या मनावर ठसून त्यांस फार दिवसांपासून खिळलेली स्वदेशाच्या इतिहासाविषयींची पराङ्गमुखता व पुण्यश्लोक अशा आपल्या पूर्वजांच्या कृतींविषयींची अभिमानशून्यता नष्ट होऊन स्वोन्नतीची चुकलेली दिशा सांपडेल अशी बळकट आशा आहे.

आतां शेवटीं वाचकांची रजा घेण्यापूर्वी इतकेंच सांगावयाचें कीं, सदर पुस्तकाची मूळ प्रत आमचे मित्र रा. रा. **विष्णू लक्ष्मण काळे बेळगांव लंडन मिशन** हैस्कूलचे मास्तर व **जिजीवास** पुस्तकाचे कर्ते यांजकडे तपासण्याकरितां दिली होती, ती त्यांनीं मोठ्या संतोषानें वाचून पाहून तींत भाषेच्या व एकंदर संविधानकाच्या संबंधानें ठिकाठिकाणीं बरेच फेरफार व सुधारणा करून

दिली याबद्दल त्यांचे व प्रिय आश्रयदात्यांनीं आगाऊ आश्रय दिला याबद्दल त्यांचे आभार मानल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं.

कर्ता.



# अनुक्रमणिका.


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| प्रकरण | १—एकी कीं बेकी..... .... .... | १ |
| ,, | २—उत्तर विरुद्ध दक्षिण. .... .... | ७ |
| ,, | ३—अफगाण छावणीचा दरवाजा. .... | २० |
| ,, | ४—गायन..... .... .... .... | ३० |
| ,, | ५—रणस्तंभ... .... .... .... | ५२ |
| ,, | ६—मराठे लष्कराचा बाहेरील देखावा. | ५८ |
| ,, | ७—पाण्याचा झरा..... .... .... | ६६ |
| ,, | ८—प्रीत्यागमन. .... .... .... | ७६ |
| ,, | ९—आईचें मन आणि रात्र सारखी.... | ८७ |
| ,, | १०—पिंजऱ्यांत सांपडलेले सिंह. .... | ९७ |
| ,, | ११—भाऊसाहेबाची कचेरी..... .... | १०२ |
| ,, | १२—प्रतिस्पर्धी. .... .... .... | १०६ |
| ,, | १३—भिंतीला कान...... .... .... | ११८ |
| ,, | १४—लांडग्यांच्या टोळींत बकरी. .... | १२३ |
| ,, | १५—मराठ्यांची पिछेहट. .... .... | १२९ |
| ,, | १६—महादजीची मुद्रा... .... .... | १३४ |
| ,, | १७—*भल्लयुद्ध. .... .... .... | १३९ |
| ,, | १८—पानिपतचा रस्ता... .... .... | १४३ |
| ,, | १९—मानलेला बाप..... .... .... | १५२ |
| ,, | २०—तपासाची समाप्ति.. .... .... | १५७ |
| ,, | २१—अन्यवस्था. .... .... .... | १६७ |
| ,, | २२—भाऊसाहेबाची मसलत.... .... | १७४ |


* १३९ पेजवर १७ व्या प्रकरणाखालीं मल्लयुद्ध असें लिहिलें आहे त्या ठिकाणीं भल्लयुद्ध असें वाचावें.

प्रकरण २३—थट्टेबाज ब्राह्मण... .. .... १८८
,, २४—भाऊचा शाप..... .... १९३
,, २५—अखेरचा निरोप... .... २०२
,, २६—केशरी करा. .... .... २०९
,, २७—लढाईची रात्र..... .... २१६
,, २८—सुभ्याची छावणी... .... २२५
,, २९—पेला संपूर्ण भरला.. .... २३१
,, ३०—जासुदाचा संशय... .... २३६
,, ३१—पुनः सुटका. .... .... ९४२
,, ३२—युद्धारंभप्रभात. .... .... २४७
,, ३३—दोन्ही सेनेची स्थिति. .... २५०
,, ३४—जय भवानी. .... .... २५३
,, ३५—जंगी लढाईचा शेवट. .... २५९
,, ३६—दोन्हीकडून फसला. .... २६६
,, ३७—लढाईचा शेवट..... .... २७२
,, ३८—पलायन.... .... .... २७७
,, ३९—प्रीतिपात्राची भेट.. .... २८२
,, ४०—गार्द्यांची पिछेहट... .... २९०
,, ४१—जीवंतमृत. .... .... २९६
,, ४२—लढाईचा शेवट.... .... ३०८
सोनपतपानपतच्या रणकंदनावर पोवा .... ३१७

भा. २

# लालन वैरागीण

## अथवा,

## पानिपतचा घनघोर युद्धप्रसंग.

## प्रकरण १ लें.

### एकी कीं बेकी.

वा! खुदाच्या कृपेनें आज निराळीच शिकार आपल्यास मिळणार असें वाटतें! मित्रा, तें पहा डावीकडे ओढ्यांत काय दिसतें तें! सकाळपासून रानोरान फिरून रिकाम्या हातानें परत जाण्याचा प्रसंग येतो कीं काय, असें वाटून निराशेचा मनांत संचार होणार, तोंच ही चालती बोलती शिकार खुदानें अगदीं आपल्या पुढ्यांत आणिली. यँ ! खुप सुरत! मला वाटतें ती मराठ्यांच्या छावणीचा मार्ग चुकून इकडे आल्यामुळें, अशी कावरी-बावरी होऊन नाल्यांतून फिरत असावी.

दुसरा—शिकार पण शिकार ! तरीच ह्मटलें, आज तंबूतून निघतांना शकून तर चांगला झाला होता; आणि शिकार कशी नाहीं! मित्रा असली शिकार हातीं लागल्यावर आणखी तें काय पाहिजे? आंधळा काय दोन डोळे मागतो? चल आपण तिकडेच जाऊं, ह्मणजे ती कोण व कोठून आली हें समजेल.

याप्रमाणें आपल्या भाषेंत परस्परांशीं बोलत, दोन अफगाण शिपाई दिल्ली शहरच्या उत्तरेकडील एका नाल्या-

कडे वळले. ते शरीरानें धिप्पाड असून दोघांचीही आंगलट मजबूत दिसत होती. त्यांची लांब दाढी आणि काळ्या कुळकुळीत कल्लेदार मिशा, त्यांच्या स्वाभाविक तांबुस चेहऱ्यास विशेष शोभा देत. दोघांनींही फार मोठे व सैल असे पायजमे घातले होते. एकाच्या अंगांत ढोंपरापर्यंत सहज पुरणारें असें काश्मिरी डगलें होतें व दुसऱ्याच्या अंगांत मेंढराच्या केशयुक्त कातड्याचें बन्यान होतें. त्यांच्या डोकीस उंच टोप्या असून त्यावर चार हात लांबीचा एकेक पटका गुंडाळलेला होता. पायांत चमत्कारिक पण बेडौल असे जोडे होते. दोघेही हत्यारबंद. त्यांच्या कमरपट्यांत इराणी तऱ्हेची वांकडी तलवार, कसायाच्या लांबलचक सुऱ्याप्रमाणें जंबिये, बंदुकीच्या गोळ्या वगैरे ठेवण्याचीं तोस्तानें आणि दारूचे शिंगाडे अडकविलेले होते. तसेंच खांद्यावर बंदुक व पाठीवर भव्य ढाल, इतकीं हत्यारें त्यांजपाशीं होतीं.

ते ज्या ओढ्याकडे वळले, त्याच्या दोहीं कांठांवर बरीच दाट झाडी होती. त्यांत घोड्यांचें खिंकाळणें, हत्तींचा चीत्कार, मनुष्यांचें संभाषण व हंसणें आणि मधेंच केव्हांतरी रणवाद्यांचा गंभीर ध्वनि ऐकूं येत होता.

वर जी स्त्री त्या अफगाणांच्या अकस्मात दृष्टीस पडली ह्मणून सांगितलें, ती त्या ओढ्यांत इकडे तिकडे फिरत होती. तेव्हांच्या तिच्या चेहऱ्यावरून स्पष्ट दिसत होतें कीं, तिचा त्या लष्करी छावणीकडे जाण्याचा हेतु नसून तिला मार्ग चुकल्याचा भास झाला असावा.

ती तरुणी फार सुंदर होती. तिच्या भ्रुकुटी भ्रमराप्रमाणें काळ्या व धनुष्याप्रमाणें कमानदार होत्या.

परंतु, ते जाऊन पोंचण्यापूर्वींच साबाजीचा पराभव झाला असें वर्तमान त्यांस समजतांच, त्यांनीं यमुनेच्या उजव्या बाजूस आपल्या सेनेचे दोन भाग करून तळ दिला. इतक्यांत अहमदशहानें त्यांवरही हल्ला केला; पण त्यांत ह्मणण्यासारखें कोणाचेंच नुकसान झालें नाहीं.

यमुनेच्या पूर्वेकडील प्रांत मराठ्यांच्या तडाक्यांत सांपडला नव्हता. कारण, रोहिल्यांची शौर्यसंपन्नता त्या प्रदेशाचें चांगलें संरक्षण करीत होती. रोहिले व मराठे ह्यांच्या प्रांतांत यमुना हा एक जबरदस्त प्रतिबंध होता, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तशांत रोहिले व मुसलमान अहमदशहास फितूर होते, किंवा त्यांनींच भर देऊन शहास इकडे आणिलें असें ह्मटलें तरी चालेल. मुसलमानांकडून अहमदशहास दाणा-वैरण मिळे, आणि रोहिले लढाईचा सर्व सरंजाम पोंचवीत. रोहिल्यांचे सरदार **नजीबउद्दवला, हाफीजराहिमत** आणि अयोध्येचा सुभा **सुजाउद्दवला** ह्यांकडे **अहमदशहाचा** पाहिजे तसा पत्रव्यवहार चाले. इत्यादि अनेक कारणांमुळें **अहमदशहानें** आपल्या प्रतिपक्षाशीं जंगी लढाई करावी, असा घाट घातला. अफगाण लोकांचे डाव-पेंच फार निराळ्या तऱ्हेचे होते; आणि त्यांविषयीं कित्येक ग्रंथकारांचा अभिप्राय असा अवलोकनांत येतो कीं, अफगाणच्या राजकुमारांनीं लष्करी कवाईत व तालीम **नादिरशहाच्या** वेळेपासून फारच उत्तम रीतीनें संपादन केली होती.

बादशाही लष्कराच्या उपद्रवानें **दत्ताजी शिंदा** फार त्रासला. त्याचा असा विचार ठरला कीं, डाव्या बाजूस कितीही सैन्य ठेविलें, तरी व्यर्थ. बरें, उत्तरेकडे जावें तरी

मारामारच. याप्रमाणें दोन्ही बाजूनीं त्याची कोंडमार झाल्यामुळें तो निरुपायानें मागें वळला. तेव्हां **जनकोजी शिंदा** व **मल्हारराव** हे आपल्यास मार्गांतच कोठें तरी भेटतील, आणि आपण पाहिजेतसें स्वकार्य साधूं, अशी त्यास धमक होती.

**अहमदशहाचें** लष्कर फार उमेदीनें दिल्लीकडे येऊं लागलें. त्यानें यमुनेच्या उजव्या बाजूनें आपला मार्ग सुधारला. तेव्हां मार्गांतच दोन्ही सैन्यांची एकाएकीं गांठ पडली. त्यांत **मल्हाररावावर** आणीबाणीचाच प्रसंग आला होता; परंतु तो सुदैवानें बचावला. **दत्ताजी शिंद्याचा** पराभव होऊन त्यानें समरंगणक्षेत्रांत आपला देह ठेविला; आणि त्याचा बंधु प्रख्यात **महादाजी शिंदा** मोठ्या शिकस्तीनें युद्धभूमीवरून पळाला.

दिल्लींतही फारच अव्यवस्था माजली होती. **मल्हाररावास** तावडतोब मिळावें, अशा इराद्यानें **जनकोजीनें** कूच केलें. **गाझिउद्दिनानें** केवळ महत् प्रयासेंकरून **अलमागिरास** गादीवर बसविलें. नंतर त्यास असा विचार पडला कीं, कदाचित् **सुजाउद्दवला** व **रोहिले**, **अफगाणांस** केव्हां मिलाफ होऊन दिल्लीवर हल्ला करतील, आणि गादी बळकावितील, ह्याचा बिलकुल नेम नाहीं. कदाचित् तसें झालें, तर आपले सर्व हेतु निष्फल होणार. **गाझिउद्दिनाची** अशी त्रेधा होतांच, त्यानें बादशहास ठार मारून **अलमगीरचा** अगदीं लहान मुलगा **कमालबक्ष** ह्यास गादीवर बसविलें; आणि त्याचें नांव दुसरा **शहाअलम** असें ठेविलें. **गाझिउद्दिनानें** आपल्या विचाराप्रमाणें इतकी व्यवस्था केली, तरी त्याच्या मनाचा कोणताच दृढनिश्चय

होईना. इतक्यांत त्याचे शत्रु अगदीं जवळ आले. तेव्हां तो, जाटांचा सरदार **सूरजमल्ल** ह्याच्या आश्रयास गेला. अशा करण्यांत त्याचा हेतु इतकाच होता कीं, **सूरजमल्लाचें** व **मराठ्यांचें** सख्य आहे. आणि मराठे, **अहमदशहाचा** सहज पराभव करतील!

**अहमदखान** बंगसच्या ताब्यांत जी अफगाण-फौज होती, तिला रोहिले युद्धाचें वगैरे सामान पोंचवीत. हें वर्तमान मराठ्यांस समजतांच, त्यांस प्रतिबंध करण्याकरितां **मल्हारराव** होळकर आग्र्याहून निघाला. त्यानें पहिल्याच सपाट्यास रोहिल्यांची चांगली खोड जिरविली. रोहिल्यांची एक मोठी टोळी धुळीस मिळवून आतां पुढें कसें करावें, ह्या विचारांत तो असतां सिकंदरा येथून आलेल्या अफगाण-सेनेनें त्याचा पराभव केला. त्या युद्धांत मराठ्यांचें फारच नुकसान झालें. कितीएक लोक मेले, कित्येक घायाळ पडले, आणि कित्येकांनीं दक्षिणची वाट धरिली.

असा प्रकार होतांच, **अहमदशहानें** निर्भयतेनें दिल्लींत शिरून रोहिल्यांचा सरदार व अयोध्येचा **नबाब** ह्यांशीं तह केला. तरी **मराठे** आपल्या अंगच्या बळावर स्वस्थच होते. **अहमदशहाचें** सर्व कृत्य **पुणें** येथें पेशव्यांस समजतांच त्यांनीं मोठ्या जोरानें लढाईची तयारी चालविली. **सदाशिवराव भाऊ** ह्मणजे सामान्य योद्धा नव्हे. त्यानें निजामासारख्या बलाढ्य शत्रूचा पराभव केला. इतकेंच नव्हे, तर पोर्च्युगीजांसही आपला पराक्रम दाखवून **कोंकण**प्रांताचा बहुतेक भाग पेशव्यांच्या राज्यास जोडिला होता. प्रख्यात **फ्रेंच**सरदार बुसीचा पट्ट

शिष्य इब्राहीमखान गारदी हा पेशव्यांच्या तैनातींत होता. त्यानें त्यांच्या फौजेस चांगलें युद्धशिक्षण दिलें होतें. सदाशिवराव भाऊच्या पित्यानें सर्वत्र विजय मिळविला असल्यामुळें, जावें तिकडे त्याच्या नांवाचा जयघोष ऐकूं येई. एकंदरींत ह्या वेळीं पेशव्यांचें बुद्धि-वैभव, शक्ति, चातुर्य व हिंमत यांनीं त्यांच्या शत्रूंचे डोळे दिपविले होते, ह्यांत शंका नाहीं. " मुसलमानांस अटकेपार हांकून काढण्यास ही संधि चांगली आहे, अशी वेळ पुनः सांपडणार नाहीं. " असा सदाशिवरावाचा विचार ठरला. रघुनाथराव दादाचाही विचार भाऊच्या विचाराशीं बहुतांशीं मिळताच दिसे. त्याची उमेद " मी दुराणीस अटकेपार घालवून मराठ्यांची गेलेली कीर्ति पुनः संपादन करीन. " असो. शेवटीं पेशव्यांचा विचार शत्रूवर चालून जाण्याचा ठरला व त्याप्रमाणें पुणें शहराच्या आस-मंतांतील बहुतेक भाग युद्धोपयोगी तयारीनें गजबजला. पेशव्यांनीं सैन्य, मांडलिक राजे-रजवाड्यांची सेना, आप्त-इष्ट-मित्रांचें लष्कर आणि रजपूत व जाट वगैरे समरप्रवीण योद्ध्यांची फौज मुसलमानांस आपल्या देशांतून हांकून लावण्यास सिद्ध झाली. सर्व सिद्धता झाल्यावर सदाशिवराव भाऊ व विश्वासराव असे उभयतां मोठ्या थाटामाटानें, अंतःनात सेना व सरदार बरोबर घेऊन आपला विजयध्वज अवघ्या भरतखंडांत फडकाविण्याच्या उमेदीनें पुण्याहून निघाले. श्री. शिवाजी महाराजांच्या परलोकवासानंतर अशी थाटामाटाची, कडेकोट तयारीची व खऱ्या जोमाची स्वारी कधींच कोणाच्या अवलोकनांत आली नसेल !

मराठ्यांची तयारी होईपर्यंत अहमदशहाच्या तावडीं-

त त्यांच्या ज्या कित्येक भटकणाऱ्या व लुटारु टोळ्या सांपडल्या, त्यांचा पराभव करून त्यांस दिल्लीच्या आसमंतांतून त्यानें हांकून लाविलें. मराठ्यांशीं लढाई करण्याकरितां अहमदशहासही चांगली तयारी करावी लागली. आतां आपला बचाव होईल, आणि मराठ्यांचे व आपले कोठेंही चार हात झाले, तरी आपण डगमगणार नाहीं. अशी शहाची खात्री होतांच तो, सुजाउद्दवल्यास आपल्याबरोबर घेऊन रोहिलखंडांतून अनूप शहरीं आला. "मराठ्यांच्या हल्ल्यास यमुना व काली ह्या दोन्ही जबरदस्त नद्या ईश्वरनिर्मित प्रतिबंधाप्रमाणें सज्ज आहेत. तेव्हां मराठ्यांचा दिल्लींत प्रवेश होणेंच महत् कठीण! कदाचित् झाला, तरी वर्षाऋतूंत दोन्ही नद्या तुडुंब भरून जाऊन समुद्राप्रमाणें गर्जना करूं लागल्या, ह्मणजे त्यांस पलीकडे जाण्याचें महत् संकट पडेल." ह्या घमेंडीवर विश्वास ठेवून अहमदशहा स्वस्थ होता.

सूरजमल्ल जाट व मल्हारराव होळकर यांनीं आपल्या प्राचीन पद्धतीप्रमाणें "आपण पर्वतप्रदेशाचा आश्रय धरून राहूं." अशी भाऊस सल्ला दिली. परंतु, भाऊ आपल्या पित्याच्या कीर्तीवर, स्वसामर्थ्याच्या पूर्ण विश्वासावर व आपल्या तैनातींत हात जोडून तयार असलेल्या लक्षावधि सैन्याच्या बलावर भरंवसा ठेवून स्वस्थ होता. "मी भाल्याच्या अणीवर सर्वांस नाचवीन, आज मी ह्मणेन तें होईल, किंवा तसें करण्याचें आपल्या अंगीं सामर्थ्य आहे, मुसलमान ह्मणजे कःपदार्थ!" असा आणि अशाच इतर तऱ्हेचा भाऊचा अभिमान. जसा अहमदशहा गर्वातिशयानें उन्मत्त झाला होता, तसाच भाऊ. त्यानें हो-

ळकरांसारख्या आपल्या हितचिंतकांस "मी तुझ्यांसारख्या धनगरांच्या मसलतीनें वागूं इच्छित नाहीं." असा खणखणीत जबाब दिला.

दिल्लीवर तोफांच्या गोळ्यांचा पर्जन्य पडूं लागला. हल्ल्यामागून हल्ले होऊं लागले. मराठ्यांनीं दिल्ली सर केली. तेव्हां सदाशिवरावास असें वाटलें कीं, आतां मी दिल्लीचा बादशहा बनलों! आतां मी ह्मणेन ती पूर्व दिशा! भाऊनें विश्वासरावास दिल्लीच्या श्रेष्ठ सिंहासनावर बसविलें, पुढें अहमदशहाचा व सुजाउद्दवल्याचा स्नेहग्रंथि तुटावा, सुजाउद्दवला आपल्या पक्षास मिळावा, अहमदशहाची एक बाजू लंगडी होऊन आपली भावी आशा सफल व्हावयास अडचण पडूं नये, अशा हेतूनें विश्वासरावानें सुजाउद्दवल्यास बादशहाचा वजीर ठरविलें. परंतु, सुजाउद्दवला किती दक्ष! तो भाऊच्या मतास अनुकुल होईना. तशांत तो पडला धर्मवेडा. तो मुसलमानांस सोडून हिंदूंस कां वश होईल? मराठ्यांच्या तर्फेनें विचार केला, तर भाऊचा हा विचार पोक्त व दूरदर्शीपणाचा होता. पण, मुसलमानांच्या वतीनें पाहिलें, तर सुजाउद्दवल्याचें मतही रास्त दिसतेंच. असो. वरील प्रकार कसाही असला, तरी भाऊचा हेतु निष्फळ झाला हें कोणीही कबूल करील. जरी अहमदशहाशीं जंगी लढाई करून सदाशिवरावभाऊ त्यास मातीशीं मिळविता, तरी देखील विश्वासरावास दिल्लीचा बादशहा ह्मणणें हें सर्व लोकांस मान्य होण्याची पंचाईतच; मग सुजाउद्दवल्याची वजिरी कोण मान्य करिता, देव जाणे! भाऊनें अफगाण लोकांचा सर्वथैव पराभव केला नव्हता; तेव्हां अर्थातच त्यानें

स्थापन केलेल्या मोठ्या बादशहाला सन्मान देण्यास कोणीच कबूल होईना. परंतु, भाऊच्या हातून जर तसें झालें असतें, तर त्याची दिगंत कीर्ति पसरली असती. भाऊनें मीरजाजुवानबख्त ह्यास विश्वासरावाचा वजीर नेमिलें.

मराठ्यांची छावणी आणि दिल्ली शहर ह्यांत बरेंच अंतर होतें. त्यांत पाय ठेवावा तेथें हात जोडून संकटें तयार. पत्रव्यवहाराची तर मारामारच. केव्हां कोणावर कसा प्रसंग येईल, ह्याचा नेम नव्हता. जिकडे जावें तिकडे भीति व चिंता ह्यांचें माहेर घर. पण, इतक्या अडचणी असतांही लढाईच्या सामानाची व पैशाची आपणास पंचाईत आहे असें भाऊस समजतांच, त्यानें आपल्या मदतीस आलेल्या सरदारांकडून मिळाला तितका पैसा कर्ज घेऊन मोंगल बादशहाचा सफाई चुराडा करावा, असा दृढनिश्चय ठरविला. त्यानें मोंगलांचे मोठमोठे बुरूज व महाल यांचा आंतील बहुतेक मौल्यवान् व शोभिवंत वस्तूंसह विध्वंस केला!

जाट व रजपूत लोकांच्या मनांत प्रथमपासून भाऊविषयीं बराच संशय होता. तशांत "मारीन किंवा मरेन" अशा दृढनिश्चयानें मराठे लोकांनीं पुढें चाल करावी असा भाऊचा विचार आहे, असें त्यांस समजतांच, संशयाचें मूळ द्वेषास कारण झालें. ते लोक भाऊचा तिरस्कार करूनच स्वस्थ राहिले नाहींत. भाऊ हा प्रत्यक्ष आपला कट्टा शत्रु आहे, असा त्यांचा पक्का निश्चय ठरला. भाऊनें त्यांस पुढें चाल करण्याची आज्ञा केली; पण ती त्यांनीं एकीकडे ठेवून काढता पाय घेतला. भाऊही आपल्याच घमेंडींत होता. जाट व रजपूत लोक गेले

तरी बाकी राहतील ते लोक यवनांचा एका क्षणांत पराभव करतील, असा त्याचा समज होता.

वर्षाऋतु संपला. भाऊनें राजा बाहादूर नारायण शंकर ह्याच्या हाताखालीं बरेंच सैन्य देऊन त्याकडे दिल्लीचा संरक्षणभार सोंपविला; आणि बाकीचें चट्सारें सैन्य घेऊन तो कुंजपुराकडे आला. कुंजपूर हें फिरोज-शहा कालव्याच्या कांठीं आहे. तेथेंच एकदां शेवटची लढाई करावी व मुसलमानांचा सर्व नाश करावा, असा भाऊचा फार हेतु होता. परंतु, तो साध्य न होऊन भाऊची आशा निर्फल झाली.

इकडे "रोहिलखंड व जेथें मुसलमान लोकांची वस्ती फार अशा प्रांतांत आपण राहिलों, तर आपलें संधान नीट जुळून चांगला डाव साधेल व लाहोरांत आपल्या लष्कराचा जो मोठा जमाव आहे, त्याशीं संबंध ठेवण्यास बिलकुल हरकत येणार नाहीं." असा अहमदशहाचा इरादा असल्यामुळें, त्यानें तेथें लष्करी तळ ठोकून चांगली मजबूत तटबंदीही केली होती.

मराठ्यांच्या हालचालीचें वर्तमान मुसलमानांस समज-तांच रोहिले व सुजाउद्दवला ह्यांस बरोबर घेऊन अह-मदशहा अनुप शहरांतून निघुन यमुनेकडे वळला. मराठ्यांचें शौर्य, धैर्य व बल अहमदशहास चांगलें माहीत होतें. समरचतुर व हिकमती मराठ्यांशीं लढाई करून त्यांत पराभव झाला, तर आपले हाल कुत्राहेखील खाणार नाहीं, आपली सर्व प्रकारें दुर्दशा होईल, आपल्यास जीव घेऊन पळतां भुई थोडी होऊन प्राण वांचतील किंवा नाहीं ह्याची भ्रांतिच! असें जरी त्यास

समजत होतें, तरी "होणार तें चुकत नाहीं." "मारूं किंवा मरूं" अशा विचारानें तो कुंजपूर व दिल्ली ह्यांच्या मध्यभागीं छावणी देऊन पुढें काय परिणाम होतो तो पहावा, इतक्याच फिकिरींत होता.

मराठे आणि मुसलमान आपआपल्या डाव-पेंचाची तर्तरीत तयारी करून लढाईस प्रवृत्त झाले. मराठ्यांनीं मोठ्या जोमानें व चांगल्या तयारीनें कुंजपुरावर हल्ला केला. तरवारींच्या खणाखणीनें, बाणांच्या वर्षावानें व बंदुकींच्या गोळ्यांनीं शत्रु कोण आणि मित्र कोण हें ओळखतां येईना! "हरहर महादेव" आणि "या अल्ला इलाही" इत्यादि अनेक उत्साहप्रपूरित व शौर्यजनक शब्दांनीं दाही दिशा दणाणूं लागल्या. इब्राहीमखान गारद्याच्या, तोफांच्या गोळ्यांनीं भूकंप होतो कीं काय, असा भास झाला. धुरानें आकाश व जमीन हीं एकच झालीं. हजारों मानव वीरांचें रक्त भूमातेच्या अंकावर पडूं लागलें. सहस्रावधि शिरकमलांची भूदेवीच्या कंठांत अस्ताव्यस्त माळाच पडली. जलधारा वर्षाव करणारा वर्षाऋतु संपतांच, रक्तवर्षाव करणारा कोणता नवीन ऋतु लागला, हेंच समजेना! तोफांच्या अनिवार गोळ्यांनीं तटबंदी जमीनदोस्त झाली. 'मारीन किंवा मरेन' अशा उमेदीनें दोन्ही सेना घनघोर युद्ध करीत होत्या. शेवटीं मुसलमानांस कापून काढून मराठ्यांनीं कुंजपूर सर केलें.

परंतु, विजयी मराठ्यांचा सूड उगविणारा अहमदशहा जवळच होता. कुंजपूरच्या युद्धांत जरी त्याचा पराभव झाला, तरी तो मुळींच डगमगला नाहीं. त्यानें मराठ्यांचा संहार करीन अशी प्रतिज्ञा केली; आणि मृत्युमुखांतून

वांचलेल्या लष्करास, 'नदीपलीकडे जा' असा हुकूम दिला. सेवकास धन्याची आज्ञा शिरसावंद्य करणें भाग. मग, ती आज्ञा तो विचारानें करो किंवा अविचारानें करो. कारण, धन्याचा कोणी धनी नाहीं. अहमदशहाच्या हुकुमाप्रमाणें बहुतेक लष्कर येत असतांना कित्येक लोक नदींत बुडाले. नदीच्या तडाक्यांतून जे वांचले, त्यांची टेहळीवर ठेविलेल्या मराठ्यांनीं वाताहत उडविली. आणि कित्येक, मराठे लोक जयजयकारानें विजयनाद करीत येत होते, तिकडे गेले.

अनेक कारणांमुळें आह्मांस येथें पाल्हाळ करितां येत नाहीं, ह्यामुळें आम्ही फार दिलगीर आहों. तरी दोन्ही पक्ष लढाई करण्यास नाखुष होते. ते आपापल्या छावण्यांची दुरुस्ती व मजबुदी करूं लागले. येथूनच आपल्या कथानकास प्रारंभ होणार, किंवा मंगलाचरणाचें हेंच स्थळ होय. इतकें सांगून आतां आपण पुढें वळूं.

## प्रकरण ३ रें.

### अफगाणछावणीचा दरवाजा.

ह्या वेळीं अफगाण लोकांच्या छावणीच्या दरवाजापाशीं आपण उभी आहें, असें वैरागिणीस वाटलें. त्या दरवाजाजवळ जंगली झाडांची बरीच दाटी होती. दरवाजांतून आंत जावयास अडचण पडूं नये ह्मणून ती

तोडून बेतवार व्यवस्था केली होती. युद्धप्रसंगीं शत्रु-समुदायाच्या परम भयंकर माऱ्याच्या सपाऱ्यांतून आपला बचाव व्हावा, लहानमोठ्या तोफा आत्मसंरक्षणार्थ व शत्रु-नाशार्थ व्यवस्थित लागाव्या, आणि कठड्याच्या आंतील लोकांचें चांगलें संरक्षण व्हावें एतदर्थ मोठमोठ्या वृक्षांच्या खोडांचा छावणीसभोंवार वेढा घातलेला होता. त्याच्या आसमंतांत हिंदुस्थानच्या प्राचीन युद्धरीती-प्रमाणें वृक्षसमुदायाची बरीच दाट झाडी होती. छावणीच्या दरवाजांत युद्धोपयोगी सामानाच्या पुष्कळ गाड्या पडल्या होत्या. लांकडी कठड्यापुढें किल्ल्याचे तटासारखा मातीचा मजबूत व भव्य तट होता. त्याच्या आंत तोफखान्याची यथायोग्य रचना होती. त्यापुढें सफेत, हिरव्या, तांबड्या वगैरे चित्रविचित्र रंगांचीं निशाणें व बावटे फडकत होते. त्यांतच लहानमोठ्या तंबूंचे, निरनिराळ्या रंगांचे टोप दिसत होते. त्या सर्व देखाव्याकडे लक्ष्य लावून पाहिलें ह्मणजे असें वाटे कीं, हा एक बाजारच भरला आहे. आह्मीं पूर्वीं जें संभाषण सांगितलें, तें ह्या तंबूंपासून बऱ्याच लांबीवर चाललें होतें.

डाव्या बाजूनें शोभिवंत व चांगल्या कुशलतेनें तयार केलेलें उंच निशाण एका लहानशा टेंकडीवर फडकत होतें. त्या टेंकडीवर कित्येक हत्यारी आणि कित्येक बिन्-हत्यारी स्वार व शिपाई उभे होते. कित्येक हांतरीवर व जमिनीवर बसून खुशाल गप्पा-गोष्टी करीत होते. कित्येक झोंपीं गेले होते. कित्येक आजचा दिवस कसा-बसा गेला, उद्यांचा कसा उगवतो ह्या फिकिरींत होते. तेथें असलेल्या त्या लोकांच्या स्थितीवरून हे निशाण-

संरक्षक असावेत, असा कोणीही तर्क करिता. त्या लोकांत एक जवान शिपाई विडी ओढीत इकडून तिकडे आणि तिकडून इकडे घस्त घालीत होता. ह्यावरून तो छावणींतून बाहेर व बाहेरून छावणींत कोणी जा-ये करील, तर त्याच्या पहाऱ्यावर कसावा असें दिसे त्या शिपायापासून ब-याच अंतरावर कित्येक घोडेस्वार फिरत होते. अफगाण छावणीच्या दरवाज्यावर एक लाल रंगाचा भव्य बावटा होता, आणि त्यापुढें तीन जंगी तोफा होत्या.

अफगाणांनीं बैरागिणीस दरवाजापर्यंत आणल्यावर पहाऱ्यावरील शिपायानें आपल्या लोकांस ओळखिलें; परंतु त्याचें बैरागिणीकडे लक्ष्य गेलें नाहीं. पहाऱ्यावरून **खुदायार** व **दाऊद** बैरागिणीस घेऊन पुढें चालले, तों एका शिपायानें तिला पाहून ह्मटलें "थांबा. **खुदायार**, आपल्या छावणींत ही परकी स्त्री कोण व ही येथें कशी आली? हां समजलों! हीच आजची शिकार वाटतें! असली शिकार तुला सांपडली तरी कोठें?" **खुदायाराचें** नांव घेतांच आपला हक्क शाबीत करण्याकरितां **दाऊद** मोठ्या ऐटीनें पुढें आला आणि ह्मणाला "हँ खबरदार ही माझी शिकार आहे."

**खुदायार**—शरम भाइ शरम! बेशरमी, तूं खड्ड्यांत पडतास तर बरें होतें. मनुष्य-जन्मास आलास त्यापेक्षां फत्तर होतास, तरी देखील ही खोडसाळ कृति तुला शोभती ना. अक्कल मंद! ज्या आई-बापांच्या पोटीं तूं जन्म घेतलास, त्यांच्या तोंडास चांगला कलंक आणलास. नादान! चल हो पलीकडे.

**दाऊद**—बेवकूफ, संभाळ. जीभ आटोपून बोल. अशा अपवित्र तोंडानें माझ्या पवित्र मातापितरांचें नांव घ्यायला तुला शरम नाहीं वाटत?

याप्रमाणें तें प्रकरण अशा अरेतुरेवर व शिव्यागाळीवर येतांच तेथें पुष्कळ शिपाई जमले व कित्येक **दाउदाच्या** आणि कित्येक **खुदायाराच्या** अंगावर धांवले. आतां हातघाईवर येणार, इतक्यांत एक धिप्पाड शिपाई **दाउदाचें** सहाय करण्याच्या उद्देशानें पुढें सरसावून ह्मणाला "**दाऊद**, या भानगडीच्या व बिकट प्रसंगीं जो तुझें अंतःकरणपूर्वक हित करण्याकरितां छाती ठोकून पुढें आला, त्याला तूं विसरणार तर नाहींस ना?" असें बोलून तो मोठ्या त्वेषानें गर्दीत शिरतो तों, सर्वांनीं आपलीं हत्यारें उपसलीं; आणि जो तो **वैरागिणीस** आपल्याकडे ओढूं लागला. तेव्हां त्या बिचारीचा अगदींच नाइलाज होऊन "दाशरथे! तूं अनाथांचा प्रतिपालक ह्मणवीत असून त्या ब्रीदाचा तुला ह्या वेळींच विसर पडला काय? ह्या मानवी राक्षसांच्या त्रासांतून मला कोणी तरी सोडवा. भगवंता! धांव आतां. तुझ्यावांचून या दासीची सुटका करण्यास दुसरा कोणीही समर्थ नाहीं." अशा दीन स्वरानें ओरडूं लागली.

इतक्यांत दरवाजावरील बडा अंमलदार आपल्या हातांतील हत्यार चमकावीत तेथें आला. त्यानें दोन वेळ मोठ्यानें ओरडून भांडणाचें कारण विचारिलें. परंतु, त्याला कोणीच जबाब देईना व त्याच्या प्रश्नाकडेही कोणाचें लक्ष्य जाईना. तेथें जमलेले सर्व शिपाई मारामारी करण्याच्या विचारांत होते. आतां ते हत्यारांचा

उपयोग करणार, इतक्यांत तो अंमलदार राक्षसासारखा एकदम ओरडला. तेंव्हां दाउदानें त्याकडे पाहिलें आणि मोठ्यानें ह्मटलें "मीन लुतुफउल्लासाहेब, हे सैतानाचे कुत्रे पहा" नितक्यांतच जवळच्या एका शिपायानें "तुझे बाप दादा सैतान" असा जबाब दिला. आणि दुसऱ्यानें "तूं त्यांचा कुत्रा" असें ह्मणून पहिल्याचें वाक्य पुरें केलें. तें ऐकून तिसरा एक इसम मोठ्यानें ह्मणाला "खबरदार. आतां येथें सैतानाचें नांव कोणी घेतलें?"

दाऊद—मीं.

लुतुफउल्ला—(पुनः) तें कां?

दाऊद—मी बाहेर फिरत असतांना ही तरुणी मला सांपडली. तिजवर माझा हक्क असतांना, हे बेशरम विनाकारण बेदा माजवितात. तेंव्हां सैतान नव्हे तर कोण? त्याचे बाप?

लुतुफउल्लाहखानाच्या मनांत त्या सर्व शिपायांस दरडावून लावून मधेंच आपलें कांहीं साधतें कीं काय पहावें असें होतें. परंतु, तो साधारणतः मोठा अधिकारी असल्यामुळें त्यास स्पष्टपणें कांहींच बोलतां येईना, आणि युक्तिप्रयुक्तीनें किंवा धाकानेंही आपला मतलब साधेल असें वाटेना. ह्यामुळें चौकशी करून कांहीं लाग साधल्यास पहावें, अशा इराद्यानें तो ह्मणाला "अरे, ह्या स्त्रीवर तुमचा हक्क कसा पोंचतो? तुह्मी हिला लढाईंत तर धरिली नाहीं. "गरीब रयतेस विनाकारण त्रास देऊं नका." असा बादशहाचा सक्त हुकूम तुह्मी विसरलां वाटतें!"

**दाउदाच्या** मनांत हरतऱ्हा करून त्या वैरागिणीस आपल्या घरांत घालावयाची होती. आपण पकडलेली शिकार दुसऱ्याच्या हातीं गेली तर आपल्या शिपाईबाण्यास फुकटचें लांछन लागून "तेल गेलें, तूप गेलें, आणि धुपाटणेंही हातीं राहिलें नाहीं," अशी फजीती होणार, ह्या भीतीनें त्यानें दुसरीच शक्कल काढिली. तो ह्मणाला "ही मूर्तिपूजक आहे—काफर आहे. हिला सन्मार्गास लावणें हें आमचें कर्तव्य आहे, आणि आपल्या शास्त्रांतही असेंच सांगितलें आहे."

आपल्या धमकावणीनें **दाऊद** वळत नाहीं असें **लुतुफउल्लास** वाटतांच त्यानें दुसरी युक्ति लढविली. तो ह्मणाला "हो, मोठा धर्मात्मा! तुला माहित नाहीं वाटतें? कोणत्याही स्त्रीला छावणींत घेऊं नये, असा **बादशहाचा** हुकुम आहे. मी दरवाजावरील मुख्य अंमलदार. तेव्हां माझ्या परवानगीवांचून तूं तिला आंत घेऊन जाशील, तर खबरदार!"

**खुदायार** इतका वेळ स्वस्थच होता. मग तो, **दाऊद** त्या अंमलदाराबरोबर भांडत होता ह्मणून असो, किंवा ह्या वादाचा काय तो निकाल झाला ह्मणजे मग पाहतां येईल, अशा समजुतीनें असो. त्यानें त्या कलहांत तोंड घातलें नाहीं, इतकें खरें. **लुतुफउल्लानें** "स्त्रियांस छावणींत घेण्यास **बादशहाची** मनाई आहे" असा कोरा जबाब सांगतांच **दाउदाचें** धाबें गडबडलें. पुढें काय करावें, हें ही त्यास सुचेना. त्याबरोबर जवळ जमलेल्या शिपायांनीं **दाऊद** व **खुदायार** यांची फजिती करण्याकरितां "ह**जरतखान** साहेबांचें ह्मणणें रास्त आहे" अशी एकच

आरोळी केली. कित्येक मोठ्यानें ओरडून ह्मणाले " हिला तुह्मीं आंत घेऊं नका. आमच्या स्वाधीन करा; ह्मणजे आह्मीं तिला जंगलांत नेऊन पोंचवूं "

**दाउदानें** विचार केला कीं, आतां ही **वैरागीण** आपल्या हातीं लागत नाहीं. तेव्हां हिला दुसऱ्याचे हातीं देण्यापेक्षां जगांतूनच नाहींशी करून कज्जाचें मूळ काढून टाकावें, असें मनांत आणून त्यानें आपल्या कमर-पट्ट्यांतून तरवार बाहेर काढिली; आणि एकदम त्या **वैरागिणीस** ठार मारण्याकरितां उगारिली. इतक्यांत **खुदायार** आणि **लुतुफखान** ह्या दोघांनींही एकदम त्याचा हात धरिला. त्यावेळीं त्या **वैरागिणीची** काय दशा झाली असेल, ही कल्पना प्रिय वाचकांनींच करावी.

**दाऊद** बराच निराश झाला असें **लुतुफउल्लास** वाटतांच तो मोठ्यानें ह्मणाला, " **दाऊद**, तुझ्यासारखा मूर्ख मनुष्य मी कोठेंच पाहिला नाहीं. तूं **शहास** ओळ-खतोस? कोणत्याही स्त्रीला छावणींत घेऊं नये, असा त्याचा हुकूम तुला माहीत नाहीं वाटतें? "

**लुतुफउल्लाचें** रागीट भाषण ऐकतांच, **दाऊद** पुन्हां अर्जवानें ह्मणाला " मला **शहाच्या** सर्व आज्ञा माहीत आहेत; पण त्या केवळ मजसारख्या गरीबाकरितांच मा-त्र नव्हेत. "

**वैरागिणीस** मारण्याकरितां **दाउदानें** तरवार उगा-रिली, तेव्हां **खुदायार** तिच्या संरक्षणास सिद्ध झाला; परंतु तिचें संरक्षण करण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं नव्ह तें. **लुतुफउल्लाची** पक्की खातरी होती कीं, त्यांनीं जरी

वाटेल तितकी तकरार केली, तरी **बैरागिणीस** छावणींत जाऊं देणें अथवा न देणें, आपल्या स्वाधीन आहे.

इतका हा प्रकार चालला आहे तों, **लुतुफउल्लाचा** वरिष्ठ अधिकारी तेथें आला. त्याच्या मनांत दया उत्पन्न जाहल्यास तो करील तें होण्यासारखें आहे, असें **बैरागिणीस** वाटून ती दीन स्वरानें ह्मणाली "**खान** साहेब, मीं कंगाल भिकारी आहें. माझें रक्षण करा."

आतां ह्या भांडणाचा विचार करूं लागलों, तर तें संपतां संपणार नाहीं; कारितां त्याचा थोडक्यांत निकाल लावूं.

**लुतुफउल्लाच्या** मनांत **बैरागीण** आपल्या हातीं लागावी, असें होतें. आपली कोणतीच युक्ति किंवा भाषण **लुतुफउल्ला** ऐकत नाहीं असें **दाउदास** वाटतांच त्यानें **बैरागिणीस** आतां जिवंत ठेवावयाची नाहीं, असा निश्चय करून पुन्हां तिजवर हत्यार उगारिलें. तसाच प्रकार **खुदायाराचा**. त्यानेंही आपली सुरी बाहेर काढिली. **दाऊद** व **खुदायार बैरागिणीस** ठार मारणार इतक्यांत एकाएकीं "रस्ता सोडा, रस्ता सोडा." असा रागीट व अधिकाराचा शब्द त्यांच्या कानीं पडला. तेथें जमलेल्या लोकांचें लक्ष तिकडे जातें न जातें तों चार घोडेस्वार आणि कित्येक शिपाई, हुजरे व भालदार छावणीच्या दारांत येऊन थडकले.

**दाऊद** व **खुदायारानें बैरागिणीस** ओढ्यांत धरिली तेव्हां त्यांच्या दृष्टीस जे घोडेस्वार पडले, तेच हे. त्यांतच **अहमदशहाही** होता. त्याचा चेहरा भव्य व पौरुषसंपन्न दिसे. त्याची आंखुड व पिळदार दाढी, आणि

लांब व कल्लेदार मिशा, त्याच्या मुखश्रीस शोभा देत. त्याचे नेत्र पाणीदार होते. कपाळ विस्तृत होतें. कमरेस रेशमी कमरपट्टा असून त्यांत कित्येक लहान मोठीं हत्यारें लटकत होतीं. डोक्यावर लाल रंगाची रुमी टोपी असून तिजवरून काश्मिरी शाल गुंडाळिली होती. अंगांत एक पायघोळ अंगरखा होता. गळ्यांत हिऱ्यां-मोत्यांचे अलंकार होते. पायांत शोभिवंत इजार असून पादरक्षणार्थ कुशल कारागिरानें तयार केलेला जोडा चढविला होता. त्याचा घोडा चपल व धन्याचा हेतु जाणून वागणारा होता, असा दिसे.

त्याच्या उजव्या बाजूस जो घोडेस्वार होता, तोही उंच, स्थूलोदर व मजबूत होता. त्या वेळीं त्याच्या वयास सुमारें पंचावन वर्षें होऊन गेलीं असावींत, इतका अदमास दिसे; तरी त्याचा चेहरा फार तेजस्वी होता. मस्तकावर सफेत पगडी बांधली होती. त्याचें नाक सरळ, नेत्र विशाळ व कपाळ रुंद होतें. त्याच्या गळ्यांत हिरे, माणीक व मोतीं ह्यांचे अलंकार होते. अंगावरील झगा सोनेरी कलाबतूनें गुंफला होता. हिऱ्यां-मोत्यांनीं गुंफलेली काश्मिरी शाल त्याच्या उजव्या खांद्यावरून रुळत होती. कमरपट्ट्यांत एका बाजूस तरवार व दुसऱ्या बाजूस पिस्तोल होतें. पायांत पायमोजे चढवून त्यावर त्यानें इजार घातली होती. त्याचा घोडा व जीन चांगलें दिसे. हा घोडेस्वार लखनौचा सुभा. हिंदुस्थानांतील बलवान् सुभ्यांत त्याची गणना असे. त्याचें नांव **सुजाउद्दवला**.

डाव्या बाजूचा स्वार एकदां हिंदुस्थानची बादशाही

मिळविण्याचा प्रयत्न करणारा नजीबउद्दवला. हा अमीर-उल-उमराव रोहिलखंडाचा मुख्य सुभा होता. यानें आजपर्यंत पन्नास लढाया मारल्या हात्या. त्या वेळच्या स्वारांत ह्याच्या जोडीचा दुसरा कोणीच नव्हता. त्याच्या आरक्त नेत्रांकडे पहातांच हा जबरा लढवय्या असावा, असें दिसे. त्याच्या मस्तकावर बहुमोल टोपी, अंगांत अंगरखा व त्यावर चिलखत होतें. उजव्या हातांत चकचकीत व लांब भाला होता. कमरपट्ट्यांत तरवार व भरलेलें पिस्तोल होतें. त्याचा पंचाळी घोडा चांगला पाणीदार दिसे.

त्याच्या मागें बरेलीचा हाफीजरहिमत होता. हाच हाफीजरहिमत, वारनहेस्तींग्जच्या कृष्णकारस्थानांत अधमाधम कर्मांत पुढें चांगला प्रसिद्धीस आला. हा गाडी घोड्याचा फार शोकी असे. त्याचा चेहरा चंचल दिसे. जवळच्या लोकांची परीक्षा करण्यांत ह्याचा हात धरणारा कोणी नव्हता. गोविंदपंत बुंदेला गंगा नदी उल्लंघन करून जात असतांना ह्या हाफिजरहिमतनें त्याची जी घोडी धरिली होती, तिजवरच हा रोहिल्यांचा सरदार बसला होता. फक्त बसावयाच्या घोड्यांशिवाय नजीबउद्दवला व हाफीजरहिमत ह्यांच्यांत फारशी तफावत नव्हती.

चारी घोडेस्वारांच्या पुढें व बाजूस पायांनीं चालणारे शिपाई होते. सर्वांपुढें चोबदार आदब पुकारीत होता. त्यानें आपल्या हातांतील छडीनें जमलेल्या गर्दीतील लोकांस इशारत देतांच बादशहास पाहून त्या टोळीचे दोन भाग झाले.

# प्रकरण ४ थें.

## गायन.

**अहमदशहा**—काय गडबड आहे ही?

हे बादशहाचे शब्द ऐकतांच भांडणांत निमग्न असलेल्या मंडळींनीं त्यास सलाम केला आणि लीनतेनें खालीं मान घालून सर्व जण उभे राहिले.

**लुतुफउल्लाह**—खाविंद,—

त्याचें भाषण पुरें जाहलें नाहीं, तों मध्येंच बादशहानें ह्मटलें. "खानसाहेब, तुमच्या पाहऱ्यावर अशी दंगल माजणें फार वाईट."

**लुतुफ०**—दरियाएफेन, (दयासागरा,) या हराम खोरांच्या तंट्याचा मी निकाल करीत होतों, इतक्यांत सरकारची स्वारी आली.

**अहमदशहानें** करड्या नजरेनें त्या भांडखोरांकडे पाहिलें, त्या बरोबर ते गर्भगलित होऊन सर्वांनीं माना खालीं घातल्या आणि आपण अन्यायी आहों असें दर्शविलें.

**अहमद०**—छावणींत कोणत्याही स्त्रीस आणूं नये, अशी माझी आज्ञा असून हें काय? हरामांनों, मला वाटतें, ही स्त्रीच ह्या धांदलीचें मुख्य व खरें कारण असावी; खरें कीं नाहीं? तिला त्या दुष्टांच्या हातून सोडवा, आणि बांधा त्या गुलामांच्या मुस्क्या.

बादशहाचा इतका हुकूम होतांच **दाऊद** व **खुदा यार** या दोघांच्या मुस्क्या आंवळल्या व त्यांस बादशहा-

पुढें नेलें. तेव्हां अर्थातच बैरागीण त्यांच्या तावडींतून मुक्त झाली.

**बादशहा**—अरे, तुह्मी काय करीत होतां; आणि हिला कोठून आणिली?

**दाऊद**—खाविंद, आह्मी युसफशाई वंशांतील शिपाई आहों. खुदा व पैगंबराच्या फरमानाप्रमाणें ही आह्मांस मिळालेली दासी आहे.

अहमदशहास आपल्या सर्व लोकांचा फार अभिमान असे. त्यांत प्राचीन वंशांतील लढाऊ लोकांविषयीं त्याच्या मनांत विशेष पूज्यबुद्धि होती. आपल्या लोकांनीं सभ्यतेनें व मर्यादेनें वागावें, विनाकारण दुसऱ्यास त्रास देऊं नये, गोरगरिबांस यथाशक्ति साहाय्य करावें, स्वधर्माभिमान धरून त्या प्रमाणें वर्तन करावें, शेतकऱ्यांस आपल्या सैन्यानें लुटूं नये, कोणावर जुलूम होऊं नये, अशी त्याची इच्छा असे व त्या प्रमाणें त्याचे हुकूमही कडक असत. तशांतही आपले लोक अन्यायाचरण करणार नाहींत, किंवा आपल्या आज्ञेचें उल्लंघन करावें असें त्यांच्या मनांत येणार नाहीं, अशी त्याच्या मनाची पक्की खातरी होती. आपल्या लष्करांत वेश्या किंवा व्यभिचारासक्त दुष्ट स्त्रिया आणणें किंवा त्यांशीं हास्य-विनोदादि अश्लाघ्य क्रीडा करणें, अशा गोष्टींचा तो फार तिरस्कार करी. आपल्या हुकुमाविरुद्ध जो वर्तन करील, त्यास कडक शिक्षा करण्यास तो कधींही कमी करीत नसे. आपल्या आज्ञेचें उल्लंघन कसें झालें, ह्याविषयीं किंचित् विचार करून तो ह्मणाला. "बस्स, मी विचारतों तितक्याच प्रश्नांचा खरा असेल तो जबाब द्या. खोटें सां-

गणारांस मी कशी कडक शिक्षा करितों, याचा अनुभव तुह्मांस असेलच. तुह्मीं या स्त्रीला कोठें पकडली व तिजवर इतकें तुफान करण्याचें कारण काय? तुह्मीं कोठें गेलां होतां व ही तुमच्या हातीं कशी लागली? वगैरे सर्व खरा वृत्तांत असेल तो सांगा." बादशहाच्या प्रश्नांचा कांहींच जबाब त्यांच्यानें देववेना. कांहीं वेळ ते स्वस्थ होते. बादशहाकडे पहाण्याचेंही धैर्य त्यांस होईना. तेव्हां बादशहाचीही वृत्ति पालटली.

**लुतुफउल्ला**—( आदबतेनें पुढें होऊन ) हे **उमरखान** यूसफझाईच्या तैनातींतील शिपाई असावे. ह्यांची आज बाहेर फिरण्याची पाळी होती.

**बादशहा**—आतां तुह्मीं जें सांगितलें, त्याविषयीं तुमची पक्की खातरी आहे?

**लुतुफउल्ला**—पन्हाहे आलम, ( जगास अन्न देणाऱ्या ) ह्या लोकांस मी चांगला ओळखितों. बहुतांशीं माझें ह्मणणें खरें असावें, असें मला वाटतें.

**बादशहा**—बरें; **लुतुफउल्लाह**, ह्यांची नेहमीची चाल-चलणूक कशी आहे? ( **दाऊद** व **खुदायार** यांकडे वळून ) तुह्मीं **उमरखानाच्या** ताब्यांतील शिपाई काय?

**दाऊद**—सरकार, होय.

**बादशहा**—तर मग तुह्मीं मुळचेच लुटारू टोळींतील. बरें; तुह्मीं आज गस्त घालीत होतां काय?

**दाऊद**—होय खाविंद.

**बादशहा**—मग तुमचें कर्तव्य सोडून तुह्मीं या स्त्रीची शिकार शोधण्यास कसे गेलां? बेशरम, तुह्मीं हिला कोठें धरिली?

**दाऊद**—सरकार, आह्मीं घस्त घालीत असतांना ही छावणी जवळील ओढ्यांत आमच्या दृष्टीस पडली.

**बादशहा**—तर मग ही कोणाची तरी सांडलेली स्त्री असेल.

**दाऊद**—ही आमच्या छावणीकडे येत होती, ह्यावरून ही जासूद असावी, अशा समजानें आह्मीं हिला पकडली.

हा **दाउदाचा** नवीन विचार आत्मसंरक्षणास सयुक्तिक होता. ह्या **दाउदाच्या** जबाबानें **लुतुफउल्ला** फिका पडला; इतकेंच नव्हे तर अनुभवी व दूरदर्शी **बादशहा** देखील चकित् झाला. **दाउदाच्या** प्रत्येक शब्दावरून आणि मुखश्रीवरून **बादशहाची** बालंबाल खातरी झाली कीं, हा मनुष्य फार लबाड असावा; परंतु पुराव्यावांचून शिक्षा करणें, किंवा त्यास सोडून देणें यांपैकीं कोणतेंही **बादशहास** योग्य वाटेना. **दाऊद** तर **बादशहाच्या** प्रत्येक प्रश्नाचें समर्पक उत्तर देत असे. शेवटीं **अहमदशहा** आपल्या बरोबरच्या लोकांकडे पहात बराच वेळ स्तब्ध राहिला. त्यावरून असें दिसलें कीं, तो **दाउदाच्या** जबाबाचा विचार करीत असावा. इतक्यांत—

**लुतुफउल्ला**—खाविंद, ही स्त्री जासूद किंवा हेर आहे, असें ह्यानें मला मुळींच सांगितलें नाहीं. शराहाच्या हक्काप्रमाणें ही आपली आहे, इतकाच ह्याच्या सांगण्याचा मतलब होता. पूर्वींच्या सांगण्यास आणि आतांच्या सांगण्यास जमीन-अस्मानाचें अंतर आहे.

माझें आर्जव करून तिला आपल्या छावणींत जाऊं देण्याविषयीं तो मला मतलबाच्या अनेक गोष्टी सांगत होता. "तुह्मीं उभयतांस छावणींत जाऊं दिलें, तर ही स्त्री उदईक मी तुह्मांस देईन," असेंही तो बोलला. ह्यावरून त्याचा हेतु कोणत्या प्रकारचा होता, हा विचार खाविंदांस सहज करितां येण्यासारखा आहे.

**बादशहा**—कायरे हरामखोर, **लुतुफखानानें** सांगितलें तें खरें कीं नाहीं? आतां तुझी सर्व लुच्चेगिरी आणि खोटसाळपणा उघडकीस आला. तूं खोटें सांगितलेंस इतकेंच नव्हे, तर सरकारी नियमाचा अनादर करून **लुतुफखानास** लांच देण्याचाही प्रयत्न केलास, हें निर्विवाद शाबीत होतें. लुच्चांनों, असें नीच कर्म करितांना तुमच्या मनांत भय कसलें तें वाटलेंच नाहीं काय? बरें आहे; कोण आहेरे तिकडे?

**शिपाई**—हुकूम, सरकार.

**बादशहा**—या हरामखोरांस घेऊन वजीराकडे जा आणि त्याला सांग कीं, या नीचांस **उमरखानाकडे** पाठवा. कारण हे त्याच्या ताब्यांतील शिपाई आहेत. ह्यांनीं आपलें काम सोडून एका गरीब स्त्रीवर विनाकारण जुलूम केला, खोटें सांगितलें, आणि आपलें नीच कृत्य छपविण्याकरितां लांच द्यावयासही हे तयार झाले. **उमरखान** यांस योग्य शिक्षा करील, समजलें? जा; ह्यांस दोन दिवस पर्यंत अगदीं अन्न-पाणी न देतां ठेवावें व तिसरे दिवसापासून पुढें माझा दुसरा हुकूम होईपर्यंत एकदांच अन्न द्यावें, असें **उमरास** कळीव. ह्यांना ह्यापेक्षांही कडक शिक्षा पाहिजे होत्या; नाहींतर हे मदांध शिपाई आपलें

काम टाकून लोकांच्या स्त्रियांस वारंवार बळजोरीनें धरून आणण्यास चुकणार नाहींत.

**दाऊद** व **खुदायार** या दोघां त्रासदायक अपराध्यांचा निकाल करून **बादशहानें वैरागिणीकडे** पाहिलें. तिनें दोन्ही हात जोडून लीनतेनें **बादशहास** सलाम करून ह्मटलें "महाराज, मीं एक गरीब अबला आहें. माझे आई-बाप येथून फार दूर आहेत. परलोकीं ईश्वर, आणि इहलोकीं तुह्मीं, माझें रक्षण करणार. मीं लष्करी छावण्यांतून किंवा गांवगन्ना वीन वाजवीत व गात फिरतें, आणि कोणी भाकरी तुकडा देतात त्यावर चारितार्थ चालवितें. आमचे हिंदु लोक आह्मांसारख्या कंगाल भिकाऱ्यांस दुःख देत नाहींत इतकेंच नव्हे, तर आह्मां सारख्यांच्या पालन-पोषणांत त्यांची दक्षता नांवाजण्या सारखी असते. महाराज, खरोखर त्यांच्या उदारतेची जितकी तारीफ करावी, तितकी थोडीच! पण तुह्मीं पडलां परकी. आमच्या रीति-भाति, भाषा अथवा आचार-विचार तुह्मांस माहीत नाहींत; यामुळेंच संशय धरून तुमचे शिपायांनीं मला व्यर्थ इकडे धरून आणिली. तुह्मांसारखे दयाळु धनी, दीन-संरक्षक, व हरीचे लाल या पृथ्वीवर वास्तव्य करीत आहेत ह्मणूनच मजसारख्या अनाथाचा प्रतिपाळ होतो. तुह्मीं थोर व मीं ह्मणजे केवळ तुमच्या चरणाची यःकश्चित धूळ. मजवर दया करून आपण जी माझी मुक्तता केली, त्याविषयीं मीं जितकी तुमची स्तुति करीन व आभारी होईन, तितकें थोडेंच. जगदीश तुह्मांस उदंड आयुष्य देवो.

**वैरागिणी**ची हिंदुस्थानी भाषा **अहमदशहास** पुर-

तीशी समजली नाहीं. त्यानें त्याचा मतलब सांगण्याविषयीं सुजाउद्दवल्यास विनंती केली; परंतु त्यालाही बैरागिणीच्या भाषणाचा चांगलासा अर्थ समजला नव्हता. सुजाउद्दवला बराच वेळ स्वस्थ राहिला. त्याला आपणास कांहीं समजलें नाहीं, असें सांगतां येईना. जर त्याला कांहीं समजलेंच नव्हतें तर बैरागीण काय ह्मणाली, हें तो सांगणार तरी कसें? तो बादशहाच्या तोंडाकडे पहात स्तब्ध राहिला. नजीबउद्दवल्याचा दक्षिणी लोकांशीं विशेष परिचय होता. त्याला हिंदुस्थानी भाषा चांगली समजत असे. सुजाउद्दवला कांहींच बोलेना असें पाहून त्यानें बैरागिणीचें सर्व भाषण बादशहास पार्शीत खुलासेवार सांगितलें.

अहमदशहा—बरें तर; आतां तिला इतकेंच विचारा कीं, तुला पकडलें तेव्हां तूं कोठें जात होतीस? आणि आमच्या छावणीकडे येण्याचें कारण काय?

नजीबउद्दवल्यानें बादशहाच्या प्रश्नांचें हिंदुस्थानींत भाषांतर करून बैरागिणीस तेच प्रश्न विचारिले. तेव्हां बैरागीण ह्मणाली, "मी मराठे लोकांच्या छावणींत जात होत्यें. महाराज, आह्मां हिंदुलोकांच्या लष्कराकडे जाण्याचा माझा हेतु होता. जेथें आमची भाषा समजत नाहीं, जिकडे मजसारख्यास अन्न-पाणी मिळण्याची मारामार, तिकडे येण्याचें मला कांहीं एक कारण नव्हतें."

नजीबउद्दवला—जहानपन्हा, हिंदु लोकांपैकीं ही एक जात गाऊन व वाजवून आपला निर्वाह करीत हिंडत असते. त्यांचें भटकणें बहुधा लष्करी छावणीजवळ असतें. शिपायांपुढें गाणें-बजावणें केलें, ह्मणजे ते खुशीनें

त्यांस अन्न-पाणी व कांहीं बक्षीस देतात. त्यावर कसा-बसा काळ काढण्यास ह्यांस जड जात नाहीं. एखादे वेळीं प्रेमांत विघ्न येतें, तेव्हां स्त्रिया बहुधा बैरागिणी होतात.

हाफीजरहिमत—आपल्या लोकांनीं निरपराध या **बैरागिणीस** त्रास दिला. त्या हरामांचा हेतु फार नीच होता, ही मोठ्या शरमेची गोष्ट होय. इतके दिवस आपले बादशहा हिंदूंस मुसलमान करीत होते; आतां ती बाकी मुसलमानांचे हिंदु करून **भाऊसाहेब** पेशवा फेडीत आहे.

सुजाउद्दवला हळच ह्मणाला "आमीन" (तसेंच.)

अहमदशहा—त्या हरामखोर शिपायांनीं गरीब बैरागिणीस फार छळिलें असावें, असें तिच्या चेहऱ्यावरून दिसतें. **नजीबखान**, तिला विचारा बरें. तिची जात बिघडविण्याचा तर त्या दुष्टांनीं प्रयत्न केला नाहींना ?

**बैरागीण**—(नजीबखानाचें भाषण ऐकून) साहेब, जगदीशाच्या कृपेनें माझ्या एका केंशास देखील धक्का लागला नाहीं; पण आपली स्वारी जर ह्या मार्गानें आणखी कांहीं वेळ न येती, तर मात्र पुढें काय झालें असतें, तें माझ्यानें सांगवत नाहीं. ईश्वर तारणारा असला, ह्मणजे मनुष्यावर कसलींही संकटें आलीं तरी तो त्यांतून पार पडतो.

अहमदशहा—बरें; खुदाच्या मेहरबानीनें जें झालें तें सर्व ठीक झालें. **खानसाहेब**, ह्या बैरागिणीचा गाण्याचा धंदा आहे, असें तुह्मी सांगतां; तर ही कसें काय गाते तें ऐकावें, अशी माझी इच्छा आहे.

नजीबउद्दवल्यानें बादशहाच्या ह्मणण्याचा तर्जुमा करून **बैरागिणीस** सांगितला; तेव्हां **बैरागीण** ह्मणाली,

"जशी महाराजांची आज्ञा. माझी वीन तुमच्या शिपायांकडून देवविल्यास मीं आपल्या आज्ञेची तावेदार आहें"

दाउदास पकडलें, तेव्हां त्याकडून काढून घेतलेली वैरागिणीची वीन नजीवउद्दवल्याच्या पुढें पडली होती, ती तिच्या स्वाधीन केली. ती घेऊन वैरागीण खालीं बसली. ओढाताणींत वीनच्या खुंट्या व तारा ढिल्या झाल्या होत्या, त्या तिनें नीट केल्या; आणि आपल्या सुरावरोवर वीनचा सूर जमविला. वीन वरोवर लागली असें वाटतांच ती उठून उभी राहिली. तिनें फार नम्रपणानें सर्वांस सलाम केला; आणि आपल्या खांद्यावर वीन नीट धरून ती गाऊं लागली.

हिंदुस्थानांत गानांना जीं वाद्यें वाजवितात, त्यांत वीनची वरोवरी कशासच कारितां येणार नाहीं; असा केवळ आमचाच अभिप्राय आहे असें नव्हे, बहुधा प्रत्येक देशांतील लोक आमच्या वीनची तारीफच कारितात. आधींच वीनचे स्वर चांगले, त्यांत ती वैरागीण वाजविण्याच्या व गाण्याच्या कामांत मुरून गेलेली. तिनें त्या वेळीं उचित असें एक मल्हारांतील हिंदुस्थानी पद ह्मटलें. मल्हार या रागास आपल्या देशांतील लोकांपेक्षां परदेशी लोक फार खुप होतात. त्या रागाची मधुरता, त्याचे कोमल व तीक्ष्ण, चढते व उतरते, करुणारस खुलविणारे स्वर ऐकतांच सर्व लोक अत्यानंदांत गर्क झाले. बहुतेक श्रोत्यांस तिच्या गायनाचा अर्थ समजत नव्हता; परंतु त्यांतील एखाद्या शब्दाचा अर्थ समजला ह्मणजे तो, ते लक्षपूर्वक ऐकूं लागत. लौकरच तेथें पुष्कळ अफगीण जमले. ते गायनश्रवणानें आनंदित होऊन वैरागिणीकडे सदय

अंतःकरणानें पाहूं लागले. **लुतुफउल्लाह** तर देहभान विसरून गेला. गाणें खलास झालें. बैरागिणीनें वीन खालीं ठेविली. अहमदशहानें तिच्या गायनाचा भावार्थ नजीबउद्दवल्यास विचारिला तेव्हां तो ह्मणाला, "खाविंद, हें एक प्रीतिपद्य आहे. ह्यांत एक तरुण व सुंदर स्त्री आपल्या प्रियकराच्या वियोगजन्यदुःखानें विलाप करीत आहे, असें वर्णन केलेलें आहे."

**बादशहा**—खरें आहे; आतां मी समजलों. आमच्या भाषेंत देखील अशीं पद्यें पुष्कळ आहेत. शाबास! ही चांगली गाणारी आहे. पण आतां पुढें हिचें काय करावयाचें?

**सुजाउद्दवला**—काय? करावयाचें काय? तिला सुरक्षितपणें मराठ्यांच्या छावणींत पोंचती केली, ह्मणजे झालें.

**लुतुफउल्लाह**—मालिक, खाविंदांस आतां हिची सर्व हकीगत समजली. न जाणो कदाचित् ही जासूद देखील असण्याचा संभव आहे. तेव्हां, आज्ञा होईल तर मी हिला दोन तीन दिवस येथेंच माझ्या देखरेखी खालीं ठेवीन.

**अहमदशहा**—छे! भलत्याच संशयानें. त्या गरीब बिचारीस येथें ठेवण्याचें कारण दिसत नाहीं. कोणी मनुष्य बरोबर देऊन तिला छावणीबाहेर पोंचवावी, हें बरें. लुतुफ, कोणी तिच्या केंशास धक्का लावील किंवा त्रास देईल, तर त्यावर तुझी नजर असूंदे.

**हाफिजरहिमत**—मी खाविंदांस सुचवावें, असें नाहीं. ज्या अर्थीं आपण हिचें गायन ऐकिलें आहे, त्या अर्थीं तिला कांहीं तरी बक्षीस दिलें पाहिजे.

**अहमदशहा**—होय, सूचना योग्य आहे. (मागें पाहून) बेहेरिन, आपली सदोदित आठवण राहील, असें हिला कांहीं तरी चांगलें इनाम देण्याविषयीं वजिरास सांग.

अहमदशहाच्या नोकरानें वजिरास बादशहाचा निरोप कळवून एक मौल्यवान सुवर्णाची हिरेजडित आंगठी व बऱ्याच मोहरा त्या **बैरागिणीस** आणून दिल्या. शहाकडून विदायगी पोंचतांच **सुजाउद्दवला, नजीबखान, हाफीजरहिमत** व तेथें जमलेल्या इतर लोकांनीं आपल्या शक्तिप्रमाणें कोणी कांहीं कोणी कांहीं, याप्रमाणें तिला देणग्या दिल्या. **बैरागिणीच्या** पुढ्यांत ह्मा ह्मा ह्मणतां कित्येक वस्तूंचा ढीग पडला. त्यांत कित्येक रुपये, पुतळ्या, मोहरा, आंगठ्या वगैरे बऱ्याच मौल्यवान वस्तु होत्या. इतकें होत आहे, तों बादशहाची स्वारी तेथून चालती झाली व **लुतुफउल्ला** आणि **बैरागीण** ह्यांशिवाय तेथें कोणी राहिलें नाहीं. **बैरागिणीची** हकीगत तुह्मांस माहित आहेच. आतां **लुतुफउल्लाची** व तुमची ओळख करून देऊं, ह्मणजे झालें.

लुतुफउल्ला बावीस वर्षांचा तरणा लुसलुशीत बांड होता. त्याचा चेहरा सुरेख असून छाती विशाल व भरलेली होती. गरुडाच्या टोंचेसारखें अणकुचीदार नाक त्याच्या शरीरकांतीस चांगली शोभा देई. मिशा कल्लेदार असून त्यांचीं शेवटें पीळ भरून वर चढविलीं होतीं. त्यानें आपल्या डोकीवरील केशांस सुगंधि द्रव्यें लावून त्याचे गुच्छ बनविले होते. दाढीही जेथच्या तेथें बसविल्यासारखी बेतवार दिसे नेत्र पाणीदार व भोंवया कमानदार असून सुशोभित दिसत. लोकांत जें स्वरूप नावाजण्या-

सारखें सुरेख मानितात, त्या प्रमाणें त्याचा चेहरा सुंदर होता. त्याला पाहतांच कोणीही असें ह्मटल्याशिवाय राहिला नसता कीं, हा मनुष्य तरवारबहाद्दर, सुस्वभावाचा, रीतिभातीनें सभ्य, सुधारलेला, बुद्धिवान्, चपळ आणि आपल्या कर्तव्यांत प्रवीण असावा. त्याचा पोषाख जरी फार मौल्यवान नव्हता, तरी तो त्याच्या मोहक स्वरूपास विशेष शोभा देत असे. लष्करी अंमलदारांप्रमाणें त्याच्या डोकावर लाखंडी टोप होता अंगांत लोखंडी कड्यांचें चकचकीत चिलखत होतें. तरवारीची मूठ चांगल्या कुशल कारागिरानें आस्थापूर्वक तयार केली होती. ती पाहतांच म्यानांतील तरवार फार तिखट असावी, असें सहज अनुमान करितां येई. पायांतील जोडा निरनिराळ्या रंगांच्या रेशमानें गुंफलेला असून ढोंपरापर्यंत चढविला होता. कमरपट्ट्यावर अस्मानी शाल गुंडाळली असून तिच्या शेवटास इराणांतील पाणीदार मोत्यें लटकत होतीं. जरतारीनें त्या शालीवर चांगली नक्षी काढली होती. कमरपट्ट्यांत तरवार, पिस्तोल, बंदुकीच्या गोळ्या ठेवण्याचें तोस्तान व पेशकबज् इतकीं हत्यारें होतीं. खांद्यावर मोठी ढाल असून तिजवर सुवर्णाप्रमाणें पितळेचे गोळे बसविले होते. सहज फिरवितां येण्यासारखा, मराठ्यांच्या नाशाची वेळ केव्हां येते याची मार्गप्रतिक्षा करणारा, आणि चकचकणारा भाला उजव्या हातांत होता.

लुतुफउल्ला हा अफगाण सैन्यांत दुसऱ्या प्रतीचा सरदार होता. त्याच्या बापाचें नांव **फैझुल्लाखान. फैझुल्लानें नादीरशहाची** पुष्कळ दिवस नोकरी केली

असून, तो दुराणी राजाच्या जिवास जीव देणारा होता. **लुतुफउल्ला** वयानें लहान; पण त्याची कीर्ति किंवा दर्जा मोठा होता. त्यावर कोणतेंही काम सोंपविलें, तर तो तें चोख व काळजीपूर्वक करी. त्याकडून चुकारूपणा किंवा आळस व्हावयाचा नाहीं, असें **बादशहास** वाटत असे. **लुतुफउल्लानें** जंगी लढाईच्या मैदानांत अवर्णनीय तरवार गाजविल्यामुळें **अहमदशहानें** संतोपानें त्याचा दर्जा एकदम वाढविला होता. त्याचा दरमहा मोठा असून त्याच्या आज्ञेस बहुतकांस मान द्यावा लागे. त्याची चपलता, लढाऊपणा, शौर्य, हुशारी व विश्वास इत्याद्यनेक सद्गुणामुळें **बादशहानें** त्यास छावणीचा मुख्य दरवाजा संभाळण्यासारख्या जोखमीचे कामावर नेमिलें होतें. **लुतुफउल्लानें वैरागिणीस** पाहिल्यापासून त्याची चित्तवृत्ति चमत्कारिक झाली. ती सुधारण्या करितां त्याच्या तरूण अकलेप्रमाणें त्यानें पुष्कळ खटपट केली; पण ती सर्व व्यर्थ होऊन कामज्वरानें तो फारच बेफाम झाला. त्यांत **वैरागिणीचें** गायन ऐकून तर त्याच्या कामी हृदयास घरेच पडले, असें ह्मटलें तरी चालेल. आधींच कामाग्नीनें त्याचा देह होरपळलेला; त्यांत मधुर गायनरूपं घृत पडतांच तो अनिवार भडकला. कामाच्या तडाक्यापुढें **अहमदशहा** कुठला आणि कोण कुठला? आपण हरतऱ्हा करूं, आर्जव करूं, पाय धरूं; पण ह्या भटकणाऱ्या अबलेस वश केल्याशिवाय सोडावयाचें नाहीं, असा त्याच्या मनाचा निश्चय झाला. तशांत ती भिकारी; तेव्हां आपल्यासारख्या मोहऱ्यास पहातांच वश होईल, असेही तो मनांत मांडे खाऊं लागला. कामी मनुष्यास सर्व जग

आपल्याप्रमाणेंच वाटतें, ह्याचा अनुभव पुष्कळांस आला असेल. असो. लुतुफउल्लास हिंदुस्थानी भाषा चांगलीशी समजत नसे व बोलतांही येत नव्हती; परंतु आपला मनोभाव सांगण्यास दुसरें साधन नसल्यामुळें, तो अर्धवट हिंदुस्थानी भाषेंत वैरागिणीस सांगूं लागला.

"गुलए गुलस्तान! (बागेंतील पुष्प) बादशहा गेला. त्यानें तुला माझ्या हवालीं केलें. आतां तुझा काय हुकूम आहे? हा दास तुझ्या सेवेंत तत्पर आहे. जी आज्ञा करशील, ती मी शिरसावंद्य करीन."

**वैरागीण**—साहेब, या गरीब दासीनें तुह्मांसारख्या सरदारास काय हुकूम करावा? पण—

**लुतुफउल्ला**—(मध्येंच) सुंदरी, तुझ्यासारखी मनोरम स्त्री चाहेल तो हुकूम करूं शकेल. फक्त, तूं मनांत मात्र आणिलें पाहिजेस. तूं जसें ह्मणतेस तसेंच मीही खात्रीनें सांगतों कीं, हा तुझा धनी-दास-तुजवरून प्राण देखील ओंवाळून टाकण्यास कमी करणार नाहीं.

हा भाषणाचा निराळा झोंक पाहून वैरागिणीनें मान खालीं घातली व ती एकसारखी रडूं लागली. ती ह्मणाली, "बादशहानें सांगितल्याप्रमाणें मी हिंदूंच्या छावणींत जाणार. या परता माझा दुसरा हेतु कोणताच नाहीं; तर मला तिकडे पोंचवा."

**लुतुफउल्ला**—दिलरुबा, (प्राणप्रिये,) तिकडे जाण्याचा रस्ता फार भयंकर आहे. तुझ्यासारख्या नाजुक प्रकृतीच्या अबलेस ते कष्ट सहन होणार नाहींत. तुजकडे फार मौल्यवान वस्तु आहेत. कोणी तरी त्या

मार्गांत लुटून नेईल. इतक्याकरितां तिकडे जाण्याचा हट्ट टाकून दुसरी काय पाहिजे ती आज्ञा कर. हा तुझा दास-सेवक-तुझी आज्ञा पालन करावयास सिद्ध आहे. तूं सदैव मजकडे सुखानें असावेंस, अशी माझी प्रार्थना आहे. तुझें संरक्षण करणें व तुझ्या इच्छेनुरूप वागून तुला सुख देणें, हेंच माझें महत्‌भाग्य असें मी समजतों. तुला वाटत असेल, तर आपण उद्यांक सहज मराठ्यांच्या छावणीकडून फिरून येऊं.

बैरागीण—मेहरबान, हें आपलें भाषण माझ्या मनाला फारच दुःख देतें. मीं भीतीचीं व दुःखाची थोडीच पर्वा बाळगिली आहे. कांहींहीं होवो; बादशहानें सांगितल्या प्रमाणें मला पोंचती करा, ह्मणजे मीं आपली फार आभारी होईन.

लुतुफउल्ला—(किंचित् बोलण्याचा रोंख फिरवून) खरें आहे; पण बादशहानें मला बरोबर जाण्याचा हुकूम केला नाहीं. शिवाय दरवाजावरील आज माझा पहारा. तेव्हां मला आपला उद्योग सोडून कोठें जातां येणार नाहीं. उद्यां येथें दुसऱ्यास नेमून कदाचित् मी तुजबरोबर येऊं शकेन, तों पर्यंत तूं येथें राहिल्यास तुला कोणत्याही गोष्टीची उणीव पडणार नाहीं.

बैरागीण—साहेब, मजसारख्या यःकश्चित कंगालदरिद्र्याकरितां आपल्यासारख्यांस तसदी द्यावी, असा माझा उद्देश नाहीं. तुह्मीं कोणीही आपला विश्वासु चाकर किंवा शिपाई मजबरोबर दिलात, तरी मी जाईन.

लुतुफउल्ला बराच वेळ स्तब्ध होता. बैरागिणीची

कशी समजूत करावी, हें त्यास कांहींच सुचेना. तरी तो ह्मणाला, "प्रिये, माझें न ऐकतां तूं जावयाचें मनांत आणशील, तर जें मिळविलें आहेस तें जाऊनही तुजवर कोणता प्रसंग येईल, याचा नेम नाहीं.

**बैरागीण**—छीः! मला त्याची थोडीच पर्वा आहे! माझ्याकडे आतां जें द्रव्य जमलें आहे तें जरी गेलें, तरी मीं बिलकुल फिकीर करीत नाहीं. ह्या पैशाचें मला काय करावयाचें आहे? मीं तो थोडाच डोक्यावर घेऊन जाणार! सोनें आणि माती हीं मला सारखींच आहेत. जगदीश परभ समर्थ आहे; तो मला चारितार्थापुरतें कोठेंही देईल. त्यांतच माझें समाधान आहे. मीं मराठ्यांच्या छावणींत सुखरूप पोंचलें, ह्मणजे हें सर्व किंवा अर्धें द्रव्य माझ्या ज्ञातिबांधवांस वांटून टाकणार; आणि अर्धें, जो मला सुरक्षित पोंचवील त्यास द्यावयाचें, असा मीं संकेत केला आहे.

**बैरागीण** जसजशी टाळाटाळीचीं उत्तरें देऊं लागली, तस तसा **लुतुफउल्ला** प्रेमबंधनांत विशेष परिबद्ध होऊं लागला. द्रव्याची किंवा दुसरी कशाची लालूच दाखवून प्रीति बसत नसते. स्त्रियांची पुरुषांवर प्रीति बसण्यास एखादें सामान्य कारण देखील बस्स होतें. नाहीं तर, कितीही दीर्घ प्रयत्न केले, तरी त्यां पासून कांहींच अर्थनिष्पत्ति होत नाहीं. असो. आपण करावा तो प्रयत्न, बोलावें तें भाषण, सांगावी ती युक्ति किंवा घालावें तें भय व्यर्थ जातें, तेव्हां आतां काय करावें, या विचारांत त्यानें बराच वेळ काढिला. सामदामादि सर्व उपाय करून न केल्यासारखे झाले. बरें; तिला फार

वेळ ठेवावी तर बादशहाच्या आज्ञेचा अनादर. असा तो जिकडून तिकडून पेंचांत सांपडला. कामाचा सपाटा कसा जबर आहे पहा! शेवटीं त्या सरदाराची जरी बहुतेक निराशा झाली होती, तरी तो पुनः ह्मणाला "हे सुंदरी, समयीं तूं माझ्या भाषणाचा भावार्थ बरोबर समजली नसशील; इतक्या करितांच मी तुला पुनः प्रार्थनापूर्वक सांगतों तें ऐक. केवळ भिक्षा मागून उदरनिर्वाह करावा, हा तुझा उद्योग. तुझ्या पुढें ह्या वेळीं जरी द्रव्याचा मोठा ढीग पडला आहे, तरी तुला अन्नाकरितां दाही दिशा भटकावें लागत असेल. तुला पाहिली तेव्हांच तूं माझें मन हरण केलेंस. मी तुला माझे प्राणापलीकडे चहातों. माझे मनांत तुझें दारिद्र्य दूर करावें आणि तुला मजकडे ठेवावी असें आहे. कारण, तुझ्या सौंदर्याकडे पाहिल्या वेळेपासून माझें मन अगदीं वेडावून गेलें आहे. जानिमन, (माझ्या प्राणा, ) तूं जेव्हां माझ्याजवळ राहशील, तेव्हांच तें शांत होईल. मी खातरीनें सांगतों कीं, तूं आजन्मांत ज्या सुखाचा अनुभव घेतला नाहींस, त्या सौख्यांत ठेवण्यास मी समर्थ आहें. मी उदार मनाचा उमराव आहें. माझी सर्व दौलत तुझ्यापायीं अर्पण करण्यास एका पायावर मी तयार आहें. मी तुला अमूल्य डागडागीने घालीन, उत्तम वस्त्रें देईन, व तुझ्या सेवेंत पाहिजे तितके शिपाई आणि दास-दासी ठेवीन; परंतु माझी विनंति मात्र तूं अमान्य करूं नकोस. तूर्त तूं आहेस त्यापेक्षां लक्षपट सुखी होशील. तूं आपल्या हातानें आपलें नुकसान करून घेऊं नकोस. अशी सोन्यासारखी संधि पुढें तुला मिळणार नाहीं. पुढें तुला

पश्चात्ताप करावा लागूनही त्यापासून तुझा तिळभरही फायदा होणार नाहीं. मी कायावाचामनानें तुला फार चहातों. हें शरीर व हा आत्मा तुझ्या सौंदर्यावरून ओंवाळून टाकावा, असें मला वाटतें. आतां माझा अंत पाहूं नकोस. माझें सांगणें तूं अमान्य केलेंस, तर मी फार दिवस वांचणार नाहीं.

वैरागीण एका संकटांतून सुटतांच आपण निर्वोर झालें, असें समजत होती; परंतु तिच्या दुदैवानें दुसऱ्या विघ्नाची तयारी होतीच! एखादे वेळीं संकटें येऊं लागलीं ह्मणजे तीं जशीं काय क्रमानेंच सुरू असतात. बरें; तीं यावयाचीं नसलीं, तर बोलाविलें तरी येत नाहींत. कोठें सुख-दुःखमिश्रस्थिती असते, कोठें पाहिलें तर दुःखाचा गंधही दृष्टोत्पत्तीस येत नाहीं, व कोठें त्याच्या उलट गोष्टी दृष्टीस पडतात. जगदीशाच्या घरचा काय तमाशा असेल तो असो. लुतुफचें सांगणें ती ऐकत होती; आणि त्याच्या अत्याग्रहावरून आतां या संकटांतन आपली सुटका होणार नाहीं, असाही तिचा समज झाला. तेव्हां ती मधुर वाणीनें व विनयानें ह्मणाली "सरकार, तुह्मी माझी थट्टा तर करीत नाहींना! मजसारख्या कंगालाची थट्टा करण्यांत तुमच्या मनाचें काय समाधान होत असेल, देव जाणे."

लुतुफउल्लास तिच्या भाषणाचा बरोबर भाव समजला नाहीं असें वाटतें. कारण, तो ह्मणाला "थट्टा! मी बगदादच्या सर्व पवित्र स्थलांची, घोसमोहीउद्दीन अब्दल्कादर जलालीची, मुझार एसरीफच्या कबरेची आणि

कुराणाची शपथ वाहून सांगतों कीं, खरोखर खऱ्या मनानें मी हें सर्व सांगत आहें."

वैरागीण—(भयानें कांपत दोन्ही हात जोडून) सरदार, तुम्हीं कृपा करा; आणि मला येथून रवाना करा. मीं हिंदु, तुम्हीं मुसलमान. हा संबंध आमरण जुळावयाचा नाहीं. तुम्हीं कांहीं सांगितलें तरी, मीं जिवंत असेपर्यंत माझा धर्म सोडणार नाहीं. माझ्यापेक्षां हजारपट सुंदर स्त्रिया तुह्मांस मिळतील. मीं बोलून-चालून गरीब जातींतील भिकारी, भाकरी-तुकडा उकळीत फिरणारी, तुमच्या पायांतील जोड्याच्या धुळीपेक्षांही कमी आहें. माझ्या भानगडींत पडून तुह्मांला कधींही यश येणार नाहीं.

लुतुफउल्ला—फिकीर नाहीं. ती पंचाईत तुला कशाला? राजाच्या मनास आवडेल ती राणी!

वैरागीण—क्षमा करा. फार बोलण्यांत मजा नाहीं. तुह्मांस इतकें सांगितलें तरी तुमची माझ्या कमनशीबामुळें समज पडत नाहीं, त्यास माझा नाइलाज आहे. (सुस्कारा टाकून) जगदीशा,——

लुतुफउल्ला—( मध्येंच ) प्रिये, माझाही तसाच नाइलाज झाला, ह्मणून मी इतकें आर्जव केलें. आजचा एक दिवस तरी रहा. इतकें मागणें नाकबूल करूं नकोस. तुझी मर्जी नसल्यास उद्यां तुला मी खास येथें ठेवणार नाहीं. मी काय सांगतों, तें तूं समजतेस ना?

वैरागीण—साहेब, मीं सर्व समजते; पण कसेंही करा आणि कृपा करून मला जाऊं द्या.

लुतुफउल्ला—सुंदरी, तूं मागशील तें मी तुला देईन.

मी तुला आवडत नाहीं काय? मी वृद्ध तर नाहींच. शिवाय लंगडा, थोटा, बहिरा, किंवा कुरूप अशांतला-ही पण प्रकार नाहीं. मग अनमान कां?

**वैरागीण**—तें सर्व खरें; पण मीं हिंदु आहें.

**लुतुफउल्ला**—असलीस ह्मणून काय झालें? स्वज्ञातीचें संरक्षण करून, अमीर-उमरावांकडे किंवा शिपायांकडे देखील कित्येक हिंदुस्त्रिया राहिल्या आहेत. तुझ्या मनांत टाळाटाळींचा जबाब देऊन वेळ काढावयाची असेल; परंतु तसें करूं नको. एक दिवस खुशाल येथें रहा. मी ब्राह्मण स्वयंपाकी आणवितों. तूं ज्ञातीनें हलकी असलीस तरी केवळ तुझ्या सौंदर्याकरितां, हा एवढा मोठा सरदार तुझी प्रार्थना करीत आहे, त्याचा कांहींतरी विचार कर.

**वैरागीण**—खानसाहेब, ह्या भाषणांत कांहीं अर्थ नाहीं. तुह्मीं कसेही असा; आणि कांहींही करा. मीं एकदां सांगितलें तें कधींही बदलणार नाहीं.

**लुतुफउल्ला**ची खातरी झाली कीं, कांहीं सांगितलें तरी ही आपला हेका सोडणार नाहीं; मग विनाकारण आर्जव तरी कां करा? पण पुनः त्याचें मन बदले; पुनः तो आर्जव करी; क्षणांत रागानें सांगे; घटकेंत गोडी-गुलाबीनें बोले; केव्हां हातीं-पायीं पडे; केव्हां रागानें पाही. अशी त्यानें आपली होती तितकी पराकाष्टा केली. शेवटीं आतां कांहीं उपयोग होत नाहीं, अशी त्याची खातरी होतांच त्यानें निराशेनें "**झमरूद**" अशी हांक मारिली. तेव्हां एक काळा ठेंगणा मजबूत हबशी नोकर **लुतुफउल्ला**पुढें हजर झाला.

**लुतुफउल्ला**—( नोकराच्या कानांत कांहीं सांगितलें-सें करून मोठ्यान ) **झमरूद**, आतांचे आतां **दोस्त-महमदास** जाऊन सांग; आणि या पत्राजखोर स्त्रीला मराठ्यांच्या छावणींत पोंचविण्यास जाण्याची तयारी कर.

स्वामीची आज्ञा शिरसावंद्य करून **झमरूद** निघून गेला. तेव्हां **लुतुफउल्ला** रागानें **वैरागिणीस** ह्मणाला, "तू काय समजलीस? मी **भाऊच्या** छावणींतूनही तुला आणीन"

**दोस्तमहमद** तयार होऊन येतांच, **वैरागीण** आपली काठी, बीन व बक्षीस मिळालेले सर्व पदार्थ घेऊन, त्याजबरोबर मराठ्यांच्या छावणीकडे निघाली.

**लुतुफखानानें वैरागिणीस** रजा देण्यापूर्वी बराच वेळ काढिला. सकाम दृष्टीनें, नखऱ्यानें, ऐटीनें व घमेंडीनें त्यानें बराच वेळ तिजकडे पाहिलें. नंतर तो ह्मणाला, "**दोस्तमहमद**, तूं ह्या **वैरागिणी**बरोबर जाणाऱ्या तुकडीचा प्रमुख आहेस. तुझी शक्ति असाधारण आहे खरी; परंतु तेथें लढाईचा प्रसंग येऊं देऊं नकोस. जरी आला तरी टाळाटाळी कर. तूं रणस्तंभापर्यंत जा आणि तेथें जो कोणी हिंदु भेटेल त्याच्या हवालीं हिला कर. समजलें? दरवाजावर हिला नेण्याकरितां उंट तयार आहे, त्यावर हिला बसवा; आणि हिचें सामानही त्यावरच लादा. हिनें जर आपल्या खुषीनें तुह्मांस कांहीं दिलें, तर घ्या. जबरदस्तीनें किंवा तिला फसवून घ्याल तर खबरदार. हिच्या एका केंशास देखील धक्का लागतां कामानये. **कासीमखान, मीरअलाद, जगन-**

शहाहुझरा, अबदुल रहिमान, शमसुद्दीन गिलझाई हे बरोबर आहेतच.

उंट तयार होऊन येतांच त्यावर वैरागीण वसली. तिचें बक्षीस मिळालेलें सामान व्यवस्थेशीर उंटावर लादलें. वैरागिणीनें बीन आपल्यां हातांत घेतली. बाकीची तयारी होईपर्यंत उंट स्वस्थ बसलें होतें. तयारी होतांच हालत डोलत तें उठलें. तेव्हां लुतुफउल्ला ह्मणाला, " प्रिये, अखेरीस तूं चाललीस? अल्लाह हाफीज. ( ईश्वर तुझें कल्याण करो. ) पुनः तुझी मुलाखत होईल काय ? "

वैरागीण--( सत्कारपूर्वक सलाम करून ) भेटीची गोष्ट असो; परंतु दुष्ट लोकांच्या तडाक्यांतून तुह्मीं माझें रक्षण केलें, स्वतंत्रता दिली व मला वाटेस लाविलेंत, याबद्दल मीं परमेश्वराजवळ करुणा भाकून एवढें मागतें कीं, त्यानें तुह्मांस उदंड आयुष्य द्यावें.

इतकें झाल्यावर ही टोळी आपली छावणी सोडून निघाली. कांहींसें दूर जातात तों दोस्तमहमदास कोणी हुक्का प्यावयास बोलाविलें; तेव्हां त्या टोळीस साहजिकच उभें राहणें भाग पडलें. दोस्तमहमद हुक्का पिऊन तोंडांतून धुराचा भपका सोडीत आहे, तों त्याजवळून एक मनुष्य गेला. त्यास मारण्याकरितां लुतुफउल्लानें तरवार उपसली; परंतु एकाएकीं त्याचा हात मागून कोणी धरिला. दोस्तमहमदाजवळून जाणारा इसम गरीब, काळ्या कातडीचा, फाटक्या-तुटक्या चिंध्या अंगावर घेतलेला व वृद्ध होता. त्यास मारावयास उशीर नव्हता; परंतु तितक्यांत कांहीं खूण झाली ह्मणून पठाणानें माघार घेतली. पुनः

उंट वांकडीतिकडी मान करीत डवकत चालूं लागलें, व तो वृद्धही त्यांच्या मागून निघाला.

---

## प्रकरण ५ वें

### रणस्तंभ.

एका मोठ्या पिंपळाच्या वृक्षाजवळ, मुसलमानी व मराठे लष्करांच्या छावण्यांमध्यें, बरेंच मोठें सपाट मैदान होतें. त्यांत कोणी बादशहानें, दिल्ली व करनाल ह्यांमध्यें प्रवास करणाऱ्या मुशाफरांस विश्रांति मिळावी, ह्मणून एक लहानसें झोंपडें बांधिलें होतें. जवळच एक विहीरही होती. पिंपळाच्या वृक्षापासून सुमारें शंभर हातांवर मराठ्यांनीं आपला रणस्तंभ पुरला होता. तेथें दोन्ही फौजांतील प्रबल वीरांचें केव्हां केव्हां द्वंद्वयुद्ध होई. गाड्या ठेवण्याची जागा तेथून जवळच होती. त्याच्या बाजूस रिकामपणीं गप्पा मारीत बसावयाची जागा होती. दोन्ही लष्करांतील लोकांचे तेथें पत्रव्यवहार चालत. लढाई तहकूब करणें, चालू करणें, तह, करार, गुप्त किंवा उघड राजकारस्थानें वगैरे कामें चालण्याचें हेंच स्थळ. एका पक्षांतील कोणी लढाईंत पडला किंवा दुसऱ्या पक्षाच्या हातीं लागला, तर त्याची दाद येथेंच लागे. येथेंच केत्येक लोकांस दंड घेऊन किंवा मोबदल्यानें सोडीत. विरुद्ध पक्षाच्या लोकांस किंवा सरदारांस लालूच दाखवून अथवा फसवून आपल्या पक्षाकडे वळविण्याचें गुप्त ठिकाणही

हेंच. सारांश, लढाईच्या सर्व खटपटी आणि लटपटी येथेंच चालत.

त्याच्या आसपास जवळच मराठे लोकांचें प्रधान दैवत व रणामध्यें विजय देणारी अशी जी **श्री भवानी**, तिची स्थापना केली होती. तिला बकऱ्यांचे व रेड्यांचे बळी दिल्यामुळें, त्यांचें रक्त जमीनीवर पडून थिजलें होतें. त्यांतच हिंगुळक व तेल मिसळून गेल्यामुळें ती जागा भयाण दिसे. जिकडे तिकडे तोरणें बांधलेलीं असून निशाणें फडकत होतीं. द्वंद्वयुद्ध करणारांच्या घोड्यांच्या टापांना लागून जमीनीवरील रक्ताचा चिखल जिकडे तिकडे उसळल्यामुळें दुर्गंधी सुटली होती. लढाईत घायाळ झालेल्या घोड्यांचीं जिनें व कित्येक तुडके-मोडके दागीने चिखलांत पडले होते. पिंपळाच्या वृक्षाजवळ राखेचा मोठा ढीग होता. त्याजवळ कित्येक अर्धवट जळलेलीं व कित्येक पेट घेतलेलीं लांकडें पडलीं होतीं. येणाजाणारांनीं चिलीम ओढण्यास त्यांतील विस्तव न्यावा, असा प्रघात असे.

अशा त्या रणस्तंभाजवळ दोनप्रहरच्या सुमारास **वैरागीण** येऊन पोंचली. तिच्याबरोबर पूर्वीं सांगितलेला वृद्ध जाटही होताच. **दोस्तमहमदानें** दुरूनच विचारिलें, "येथें कोणी मराठा नाहीं?" इतक्यांत एकानें जबाब दिला, "होय, आहेत; ते पहा येत आहेत." या प्रमाणें सवाल-जबाब होत आहेत तों तेथें, सुमारें पन्नास मराठे स्वार येऊन पोंचले. त्यांच्या डोकीस तांबडीं पागोटीं आणि हातांत भाले होते.

**दोस्तमहम्मद** तेथेंच थांबला व त्यानें आपल्या आंगा

वरील मळकट वस्त्रें काढून नवीन घातलीं; इतक्यांत मराठ्यांपैकीं एक स्वार तिरासारखा आपला घोडा फेंकीत पुढें आला. त्याचा घोडा मोठा चपळ असून तो बारा हात उडी मारीत होता. त्याकडे पाहून—

**जंगीशहा**—काय घोडा आहे पण! सोजारोपन, आणि स्वारही पण तसाच!

मराठा स्वार मोठ्या आढ्यतेनें पुढें आला. तंटा-भांडण काढावें, असा त्याचा हेतु नव्हता; परंतु आपली कर्तबगारी पाहून अफगाणांनीं थक्क व्हावें, इतकीच त्याची उमेद. त्यानें एकदम लगाम खेंचून घोडा थांबविला आणि भाला सरसावीत पुढें होऊन, "हरहर महादेव! भवानी देवीकी जय! इस्लामी धर्मांतील कोणी माझ्याशीं युद्ध करावयास सिद्ध आहे?" असा प्रश्न केला.

**दोस्तमहमदाच्या** मनाची शांतता नाश पावण्यास इतकेंच कारण बस्स झालें. आपल्या अधिकाऱ्याचा हुकूम विसरून त्यानें घोड्याची लगाम बरोबर केली आणि भाला सज्ज करून ह्मटलें "बेइमान, डुकर खाऊ, तुझा नाश करावयास मी सिद्ध आहें"

मराठा स्वार प्रथम कांहीं वेळ स्वस्थ राहिला आणि नंतर हंसत ह्मणाला, "फार चांगलें. पण परस्पर योद्धे सारख्या योग्यतेचे असले ह्मणजे, त्या युद्धांत मजा असते. मी मराठ्यांमधील मोठा सरदार आहें. तेव्हां शत्रूच्या मोठ्या सरदाराबरोबर युद्ध करावें, असा माझा इरादा आहे. तूं कोण आहेस?"

**दोस्तमहमद**—(आपला भाला मागें घेऊन) मी

**लुतुफउल्लाखान** पोपलझाईच्या लष्करांतील एक शिपाई आहे.

**मराठा**—तर मग, तूं आमच्या बरोबर लढण्यास अयोग्य आहेस.

**दोस्तमहमद**—तुह्मांला तुमचा दर्जा संभाळण्याची इच्छा असेल, तर तुह्मीं आमच्या धर्माविषयीं कांहीं बोलूं नका.

**मराठा**—कोणाला गरज? आह्मांला **राम** आणि **रहिम** यांत मुळींच तफावत वाटत नाहीं.

**दोस्तमहमद**—वाः! फार चांगलें. बरें; साहेब, आपला काय हुकूम आहे?

**मराठा**—माझा हा मल्लयुद्धाविषयींचा निरोप लखनौचा सुभा **सुजाउद्दवला**, **हाफीजरहिमत**, **नजीबउद्दवला**, अथवा तुमच्या समजुतीप्रमाणें जो कोणी मोठा लढवय्या आहे असें तुह्मांस वाटत असेल, त्यास सांगा ह्मणजे झालें.

**दोस्तमहमद**—त्यांना तुमचा दर्जा किंवा ओळख लागावी कशी?

**मराठा**—( आपल्या हातांतील एक आंगठी **दोस्तमहमदास** देऊन ) त्यांना ही आंगठी दाखवा; ह्मणजे ते, मी कोण हें समजतील. बरें; तुह्मीं कां आलां?

आतां, **दोस्तमहमदानें** त्याच्या प्रश्नास जबाब काय दिला हें सांगण्यापूर्वी, आपल्या मराठे सरदाराच्या स्वरूपाचें थोडेंसें वर्णन करूं. कारण, आपल्या कथानकांत ह्या मराठे सरदाराचा बराच संबंध आहे.

सुमारें सोळा हात उंच काठेवाडी घोडीवर तो मराठा सरदार स्वार झाला होता. घोडीवर सोन्या-रुप्याचे पुष्कळ अलंकार होते. ती फार चपल व चांगली दिसे. मराठा सरदार उंच व मध्यम बांध्याचा होता. त्याच्या डोक्यास नारंगी रंगाची चंदेरी पगडी होती. तिचा पदर सूर्याच्या तेजाप्रमाणें चकाकत होता. त्याच्या भिंवया कमानदार व मिशा कल्लेदार होत्या. कपाळ मोठें होतें. त्यावरून तो मोठा बुद्धिमान् असावा, असें दिसे. छाती विशाल व भरलेली होती. हाताच्या बोटांत बऱ्याच मौल्यवान आंगठ्या होत्या. गळ्यांत उत्तम पाणीदार मोत्यें, हिरे, माणीक, वगैरेंनीं गुंफलेलें पेंढें होतें. कमरपट्ट्यांत फक्त पिस्तोल व तरवार होती. अंगांत लांब अंगरखा आणि आंत बन्यान होतें. पायांतील इजारीचीं तोंडें रेशमी व जरी कलाबतूनें गुंफलेलीं होतीं. असो.

**दोस्तमहमद** —आम्हीं एका खास पोंचविण्याकरितां आलों आहों. ती भटकणारी भिकारीण आहे किंवा कोण हें आमच्यानें सांगवत नाहीं. कांहीं का असेना, ही ती स्त्री आपल्या ताब्यांत घ्या. आम्हीं आमचें काम बजाविलें.

**दोस्तमहमदानें बैरागिणीस मराठे सरदाराच्यां** हवालीं केली. त्याबरोबर सरदारानें आपली घोडी फिरविली. इतक्यांत म्हातारा जाट दोन्ही हात जोडून पुढें झाला आणि म्हणाला, "सरकार, छत्रपतीची दुहाई! देवा खातर तुम्हीं माझें रक्षण करा."

**मराठा सरदार**—(पुनः आपली घोडी परतवून) तूं कोण व तुला काय झालें आहे?

म्हातारा—माझें रक्षण करा महाराज!

मराठा—कोणापासून तुला भय आहे?

म्हातारा—शत्रूंकडून. मराठ्यांचा मित्र सूरजमल्ल जाट आपल्यास माहीत असेलच?

मराठा—बरें; मग ह्मणतोस काय?

· म्हातारा—मी त्याची प्रजा. माझ्या मुलीचें लग्न ठरविण्याकरितां मी करनालास गेलों होतों. मला परत भरतपुरास जावयाचें आहे. वाटेंत मुसलमान लष्करांतील लोकांनीं मला पकडलें. महाराज, महत् संकटानें त्यांतून मी बचावलों; आणि दोस्तमहमद साहेबांच्या कृपेनें येथपर्यंत आलों. आतां तुह्मीं मला वांचवा; नाहीं तर, फुकट मला कोणी तरी मारील. (हुंदके काढून रडूं लागतो.)

मराठा—काय बिचाऱ्याची सूरत! बाबा, तुला आणखी किती वर्षे जगावयाचें आहे?

वृद्धजाट मराठे सरदारासभोंवार घिरट्या घालूं लागला. दोस्तमहमदास त्यानें पुष्कळ आशीर्वाद दिले; शेंकडो वेळ सलाम केला; परंतु महमदाचा व त्याचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नव्हता. मराठे सरदारानें त्याची विनंति मान्य केली असती तरी त्यास दुःख नव्हतें, आणि अमान्य केली असती तरी सुख नव्हतें. तो मराठे सरदाराकडे पाहून ह्मणाला, "हा बेवकूब काय सांगत असेल, तें देव जाणे! आतां जसा तो तुमचे आर्जव करीत आहे, तसेच माझेंहि करीत होता. तुह्मांस वाटेल तसें करा. पाहिजे तर बराबर न्या; नाहीं तर सोडा."

मराठा—बरें बाबा; चल, तुला यावयाचें असेल तर या स्त्री बरोबर.

ह्याप्रमाणें मराठा सरदार आपल्या स्वारांपैकीं निम्म्या स्वारांसहवर्तमान बैरागिणीस व ह्यातार्‍या जाटास बरोबर घेऊन आपल्या छावणीकडे निघाला. छावणीजवळ जातांच "या स्त्रीस व जाटास आपल्या छावणींत पोंचवा." असें मराठे सरदारानें आपल्या लोकांस सांगितलें आणि आपण ओढ्याकडे जावयास निघाला. निम्मे स्वार त्यानें अफगाण लोकांबरोबर दिले.

दोस्तमहमद आपलें काम आटोपून परतला; तेव्हां वाटेंत त्यानें आपल्याबरोबर आलेल्या मराठे स्वारांस विचारिलें, "अहो, माझ्याबरोबर जो तुमचा सरदार बोलत होता, तो कोण?"

**स्वार**—त्यास तुम्हीं ओळखिलें नाहीं? दक्षिणी लढवय्यांत पहिल्या प्रतीचा अमीर, राजव्यवहारकुशल, रावसाहेब व भाऊसाहेबांच्या जोडीचा, लढाईंत अप्रतीम शूर, शिपायांचा प्राणप्रीय स्नेही, तरवारबाहद्दर, हिंदुस्थानांत मराठ्यांची जी सत्ता आहे तिचें केवळ मूळ, असा जो प्रख्यात महादजीशिंदा, तो हा.

## प्रकरण ६ वें.

### मराठे लष्कराचा बाहेरील देखावा.

पानिपत येथें मराठ्यांची छावणी होती. एक शतकापूर्वीची ह्या शहरची स्थिति, आणि आतांची स्थिति, यांत फार तफावत पडली आहे. शंभर वर्षांपूर्वी मेलेला एखादा मनुष्य जिवंत होऊन आला आणि त्यानें त्या स्थलाच्या

प्रस्तुत स्थितीकडे पाहिलें, तर त्याला फारच आश्चर्य वाटेल. तेथील पूर्वीच्या सुरेख इमारती मोडून-तोडून जरी धुळीस मिळाल्या आहेत, तरी अलीकडे ह्मणजे इंग्रज सरकारचा त्या ठिकाणीं अंमल बसल्यापासून त्यांच्या व्यापार संबंधीं सुधारणेनें त्या स्थानचें जें विचित्र रूपांतर झालें आहे, त्याविषयीं जितकें लिहावें तितकें थोडेंच. मोठमोठे तलाव आटवून तेथें सपाट मैदानें केलीं आहेत. मोठमोठे खंदक व किल्ल्यांचे अजस्र तट पाडून जिकडे तिकडे नवे रस्ते केले आहेत. किल्ल्यांच्या जागीं बाग-बगीचे उठविले आहेत. लोकांच्या आणि हवेच्या स्थितींतही चमत्कारिक बदल झाला आहे. असो. एखाद्या बेटाच्या सभोंवार जसा पाण्याचा विपूल सांठा असावा, त्याप्रमाणें पानिपतच्या सभोंवार मराठे लोकांचा तळ पडल्याकारणानें तें स्थळ केवळ बेटासारखें दिसत होतें. मराठ्यांनीं पानिपतच्या एका बाजूस बुरूज बांधिला होता. छावणीच्या आसमंतात पाण्याचे पाट व नाले वहात होते. जिकडे तिकडे गगनचुंबित वृक्षश्रेणींनें त्या क्षेत्रास विचित्र शोभा आली होती. बकाणा, महुडा, जंबू, शिरस व पळस ह्यांनीं त्या युद्धक्षेत्राचें संरक्षण करण्याचा भार आपल्या अंगावर घेतला होता. ह्या कुरुक्षेत्रांतच पूर्वी आर्य लोकांच्या परम पराक्रमसंपन्न पूर्वजांनीं घनघोर युद्ध केलें होतें. येथेंच द्रोण आणि युधिष्ठिर, अर्जुन व कर्ण, कृष्ण आणि भीष्म, भीम आणि दुर्योधन लढले होते. कुरुक्षेत्रांत कौरव-पांडवांची जी दशा, तीच सोनपत पानपत येथें मुसलमान व मराठे ह्यांची: भारती युद्धांत

जसे अतिरथी महारथी, तसेच या युद्धांतही सर्व प्रकार होते. अभिमन्युसारखा शरसंधान करणारा विश्वासराव पेशवा, धृष्टद्युम्नाप्रमाणें खड्गपटु जनकोजी शिंदा, भीमार्जुनाप्रमाणें एकबाजू संभाळणारा युद्धकलाकुशल यशवंतराव पवार, घटोत्कचाच्या पर्वतवृष्टीप्रमाणें अनिवार लोहगोलांची वृष्टि करणारा व समरप्रवीण इब्राहीमखान गारदी, अश्वत्थामा व कृपाचार्य ह्यांप्रमाणें विंचूरकर आणि मेहेंदळे, द्रोणाचार्यासारखे वृद्ध मल्हारराव होळकर, सुयोधनाप्रमाणें मानधनाग्रगणी व आकाश कोसळलें तरी न डगमगणारा, कर्णाप्रमाणें सत्यप्रतिज्ञ रणधीर-वीर-शिरोमणी सदाशीवराव भाऊ पेशवा, ह्यांचें वर्णन वाचतांना मनाची जी दशा होते ती लेखणींतून कागदावर उतरत नाहीं, इतक्याकरितांच दिलगीर वाटते. भारती युद्धानंतर दिल्लीमध्यें राज्य करणारा शेवटचा हिंदुराजा पृथुराज चव्हाण ह्यावर शहाबुद्दीन घोरीनें चाल करून या ठिकाणींच त्याचा गर्वपरिहार केला. तें युद्धही अशाच नमुन्याचें झालें. त्यांत पृथुराज चव्हाण आणि त्याचे मदतगार समरसिंह, चामुंडराय व हमीरराय इत्याद्यनेक शौर्यधैर्य-संपन्न वीरावतंसांनीं, आपलें असामान्य क्षात्रतेज प्रकट केलें. त्या तेजस्वी पुरुषांच्या प्रतापाचें वर्णन ऐकूनच आधुनिक प्रजेची जी दशा होत असेल, ती वर्णन करणें आमच्या शक्तीच्या बाहेर आहे. शहाबुद्दिनानें पृथुराजाचा पराभव करून दिल्ली बळकाविल्यानंतर, तेथें हिंदूचें राज्य आजपर्यंत कधींच झालें नाहीं. बिचाऱ्या शहाबुद्दिनानें कोणत्या घोर मुहुर्तावर आमच्या देशांत पाय

ठेविला देव जाणे! दिल्लीचा पठाण बादशहा **इब्राहीम लोदी** ह्यानें **मोंगल बादशहा बाबर** ह्याशीं जंगी लढाई करून, राज्य व प्राण हीं येथेंच अर्पण केलीं. प्रख्यात **अकबर बादशहा**सही, समरप्रवीण व युद्धकुशल रजपूत लोकांशीं येथेंच भयंकर लढाई करावी लागली. असो.

आपल्या पराक्रमी **नायिकेस** घेऊन येणारी टोळी या छावणीजवळ आली. छावणीबाहेर **इब्राहीमखान गार**द्याच्या अनुमताप्रमाणें तटबंदी केली होती. त्याचा बंदोबस्त खरोखरच स्तुतिपात्र होता. एखाद्या घुमटांत राहिलेले लोक आपला साहजिक बचाव करून जसे दुसऱ्यास मारूं शकतात, त्याप्रमाणेंच त्या तटबंदीची स्थिति होती. **पानिपत**ची ईश्वरनिर्मित रचनाच युद्धोपयोगी असून, स्वसंरक्षणाचीही तेथें उत्तम सोय होती. तशांत वृक्षश्रेणींनें नदी-नाल्यांनीं आणि मातीचे ढिगांनीं संरक्षणसाधनास फार मजबुती आली होती. छावणीच्या दारावर लहानसा तोफखाना होता; आणि मातीच्या ढिगांवरही तोफांची चांगली रचना केली होती.

छावणीच्या द्वाराजवळून एक नाला यमुनेकडे जात होता. त्याच्या कांठांवर वड, पिंपळ, बाभळ वगैरे वृक्षांची गर्दी असून, त्यांतच लहानशी एक वाडी होती. त्या वाडींत एक मठ होता. इंग्रजी लष्कराच्या पद्धतीप्रमाणें झाडें-झुडपें तोडून टाकून जिकडे तिकडे हवाशीर मैदान न करितां, मराठ्यांनीं सर्व झाडें तशीच कायम ठेविलीं होतीं. त्या वृक्षांचा पाला लष्करांतील हत्ती व उंट यांस उपयोगीं पडे. मठाच्या दारांत एक हत्यार-

बंद पहारेकरी होता. त्या बाजूस **दमाजी गायकवाडाच्या** घोडेस्वारांची घस्त फिरत होती.

मठाचा देखावा दृष्टीस पडतांच **वैरागिणीनें** आपले बरोबर आलेल्या स्वारांस विचारिलें. “**रावसाहेब**, हा मठ आहे काय?”

**मराठा स्वार**—होय. हा मठ असून यांत **महादेवाचें** देवालयही आहे.

**वैरागीण**—येथें कोण राहतें?

**म० स्वार**—येथील पुजारी **ब्राह्मण** आहे. तो शहरांत राहतो. त्या झोंपडींत एक वृद्ध **वैरागीण** असते. तीच देवळांतील झाड-लोट व दिवा-बत्ती करिते. आमचे लोक वारंवार तेथें तंबाकु ओढावयास जातात.

**वैरागीण**—तर माझ्यासारख्या **वैरागिणी**सही हीच जागा चांगली. आपला येथें कोणी स्नेही नाहीं; तेव्हां आपल्या जातभाईबरोबर रहावें ह्मणजे झालें. येथें राहण्यास कोणाची कांहीं हरकत नाहीं ना?

**म० स्वार**—कांहीं नाहीं; परंतु हें स्थळ उजाड आहे. येथें रात्रीच्या वेळीं भीतीचा बराच संभव असतो. आह्मांला वाटतें ह्यापेक्षां तूं मोर्च्यांत राहशील तर फार चांगलें; परंतु आमचें सांगणें काय उपयोगाचें! तुला जसें वाटेल तसें कर.

**वैरागीण**—मला भिकारिणीला भीति आणि अडचण कसली? माझ्या नशिबांत लिहिलें असेल तें होईल.

**स्वार**—वाः! तूं भिकारी? तर मग श्रीमंत भिका-

रीण दिसतेस! तूं कोठेंही राहिलीस तरी तुला आनंदच आहे.

जाटानें हात जोडून स्वारास विचारिलें "शिपाईबुवा, माझें कसें काय? मीही येथेंच राहूं?"

स्वार ह्मणाला "तूं कशाला मरायाला येथें राहतोस!" इतकें बोलून त्यानें आपला घोडा फिरविला; आणि जाटास नखशिखांत पाहिलें. तेव्हां त्याच्या मुखचर्येवरून त्यास अत्याश्चर्य वाटलें असावें, असें दिसतें. बराच वेळ जाटास पाहिल्यावर तो **बैरागिणीस** विचारूं लागला. "हा तुझा सोबती आहे? तूं ह्याला ओळखतेस काय?"

**बैरागीण**—नाहीं; **रावसाहेब**. हा माझा स्नेही नव्हे. मीं **खानदेशांतील** आणि हा **भरतपूरचा**.

पुनः त्या स्वारानें **जाटाकडे** बारकाईनें पाहिलें. तो डोकें हालवून त्यावर भाला उगारूं लागला. ह्यावरून त्याचा त्या स्वाराला कांहीं तरी संशय आला असेल असें दिसतें. तो ह्मणाला "याद राख! तुझा मला फार संशय दिसतो; परंतु धन्याच्या आज्ञेपुढें नाइलाज. त्यांनीं तुला सुरक्षित पोंचवावयास सांगितलें नसतें, तर माझ्या संशयाची निवृत्ति याच तीक्ष्ण भाल्यानें केली असती. आतां तुझी व आमची पुनः भेट होईल किंवा नाहीं, हें सांगवत नाहीं. पण तूं इतकें पक्कें ध्यानांत ठेव कीं, तूं जर कांहीं कावा-डाव रचशील, तर या झाडास बांधून तिरांनीं ठार मारीन. रामराम! असें ह्मणून मराठा घोडेस्वार गेला.

जाटानें वेषांतर केलें होतें. स्वाराची धमकी ऐकतांच तो हांसला आणि **बैरागिणीमागून** वाडींत गेला.

वाडीच्या आजू-बाजूस बरींच नारिंगीचीं झाडें होतीं. कुंपणास एक कवाड होतें. मध्यें एक झोंपडी होती. त्याजवळ दोन लहानशीं घरें विटांनीं व मातीनें तयार केलीं होतीं. घरांस दोन दारें आणि मजबूत सऱ्यांच्या खिडक्या होत्या. एका खिडकींत, कानांत कुंडलें घातलेली एक **बैरागीण** बसली होती. आपल्या दारांत कोणी परकी **बैरागीण** येत आहे, असें पाहून ती सामोरी गेली. आपल्या पद्धतीप्रमाणें त्या दोघीही परस्परांस भेटल्या. नंतर तरूण **बैरागीण** ह्मणाली "मताजी, जय सीताराम!"

**वृद्ध बैरागीण**—रामेराम सीताराम! आदेश गुरुजीका. इतकें भाषण झाल्यावर, त्या दोघीही परस्परांकडे पहात तटस्थ उभ्या होत्या. नंतर वृद्ध **बैरागिणीनें** विचारिलें "बाई, तूं कोठून आलीस."

**तरूण बै०**—बाई, मीं अशीच फिरत आहें. आपल्या भिक्षेची पद्धतच अशी.

**वृद्ध बै०**—तुझ्या बापाचें नांव काय?

**तरूण बै०**—**जानकीदास.**

**वृद्ध बै०**—तुझें नांव?

**तरूण बै०**—**लालन.**

**वृद्ध बै०**—तुझ्या गुरूचें?

**तरूण बै०**—बऱ्हाणपुरांत राहणारा प्रसिद्ध **रणछोडदास** माझा गुरु. आजीबाई, तुमचें नांव काय?

**वृद्ध बै०**—बाई, माझें नांव **मोहनप्यारी.** माझा पति स्वर्गवासी झाला. माझ्या गुरूचें नांव **बाल-**

गोपालदास. तो कनोजचा राहणारा. तूं आलीस बरें झालें. तुझा काय उद्देश आहे?

त० वै०—आजची रात्र येथें राहवें, इतकाच.

वृ० वै०—कांहीं चिंता नाहीं. आंत चल.

इतक्यांत तो वृद्ध जाटही तेथें येऊन पोंचला. त्याला पाहतांच ती विचारूं लागली "हा कोण?"

तरुणीनें उत्तर द्यावयाच्या पूर्वींच जाट ह्मणाला "मीं एक प्रवासी आहें. आई, कृपा कराल आणि मला येथें रहावयास थोडीशी निवांत जागा द्याल, तर जगदीश तुमचें कल्याण करील.

वृ० वै०—प्रवाशांकरितांच हें स्थळ आहे; परंतु तूर्तच्या स्थितीचा विचार केला तर तुझें येथें राहणें या समयीं आह्मांस भीतिप्रद होईल, हीच शंका आहे. इतक्याकरितांच 'होय' ह्मणण्यापूर्वी विचार करावा, हें चांगलें. बाई, तूं ह्याला ओळखतेस?

त० वै०—नाहीं. 'आपण भरतपूरचा जाट. करनाळाहून भरतपुरास जाणार' असें तो सांगतो. मग खरें काय असेल, तें त्याचें त्याला माहीत.

या वृद्ध मनुष्याकडून आपलें काय अनहित होणार? असा वृद्धेनें विचार करून दोघांसही हात-पाय धुवावयास पाणी आणून दिलें. नंतर कांहीं वेळानें त्यांनीं स्नान केलें; तों संध्याकाळ झालाच. तिघेंही आपआपल्या भोजनसिद्धतेच्या तयारीस लागलीं.

# प्रकरण ७ वें.

## पाण्याचा झरा.

**मोहनप्यारी** आणि तिच्या पाहुण्यांनीं आपलें साधें अन्न लौकरच तयार केलें. **लालन, मोहनप्यारी**च्याच जातीची; ह्यामुळें त्या दोघींचा एकच स्वयंपाक होता. वृद्ध **जाटास** दोन-तीन लहान-मोठीं भांडीं, मीठ, मिर्ची, तूप, डाळ, तांदूळ वगैरे मिळतांच त्यानें आंबटी, भात व भाकरी तयार केली.

पडशाळेंत एका पणतींत एक दिवा मिणीमिणी करीत होता; पण जवळच एक परसा पेटत असल्यामुळें त्याच्या प्रकाशांत सर्वांनीं आपलें भोजन उरकलें. **जाटानें** व **मोहनप्यारीनें** आपलीं स्वयंपाकाचीं भांडीं घांसून पुसून उपडीं घातलीं; तोंपर्यंत **लालन** आपली बीन लावीत होती.

**मोहनप्यारी** बिछान्याची तजवीज करीपर्यंत, वृद्ध **जाटानें** चिलमीची तयारी केली. वृद्धा आपलें काम आटोपून गोष्टी बोलण्याकरितां कांहीं वेळ स्वस्थ बसली. तरुणीचें गोष्टीकडे लक्षच नव्हतें. सर्वांचें काम-काज आटोपून अन्नपचनार्थ तीं इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलण्यास किंवा ऐकण्यास तयार झालीं, तरी **लालन** आपली बीन नीट लावीतच होती. **जाटास** देखील **मोहनप्यारी**च्या शुष्क गोष्टी नको होत्या. तो, **लालन** केव्हां बीन वाजवून गाते ह्याच चिंतेंत होता. शेवटीं **मोहनप्यारी** कंटाळली आणि ह्मणाली, "बाई, तूं आज-फार श्रमली असशील!

तिचें भाषण **लालननें** ऐकलेंच नाहीं. ती आपल्या वीनच्या दुरुस्तींत निमग्न होती. मनुष्याचें मन एखाद्या खोल विचारांत किंवा उद्योगांत निमग्न असलें ह्मणजे, त्याच्या जवळ मोठमोठ्या उलाढाली झाल्या तरी त्याची त्यास दादच नसते. तोच प्रकार लालनचा. **मोहनप्यारीस** कोणीना-कोणी बोलायाला पाहिजे होतें; परंतु तिच्या भाषणाकडे कोणीच लक्ष्य देईना. वृद्ध मनुष्यांनीं जगाचा फार अनुभव घेतलेला असतो. त्यांतही **मोहनप्यारीस** बोलायला फार पाहिजे होतें. आपली कोठेंच दाद लागत नाहीं, आणि झोंप घेण्याचेंही कोणी नांव काढीत नाहीं, ह्यामुळें ती बिचारी बरीच संतापून मोठ्यानें ह्मणाली 'बाई, तूं आज फार थकलेली दिसतेस.' ह्या प्रश्नाचाही तिला कोणीच जबाब दिला नाहीं. नाहीं ह्मणायाला **लालनची** वीन मात्र तनन् तनन् टण्! अशी वाजत होती.

**लालन**चा निष्काळजी व सुस्त स्वभाव पाहून वृद्धेस फार राग आला. ती ह्मणाली "काय बाई जुलुम हा! अग मीं तुला कितीदां विचारिलें, तरी तूं जबाबच देत नाहींस. तूं शुद्धींत तरी आहेसना?"

हे शब्द कानीं पडतांच, **लालननें** आपली वीन खालीं ठेवून **मोहनप्यारीस** विचारिलें, "आजीबाई, आपण काय ह्मटलें?"

**मोहनप्यारी**—अग, मनाच्या विश्रांतिकरितां, घटकाभर बसून गोष्टी बोलाव्या; तें सोडून हें काय?

**लालन**—मग, नाहीं कोणी ह्मटलें?

**मोहनप्यारी**—बरें, पण तूं दमून आली आहेस;

तेव्हां तुला झोंप येत असल्यास गोष्टी बोलत बसण्याविषयीं आग्रह करणें बरोबर नाहीं.

**लालन**—आजीबाई, मीं दमलें आहें हा प्रकार निराळा; पण त्यापेक्षांही महत्संकटांत व विचारांत माझें मन गढलें आहे.

**मोहन०**—मीं समजलें. तूं सांगायचे पूर्वीं तुझें चिन्हच सांगतें. त्या दुष्ट म्लेंच्छांनीं, तुला बराच त्रास दिला आहे, यांत संशय नाहीं.

**लालन**—आजीबाई, जर स्वतः **शहानें** मला संकटांतून मुक्त केलें नसतें, तर माझ्या हाल-अपेष्टेस सीमाच नव्हती. "त्या लोकांचें जगदीश केव्हां काळें करील तें करो" असें ह्मणून **मोहनप्यारीनें** आपल्या हाताचीं कडाकड बोटें मोडिलीं; आणि विचारिलें "बरें; पण तूं बाई एकटी त्या चांडाळांच्या हातीं कशी सांपडलीस."

**लालन**—भिक्षा मागण्याकरितां फिरत मीं सहज त्यांच्या छावणीकडे गेलें असतां, तेथें एका नाल्यांत त्या दुष्टांनीं मला पकडून आपल्या छावणींत नेलें.

**मोहनप्यारी**—आह्मां हिंदू लोकांच्या छावणीजवळ निःशंक फिरण्यास हरकत नाहीं; परंतु त्या आडदांड रानटी लोकांच्या छावणीजवळ जाणें ह्मणजे महत्संकट व साहसच! तुला **पानपतचा** रस्ता माहीत नव्हता, कीं तूं मार्ग चुकलीस? पूर्वीं कधीं तूं **मराठे** लष्कराबरोबर इकडे आली नव्हतीस काय?

**लालन**—मीं ह्या प्रदेशांत आजच पाय ठेविला. लोकांस विचारिलें तेव्हां, त्यांनीं मला शत्रूच्या छावणीचा मार्ग दाखविला; ह्यामुळें मीं साहजिकच तिकडे गेलें.

**मोहन०**—बरें; इतकीं दुःखें व संकटें सोसून तूं इतकी दूर कां आलीस? तुझ्या आई-बापानीं तुला एकटी कशी बरें सोडिली? मला वाटतें तीं परलोकवासी असतील. बरें; मराठ्यांच्या छावणींत तुझा कोणाशीं परिचय आहे?

**मोहनप्यारीचे** प्रश्न ऐकतांच **लालनच्या** नेत्रांतून अश्रुधारा चालल्या. ती पूर्वीपेक्षां फार उदास व दीन दिसूं लागली. तिचा कंठ भरून आला. तिच्यानें कांहींच बोलवेना. बराच वेळ तिनें रडण्याचे हुंदके आंवरिले. तितक्यांत **मोहनप्यारी** समजली; परंतु तिनें जाणून बुजून पुनः विचारिलें, "परिचय असल्यास तूं इतर स्त्रियांप्रमाणें लष्कराबरोबर कां नाहीं आलीस? छावणींत हजारों स्त्रिया आहेत. त्यांनीं तुला मागें कशी सोडिली? मीं खात्रीनें सांगतें, मग तुझी खरी काय अवस्था असेल ती भगवान जाणे! तुझ्या ह्या अवस्थेचें व रस्ता चुकण्याचें खरें कारण खचित निराळें आहे!

**लालन** कांहींच विशेष बोलली नाहीं. तिनें इतकेंच सांगितलें कीं, "आजीबाई, मीं माझ्या जिवास फार कंटाळलें आहें."

**मोहन०**—खरोखर मीं ह्मणतें तसेंच आहे. तूं खरें सांग; तुझी हकीगत सांगायाला लाजूं नकोस. एका स्त्रीनें आपल्या सुख-दुःखाच्या गोष्टी दुसऱ्या स्त्रीला सांगणें ह्यांत लज्जा कसली?

**लालन**—आजीबाई, आपलें दुःख दुसऱ्यास सांगितलें, तर त्याचा आपल्यावरील कांहींसा भार कमी होतो, हें खरें; परंतु ती फार लांबलचक कथा आहे. ती ऐकून

इतरांचा फायदा किंवा त्यांस करमणूक होईल, असें कांहीं नाहीं. खरेंच बाई, मला तर सांगायला लज्जा वाटते.

**मोहन०**—अग, त्यांत लाज कसची? मीं तुझ्या आईसारखी आहें आणि हा वृद्ध ( जाटाकडे बोट दाखवून ) बाप समज. आईबापांपाशीं मुलांस लज्जा वाटण्याचें कांहीं कारण नाहीं.

**लालन**—लाजण्यासारखें कांहीं नाहीं हें खरें, परंतु—

**मोहन०**—परंतु नाहीं, आणि किंतु नाहीं. बाई, वाऱ्याचा तडाका बसला नाहीं, असें ह्या जगांत एकही झाड नसेल. तसेंच कोणा पुरुषावर प्रीति जडली नाहीं, अशी एकही स्त्री नाहीं. हें मीं अनुभवावरून सांगतें. त्यांत न सांगण्यासारखें तर कांहीं नाहीं ना?

**लालन**—न सांगण्यासारखें काय असणार? तुमची इच्छा असेल, तर मीं सांगतें; ऐका—

**मोहन०**—सांग. खुशाल सांग. आह्मांला कानभर ऐकूं दे. आह्मांला झोंप यायला अद्याप पुष्कळ वेळ आहे. तुझी कथा ऐकून आह्मांस एखादी युक्ति सुचली, तर आह्मीं मोकळ्या मनानें तुला सांगण्यास हयगय करणार नाहीं.

**लालन**—कांहींही होवो. तुमची ज्या अर्थीं ऐकण्याची इच्छा आहे, त्या अर्थीं मीं सांगतें ऐका.

इतक्यांत विहिरींतून पाणी आणण्याच्या निमित्तानें वृद्ध जाट तांब्या घेऊन निघाला. तेव्हां त्यास **मोहन-प्यारीनें** विचारिलें, "बाबा, कोठें निघालां?"

**जाट**—नाहीं. कोठें जात नाहीं. हा पहा आलोंच.

**मोहन०**—बरें, पण दार नीट लावून घ्या. इतकी

पंचाईत तरी पाहिजे कशाला? मीच तुमच्याबरोबर येऊन दार झांकतें. तुह्मीं आलां ह्मणजे मला हांक मारा; मीं उघडीन.

'बरें,' असें ह्मणून जाट निघून गेला. वृद्धेनें दार बंद केलें, आणि ती लालन जवळ येऊन बसली, व ह्मणाली " हं, आतां चालूंद्या."

**लालन**—राजा, राणी, भुतें, राक्षस, पिशाच्च, सावकार वगैरे चमत्कारिक कथानकाच्या तुह्मीं पुष्कळ गोष्टी ऐकिल्या असतील, परंतु माझ्या गोष्टींत तसें कांहींच नाहीं. माझा आहे हाच वेष. मीं वेषांतर केलें नाहीं, कांहीं नाहीं. माझा बाप **जानकीदास** जन्माचाच बैरागी. तशीच मींही बैरागीण आहें. **खानदेशांतील तापी** नदीच्या कांठीं आह्मीं रहात होतों. तो प्रदेश दाट जंगलानें वेष्टिलेला व डोंगराळ. त्यांत मीं लहानाची मोठी झालें, ह्यामुळें माझें मन निर्भय झालें. रात्र असो, दिवस असो मला केंव्हांही डोंगरांत, जंगलांत किंवा दरी-खोऱ्यांत जावयास भीति वाटत नसे. आमच्या मठाजवळ एक गांव होतें, त्यांत भिल्ल व गोंड लोक रहात. तेथें होळकरांच्या मकराणी लोकांचें ठाणें होतें. तेथें होळकर व पेशवे जकात घेत. माझी आई लहानपणींच मरण पावली. बापानें दुसरें लग्न केलें नाहीं, त्यामुळें लहानपणापासूनच घरांतील सर्व काम मला पहावें लागे. अन्नापाण्याची आह्मांस ददात नसे. माझा बाप तरुण वयांत पुष्कळ फिरला होता. संध्याकाळच्या वेळीं आमच्या घरीं पुष्कळ लोक जमत; आणि टाळ, मृदंग, ढोलकीं वगैरे वाजवून करमणूक करीत. मीं माझ्या बा-

पाजवळच बीन वाजवायाला शिकलें. एक वर्षापूर्वी-पर्यंत आमची अशी स्थिती होती. एके दिवशीं माझा बाप जवळच्या शेतांतून अफूचा लागा आणण्याकरितां परगांवीं गेला. तेव्हां घरांत मीं एकटीच होतें. त्या दिवशीं मीं घरांतील कामकाज लवकरच आटोपलें. जेवून खाऊन दोनप्रहरचे वेळीं थोडेंसें सूत काढलें, आणि भांडें घेऊन नदीवरून पाणी आणावयास गेलें. ते दिवस उन्हाळ्याचे होते; तेव्हां नदीवर किंवा आमच्या झोपडींत कोणी येण्याचा संभव नव्हता. नदीवरून मीं मठांत आलें. इतक्यांत मठाच्या दारांत राहून कोणी विचारिलें, “ हा कोणाचा मठ आहे ? ” मीं पाण्याची घागर खालीं ठेवून लगबगीनें बाहेर आलें, आणि पहातें तों दारांतील कडुनिंबाच्या झाडाखालीं दाट छायेंत एक मदनासारखा सुंदर घोडेस्वार उभा होता. त्यास पहातांच माझ्या मनाची स्थिति चमत्कारिक झाली; पण काय तें मला सांगतां येत नाहीं. तो पुरुष सुरेख होता. वस्त्रभूषणांनीं त्याच्या सौंदर्यांत चांगली भर पडली होती. त्याच्या घोड्यावरही पुष्कळ अलंकार होते. उन्हाच्या त्रासानें त्याच्या सुंदर मुखकमलावर बराच काळेपणा दिसत असे. दोघेही घामानें डवडवले होते. त्यावरून मीं तर्क केला कीं, हा कोणी तरी शिपाई शिकार करितां करितां इकडे आला असेल. माझ्यानें त्याला कांहींच विचारवेना. छाती धडाडूं लागली; पाय पुढें पडेना; मला कांप सुटला. तरी कांपत कांपत मीं लाजेनें तेथें कशीबशी उभी होतें. शेवटीं काय होईल तें होवो, असा मनाचा धडा करून मीं पुढें झालें; तेव्हां त्यानें विचारिलें, “ बाळे,

येथें कोण रहातें" मीं सभ्यतेनें जबाब दिला "महाराज, या झोंपडींत एक गरीब बैरागी असतो."

स्वार ह्मणाला "तूं भिऊं नकोस. मजकडून तुला कोणत्याही प्रकारची इजा होणार नाहीं." त्याच्या संभावितपणाचे भाषणानें मला कांहीं विशेष धैर्य आलें, आणि मीं त्यास विचारिलें "तुह्मांला काय पाहिजे?"

**स्वार** ह्मणाला "हिंदु लोकांस येथें पाणी पिण्यास हरकत नसेल, तर मी तहानेनें अगदीं व्याकुळ झालों आहें. मीं सकाळपासून शिकारीच्या नादानें रान-वनांतून आणि डोंगरांच्या दऱ्या-खोऱ्यांतून एकसारखा हिंडत असल्यामुळें, माझा घसा अगदीं कोरडा झाला आहे. माझ्या बरोबरचे लोक मला चुकले. या नदीच्या कांठानें डोंगराच्या दरींतून जाणें फार भयंकर! घोडा सोडून जावें, तरी विचारच. अशा विचारांत बराचवेळ फिरल्यावर जवळ कोठें गांव किंवा घर असलें तर पहावें, अशा हेतूनें मीं इकडे आलों. मार्गांत कित्येक गोंड व भिल्ल लोक भेटले; परंतु त्यांच्या हातचें पाणी घेणें आमचे धर्माविरुद्ध. त्यांनीं मला सांगितलें कीं, येथून जवळच मठ आहे, तिकडे तुह्मीं जा; ह्मणजे तुह्मांस चांगलें पाणी मिळेल. त्यांचा आभार मानून मठ शोधीत मीं इकडे आलों."

मीं ताजें स्वच्छ पाणी आणिलें होतेंच. त्यांतून एक तांब्या भरून आणून मीं स्वाराजवळ गेलें. इतक्यांत तो घोड्यावरून खालीं उतरला. त्यानें आपल्या हाताची ओंजळ करून तोंडाजवळ धरिली. मीं त्यांत पाणी ओतलें व तें तो गटागट प्याला. नंतर त्यानें मजकडे बा-

रीक दृष्टीनें पाहिलें आणि तो काय समजावयाचें तें समजला; परंतु त्याच्या पहाण्याचा किंवा समजण्याचा काय अर्थ होता, तो मला मुळींच समजला नाहीं.

हौतांतील पाणी जमीनीवर टाकतांना तो ह्मणाला, "आतां तूं मजकडे जशा दृष्टीनें अवलोकन करीत आहेस, तसें दुसऱ्या कोणा शिपायाकडे पहाशील, तर विनाकारण संकटांत पडशील इतकेंच नव्हे; पण समयीं प्राणहानि देखील होईल.

त्याच्या प्रश्नाचा काय जबाब द्यावा, हें मला समजेना. तशांत भयानें व लज्जेनें मजवर बराच अम्मल बसविला होता; तरी मीं मोठ्या हिंमतीनें सांगितलें, "मला या बोलण्याचा कांहींच अर्थ समजत नाहीं."

त्यानें पुनः मजकडे पाहून ह्मटलें "छीः! तूं मला शिकवूं नकोस. तुजसारख्या मुलीकडून मीं फसणार नाहीं. बरें; थोडा विस्तव असेल तर दे, चिलीम तरी ओढूं."

मीं विस्तव आणून दिला. त्यानें चिलीम ओढिली. नंतर त्यानें चिलमीवरील विस्तव एकीकडे टाकिला व चिलीम पालथी करून त्यांतील जळका वगैरे तंबाकू फेंकून दिला. चिलीम थैलींत टाकली, आणि तो घोड्यावर बसला.

तो एकसारखा हास्यमुद्रेनें मजकडे पहात होता. जातां जातां तो ह्मणाला, "बाळे, तूं मजवर मोठी मेहरबानी केलीस. तुला माझ्या मागून यावें लागेल. मीं एक जादू केला आहे. समयीं तूं देहानें न आलीस, तरी

मनानें अवश्य येशीलच येशील. बरें तर, तुला येतांना वाटखर्चीसाठीं कांहीं देऊन ठेवूं." असें ह्मणून त्यानें एक पिशवी मजकडे फेंकली. इतकें झालें तरी, माझे दुर्दैवानें असो किंवा अज्ञानानें असो, त्याला 'तूं कोण. काय,' असें मीं विचारिलें नाहीं. किंवा मला आतांच बरोबर न्या, असेंही सांगितलें नाहीं. तो जातांच माझ्या अंतःकरणांत प्रेमाग्नीनें पेट घेतला आणि मला वाटलें कीं, मीं जंगली, भित्री, दुःखी व हीनभाग्य आहें. अशा दुःखांत व चिंतेंत असतां मीं बराच विचार केला, परंतु माझी अक्कल गुंग झाली. माझें देहभान गेलें. तेव्हांच मला समजतें कीं, हा स्वार मला पाहून मोहित झाला आहे, तर मीं त्याच वेळीं हा देह त्याच्या स्वाधीन करितें.

नंतर मीं स्वाराच्या जाण्याच्या वाटेकडे पहात खालीं बसलें आणि पुष्कळ रडलें; पण त्याचा उपयोग काय? नंतर मीं थैली सोडून पाहिली. तींत पेशवाईतील चांदीचे रुपये होते.

पुढें तिच्यानें सांगवेना. तिला पुनः दुःखाचे व रडण्याचे हुंदके येऊं लागले. तेव्हां मोहनप्यारीनें तिला आपल्या जवळ घेतलें; आणि तिला कुरवाळून व वारा घालून सावध केलें.

बाहेर कोणी आल्याची चाहूल ऐकल्यासारखें करून मोहनप्यारी ह्मणाली "अजून तो जाट आला नाहीं."

लालन वर पाहून ह्मणाली, "त्याला जाऊन बराच वेळ झाला, तो अद्याप कसा बरें आला नाहीं?"

त्या दोघींनीं बराच वेळ त्याची वाट पाहिली व मोहनप्यारीही उठून बराच वेळ दरवाजांत त्याची वाट पहात उभी राहिली; परंतु तो आतां येणार नाहीं, अशी तिची खातरी होतांच तिनें दरवाजा बंद केला.

---

## प्रकरण ८ वें.

### प्रीत्यागमन.

आपल्या थोड्या परिचयाच्या नवीन मैत्रिणीचा आश्चर्यभरित वृत्तांत ऐकून, मोहनप्यारीच्या मनास फार वाईट वाटलें. दोघींनींही निजण्याची तयारी केली; परंतु त्यांस झोंप येईना. लालनच्या मनांत आरंभापासूनचा सर्व देखावा मूर्तिमंत उभा राहूं लागला. मोहनप्यारी तिच्या दुःखनिर्मुक्ततेची काय तजवीज सांगावी, ह्या विचारांत गढून गेली. बराच वेळ त्यांनीं झोंपेची मार्ग-प्रतीक्षा केली; परंतु विचारप्राबल्यापुढें त्या ईश्वरी देणगीचें कांहीं चालेना! तेव्हां लालननें आपली गोष्ट पुढें चालू केली.

ती ह्मणाली " माझ्या मनांत प्रेमग्रंथि दृढबद्ध होतांच मीं आजारी पडलें. मला अन्न-पाणी नकोसें झालें. दाही दिशा उदास दिसूं लागल्या. देहांतील रक्त आटून चाललें, गालांवरील टवटवी मावळली. नेत्र खोल गेले, गाल बसले. हातापायांची शक्ति कमी झाली. तेव्हां लोकांनीं अजमास केला कीं, हिला भूतबाधा झाली अ-

सावी. नाहीं तर ही तरूण, सुरेख, लुसलुसीत, केळीच्या कोंबासारखी असतां एकाएकीं वाळण्याचें कारण काय? कोणी ह्मणत, हिच्या तारुण्याच्या वसंतकाळास आरंभ झाल्यामुळें, ह्या रानांतील प्रेत किंवा पिशाच्चानें हिला पछाडिलें असावें. मला तर, माझ्या प्रियकराशिवाय जगांत दुसरें कांहीं दिसत नव्हतें. त्याच्या मोहक अवलोकनाचे प्रकार, त्याच्या बोलण्याची ढब, त्याचें मार्मिक भाषण, त्याची प्रेक्षणीय मूर्ति माझे मनांत क्रीडा करीत होती. फारतर काय, खातां-पितां, बसतां-उठतां, बोलतां-चालतां, माझ्या मनांत त्याच्याशिवाय दुसरा कोणताच विषय नसे. त्यानें माझ्या देहाची-शरीराची-मनाची -खराबी केली होती, तरी तो मला प्राणापेक्षां जास्त आवडत असे. मीं केव्हांतरी नदीवर पाणी आणावयाला जाई, तेव्हां मजपेक्षां वयानें मोठी अशी एक भिल्लाची स्त्री माझी मैत्रीण होती, तिला मीं आपली अवस्था सांगें. तिनें मला सांगितलें, "तूं पुरुषप्रेमांत परिबद्ध झाली आहेस. तुझ्या अंतःकरणांतील प्रियकराची व तुझी भेट होईल, तेव्हांच तूं दुःखमुक्त होशील. केवळ प्रियकराच्या वियोगामुळें तुझी अशी दशा झाली: यांत शंका नाहीं. हे तिचें सांगणें मला खरें दिसलें; आणि असेंही वाटलें कीं, खरोखर माझें मन हरण करणारा भेटेल, तर मीं फार सुखी व निरोगी होईन. मला वारंवार त्याविषयीं भलतीं सलतीं स्वप्नें पडत. स्वप्नांत तो माझ्या खांद्यावरून मानेवर हात टाकी. मला आलिंगन देई. केव्हां सुपुष्प-हारानें, केव्हां दागदागिन्यांनीं आणि केव्हां वस्त्रप्रावर्णा-नीं तो मला संतोषित करी. केव्हां मीं त्याच्या मांडीवर

बसें. केव्हां मीं चुंबन घेई. केव्हां केव्हां माझी काय दशा होई, ती मलाच समजत नसे. मला झोंप येत नसे. मीं विचारलहरींत तरंगूं लागलें ह्मणजे मला असें वाटे कीं, माझी झोंप जाण्यास व विचारप्राबल्य वाढण्यास माझा प्रियकरच कारण आहे. मीं नदीवर गेलें ह्मणजे "देवा, तो आतां या वाटेनें येऊन मला भेटेल काय?" असें ह्मणून त्याची मार्गप्रतीक्षा करीत मीं वेड्यासारखी भांडें जेथच्या तेथें ठेवून विचारांत गर्क होऊन बसें. त्याचें ध्यान करीत बसतांना माझ्या नेत्रांतून अश्रुधारा चालून माझा पदर भिजे; परंतु मला त्याची शुद्धी नसे. **जानकीदासाच्या** मुलीस भूतबाधा झाली आहे, असा जोंपर्यंत लोकांचा समज होता, तोंपर्यंत मीं चाहेल तिकडे वाटेल तितकावेळ जंगलांत भटकें. केव्हां गात बसें, केव्हां प्रियकरास हांका मारीं. असे वेडगळ चाळे मीं काय काय करीं, त्याला खरोखर सीमाच नव्हती.

माझी चमत्कारिक अवस्था पाहून माझा बाप **जानकीदास** चिंतातुर झाला. शेवटीं त्याला माझ्या हृद्गत व्याधीचें खरें कारण समजलें. मग तें माझी सखी सांगो, किंवा तो आपले बुद्धीनें समजो. तो वारंवार ह्मणूं लागला कीं, आतां होईल तितक्या लौकर **लालनचें** लग्न केलें पाहिजे. कारण, ती आतां वयांत आली. एके दिवशीं रात्रीं मीं झोंपी गेलें असें समजून त्यानें आपल्या शेजारच्या जमादारास हुक्का पिण्याकरितां हांक मारिली. त्याला तो सांगूं लागला कीं, "उद्यांक मीं **एलिचपुरास** जाणार. तेथें **लालनच्या** योग्य एक पुरुष आहे. त्याशीं तिच्या लग्नाचें ठरवावें, असें माझ्या

मनांत आहे. तुह्मीं घरांतील व्यवस्था पहा." मीं जागृत असल्यांमुळें त्यांचें सर्व भाषण ऐकलें. दुसरे दिवशीं मोठ्या पहांटेस माझा बाप बिछान्यावरून उठला आणि मला सांगूं लागला, "मीं कांहीं दिवस बाहेरगांवीं जातों. तूं घरांत संभाळून रहा. घरांत सर्व सामानसुमान आहेच. आणखी कशाची जरूर लागली, तर जमादारास मीं सांगितलें आहे."

त्यानें आपल्या लहानशा तट्टावर प्रवासोपयोगीं सामानसुमान घातलें, आणि रस्ता सुधारला. तेव्हां तर मीं महत्संकटांत पडलें. पुढें काय करावें, हेंच मला सुचेना. माझा बाप आला कीं, तो माझें लग्न केल्याशिवाय रहाणार नाहीं. मला माझ्या इच्छेविरुद्ध त्याचें ऐकावें लागणार. माझें खरें प्रेम कोणावर आहे, मला कोण पाहिजे, हें त्या बिचाऱ्याच्या स्वप्नींही येण्याचा संभव नव्हता. लग्नाचें कायम ठरलें आणि त्याशीं माझें लग्न करूं नको असें मीं सांगितलें, तरी माझें कोणी ऐकणार नाहीं. किंवा त्याला तसें न करण्याविषयीं मला प्रतिबंधही करितां येणार नाहीं. मग माझ्या प्रियकराचा समागम होण्याविषयींच्या सर्व आशेचा अंत होणार. काय करूं? नदींत जीव देऊं कीं अफु खाऊन प्राणत्याग करूं, असें मला झालें. परंतु तितक्यांतच मला सुचलें कीं, आत्मघात करणें महत्पाप आहे. अखेरीस अशा विपत्तींत पडण्यापेक्षां आपल्या प्रियकराच्या शोधार्थ तोंड घेऊन घराबाहेर पडावें, असा माझा निश्चय झाला. बोलून चालून मीं वैराग्याची कन्या. मला राजरोस भिक्षा मागण्यास कोणाचा प्रतिबंध नाहीं. वाट सांपडेल तिकडे

भिक्षा मागून प्रियकराचा शोध करावा, अशा विचारानें माझी बीन घेऊन मा घराबाहेर पडलें. परंतु मीं ज्याचा शोध करणार, त्याचें नांव-गांव देखील मला माहीत नाहीं; मग मीं त्याचा शोध करणार कसा, आणि मला त्याविषयीं कोणी कांहीं माहिती तरी सांगावी कशी? ह्या विचारांत मीं असतां पुढें त्याचेंही निरसन होऊन माझ्या मनाला असें वाटलें कीं, ईश्वर आपला साहाय्यकर्त्ता आहे; तेव्हां प्रियाची व माझी भेट होईपर्यंत फिरत रहावें. अवघें जग फिरावें लागलें किंवा मला त्याचें नांव-गांव माहीत नसलें, तरी चिंता नाहीं. जगदीश दाखवील त्या मार्गानें जावें आणि प्रियकर भेटेपर्यंत त्याला शोधावें. प्रेमदृष्टीपुढें तो कोठें छपून राहणार? आणि प्रेम आहे, तर संकटाची तरी पर्वा कसली?

त्यानें वाटखर्चीसाठीं जे रुपये दिले होते, ते मीं जपून ठेविले होते. त्याशिवाय मजकडेही कांहीं पैसा होता. तो सर्व घेऊन रात्रीच्यावेळीं अवघें जग गाढ निद्रावश असतां मीं घराच्या बाहेर पाय ठेविला. प्रथम नागपुराकडे जावें, असा विचार केला. तो प्रांत भोंसल्यांच्या ताब्यांतला. त्या प्रांतांत झाडी व डोंगर फार. दुसरे दिवशीं मला एक लम्माण्याचा तांडा भेटला, त्याच्या आधारानें मीं निघालें. त्याचा धनी भला मनुष्य होता. त्याच्या संगतीनें मीं नागपुरास सुखरूप आलें. तेथें बरेच दिवस राहून मीं माझ्या प्रियाचा तपास केला. शेंकडों शिपाई व अमीर–उमराव पाहिले. कित्येक प्रवासी व शेटसावकार माझ्या अवलोकनांत आले; परंतु व्यर्थ. नंतर मीं हैदराबादेस जावयाचा विचार

केला. पुनः मीं कोरी जंगलांतून, डोंगरांवरून, पर्वतांतून, भयंकर श्वापदांचे कर्कश व भयानक शब्द श्रवण करीत निघालें. मार्गांत कित्यक शिपायांच्या व स्वारांच्या टोळ्या मला भेटल्या. हैदराबादेस गेल्यावर तेथें मराठे लोकांच्या राहण्याच्या जागा मीं शोधिल्या; परंतु जो मला भेटावयास पाहिजे होता, तो भेटला नाहीं. तेथें माझी निराशा होतांच मीं तेथून विजापूर, सातारा, वगैरे शहरें पाहून फिरंग्यांच्या राज्यांत गेलें. तेथें मोठमोठीं गलबतें येतात. तेथील लोक सुळावर चढवि-लेल्या मृत मनुष्याच्या आकृतीची पूजा करितात. तेथेंही माझी आशा निष्फल झाली. तेथून मीं मुंबईस आलें. परंतु तेथेंही आशेची सफलता झाली नाहीं. नंतर माझा असा विचार झाला कीं, आपलें मानस हरण करणारा हिंदु आहे. तर्त सर्व हिंदुलोकांच्या राजधानीची जागा पुणें शहर आहे. तेथें शेंकडों लोकांची ये-जा सुरू असते. आपण तिकडेच जावें, म्हणजे नशिबानें लागला तर ला-गला पत्ता. मुंबईहून पुण्यास आलें; तेव्हां तें शहर जादूनें भारल्याप्रमाणें उदास व भयाण दिसत होतें. तेथील बहुतेक लोक सांगूं लागले कीं, भाऊसाहेब पु-ष्कळ सेना आपलेबरोबर घेऊन काबुलच्या राजाशीं युद्धास गेले आहेत. त्याजबरोबर श्रीमंत पेशव्याचे पुत्र व पुष्कळ शूर वीर सरदार आहेत. येथें फक्त म्हातारे-कोतारे पुरुष, स्त्रिया व अज्ञान लेंकरें मात्र राहिलीं आहेत. तेव्हां मीं उत्तरहिंदुस्थानांत येण्याचा तेथेंच निश्चय केला.

मोठ्या त्वरेनें चालत मीं दौलताबाद, मालेगांव पहात

पहात सुरतेस आलें. तेथून बडोदा, उदेपूर, इंदूर, कोटा, जयपूर पहात पुढें निघालें. आजीबाई, ज्यांचें नांवगांव मला माहीत नाहीं, त्याचें वर्णन तोंडानें सांगून लोकांस काय समजणार? आणि त्याचा पत्ता ते मजसारख्या गरीब स्त्रीस काय सांगणार? मार्गांत मला पुष्कळ फकीर, बैरागी, गोसावी, फक्कड, बावा, साधु व संत भेटले. जो भेटे, त्यास माझा पहिला प्रश्न माझ्या प्रियकराबद्दलचा असे; पण फुकट. कोणीही घोडेस्वार आढळो, त्यास मीं हरतऱ्हा करून विचारून पाहीं. परंतु जेथें जेथें गेलें, तेथें तेथें गेलें नसतें तर चांगलें, असें मला वाटूं लागलें. अखेरीस प्रवासाच्या त्रासानें, निरनिराळ्या प्रांतांतील निरनिराळ्या हवा-पाण्यानें, आणि जावें तेथें आपला हिरमोड होतो या दुःखानें, मीं फार कंटाळलें. असें निर्लज्जपणें भटकण्यापेक्षां मरण येईल तर सोन्याहून पिवळें, असें मला वाटूं लागलें.

मध्यें पर्जन्य फार पडूं लागला, ह्मणून मीं जयपुरास राहिलें. वर्षाऋतु संपतांच मीं पुनः प्रवासास सुरवात केली. आतां घरांतून निघाल्यासारखी एकदां नशिबाची पुरी परीक्षा पहावी; मग त्यांत मरायला होवो किंवा तरायला होवो, असा माझा निश्चय झाला. वाटेंत भरतपूर व अलवार हीं ठाणीं मीं अवलोकन केलीं. तेथें पुष्कळ सैन्य जमलें होतें. तेथून मीं दिल्लीस आलें तेव्हां मला समजलें कीं, मराठ्यांचें लष्कर पानिपतच्या उत्तरेस आहे. 'तेथें जाऊं नको' असेंही मला पुष्कळांनीं सांगितलें. त्याचें कारण त्यांनीं इतकेंच सांगितलें कीं, कौरव-पांडवांनंतर न झालेली अशी भयंकर लढाई तिकडे चालली आहे.

तेथें जमलेले युद्धोत्सुक अफगाण फार दुष्ट व नीच स्वभावाचे आहेत. परंतु मोहत्रा नें पीडित झालेल्या लालनेस त्यांच्या सांगण्याचें महत्व कितीसें वाटणार ?

तिसरे दिवशीं मीं अफगाण छावणीजवळच्या शहरीं आलें; मीं आणि पानिपत ह्यांच्यामध्यें अफगाण लष्कराचा मोठा तळ पडला आहे असें मला समजतांच, हिंदु-लष्करांत जाण्याचा मार्ग दाखविणारा मीं एक वाटाड्या घेतला. काल मध्यरात्रीच्या सुमारास आह्मीं तेथून निघालों. आह्मीं परदेशी लोकांच्या छावणी जवळून जाण्याच्या तयारींत होतों, तोंच मुसलमान घोडेस्वारांची एक टोळी आह्मांकडे आली. त्या लोकांच्या भयानें माझ्या बरोबरचा वाटाड्या सुसाट पळत सुटला. घोडेस्वार तेथून जाईपर्यंत मीं एका ओढ्यांत लपून बसलें. स्वार जातांच मीं पुढें निघालें. परंतु रस्ता माहीत नव्हता, व तशांत मीं एकटी. जिकडे वाट फुटेल तिकडे जावयाचें; अखेरीस मीं वाट चुकलें. तरी दोन काबुली लोकांची गांठ पडेपर्यंत मीं एकसारखी चालत होतें. ते मजशीं क्रूरपणानें व निष्ठूरतेनें वागतील असें मला वाटलें नव्हतें; परंतु एक लष्करी तुकडी येईपर्यंत त्यांनीं माझे फार हाल केले. यावरून ते लोक फार नीच व पापबुद्धि आहेत, असें मला दिसलें. तुकडींतील लोक पुढें जातांच, त्यांनीं मला आपल्या छावणीकडे नेलें. तेथील रखवालदाराच्या मनांत मजविषयीं भलतीच कल्पना येऊन शेवटीं माझ्या जिवावर प्रसंग येऊन गुदरला. आतां मीं जगांत नाहीं, अशी माझी खातरी झाली. त्यांनीं मला ठार मारण्याकरितां हत्यार उपसलें; परंतु 'दानात तशी बरकत.' माझी निष्ठा चांगली,

ह्मणून तितक्यांत तेथें मोठमोठ्या दर्जाचे कित्येक स्वार आले. त्यांचीं आपसांत पुष्कळ भाषणें होऊन मला धरणाऱ्या दुष्टांस त्यांनीं चांगली शिक्षा केली. त्यांस माझी दया आली व त्यांनीं मला गावयास सांगितलें. माझें गाणें ऐकून ते फार खुष झाले आणि त्यांनीं मला पुष्कळ बक्षीस दिलें; परंतु त्यांचा हेतु इतकाच होता कीं, मीं भाऊसाहेबांच्या छावणींत गेल्यावर मुसलमानांस कंजुष अथवा जंगली ह्मणूं नये. बादशहानें केवळ उदार बुद्धीनें मला सोडल्यावर पहिल्या भांडणांतील एक पहारेकरी माझें फारच आर्जव करूं लागला. त्यानें मला चाहेल तें देतों असें सांगून रहाण्याविषयीं अत्याग्रह केला; पण माझा जो निश्चय होता, त्यांत मुळींच बदल झाला नाहीं. त्यानें आपल्य तैनातींतील कित्येक लोक मला पोंचवावयास दिले. त्यांजबरोबर मीं रणस्तंभापर्यंत आलें. तेथें माझ्या धैर्याची किंवा हिंमतीची चांगली परीक्षा झाली.

**मोहन०**—शाबास! बाई, ती काय?

**लालन**—काय? मीं ज्यास भेटेन अशा निश्चयानें निघालें,—

**मोहन०**—(मध्येंच) त्यास भेटलीस वाटतें?

**लालन**—नाहीं; पण त्यास मीं डोळेभर पाहिलें.

**मोहन०**—तर मग जो मागें फिरला, तोच मराठा सरदार तुझा प्रियकर वाटतें!

**लालन**—असें खरें, आजी बाई!

**मोहन०**—खरेंच बाई, तूं मोठी भाग्यशाली! त्याशीं तूं बोललीस?

**लालन**—नाहीं.

**मोहन०**—बरें; पण त्याचें नांव तरी तुला समजलें?

**लालन**—होय.

**मोहन०**—काय?

**लालन**—(लाजत) **महादाजी शिंदे.**

**मोहनप्यारीनें** मोठ्या सन्मानानें आपले दोन्ही हात पुढें केले; आणि **लालनला** प्रेमालिंगन देऊन विचारिलें, "पुढें काय झालें?"

**लालन**—तें सर्व तुह्मांला माहित आहेच. त्यांच्या लोकांबरोबरच मीं इकडे आलें, आणि अद्याप येथें आहें.

**मोहन०**—तर मग, तो **जाट** कोण?

**लालन**—तें मला काय माहीत? **मराठ्यांच्या** छावणीकडे मीं निघालें, तेव्हांपासून तो मजबरोबर आहे. त्याचें माझें भाषण नाहीं किंवा कोणत्याही प्रकारचा संबंध नाहीं. मला इकडे पाठविणें झालें, तेव्हां तो, त्यांचें आर्जव करून सांगूं लागला कीं, "मीं फार भित्रा आहें; मला हिच्याबरोबर जाण्याची परवानगी द्या."

**मोहन०**—बरें; तो अद्याप आला नाहीं कसा? माझ्या मनास उगाच हुरहुर लागली आहे. न जाणो, अशा परकी लोकांच्या अविश्वासुपणाचा एखादे वेळीं भलताच परिणाम व्हावयाचा.

इतक्यांत बाहेरचें दार ठोंठावल्याचा आवाज ऐकूं आला व त्या दोन्ही स्त्रिया, ज्या **जाटाच्या** विवंचनेंत होत्या, तोच तो हांका मारीत आहे, असें त्यांनीं ऐकिलें.

**जाट**—आजीबाई, अहो आजीबाई, दार उघडा.

"काय संकट आलें पाहूंया." असें ह्मणून **मोहनप्यारी** उठली.

**लालन**—संकट कसलें? जगदीश समर्थ आहे.

**जाट**—आजीबाई, भिऊं नका. मीं तो जाट. तुम्हीं निजलां वाटतें?

**मोहनप्यारी** दाराजवळ कान देऊन बाहेर कोण बोलतात वगैरे कानोसा घेऊं लागली. तिच्या मनाची खातरी झाली कीं, दाराबाहेर जाटाशिवाय दुसरा कोणी नाहीं. तेव्हां तिनें कडी काढीत ह्मटलें, "भल्या माणसा किती वेळ हा! तूं ह्मणालास, आतां जाऊन येतों; पण तीन तास झाले, तरी तुझा ठिकाण नाहीं! झाला ह्मणावें तरी काय?"

**जाट**—खरें ह्मटलें, आजीबाई. त्या लबाड **गार**-द्यांनीं मला पकडलें नव्हे हो! त्यांची खातरी होईपर्यंत गुलामांनीं मला कुचंबत ठेविलें. काय करणार?

**इब्राहीमखान गारद्याचें** ठाणें तेथून जवळच होतें, आणि हा अजाण व परकी मनुष्य त्यांच्या तडाक्यांत सांपडण्याचा संभवही होता. तेव्हां **मोहनप्यारीनें** त्या जाटास आंत घेतलें. तिनें त्याच्या भामटेगिरीचा बिलकुल विचार केला नाहीं. जाटाचें भाषण निव्वळ खोटें, असा तिला पुढें प्रत्यय आला. दारास घट्ट आडसर घालून **मोहनप्यारी** बिछान्यावर पडली न पडली इतक्यांत "**मोहनप्यारी, मोहनप्यारी,**" अशा हांका देत कित्येक लोकांची टोळी तेथें आली; आणि दार फोडून आंत शिरली.

# प्रकरण ९ वें.

## आईचें मन आणि रात्र सारखी.

बाहेरील गडबड आणि पावलांचा आवाज ऐकतांच लालन भ्याली.

लुतुफउल्लाच्या मनांत लालनविषयीं दुष्ट वासना होती. ती जेव्हां त्याच्या हातून सुटली, तेव्हांच त्यानें आपल्या दुष्ट वासनेचा परिणाम अमलांत आणण्याकरितां मुद्दाम जाटास तिजबरोबर पाठविलें; आणि ती कोठें राहते, हा तपास काढून येण्यास सांगितलें. धन्याच्या आज्ञेप्रमाणें सेवकानें आपलें काम चांगलें बजाविलें.

लुतुफउल्ला मोठ्यानें दरडावून ह्मणाला, " ती लबाड वैरागीण कोठें आहे? धरा तिला—संभाळा-पळून जाईल."

जाट—अहो, इकडे या, इकडे. तिकडे दुसर रस्ता नाहीं. ती जाते कोठें? पळून जाणार नाहीं' भिऊं नका. तिसरा एक मनुष्य मध्येंच बोलला, "दरवाजा संभाळा. तुह्मीं बेवकूफ आहां, असें दिसतें. तुमचें बिलकुल लक्ष्य नाहीं. यःकश्चित् स्त्रीच्या मागून दिवाण्याप्रमाणें इकडे तिकडे भटकतां; पण मागिल पुढील स्थितीचा विचार कोणीच पहात नाहीं. काय मूर्खपणा हा?"

लालनबरोबर आलेला विश्वासघातकी सोबती लुतुफउल्लाच्या टोळीचा पुढारी व माहितगार होता. त्याची टोळी आंत शिरतांच, लालननें आत्मसंरक्षणाकरितां 'दिवा मालविला; आणि ती एका कोनांत लपून बसली.

आंत शिरलेली टोळी मित्री नव्हती. तिनें आंत उजेड नाहीं असें पहातांच कांकडे पेटविले; आणि पहिल्या सपाट्यास त्यांनीं लालनला पकडिलें.

लुतुफउल्ला—( आतूर होऊन ) आतां कांहीं होवो, देवानें मेहरबानी केली. आतां काळाचीही भीति नाहीं. प्राण गेला, तरी देखील हिला मीं सोडणार नाहीं.

लालननें ओक्साबोक्सीं रडून आकांत केला व त्यांच्या हातून सुटण्याचा प्रयत्न केला; परंतु वाघाच्या तडाक्यांत सांपडलेल्या मेंढीप्रमाणें तिची अवस्था झाली. ती मोठ्यानें ओरडूं लागतांच, मागून कोणी मुखपाश घातला आणि तिला फरपटत ओढीत दाराबाहेरील आंगणांत आणिलें.

लालनला घेऊन ती टोळी झोंपडीच्या बाहेर येतांच त्यांतील पुढाऱ्यानें थोडासा वेळ विचार करण्यांत दवडून वाडीच्या बाजूनें नाल्याचा मार्ग धरिला. दहा-बारा कदम पुढें गेल्यावर लुतुफउल्ला पडत-झडत व आपटत-धोपटत लालनबरोबर निघाला; आणि जातां जातां ह्मणाला, "ल्यारबबर सैतान लातन" (परमेश्वरा, सैतानास धिक्कार असो.)

वेषधारी जाट—केवळ देवाकरितांच तुह्मीं आज वाघ मारिला !

अफगाण—काय ह्मणतो बीरबल ?

जाट—खुदावंत, इब्राहीमखान गारद्याचें ठाणें जवळ आहे; करितां मशाली विझवा.

बोलतां बोलतां त्या टोळींतील लोकांनीं आपल्या हा-

तांतील मशालीसारखे कांकडे विझविले; आणि लपत-छपत ते नाल्याच्या कांठावर आले. ही टोळी दूर गेली असेल नसेल, इतक्यांत नाल्याच्या वरील बाजूस मनुष्यांची चाहूल असावी, असा तीस भास झाला.

"गारदी लोक, अहो तमाम गारदी लोक! पहा माझ्या मुलीस जबरीनें घेऊन चालले. धरा, मारा." अशी ओरड करीत **मोहन** बाहेर पडली. तिचा हेतु **इब्राहीमखाना**ची टोळी जवळ आहे, तींतील लोक आपल्यास तावडतोब मदत करतील, असा होता. इतक्यांत बंदुकींच्या चापांचा व पडघुमचा आवाज होऊन "तुझें सांगणें आह्मीं ऐकिलें.,, असें उत्तर मिळालें.

**लुतुफउल्ला**— बीरबल, ती ह्यातारी कुत्री कोण?

"सासू. इतकेंच उत्तर.,,

**लुतुफ०**—अरेरे! मला हें प्रथमच समजतें, तर ती थेरडी जेथें पडली होती, तेथेंच तिचे तुकडे तुकडे केले असते.

ती टोळी भीतीग्रस्त मार्गांतून थोडीशी पुढें गेली. इतक्यांत ती ज्या नाल्यांतून जात होती, त्या नाल्याच्या वरच्या कांठावरून " कौनहै?" असा शब्द झाला. तिकडे जमलेल्या लोकांनीं बंदुकींचे घोडे ओढिले व त्यांचा किलीक किलीक असा आवाज झाला. 'कौनहै' या प्रश्नाचा बराच वेळ जबाब मिळाला नाहीं; तेव्हां त्यांनीं पुन्हां विचारलें, "उदर कौनहै?" "ससूर, तेरा बाप!" हेंच वरील प्रश्नाचें उत्तर. त्या बरोबर कटाकट बंदुकींचे चाप पडले; आणि सटासट गोळीबार झाले. त्याचा प्रतिध्वनि नाल्यांत चांगला दुमदुमला.

गोळ्यांच्या वर्षावापासून टोळींतील लोकांस कांहींच इजा झाली नाहीं; परंतु अंधःकारामुळें व रस्त्यांतील खांच खळग्यांमुळें तिचे फार हाल झाले. बंदुकींच्या धुरानें पुढें कांहींच दिसेना. तेव्हां एक इसम मागें राहिला आणि ढोंपरावर राहून त्यानें आपली बंदूक झाडिली. त्या बरोबर अतीशय कल्पांत झाला. पुनः **मोहन** मोठ्यानें ह्मणाली, "ते चालले. अहो, ते गेले. मारा गुलामांना. बांधा मुस्क्या" लोकांची दाटी बरीच होत चालली, असें **लुतुफउल्लास** व त्याच्या बरोबरच्या टोळीस वाटतांच त्यांनीं दवा धरून राहवयाचा नाद सोडून आपल्या शिकारीसह झऱ्याच्या खालील बाजूचा मार्ग पकडला. **बीरबल** आरोळी मारून सांगूं लागला, "पुढें धांवा; हीच संधि आहे. ते लोक हिंमतीनें पुढें येणार नाहींत. विनाकारण बंदुका झाडीत भित्र्यासारखे जागच्या जागीं रहातील किंवा दमले ह्मणजे मागें वळतील." **बिरबला**चाही समज चुकीचा होता. कारण, आलेल्या टोळीच्या अंमलदारानें एकदम हुकुम केला आणि **अफगाण** टोळीच्या मागें बंदुका सुटूं लागल्या. त्या, पळणाऱ्या टोळीच्या मस्तकावरून गल्यामुळें **अफगाणांनीं** चार पांच बंदुका सोडून झपाट्यानें पळण्यास सुरवात केली. तितक्यांत पडघुम वाजलें व रणशिंग झालें. **पानिपत** जवळ जो तोफखाना होता, त्यांतील **मराठ्यांच्या** मोर्च्यावरील लोकांस इतकी खूण पुरे होती, परंतु अफगाण लोकांस त्याची पर्वाच नव्हती.

पावकोस हाल व त्रास सोसून जातांच त्रासदायक मार्ग संपला. **लालन**, **झमरुद**च्या हवालीं होती.

त्याच्या बरोबर हिंदुस्थानांतील रस्त्यांचा माहीतगार बीरबल होता. त्यांची लहानशी तुकडी अफगाण लोकांच्या छावणीपुढें जें मोकळें मैदान होतें, त्यांत सुरक्षित पोंचली.

इतकें झालें तरी ती तुकडी निखालस पार पडली नव्हती. ती मराठे सैन्याचा रणस्तंभ उजव्या बाजूस सोडून पुढें चालली तोंच, घोड्यांच्या पावलांचा शब्द तिच्या कानीं आला. लुतुफउल्ला व त्याचे बरोबरचे लोकही जवळ नव्हते. एखादी सूचना करावी, तरी पंचाईत. बरें; मोकळ्या मैदानांत घोडेस्वारांच्या सपाट्यांतून निभाव लागण्याचीही मारामारच. प्रसंग पडला ह्मणजे उपाय सुचतो. त्यांनीं जमीनींवर पडून आपलें संरक्षण करण्याचा उपाय योजिला. एका हबशानें लालनचें तोंड दाबून धरिलें. त्या बिचारीच्या संकटास तर सीमाच नव्हती. दुःखामागून दुःख, विपत्तिमागून विपत्ति आणि त्रासामागून त्रास यांनीं अगदीं कहरच करून सोडिला. परंतु ती करते काय? ‘पडले कष्ट शरीर सोशी’ हाच न्याय खरा. लालनला ती टोळी मराठ्यांची आहे कीं मुसलमानांची आहे, हें समजण्यास साधनच नव्हतें. रात्रीच्या मिट्ट अंधःकारानें व मातीच्या लहान मोठ्या उंचवट्यांनीं त्या टोळीचें रक्षण केलें. आतां आपण निर्भय झालों असा विचार करून ती टोळी आपले जाग्यावरून उठून चाळीस कदम पुढें गेली असेल नसेल, इतक्यांत अशिक्षीत मराठे घोडेस्वारांचें सैन्य तिच्या दृष्टीस पडलें. मराठे सैन्यानें न बोलतां आपलें काम चालविलें. घोड्यांच्या पावलांचा शब्द होऊं नये,

अशा बेतानें घोडे चालविले होते. त्यांच्या कमरपट्ट्यांत ज्या तरवारी होत्या, त्यांचाही ते अवाज होऊं देत नव्हते. ह्यावरून त्यांस गुपचुप जाण्याचा हुकुम झाला असावा, असें वाटे. त्या लोकांनीं आपल्या अंगांत रूदार आंगरखे घातले होते. आणि त्यांच्या एकंदर व्यवस्थेवरून ते सर्वांपेक्षां सावधपणें व दक्षतेनें बाहेर पडून आपलें काम करीत होते. मनुष्याचा शब्द बिलकुल ऐकूं येईना. तेव्हां **लुतुफउल्ला** ह्मणाला, "ते कोठें जात असतील?"

**बीरबल**—बहुधा घस्त घालण्याकरितां चालले असतील.

**लुतुफ०**—छीः! असें नसेल. अगदीं थोडे ह्मटले तरी, ते लोक चारशेंत कमी नसतील. त्यांच्या बरोबर डंका व निशाण असून ते समोर आपल्या छावणीकडे जात आहेत.

"न जाणो ते घांस-चारा आणायला जात नसतील कशावरून? अथवा ह्या बाजूस अडचण करायला देखील ते निघतील." असें एका शिपायानें मध्येंच ह्मटलें.

विपक्षाची हालचालीची ज्याला चांगली माहिती, जो परदेशाचा चांगला माहितगार आणि ज्यानें हिंदुस्थानांत फार दिवस घालविले, असा एक वृद्ध अफगाण बोलला, "तसें असतें, तर ते जमावानें जातेना. जातांना थट्टामस्करी व गप्पा-गोष्टींचा सुकाळ असावयाचा. गडबड माजविल्याशिवाय सुध्या मार्गानें ते निमूट गेले, असें आजपर्यंत कधींच झालें नाहीं; परंतु आतां पहा ते कसे चोरासारखे चालले आहेत."

**बीरबल**च्या मनांत तिसराच विचार आला. तो गांभिर्यानें ह्मणाला, "अहो, तसें असतें, तर चाकर व तट्टें बरोबर पाहिजेत; तीं आहेत कोठें?"

**लुतुफ०**—देव करो आणि असें मात्र न होवो कीं, **गोविंदपंत** बुंदेल्याशीं आह्मीं जें वर्तन केलें, त्याचा सूड उगविण्याकरितां हे **उदीखाना**च्या समाचारास मात्र न जावोत. तितक्यांत एक जासूद पट्कन जमीनीवर पडला आणि कान देऊन ऐकल्यावर उठून सांगू लागला. "काय असेल, तें देव जाणे; पण येथें राहणें भयाचें आहे. आज **मराठे** घोडेस्वारांस ऊतच आला आहे. जावें तिकडे त्यांचा सुळसुळाट चालू आहे. आपण जितक्या त्वरेनें जाऊं तितकें चांगलें."

हें जासुदाचें भाषण ऐकतांच सर्वांच्या पोटांत धास्ती पडली. त्या टोळींतील लोकांनीं त्वरेनें पुढें चाल केली. **बीरबल** तिचा पुढारी होता. तो तीस मोठ्या बेताबातानें नेत होता. पण मागें फिरण्याचा प्रसंग आला, तर तिचें कसें रक्षण करावें, हा विचार त्याच्या मनांत घोळत होताच. प्रसंग केव्हां येईल, याचा मुळींच नेम नसतो. ती टोळी एकाएकीं मोठ्या संकटांत पडली. दहा कदमांवर एक झरा होता; परंतु तो अगदीं अरुंद असल्यामुळें संरक्षणाच्या कामीं निरुपयोगी होता. **पानिपत**च्या मैदानांत असे झरे फार. त्या टोळीनें युक्तिप्रयुक्तीनें संकटांतून पार पडण्याचा बेत केला; परंतु तो व्यर्थ गेला. **लॉलन** इतका वेळ स्वस्थ होती; परंतु तिचाही नाइलाज झाला. शेवटीं ती टोळी **मराठे** लोकांची असली आणि तींतील कोणास दया येऊन आपली मुक्त-

ता झाली तर पहावें, असें मनांत आणून टोळी जवळ आली असें लालनला वाटतांच जरी ती बंधनांत व दुःखातिशयांत होती तरी, "तेथें कोणी हिंदु आहे काय?" असें ती मोठ्यानें ह्मणाली. तेव्हां "तिकडे कोण हिंदु आहे?" असा तिला जबाब मिळाला. लालन त्याला उत्तर देणार तोंच, झमरुदानें तिच्या तोंडावर हात ठेविला. इतका वेळ तिनें कांहीं गडबड केली नव्हती. त्यावरून झमरूदची खातरी झाली होती कीं, ही मुकाट्यानें आह्मीं नेऊं तिकडे येईल, परंतु तो त्याचा समज चुकीचा ठरला. तेव्हां तो ह्मणाला "काय जाहांबाज बायको आहे ही!"

झमरूदच्या भाषणानें लुतुफउल्लास त्वेष आला. तशांत भीतिग्रस्तावस्थेनें त्यांत विशेष भर पडली. त्यानें पट्कन आपल्या कमरपट्ट्यांतून पिस्तोल काढून मराठे स्वारावर झाडिलें. त्याची गोळी नेमकी मराठे घोडेस्वाराच्या छातींत बसून त्याचा प्राण गेला व तो घोड्यावरून खालीं पडला. आपला धनी किंवा आपल्यास कह्यांत ठेवणारा कोणी नाहीं असें घोड्यास वाटतांच तो अनावर होऊन उधळला; तेव्हां एकच धांदल उसळली. ती पाहून बीरबल मोठ्यानें ह्मणाला, "उठा. बेवकूफ, पळा. नाल्याकडे पळा. धांवा, आतां बचाव व्हावयाचा दुसरा उपाय नाहीं. नाल्यांत त्यांचे घोडे येणार नाहींत" बिरबलचें हें भाषण ऐकतांच लुतुफउल्ला व झमरूद या दोघांनीं रडणाऱ्या व आकांत करणाऱ्या लालनेस ओढीत दहा कदम पुढें नेलें.

दक्षणी लोक मोठ्या जोमानें व आपल्या समजाप्र-

माणें जंगी तयारीनें आले होते. अंधःकारानें सर्वत्र अंमल बसविला होता; तरी त्यांचे घोडे ठोकर खात व अडखळत नाल्यांत उतरले. एका घोड्याचा पाय लचकला, तेव्हां वरील स्वार खालीं येण्याच्या बेतांत होता; पण दुसऱ्या स्वारानें त्याचा तोल सांवरला. इतक्यांत अफगाण टोळींतील लोकांनीं दोनतीन बार काढिले. त्यामुळें मराठे स्वारांनीं तो रस्ता सोडून डावी बाजू धरिली. वारंवार दुःख भोगण्याची व मरण्याची पाळी येऊं लागली. झमरूद फार त्रासला. त्याला वाटत होतें कीं, लालनची दगदग आपल्या मागें नसती, तर आपण केव्हांच सुखरूप पोंचलों असतों. तो ह्मणाला, "मियां, आतां आमचें रक्षण होणें कठीण! माझी खंजीर इकडे आण. त्यानें ह्या स्त्रीचे मीं एका तडाक्यांत दोन तुकडे करितों. उगीज हें लफंडें कां?"

आपल्या जातिस्वभावाविरुद्ध किंवा स्वदेशांतील लोकांच्याविरुद्ध लुतुफउल्ला ह्मणाला, "छीः छीः असें करूं नको. तिनें आमचा कांहीं अपराध केला नाहीं; किंवा "तुह्मीं येऊन मला घेऊन जा" असेंही तिनें आह्मांस आमंत्रण दिलें नाहीं. मीं ह्या विपत्तींत मेलों, तरी माझें स्मरण करीत तिनें जीवन कंठावें, इतक्याकरितां मीं तिला मुक्त करीन. पण जीवंत असेपर्यंत तिच्या एका केंशासही मीं धक्का लागूं देणार नाहीं. बच्चाजी, धीर धरा. हिंमत सोडूं नका. आणखी थोडा वेळ दुःख भोगावें लागेल; पण उदयीक आपण दीनसंरक्षक ह्मणून आमची कीर्ति फैलावेल! खुदा व खुदाच्या बंद्याची याद करा. भिऊं नका."

"आतां काय आह्मीं आमचें कपाळ वांचतों" असें मध्यें-चें एक शिपाई निराशेनें ओरडला. त्यास धमकी देऊन दुसरा एक वृद्ध अफगाण बोलला, "काय बेटा कमअ-क्कल व कमताकद आहे! अरे हिंमतमर्दा तो मदत खुदा, तुझ्या मतानें आह्मीं मूर्खच आहों वाटतें"

बीरबल आनंदानें ह्मणाला, "तो तिकडे घोड्यांच्या खुरांचा खणखणाट ऐकूं येतो, ऐका ऐका. मला वाटतें, ते नवे येणारे लोक उत्तरेकडील अफगाणच असावेत. त्यांच्या नग्न तरवारींचा व भाल्यांचा चकचकाट पाहिला तर माझें ह्मणणें खरें आहे, असें तुह्मांस सहज वाटेल."

लुतुफउल्लाच्या टोळीनें दीन! दीन! या अल्ला! अशी एकच ओरड करून जेथच्या तेथें पडून रहावें असा निश्चय केला. तितक्यांत आकाशाप्रमाणें काळ्याकुट्ट दोन टोळ्या एका मागून एक तरवार म्यानांतून काढीत व रणशब्द करीत आल्या.

मराठे लोकांच्या प्राचीन पद्धतीप्रमाणें अफगाण लोकांच्या टोळीस त्यांनीं गराडा दिला. लुतुफउल्लानें आपल्या लोकांस मदत करण्याविषयीं होती तितकी पराकाष्ठा केली; परंतु तिचा बिलकुल उपयोग झाला नाहीं. रात्रीचा घोर अंधःकार दूर होऊं लागला. चांगलें उजाडलें. परस्पर परस्परांस ओळखूं लागले. तेव्हां तें मैदान लढाऊ लोकांनीं आणि "भवानी देवीकी जय! हरहर महादेव! या अल्ला" अशा वीररसप्राधान्य शब्दांनीं गजबजून गेलें.

# प्रकरण १० वें.

खं. २८

## पिंजऱ्यांत सांपडलेले सिंह.

मराठे सरदारानें रणस्तंभाजवळ खलबत करण्याकरितां आपल्या सैन्यांतील बहुतेक पुढाऱ्यांस बोलाविलें. तेथें त्यांचा साधक-बाधक विचार झाला. आपली तूर्तची स्थिति कशी आहे, पुढें कोणता सदुपाय योजावा, गत-युद्धांत आपला काय परिणाम झाला, आतां कसें वर्तन ठेविलें तर आपला बचाव होऊन शत्रूंचा विध्वंस होईल, इत्याद्यनेक गोष्टी त्यांच्या गूढ मसलतींत चालल्या होत्या. एकंदरींत उभय सैन्याची खरी स्थिति काय होती, ती तुह्मांपुढें ठेवूं.

आपण दसऱ्या प्रकरणांत असें सांगितलें आहे कीं, यदाकदाचित मागें पळण्याचा प्रसंग आलाच, तर उभय सेनेस ईश्वरनिर्मित चांगली सोय होती. अफगाण लोक उत्तरेकडे व मराठे दक्षिणेकडे होते. साधारण विचार केला तर, अफगाण हे शत्रूंच्या तडाक्यांत-मध्यें-होते; आणि मराठे दिल्ली व दक्षिणेकडील मार्गावर होते. अफगाण लोक पंजाबांतून अटक नदीकडे जावयाचें मनांत आणिते, तर त्यांस तसें करितां आलें नसतें. कारण मराठे मध्यें होते. त्यांनीं त्यांस गुण्यागोविंदानें जाऊं दिलें नसतें व हें निर्विवाद शाबीत करण्याकरितांच त्यांनीं कुंजपूर बळकाविलें होतें. सारांश, उभय पक्ष जीवन व मरण यांच्या हेलकाव्यांत होते. जय अनित्य आहे. तो हटकून मिळेल असें नाहीं. तशांत या लढाईचा

परिणाम फार भयंकर होता. कारण, हजारों लोक युद्धार्थ तयार झालेले. त्यांत ज्याचा फत्ते होईल, त्याचें सर्वार्थ साध्य झालें व ज्याचा पराभव होईल, त्याचा सर्वांशीं नाश होऊन जगांत तोंड दाखविण्यासही जागा नाहीं अशी स्थिति व्हावयाची. कांहीं दिवस दोन्ही पक्ष परस्परांपासून दूर होते. दोन्ही पक्षांच्या कमजास्त नुकसानीस कमजास्त प्रमाणानें निरनिराळीं कारणें होतीं हें जरी खरें, तरी एकंदरींत मराठे फार नुकसानीच्या स्थितींत होते. कारण, पानिपतचें मैदान अंडाकृति होतें. त्याच्या लांबीचा व्यास उत्तर-दक्षिण असून आसमंतांतील लहान मोठ्या नद्या-नाले, पर्जन्यकाळामुळें व बर्फ वितळल्यामुळें तुडुंब भरलेले. समरभूमीच्या उत्तरेस फेरोजशहाचा नहर, तो दक्षिण व आग्नेय दिशेनें यमुनेस मिळावयास गेलेला. पूर्वेस यमुना नदी. तिच्या कांठीं अनुप शहरीं जंगी लढाई झाली. भाऊसाहेबाच्या रणधुरंधर सेनेनें कुंजपुरावर ज्या बाजूनें हल्ला केला, त्याच्या मार्गांतच एक ओढा होता. आपल्या कथानकाच्या प्रारंभाचें तेंच स्थान. लढाईच्या मैदानाच्या पूर्व-पश्चिम व्यासाचा आपण विचार केला, तर पानिपत शहर उत्तर-दक्षिण व्यासाच्या तिसऱ्या रेषेंत येईल. ह्मणजे बादशाही काळ्याकडे होतें. सारांश, त्या त्रिकोणाकार स्थलाच्या वरचा भाग दक्षिणी लोकांनीं आपल्या ताब्यांत घेतला होता. आणि तोच त्यांस पळून वगैरे जाण्यास नुकसानकारक होता. आतां इतकें मात्र खरें आहे कीं, ज्या वाटेनें त्यांस कुंजपुराकडे जावयाचें होतें, तो प्रदेश त्यांच्या ताब्यांत होता. परंतु आजूबाजूचे मुसलमान त्यां-

च्या विरुद्ध होते. केवळ शत्रूच ह्मटलें तरी चालेल! पश्चिमेकडील हरीना प्रांतांतून नहर उल्लंघन करितांना पूर्वेस यमुना. तीवरून जावयास मुसलमानांचा अडथळा ठेवलेलाच. एकंदरींत मराठे दक्षिणेकडील स्वसंबंधाच्या गोष्टीनें मुसलमानांपेक्षां पुष्कळ मागें होते.

आतां अहमदशहाच्या स्थितीचा विचार करूं. तो आपला देश सोडून परकी लोकांच्या देशांत आला होता. दिल्लींतील मराठे सेनेचा त्यास समाचार घ्यावयाचा होता. जाट त्याचे शत्रु होते. तरी संकटकाळ आल्यास मराठ्यांपेक्षां आपलें चांगलें संरक्षण होईल, अशा सुस्थळीं तो होता. कुरुक्षेत्राचा अर्ध्यापेक्षां जास्त भाग त्याच्या स्वाधीन होता. यमुना नदीकडे त्याचा मित्र रोहिला, यथाशक्ति पाहिजे तशी व चाहेल तितकी मदत करण्यास एका पायावर तयार होता. अहमदशहा हा आपल्या लष्करांत रिकामटेंकडे लोक बिलकूल ठेवीत नसे. लढाईच्या कामांत ज्याचा उपयोग नाहीं, असा एकही इसम त्याच्या सैन्यांत नव्हता. ह्यामुळें तो विशेष मजबूत होता, हें कोणीही कबूल करील. मराठ्यांच्या सैन्यांतील लोकांप्रमाणें केवळ "खाण्यास काळ व भुईस भार" अशीं वायका-पोरें, चाकर-नोकर, दास-दासी, बायादाया, नाटकी-चेटकी, कची, जोगी, फकीर, जोशी, जुगारी, नायिका व नायकिणी वगैरे त्रासदायक लटरफटर त्याच्या लष्करांत असतें, तर त्याला अन्नासाठीं दाही दिशा भिक्षा मागावी लागती. मोंगलांपेक्षां मराठ्यांचा ऐपआराम फाजील! मराठ्यांच्या छावणीची तऱ्हाच निराळी. आतां त्याला काय नांव द्यावें, हें

राठी ग्रंथ
ठाणे

आह्मांस समजत नाहीं. परंतु आमचाही नाइलाज. त्यांनीं शेंकडो दर्जी, गालिचे व बिछाने तयार करावयाला बरोबर आणिले होते. त्यांचा कारखाना सुरू होता. घोडेवाल्यांचे चाकर घोड्यांचा खरारा करीत पडले होते. गाणारे गवई घशास कोरड पडेपर्यंत राग-रागिण्या उभ्या करीत होते. नायकिणींचा नाच सुरू होताच ! आह्मांला वाटतें पूर्वीच्या अठरा कारखान्यांची संख्या ह्यावेळीं परमावधीच्या शिखरास पोंचली होती ! तो एक जंगी बाजार भरला असून, " **अहमदशहाची** बिशाद कसली ? त्यास आह्मी कस्पटाप्रमाणें उडवून टाकूं " असें त्यांस वाटत होतें, असें दिसतें. काय असेल तें जगदीश जाणे ! पण मराठ्यांच्या सैन्यांत चार दिवस चैनीसाठीं जावें असें कोणीही मनांत आणितें, तर त्यास सवंग सुकाळ जागा व चाहेल तितकें अन्न मिळण्यास कोणाचीही आडकाठी नव्हती. " आवजाव घर तुमारा " असा प्रकार अफगाणांचा नव्हता. मराठ्यांच्या दुर्दैवानें, काळाच्या अवकृपेनें, अज्ञानतेनें किंवा गफलतीसारख्या अन्य कोणत्याही कारणानें दुष्परिणाम होवो; परंतु रिकामटेंकडे लोकांनीं मराठ्यांचें सर्वस्वी नुकसान केलें, असें ह्मटल्याशिवाय इलाज नाहीं. मराठे सेनेंत धान्याची टंचाई पडण्यास हेच खुशालचंडू कारण. **अहमदशहास** प्रथमतःच हें तथ्य समजतें, आणि तो त्यांच्या खोराकीचा मार्ग हरतऱ्हा करून बंद करिता, तर फारच थोड्या अवधींत मराठे अन्नअन्न करून ठार मेले असते. सांगण्याचा मतलब इतकाच कीं, दुराणीची स्थिति सर्वप्रकारें चांगली होती.

मराठे आपल्या घोडेस्वारांवर पूर्ण विश्वास ठेवून होते. अफगाण लष्करांत येणारें खोराकी सामान लुटावें, इतकेंच काम त्या कोसाक्स स्वारांकडे होतें. परंतु **अहमदशहा** बेफिकीर नव्हता. त्यानें आपल्या सामानास मराठ्यांचा प्रतिबंध तर होऊं दिला नाहींच; पण मराठे लोकांनीं अशा कामीं ज्या तुकड्यांची नेमणूक केली होती, त्यांतील बहुतेकांस कापून काढिलें. त्याच त्वेषानें **सदाशीवरावभाऊनें गोविंदपंत** बुंदेल्यासारख्या नाणावलेल्या सरदाराच्या ताब्यांत पुष्कळ सैन्य देऊन त्याला शत्रूची खोराकी सामग्री बंद करण्याच्या कामीं नेमिलें होतें. त्या ह्मातार्‍या नोकरानें आपलें काम चांगल्या दक्षतेनें व हुशारीनें बजाविलें. **अहमदशहाच्या** तडाक्यांतून जे लोक बचावले गेले, त्यांस त्यानें आपल्या बरोबर घेतल्यामुळें त्याकडे बारा हजार लोक जमले. त्यांसह **गोविंदपंतानें** छावणीपासून साठ मैलांवर तळ ठोकिला व आपलें काम जारीनें चालविलें. **अहमदशहास** जेव्हां हें वर्तमान लागलें, तेव्हां त्यानेंही कमी केलें नाहीं. आपल्याकडील **उटीखान**नामक तरवारबहाद्दर सरदारास त्यानें एका रात्रींत पंतावर रवाना केलें. **उटीखानानें गोविंदपंताचा** चांगला समाचार घेतला. असो; अशाप्रकारें दोन्ही फौजांची स्थिति पिंजर्‍यांत सांपडलेल्या सिंहाप्रमाणें झाली होती; आणि त्यांस लढाई केल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें.

# प्रकरण ११ वें.

## भाऊसाहेबाची कचेरी.

भाऊसाहेबाच्या कचेरीकरितां एक विस्तीर्ण मंडप घातला होता. तेथें मराठ्यांचे शूर वीराग्रेसर एकत्र जमावयाचे होते. पंजावांत तैमूरशहाचा रघुनाथरावानें पराभव केल्यानंतर गाझिउद्दिनानें त्यास एक शोभिवंत व मोठा तंबु वक्षिस दिला होता. त्या तंबूंत भाऊसाहेबानें दरबार भरविला. त्या मंडपास अस्मानी साटिनचें छत दिलें असून, बाजूस चांगली रेशमी झालर लाविली होती. त्यांत हंड्या-झुंबरांची गर्दी उसळली होती. एकंदरींत तो मंडप तारीफ करण्यासारखा असून त्यांतील मांडणीही थाटमाटाची दिसे.

मंडपापासून पन्नास हातांवर चाऱ्ही बाजूंस कनाथ लाविली होती. त्या कनाथीस दरवाजा होता. दुसऱ्या बाजूस तसेच आणखी दोन तंबु ठोकले होते. त्यांतील एकावर मराठ्यांचा भगवा झेंडा फडकत होता. त्या झेंड्यावर चित्रविचित्र रंगांच्या फुलांच्या माळा लटकत होत्या. निरनिराळ्या रंगांच्या रेशमी व जरी कपड्यानें तो सुरेख मढविला होता. भगवा झेंडा संरक्षण करण्याचें ज्या दक्षिणी सरदारांचें काम होतें, ते दोघेही तेथें होते. त्या दोन्ही उमरावांचा पोषाख फार चांगला दिसे. दुसऱ्या तंबूंत नगारखाना होता. त्या दोन्ही तंबूंसमोर व मुख्य मंडपाच्या मध्यभागीं इब्राहीमखान गारद्याच्या हाताखालील दोन लष्करी तुकड्या शोभिवंत लढाऊ पो-

पाखानें सज्ज होत्या. मोठ्या तंबूच्या दारांत चोवीस रत्तल वजनाचा गोळा फेंकतील, अशा दोन पितळेच्या तोफा लाविल्या होत्या. दरवाजाही सोनेरी व रुपेरी कलाबतूनें गुंफलेल्या कपड्यानें भव्य व प्रेक्षणीय दिसे. त्यापुढें कडाबीनवाले, आरब व शिपाई आपल्या तयारीनें उभे राहिले होते.

मंडपाच्या मुख्यभागीं निजामास जिंकणारा **सदाशीवरावभाऊ** पेशवा बसला होता. हा **सदाशीवरावभाऊ "भाऊ गारदी"** ह्या नांवानें प्रख्यात असून अद्यापि देखील "**भाऊ गारद्याचा वेळ**" अशी हिंदुस्थानांत त्याची प्रसिद्धि आहे. भाऊ मध्यम वयाचा पुरुष होता; आणि तो त्याच्या कुटुंबांतील मनुष्यांपेक्षां फार दृढनिश्चयाचा, पोक्त, विचारी, शूर व हिंमतबहादूर होता. त्यानें सफेत जामा व पागोटें घातलें होतें. गळ्यांत हिरे माणीक आणि मोत्यें ह्यांचें मौल्यवान व सुंदर पेंढें होतें. तें मोंगलांच्या लाल किल्ल्यांत लुटींत मिळालें होतें. कमरपट्ट्यांतील बिचवा हिरेजडित मुठीचा होता. तो शत्रूस आपलें सामर्थ्य दाखविण्याचा वेळ केव्हां येतो ह्याच विचारांत असावा, असें दिसे. तरवारीची मूठ जवाहिरानें खचलेली होती. भाऊच्या उजव्या बाजूस सुमारें बावीस वर्षांचा तरूण सुरेख व पौरुषसंपन्न एक वीर पुरुष वीरासन घालून बसला होता. त्याचे हरणासारखे काळेभोर नेत्र अष्टदिशांस चमकत होते. त्याचें हास्यमुख पहातांच दुष्टाच्या देखील मनाचें समाधान होत असे. त्याच्या भिवया कमानदार दिसत. पोपटाच्या चोंचीसारखें सरळ परंतु कांहीं कमानदार नाक पहातांच,

हा पुरुष अभिमानी असावा, असा तर्क करण्यास कोणासही पंचाईत पडली नसती. त्यानें आपल्या अंगास सुगंधी अत्तर लाविलें होतें. दशदिशा सुगंधानें भरून टाकणारा एक केवड्याचा व दुसरा गुलाबाचा, असे सर्वोत्तम फाये त्याच्या दोन्ही कानांत विश्रांति घेत होते. त्यानें अंगांत जरतारी मझलीनचा तलम अंगरखा घातला होता. त्याच्या डोकीस लाल पागोटें होतें, गळ्यांत कित्येक कंठभूषणें चमकत होतीं. पायांत सुवर्णाचा चकचकीत तोडा होता. कमरेस पिस्तोल, तरवार व पेषकवज होतें. हाच तो **बाळाजी बाजीरावाचा** पुत्र, **विश्वासराव**. ह्याचा खरोखर भपका व नोक-झोंक मदनासारखा दिसे. पेशवाईत ह्यासारखा सुंदर पुरुष कोणीच झाला नाहीं, अशी ह्याची सर्वतोमुखीं ख्याति होती.

त्याच्या डाव्या व उजव्या बाजूस मराठ्यांचे संग्रामचतुर वीर पुरुष आपापल्या दर्जाप्रमाणें बसले होते. त्यांत कित्येक वृद्ध व तरूण होते. निजामासारख्या संग्रामसिंहास भाल्याच्या टोंकावर नाचविणारे, तरवारीच्या धारेखालीं मोंगलांस कांपविणारे, द्वंद्वयुद्धांत रजपुतांचा पराभव करणारे आणि गगनमंडल विदीर्ण करणाऱ्या तोफांच्या परम जाज्वल्य गोळ्यांनीं फिरंग्यांचा धुव्वा उडविणारे शेंकडों रणधुरंधर सैनिक होते. ज्यांनीं मारवाड, लाहोर, बंगाल, काश्मीर इत्याद्यनेक प्रांतांतील समरप्रवीण लोकांचा पराभव केला, अटक नदीपलीकडे ज्यांनीं आपल्या कटकास पाणी पाजून 'अटक नाहींशी केली, चितोड, द्वारका व गुजराथ ज्यांनीं खालसा केली, चतुःसमुद्रपृथ्वी पादाक्रांत करावी, रूमशामच्या पादश-

हास काढून टाकावें आणि सर्वत्र हिंदुपद्बादशाही क-रावी, अशी ज्यांच्या मनाची उमेद, ब्राह्मणी राज्याचा ज्यांनीं चुराडा केला, त्रिचनापल्ली, श्रीरंगपट्टण, मच्छलीबंदर वगैरे पूर्व समुद्राकडील प्रांत आपल्या ताब्यांत घेतला, सर्व कोंकणप्रांत, गोमांतक व खंबायत ज्यांची आज्ञा शिरसावंद्य करावयास तयार, खानदेश, नेमाड व मनमाड इत्यादि सधन प्रांत ज्यांचा हुकुम झेलण्यास तत्पर, हिंमतखां, फत्तेसिंग, मनसूरअल्ली, खानखां, इब्राहीमखां, रणमस्तखां, संग्रामखां इत्याद्यनेक रणमस्तांचा ज्यांनीं पाठारा उडविला, परम भाग्यशाली श्रीमंत छत्रपति सातारकर महाराजांचा वरदहस्त ज्यांच्या मस्तकीं, युद्ध करणें ह्मणजे ज्यांस करतलामलकाप्रमाणें, अफगाणांस आतां ठार मारून धुळीस मिळवूं अशी ज्यांनीं प्रतिज्ञा केलेली, मारीन किंवा मरेन असा ज्यांचा दृढनिश्चय, ज्यांचा हात धरण्याची कोणाची प्राज्ञा नाहीं असे वीर, पराजयाचें नांव देखील ऐकिलें नाहीं असे शूर, कर्णाप्रमाणें सत्यवचनी, श्रीरामाप्रमाणें एकाच बाणानें शत्रुसंहार करणारे, ज्यांनीं तरवारीचे धारेवर राज्य मिळविलें; आणि ज्यांनीं लेखणीचे टोंकावर तें नाचविलें असे प्रौढप्रताप सकल सुगुणाचें वसतिस्थान, राजकार्यधुरंधर, विश्वासनिधी, स्वामीसेवातत्पर, स्वदेशाभिमानी, चतुर, धीट, स्वधर्माभिमानी, स्वातंत्र्यप्रीय आणि हिंदुधर्मसंरक्षक मल्हारराव होळकर, दामाजी गायकवाड, समशेरबहादर, जनकोजी शिंदे, बळवंतराव गणपत मंडले, येशवंतराव पवार, विठ्ठल सदाशीव, विंचूरकर, त्र्यंबक सदाशीव, सदाशीवराव,

अप्पाजीराव, अंताजी माणकेश्वर, गोविंदपंत बुंदेले, रामराव, नारायणराव, रामराव गणेश, आनंदराव पवार वगैरे शेंकडों उमरावांनीं आणि निंबाळकर, जाधव, भोंसले, गोखले, घांटगे, ढमडेरे, घारपुरे, डफळे इत्यादि हजारों सरदारांनीं तो सभामंडप सुशोभित झाला होता.

इंद्रसभेप्रमाणें परम शोभायमान व घनदाट सभेंत बाळाजी जनार्दनही ( नाना फडनवीस ) होता. त्याच्यासारखा चतुर, विचारी, शहाणा, दूरदृष्टि व बुद्धिमान् पुरुष क्वचितच अवलोकनांत येईल. ह्याच्या बुद्धिकौशल्याच्या साह्यानें पेशव्यांनीं अवघ्या हिंदुस्थानांत आपला अम्मल गाजविला. नानाजवळ व भाऊसन्मुख हरीपंत फडके व रामचंद्र गणेश हे बसले होते.

त्यांतच अर्धवट इंग्रेजी पोपाखाचा एक सरदार होता. त्याची तर्तरी व हुशारी तारीफ करण्यालायख होती. त्याचें नांव इब्राहीमखान गार्दी. तो भाऊचा मसलतगार. त्यानें पुष्कळ लढायांत जय मिळविला होता. अशा अमीर-उमराव व सरदारांनीं भाऊची कचेरी गजबजली होती.

---

## प्रकरण १२ वें.

### प्रतिस्पर्धा.

भाऊसाहेबाच्या आज्ञेप्रमाणें मराठे फौजेंतील अमीर उमराव सरदार व मानकरी जमा झाले. त्यांची सलामी होतांच प्रत्येकाच्या नांवाचा व गुणांचा स्तुतिपाठ चोप-

दारानें गाइला. घनदाट सभा भरल्यानंतर कांहीं वेळ सर्वत्र शांतता होती. चित्राप्रमाणें जो तो स्वस्थ बसला होता. अशा स्थितींत थोडा वेळ गेल्यानंतर, **सदाशीव-रावभाऊनें** विचारिलें "सर्व अमीर-उमराव व सरदार आले ?"

सर्व लोक इकडे तिकडे पाहूं लागले. **विश्वासराव** ह्मणाला "**भाऊसाहेब, महादाजी** शिंद्याशिवाय सर्व आले असें मला वाटतें."

**जनकोजी**—ते आपल्या तंबूंत नाहींत. मीं त्यांचा पुष्कळ तपास केला; परंतु ते भेटले नाहींत.

**भाऊसा०**—कांहीं हरकत नाहीं. ते नसले तरी आमच्या कामास व्यत्यय येणार नाहीं. कारण, ते आह्मांपैकींच एक आहेत. आणि त्यांचे व आमचे विचार एक असल्यामुळें ते, आह्मीं ठराव करूं त्यास विरुद्ध जाणार नाहींत. ( मंडळीकडे पाहून ) सर्व सभ्य हो, तुह्मां सर्वांस मीं या ठिकाणीं कां बोलाविलें, हें तुह्मीं जाणत आहांच. त्याविषयीं विशेष पाल्हाळ करणें निरर्थक व त्रासदायक होईल. तूर्तची आमच्या सैन्याची स्थिति सर्वांस माहीत आहे. त्याविषयीं चर्चा करणेंही निरर्थक आहे असें माझें मत आहे. कारण, त्या संबंधानें मीं कितीही सांगितलें तरी तें व्यर्थ कालाचा अपव्यय मात्र करणार; इतक्या करितां पुढें काय करावें ह्याविषयींचा तुमचा अभिप्राय तुह्मीं मनःपूर्वक व सत्य स्मरून सांगाल अशी मला उमेद असून ती पूर्ण करणें हें तुमचें खरें कर्तव्य होय.

पुनः सर्व सभ्य एकमेकांकडे पाहूं लागले. आतां काय जबाब द्यावा, हें कोणीच बोलेना. पुनः स्वस्थता फैलावली.

**मल्हारराव होळकर** आपल्या जवळच्या सरदारास ह्मणाला " आतां ह्यांना आमच्या सल्ल्याची अवश्यकता आहे, असें दिसूं लागलें. " त्यानें **भाऊसाहेबास** जबाब दिला " माझा अभिप्राय मीं या सहा महिन्यांपूर्वींच जाहीर केला आहे. इतक्या अवधींत लष्कर चालविणारे चांगले **धनगर** मिळालेच असतील ! "

**मल्हाररावाचें** भाषण ऐकतांच **सदाशीवरावानें** डोळे लाल केले. त्यावरून त्याला फार राग आला असें दिसूं लागलें; परंतु प्रसंगावर नजर देऊन त्यानें अतिप्रसंग आणिला नाहीं, इतकेंच. तो हांसतच थट्टेदाखल सहज ह्मणाला, " अहो, चांगला धनगर देखील एखादे वेळीं रस्ता चुकतो; आणि त्याला दुसऱ्यास मार्ग विचारणें भाग पडतें. "

**इब्राहिमखान**—(**मल्हारराव** व **सदाशीवराव** ह्यांच्या मनांतील वैषम्य काढून टाकावें असें मनांत आणून ) रावसाहेबांचें ह्मणणें बहुत अंशांनीं खरें आहे. ही चूक आजकालची नव्हे; अगदीं प्रारंभींच ही झाली; हें कोणीही कबूल करील. मीं सांगत होतों त्याप्रमाणें, दुराणी लोक जेव्हां नदी उतरत होते तेव्हांच जर त्यांवर हल्ला केला असता, तर त्याच तडाक्यांत त्यांची धुळधाण होऊन आज ही पंचाईत करण्याचा बिलकुल प्रसंग येता ना. पण काय करणार ? आळसानेंच आमची दुर्दशा केली. फ्रेंच लोक कोणत्याही लढाईंत नेहमीं विजयी होतात, ह्याचें कारण मला **बुसीनें** असें सांगितलें कीं, लढाईचा प्रसंग आला ह्मणजे आपण प्रथम हल्ला करावा, हाच त्याचा सिद्धांत.

**मल्हारराव**—त्या टोपीवाल्यांची अशी पद्धत असेल कदाचित. माझ्या बाप-दादानीं आजपर्यंत बऱ्याच लढाया केल्या; परंतु ते एकाही प्रसंगीं या पद्धतीस अनुसरले नाहींत, आणि मींही तसें अविचारी धाडस करूं इच्छित नाहीं.

**इब्राहीमखान** आपलें ह्मणणें किती खरें आहे हें सिद्ध करून दाखविण्याकरितां, व त्याचा खुलासा कळण्याकरितां, यूरोपियन लोक, पिछेहट झाली ह्मणजे काय करितात त्याविषयीं बोलणार, इतक्यांत पवार, विंचुरकर आणि दुसरे लहान मोठे होळकराच्या पक्षांतील सरदार यांचें उत्तेजन मिळतांच **मल्हारराव** ह्मणाला, "खानसाहेब, तुमच्या सल्ल्याप्रमाणें भाऊसाहेब न वागतां माझ्या सांगण्याप्रमाणें वागते, तर आज काय बहार उडाली असती! तुमची तुकडी भरतपूर किंवा दिल्लीकडे राहती; आणि आह्मीं मुसलमानांवर वरचेवर हल्ले करितों. मग त्यांस उपासमाराची पाळी येऊन तंगडीस धरून फेंकून देतां आलें नसतें काय?

**समशेर बहादर**—पण तेथून कुंजपूर घेतां आले नसतें.

**होळकर**—कुंजपूर घेऊन आपला काय फायदा झाला? आह्मीं अहमदशहाचा रस्ता अडवितों, तर तो आमचा अडविता; आणि आह्मांस एका कोंपऱ्यांत बंद केल्याप्रमाणें रहावें लागतें.

**भाऊ०**—अहो, तुमची थांबण्याची, मागें हटण्याची, लढण्याची, पळण्याची, आणि चाल करण्याची गोष्ट आतां काय कामाची? तेव्हां जें झालें, तें आतां सुधारतां

तर येत नाहींना? मग त्याविषयीं चर्चा पाहिजे कशाला? आह्मीं हातांत तरवार घेऊन पुढें चाल केली असती, तर अफगाणांस यमुनेपलीकडे हांकून लावितों, हें आह्मांलाही आतां खरें वाटतें; परंतु आतां त्या गतगोष्टी.

पुष्कळ अंशांनीं ही गोष्ट सत्य होती. तेव्हां त्या आक्षेपानें मल्हाररावाचें पित्त फार खवळलें, नेत्र आरक्त झाले, त्वेषानें व स्फुरण चढून त्याच्या अंगरख्याचे बंद तटातट तुटले आंगावर रोमांच थरारले. तेव्हां मिशांवर ताव देऊन तो ह्मणाला "कोणत्याही मनुष्याची त्याच्या मागून निंदा करावी; आणि तोंडावर तितकें गोड बोलून समाधान करावें, असा माझा सूतराम स्वभाव नाहीं. जें काय होईल तें समक्ष. एखाद्या लढवय्याच्या खऱ्या गुणांप्रमाणें मीं तुह्मांस सांगतों. खानसाहेब, तुह्मीं ह्या सैन्याच्या सर्व नाशाचें कारण आहां आणि पुढेंही व्हाल. मला जर कांहीं मार्ग असता तर मीं आणि माझ्या अनुमतानें वागणारे कित्येक सरदार व साथीदार तुह्मांला आणि तुमच्या पलटणीस येथें सोडून केव्हांच येथून निघालों असतों; पण काय करूं!"

इब्राहीमखान—(त्वेषानें) खुदाच्या बंद्याची व हजरत गेसुदुराझच्या कबरेची शपथ वाहून मीं सांगतों कीं, असें होतें तर मीं तुमच्या पूर्वींच पागेंत पोंचतों. जसें तुह्मीं सांगतां, तसेंच माझेंही मत आहे; आणि माझें जसें मत असतें, त्याप्रमाणेंच मीं नेहमीं वागतों. आंत एक व बाहेर एक असा माझाही स्वभाव नाहीं. मनुष्यमात्र जन्मास आलें तें मरावयाचेंच—मरणें हक्क आहे; परंतु मीं खात्रीनें सांगतों कीं, कीर्ति करून मरण्यांत जें भूषण आहे,

तें अपकीर्तींत नाहीं. आणि माझ्या अब्रूचें संरक्षण करण्यास मीं समर्थ आहें.

दोन्ही प्रतिस्पर्धी बोलतां बोलतां सीमेच्या बाहेर गेले. त्यांस आपण आहों कोठें, करितों काय, बोलतों काय, आपल्या अमर्याद बोलण्याचा परिणाम पुढें काय होईल, हें भानही राहिलें नाहीं. होळकरानें आपली तरवार नग्न केली. तिकडे **इब्राहीमखानानें** आपल्या पिस्तोलाचा घोडा चढविला. आतां हे परस्परांस ठार मारण्याकरितां प्रत्यक्ष शस्त्रांचा उपयोग करण्यास मागें पुढें पहाणार नाहींत व वाक्‌शस्त्रांचा परिणाम खऱ्या शस्त्रांवर येण्यास बिलकुल अवधि नाहीं असें **विश्वासरावास** वाटतांच, तो एकदम सिंहासनावरून उठून **इब्राहीमखाना**जवळ आला; आणि **येशवंतराव पवारानें** होळकरास धरिलें. **भाऊ** ह्मणाला " काय हें होळकर ! शांत व्हा-शांत व्हा. खानसाहेब, विचार करा. तुह्मांसारख्या पुरुषश्रेष्ठांस मीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. शत्रूंच्या प्राणनाशार्थ ज्या देदिप्यमान शस्त्रांचा उपयोग करावयाचा, तीं शस्त्रें तुह्मीं आपल्या बंधु-बांधवांवर उगारण्यास सिद्ध झालां ! विचार करा. येथें कज्जे व मारामारी करण्याकरितां तुह्मांस कोणी बोलाविलें नाहीं. अशा कज्जांचा परिणाम चांगला व्हावयाचा नाहीं, हें तुह्मांस समजत असून तुह्मीं मुद्दाम अज्ञानांत कां शिरतां ? **सदाशीवरावाच्या** हुकुमाचा कोणी अनादर केला असें आजपर्यंत त्यांस व इतरांसही ठाऊक नव्हतें; पण आज तसा प्रसंग आल्यामुळें तो मनांत फार दिलगीर होऊन ह्मणाला, " जें व्हावयाचें तें झालें. त्याकरितां आतां रडत बसावें किंवा दुःख शोक

करावा, हें अज्ञान बालकाचें काम. आह्मी बालक नव्हे. आह्मांस सर्व समजतें. आतां आपण एका दिलानें केवळ जय मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे; ह्यांतच भूषण आहे.

**बळवंतराव**—अशा वादांत काय अर्थ आहे? आतां शत्रूचे तरवारीपुढें कोण बलवान ह्याचा निर्णय होईलच. सर्वसाक्षी जगदीश सर्व कांहीं जाणत असेल! आतां जितकी त्वरा करावी, तितकें चांगलें. इतक्यांत **महादाजी शिंदा** आला. त्यानें दरबारच्या चिन्हांवरून तेथें काय झालें असेल, ह्याचा तेव्हांच अंदाज केला. तो ह्मणाला, " अहो, आपल्यांत तंटा करून दुही माजविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. मीं केलें तसें करा. तुह्मांला लढाई करावयाची असेल, तर रणस्तंभाजवळ जा; आणि दुराणी राजास द्वंद्वयुद्धार्थ बोलवा."

**एक सरदार**—भवानी देवीकी जय! परंतु दुराणी आपलें बोलणें कबूल करील ना?

**दुसरा**—पाहिजे तर करील, नाहींतर तो भित्रा व नादान असें सर्व जगास समजेल.

बहुतेकांची संमत्ति मिळाली.

**मल्हारराव** बाह्यतः शिंद्याशीं मित्रभावानें वागे; परंतु जहागिरीसंबंधानें त्याचें अंतरंग शुद्ध नव्हतें, हें सर्व विश्रुत होतेंच. आपला डाव साधण्यास ही संधि चांगली असें होळकरास वाटून तो शिंद्याचा मानभंग करूं पहात होता. याकरितां त्यानें **इब्राहीमखानाच्या** तक्रारीकडे अलक्ष्य केलें. इतक्यांत **समशेर बहाद्दर,**

**बळवंतराव**, **त्रिंबक सदाशिव**, व दुसरे कित्येक सभ्य गृहस्थ पुढें सरसावले; परंतु **भाऊनें** त्या सर्वांची कशीवशी समजूत करून त्यांस जागचे जागीं बसविलें.

**भाऊसाहेब**—**खानसाहेब**, खुदाकरितां आणि माझ्या करितां आतां शांत व्हा. असें भांडण करणें तुह्मांस उचित नव्हे. जगदीशाच्या मनांत असेल, तर तो संयुक्त-बलानेंच आमचें रक्षण करील. तुह्मी रागाच्या स्वाधीन होऊं नका. दुःखामागून सुख ठेविलेलेंच असतें. नेहमीं रात्रच रहात नाहीं. केव्हांना केव्हांतरी सूर्योदय हा होतोच. खरोखर सहनशीलतेंत मोठें सौख्य असतें. शांती-सारखें दुसरें सुख नाहीं.

**भाऊनें इब्राहीमखानाची** समजूत केली. तेव्हां त्यानें आपल्या पिस्तुलाचा घोडा खालीं पाडिला. तिकडे दक्षिणी सरदारांनीं **मल्हाररावास** शांत करण्याचा प्रयत्न केला; तरी मधून मधून तो **इब्राहीमखानाकडे** तीक्ष्ण दृष्टीनें पहात होताच.

इतकी स्थीरस्थावर झाल्यावर बराच वेळ सर्वत्र शांतता होती. प्रत्येक सरदार आपल्या मनांत घडलेल्या गोष्टींचा विचार करीत तटस्थ बसला होता. ती तक्रार फार वाढती, तर त्यांस कोणता तरी एक पक्ष स्वीकारणें भाग पडतें; आणि तेथेंच हाणामारी होऊन रक्ताचे पाट वहाते. जो तो आपल्या पक्षाच्या समर्थनार्थ हत्यार उपसून तयार होताच. पण **सदाशीवरावाच्या** सांगण्यास सर्वांनीं मान दिला.

**बळवंतराव**—आतां या अडचणींतून मुक्त व्हावयास

लढाईशिवाय दुसरा कोणताच उपाय नाहीं. ती जितक्या त्वरेनें होईल, तितका फायदा जास्त.

**महादाजी**—तर मग, आपसांत लौकर संप झाला पाहिजे. एकदां आह्मां सर्वांचा एक विचार झाला, आमचें ऐक्य झालें, ह्मणजे कोणताही एक निश्चय करावयास वेळ नको. माझ्याविषयीं ह्मणाल, तर जो मनुष्य आह्मांस विजयी करील तोच आमचा सरदार. आह्मी त्याच्या आज्ञेनें वागण्यास हात जोडून सिद्ध आहों.

**समशेर बहादर**—शाबास ! माझेंही मत तसेंच आहे.

**अंताजी माणकेश्वर**—आणि मींही त्यास कबूल आहें. रीतीच्या कामास विनाकारण तक्रार कां ?

**भाऊसाहेब**—माझे विचार तुमच्या विचारांशीं अगदीं मिळते आहेत; पण त्यांस मार्ग दाखवा आणि मग काय तें बोला.

**इब्राहीमखान**—मीं बोललों त्याचें पर्यवसान तंट्या-वर गेलें. जावो. मीं त्याविषयीं बिलकुल फिकीर बाळगीत नाहीं. बोलतां येतें, त्यांनां बोलूंद्या; आणि लढाई जाणतात, त्यांस लढूंद्या. आपल्यास केवळ तमाशा पहावयाचा !

**होळकर**—दुराणीच्या झपाट्यास आपले **खानसा-हेब** भीत असतील, तर त्यांस खुशाल तळाच्या संरक्षणार्थ राहूंद्या. त्यांना आपल्या युक्तीचा अभिमान वाटत असेल, तर मीं खात्रीनें सांगतों कीं, होळकरास देखील तसे पुष्कळ डावपेंच माहीत आहेत! **इब्राहीमखानच**

जाणतो, असें नाहीं. आणि आपणच काय ते कर्तबगार असा त्यांचा समज असेल, तर मीं स्पष्ट सांगतों कीं, हा त्यांचा भ्रम आहे. लष्कराचें दुःखदायक भविष्य ज्यांच्या हातांत अडकलें होतें, त्यांनीं तर लष्करास अशा स्थितींत आणिलें आहे कीं, आतां मरावें तरी एक किंवा जय मिळावा एक; त्यावांचून दुसरा उपायच राहिला नाहीं दैवानें अशी पाळी आणिली; बेहत्तर! मीं प्रथम शीर हातावर घेऊन पुढें होतों. शूर पुरुषांचे देह समरंगणांत अर्पण करण्याकरितांच परमेश्वरानें निर्माण केले आहेत. मारीन किंवा मरेन अशा दृढनिश्चयानें माझी तयारी आहे. आणि जो मराठ्यांचा खरा बच्चा असेल, जो कीर्तीचा भुकेला असेल, जो जातीचा शूर असेल, जो वीरपुरुष असेल; तो **मल्हारराव** **होळकराच्या** सरदारींत वागण्याकरितां माझ्या अनुमताप्रमाणें वर्तन करण्यास तयार होईल.

होळकराचें हें उच्छृंखल भाषण ऐकतांच **इब्राहीमखान** सभेंतून उठून जाऊं लागला.

**भाऊसाहेब**—थांबा, **खानसाहेब**, थांबा. ते काय करतात, तें करूं द्या. मीं सांगतों ऐका. ह्यांच्या हातून कांहीं व्हावयाचें नाहीं. प्रस्तुत त्यांच्या मताप्रमाणें तुह्मीं स्वस्थ छावणीचें रक्षण करा. तुमचें त्यांत काडी इतकें नुकसान नाहीं. छावणीचें संरक्षण करण्यास तुह्मीं एकटे आह्मांस पुरे. होळकरानीं आपलें शीर हातावर घेतलें आहे. फिकीर नाहीं. त्यांच्या मताप्रमाणेंच कां होईना, त्याचें फळ त्यांस अवश्य मिळेल; आणि लागलेंच खरें

कारण उघडकीस येईल. नंतर आपण जय मिळवूं. तुह्मीं स्वस्थ रहा.

आपल्या धन्याच्या वचनास सन्मान देऊन **इब्राहीमखान** स्वस्थ बसला; पण **मल्हारराव** पुनः डोळे वटारून त्याकडे पाहूं लागतांच, **इब्राहीमखान** हळूच बोलला. " आतां सर्व मंडळी हळु हळु जावयाचीच ! मीं भितों असा लोकांचा समज असेल, किंवा द्वेषानें अथवा प्रतिस्पर्धेनें वागतों असें कोणास वाटत असेल, तर ती त्यांची निव्वळ चूक आहे. मीं धन्याच्या हुकुमाचा वंदा. त्यांच्या हुकुमाबाहेर मला केव्हांही वागावयाचें नाहीं. "

**भाऊसाहेब**—बस्स, पुरे. आतां नको त्या गोष्टी. वादानें वाद वाढविण्याची ही वेळ नव्हे.

भाऊंचा असा समज होता कीं, आपल्या भाषणाचा अनादर करून कोणी गडबड माजविणार नाहीं. छावणीचें संरक्षण करण्यास कोणी तरी प्रबल-प्रताप-संपन्न योद्धा पाहिजेच. **मल्हाररावांच्या** हातून हें काम व्हावें तसें होणार नाहीं; किंवा तें करावें, अशी त्यांची उमेदही नाहीं. तेव्हां **इब्राहीमखानाशिवाय** तें काम दुसऱ्या कोणाच्या हातून निभावण्यासारखें नाहीं असा विचार करून ते ह्मणाले, " **खानसाहेबानीं** मागें राहून छावणीचें रक्षण करावें, अशी माझी इच्छा आहे व ते त्याप्रमाणें वागतीलही. आतां होळकरानीं आपल्या मर्जीप्रमाणें तजवीज करावी; मात्र होईल तितक्या त्वरेनें आपल्या युक्ति अमलांत आणाव्या. कारण, आतां दिरंगाई करण्यास वेळ राहिला नाहीं. "

**बळवंतराव**—ठीक आहे. आह्मांला लढाईच करावयाची. त्वरा होईल तितकें चांगलें. आज मध्यरात्रीं आह्मीं व पवार छावणींतून निघतों. समशेर बहादर आणि विंचूरकर आमचे मागून निघूंद्या. त्यांच्यांत आणि आह्मांत फार तर एक मैलाचें अंतर असलें, ह्मणजे झालें. आह्मीं अफगाण छावणीच्या दरवाज्यावर हल्ला करूं. ऐन झोंपेच्या वेळीं त्यांस गांठलें ह्मणजे, त्यांचा सहज नाश करितां येईल. जनकोजी व महादाजी यांस कित्येक मानकऱ्यांसह पुलावर राहूंद्या. ह्मणजे उटीखानाचे जे पांच हजार लोक रणस्तंभाच्या डाव्या बाजूस राहून रात्रीचा आह्मांस वारंवार त्रास देतात, त्यांची खोड जिरविण्यास ठीक पडेल. आतां जो होळकरांबरोबर येणार नाहीं, तो स्वामीद्रोही आहे असें समजण्यांत येईल; परंतु अशा आणीबाणीच्या वेळीं कोणी स्वामीद्रोह करणार नाहीं, अशी मला मनापासून उमेद आहे; आणि ती पूर्ण करण्याविषयीं जगदीश तुह्मां सर्वांस सद्वासना देवो. येथून निघतांना बिलकुल गडबड करितां कामा नये. रणसिंग किंवा पडघुम वाजविण्याची जरूर नाहीं. वाटेंत जातांना कोणी कोणाशीं ब्र देखील काढूं नये. इतक्या तयारीनें व उमेदीनें आपण गेलों, तर जगदंबेच्या कृपेनें अफगाणांस चांगला हात दाखवूं. आमचे घोडे त्यांच्या रक्तांत रंगवूं आणि आमच्या तृषार्त तरवारी व भाले यांस त्या दुष्टांचें रक्त पाजवून कृतार्थ होऊं.

"भवानी देवीकी जय!" सर्वांनीं एकदम जयजयकार केला! "हरहर महादेव!"

**सदाशिवरावानें** चोपदारास इशारत केली व "दर-

वार बरखास्त" असें चोपदार ओरडला. सर्व सरदार व अमीर-उमराव उठले आणि आपापल्या तंबूंत जाऊं लागले. मंडपांत भाऊ, विश्वासराव व इब्राहीमखान ह्यांशिवाय कोणी नव्हतें. भाऊनें इब्राहीमखानास सांगितलें. "खानसाहेब, तोफखाना आणि छावणीचा तपास तुमच्या चित्तांत येईल त्याप्रमाणें चांगला ठेवा. समजलें ना? जा तुह्मी आतां."

इब्राहीमखान सलाम करून निघाला. तो गेला असें पाहून "पुढें कसें काय होतें, देव जाणे!" असें विश्वासराव ह्मणाले. तें ऐकून भाऊ ह्मणाले "बाळ, यांत माझी कसूर आहे कीं त्यांची आहे हें माझ्यानें सांगवत नाहीं; परंतु एकंदरींत ह्या कृत्याचा परिणाम चांगला होईल, असें मला दिसत नाहीं. माझ्यावर किंवा सैन्यावर अथवा दोघांवरही संकट आहे, जगदीशसत्ता बलवत्तर!

विश्वासराव—(भाऊच्या गळ्यांत हात घालून लडिवाळपणें) तसें झालें, तर मला जगावयाचें नाहीं.

---

# प्रकरण १२ वें.

## भिंतीला कान.

आह्मीं मागील प्रकरणांत सांगितलेल्या वृत्तांतावरून वाचकांची खातरी झालीच असेल कीं, लालनला ज्या लोकांनीं पकडून नेली, त्यांच्या हातून तिची सुटका कर-

ण्याकरितां व उटीखानाच्या बाहेर भटकणाऱ्या लोकांचें पारिपत्य करण्याकरितां महादाजी शिंद्याचे लोक प्रयत्न करीत होते; आणि त्याच वेळीं मल्हारराव होळकराची लढाऊ तुकडी अफगाण छावणीवर हल्ला करण्यांत गुंतली होती.

शिंद्याच्या फौजेनें दीर्घ प्रयत्न केला; परंतु त्याचा कांहींच उपयोग न होतां लुतुफउल्ला आपल्या लोकां-सह निर्विघ्नपणें आपल्या छावणींत पोंहचला. संत्री लोकांनीं त्यांस थोडासा प्रतिबंध केला; परंतु लुतुफउ-ल्लाच्या कर्कश आवाजामुळें त्यांनीं त्यास ओळखून सु-खानें आंत जाऊं दिलें.

लालनला जबरीनें पकडून आणल्यामुळें तिनें क-ल्पांत केला. तिला अनिवार दुःख व त्रास भोगावा लागला, तरी त्या सर्वांची बेपर्वा करून पोपलझाई सर-दारानें शेषरात्र तिजबरोबर काढिली असती; परंतु त्याला जी हकीगत समजली, ती बादशहास कळविणें फार जरूरीचें व महत्वाचें होतें. ह्यामुळें त्यानें आपलें इनाम झमरूदच्या स्वाधीन केलें. त्याच्या संरक्षणास कित्येक गुलाम व एक दासी यांची नेमणूक केली; आणि त्यांस खबरदारीनें रहावयाची आज्ञा करून, तो खोरासान बा-दशहाच्या तंबूकडे निघाला. जातांना त्यानें आपल्या लोकांस गडबड न करितां हुशार रहा, अशी आज्ञा केली.

लालन फार थकून जाऊन तहानेनें कासावीस झाली होती. तिच्या दुःखास पारावारच नव्हता. त्या अर्धमृत अबलेचे हातपाय बांधून तिला तंबूंत कैदीप्रमाणें टाकिलें; आणि गुलाम तिच्या पाहऱ्यावर ठेविले. झमरूद तिच्या

उशाकडे बसला. वृद्ध दासी आपल्या भाषेनें "तुझी ह्या स्थितींतून सुटका होईल" वगैरे सांगून तिला धीर देत होती; परंतु लालनच्या स्थितीचा विचार केला तर, तिचा धीर दुःखावर डाग देण्यासारखाच होता, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

कादंबरींत तरुण स्त्रियांचें जें दुःख व शोकवर्णन असतें त्यापेक्षां लालनला फार दुःख भोगावें लागलें, हें स्पष्ट समजण्यासारखें आहे. ती कामी पुरुषांच्या हातीं सांपडली इतकेंच नव्हे, तर तरुण स्त्रियांवर केवळ कामांधपणानें आपली हौस कोणत्याही रीतीनें पूर्ण करण्याकरितां मागणें करणाऱ्या, स्त्रियांची मर्जी नसतां त्यांवर जुलूम करणाऱ्या व दांडग्या पुरुषांच्या तडाक्यांत सांपडली होती. लुतुफउल्ला सामान्य मनुष्य होता. तो घातकी नसो; परंतु सहनशील, विचारी किंवा शहाणा नव्हता, हें खरें. कित्येक जातींत एखाद्याचें कोणत्याही स्त्रीवर प्रेम बसलें, तर तिचें अनुमत मिळविण्यास त्यास वेळ लागत नाहीं; परंतु हिंदुस्थानांतील प्रकार सर्वथैव उलट. धर्माच्या व जातीच्या संबंधाचा विचार केला, तर लालनचें लुतुफउल्लावर प्रेम बसण्याचा बिलकुल संभव नव्हता. पूर्वीं त्यानें सांगितल्याप्रमाणें कित्येक उच्च वर्णांतील हिंदु स्त्रियांनीं ज्ञाति व धर्म सोडून मुसलमानांशीं लग्न केलें, हें खरें; पण तें प्रेमानें झालेलें नाहीं. ते प्रकार केवळ जुलमाचे. आणि त्यांतही त्यांस मागून दुःख व्हावयाचा संभव नव्हता. असो. तिला जखडून बांधिली होती. "असह्य अशा दुःखावस्थेंत रहाण्यापेक्षां प्राण द्यावा," असें जरी तिला वाटे, तरी ती करणार काय?

विष खाण्याला साधन नव्हतें. कपाळ आपटावें, तरी पंचाईत. खिडकींतून उडी टाकावी, तरीही तीच दशा. कोणत्याही बाजूनें जगणें व मरणें तिच्या स्वाधीन नव्हतें. तिच्या स्वाधीन रडणें आणि दीर्घ श्वास सोडणें इतकेंच होतें. तें ती करीतच होती. एखाद्या फार दिवसांच्या क्षुधितानें पंच पक्कांनीं भरलेल्या पानावर तोंडांत घांस घालण्यास न्यावा, आणि तितक्यांत त्याच्या हातावर थप्पड बसावी ह्मणजे त्याची जी दशा होते, तीच आपल्या साध्वी लालनची झाली. अविश्रांत श्रम करून ती आपल्या प्रियकरास भेटली. तिनें डोळेभर त्यास पाहिलें, तोंच तिच्या फुटक्या नशिबानें धांव घेतली! ती आपल्या प्रियकराजवळ असल्यामुळें तिच्या मनांत नानातरंग येत. एखादे वेळीं तिला वाटे, आपला प्रियकर ह्या संकटांतून आपल्यास मुक्त करील. तो आपल्यास परक्यांच्या जाचांत व हाल-अपेष्टेंत ठेवणार नाहीं. न जाणो, मजकरितां लढाईचा देखील प्रसंग येईल. मोहनप्यारीनें आपलें वर्तमान शिंद्यास सांगितलें असेल. पुनः तिचें मन फिरे. तिला वाटे, कोण मजसारख्या गरीबाची दाद घेतो? माझे सर्व विचार फुकट आहेत. अशा विचारतरंगांत ती एकसारखी तरंगत होती.

विचारांची शक्ति अनिवार असते. त्याविषयीं लिहावें नितकें थोडेंच. लालन दुःखानें स्फुंदत होती. ह्या कुशीवरून, त्या कुशीवर आणि त्या कुशीवरून ह्या कुशीवर लोळत होती. इतक्यांत घोड्यांच्या पावलांचा शब्द तिच्या कानीं आला. तिनें आपल्याकडून होतील तितके प्रयत्न केले; आणि ऐकलेले शब्द खरोखरच घोड्यांच्या

पावलांचे आहेत, अशी आपल्या मनाची खात्री केली. तेव्हां तीस असें वाटलें कीं, आपणास पकडून आणतांना जें मराठे सैन्य आढळलें तें तर हें नसेल ना!

आपल्यास जें ऐकूं येतें, तें आपल्या पहाऱ्यावरील मनुष्यांस ऐकूं येतें कीं काय, आणि त्यांचें तिकडे लक्ष्य आहे किंवा नाहीं, हें पहाण्याकरितां लालननें पुनः डोकें वर करून पाहिलें. तों झमरूद आपल्याकडे पहात बसला आहे, दासी उदास बसली आहे, गुलाम डुलक्या घेत आहेत, असें तिच्या अवलोकनांत आलें. आणखी तिला असेंही वाटलें कीं, आपणास जें समजलें आहे, तें त्यांच्या ध्यानीं-मनींही नाहीं. जिकडे तिकडे रात्रीची स्तब्धता पसरली होती. अवघें जग गाढ झोंपेंत होतें; इतक्यांत "बांग-बांग-बांग या खुदा! दीन! दीन! हर-हर महादेव!" असे परम भयंकर शब्द लालनच्या कानीं येऊं लागले. हत्यारांच्या खणखणाटानें, बंदुकांच्या आवाजानें, लढाईतील 'धरो-मारो-पकडो' इत्याद्यनेक हृदयभेदक व आंगावर कांटा उठविणाऱ्या शब्दांनीं, घोड्यांच्या खिंकाळण्यानें आणि दुसऱ्या अनेक गडबडीमुळें लालनच्या मनांतील एकंदर विचार जागच्या-जागीं विरवळून गेले.

# प्रकरण १४ वें.

## लांडग्यांच्या टोळींत बकरी.

" गुलरुख, संभाळ, पोरीला संभाळ." असें सांगून झमरूद हातांत काठी घेऊन दरवाजावर येऊन बाहेर डोंकावून पाहूं लागला; आणि तेथून पुनः ओरडून ह्मणाला, " यार सावध व्हा. बाहेर काय चाललें आहे, तिकडे लक्ष द्या. लौकर बाहेर पडा. चला-उठा-धांवा-मा-रा-मराठे लोक छावणींत घुसले. अरे, घोसमहमद कोठें गेला? बीरबल, बीरबल, अरे कोणी धांवा. शहाला जाऊन सांगा कीं, धर्माखातर-खऱ्या धर्माखातर-शत्रूचा संहार करा.

" शाबास वीरांनो, वहावा! भले बहाद्दर! कुत्र्यांनों, त्यांना तुह्मीं रस्ता दिला हराम" इतक्यांत त्याचा स्वर बदलला आणि तो भयाभीत होऊन ओरडला " आले, मूर्तिपूजक इकडेच आले."

त्याच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच बंड जवळ आलें, असा लालननें तर्क केला. इतक्यांत त्या तंबूच्या उज-व्या बाजूस बंडखोर येऊन पोंचले. जणो, जगदीशानेंच तिची दाद घेतली, असं ती समजत आहे तों, " हरहर महादेव" असा शब्द झाला.

लागलाच कानठाळ्या बसतील असा तोफांचा झडाका उसळला. त्याचा ध्वनि, प्रतिध्वनींत विलीन होतो न होतो तोंच बंदुकांचा गोळीबार सुरू होऊन धुरानें आकाश-पाताळ एकच झालें. आधींच रात्रीची वेळ. डोळ्यांत

घोट घातलें तरी दिसण्याची मारामार. तशांत धुरानें दशदिशा धुंद होऊन गेल्यामुळें जवळचा मनुष्य मेला कीं जिवंत आहे, हेंही समजेना! त्यांतच दुसरे लढाई-संबंधीं गोंगाट चालू होतेच. सारांश, तें स्थळ कोलाहलाचें मूर्तिमंत वसतिस्थान झालें होतें, असें ह्मटलें तरी चालेल.

लालनच्या पहाऱ्यावरील एक गुलाम पळाला. दुसरा हत्यार सरसावून झमरूदच्या मदतीस धांवला. दासी तर तोंड खालीं घालून आतां या संकटांतून देव पार पाडतो किंवा ठार करितो, ही जपमाळ घेऊन पडली होती. इतक्यांत एका गुलामानें तंबूच्या दरवाजाकडे पिस्तोलाचे एका मागून एक असे ठो–ठो–ठो–तीन आवाज काढले. नंतर त्यानें पिस्तोल खालीं ठेविलें; आणि तरवारीनें तंबू फाडून लालनला उचलली. आतां तो बाहेर निघणार तोंच, त्यावर कोणी वार केला; त्यामुळें तो ठार होऊन जमिनीवर पडला.

"हरामखोर खडे रहो! किदर भाग जाते हो? मीं गो-हत्या करणारा आलों थांबा" असा शब्द झाला.

"अव्वल इसकू पकड झमरूद!" दुसऱ्यानें सांगितलें.

झमरूद ह्मणाला, "मीं तिला घेऊन जातों; नाहीं तर मालक मला फांशीं चढवितील."

एका गुलामानें एका मराठ्यावर वार केला; परंतु मराठ्याच्या तरवारीनें त्याचे तुकडे केले. झमरूद फारच घाबरला; पण लालनला सोडून जावयास त्यास छाती होईना. त्यानेंही सुरी काढिली.

दासीला ठार मारून एक मराठा झमरूदच्या अंगा-वर गेला. लढावें किंवा पळून जावें, हाच त्याचा विचार

होता; परंतु त्याचे दोन्ही विचार अमलांत येण्यास कोणत्याच बाजूनें सवड नव्हती. तेव्हां त्यानें आपल्या अकलेचे तारे तोडून तिसरा विचार आरंभिला. लालनला ठार मारावयाकरितां तो पुढें गेला; आणि आतां वार करणार, इतक्यांत एका मराठ्यानें त्याच्या छातीवर दाणकन लाथ मारिली. त्या बरोबर तो तंबूच्या चिरलेल्या बाजूबाहेर पडला. देवानेंच आपली सुटका केली, असें समजून तो जीव घेऊन पळाला.

एक मराठा ह्मणाला, 'विठोबाची शपथ, तीच ही स्त्री! मीं मोहनप्यारीच्या मठांत जिला पोंचविली, ती हीच.' दुसऱ्या मराठ्यानें लालनचे बंद खुले केले. तिनें डोळे उघडून वर पाहून ह्मटलें, "अहो तुह्मींच मला दोनप्रहरीं मठांत पोंचविलें! देवानें माझी प्रार्थना ऐकून त्यानेंच तुह्मांस इकडे पाठविलें."

दुसरा एक मराठा हंसत ह्मणाला, 'अहो, ही जुनी ओळख दिसते! तरच महिपतराव हिची इतकी काळजी बाळगीत आहेत; वस्ताद बुवा!'

महिपतरावानें त्याला कांहींच उत्तर दिलें नाहीं. तो लालनला विचारूं लागला, 'तूं पुनः ह्या संकटांत कशी सांपडलीस?'

**लालन**—रावसाहेब, काय सांगूं! हें सर्व त्या जाटाचें कर्म.

**महिपतराव**—तो तसाच दिसला! मला त्या गाढवाचा प्रथमच संशय वाटला. तो चोर जर माझ्या तावडींत सांपडता, तर मीं त्याला माझ्या तरवारीस बळीच

दिला असता. असो; आतां त्या गोष्टी नको. दरवाजा आमच्या ताब्यांत आहे. तूं ऊठ आणि चालूं लाग. येथें, तरवारीचे तडाके व रक्ताचा पर्जन्य ह्यांशिवाय दुसरें कांहीं नाहीं.

**लालन**—महादाजी शिंद्यानें तुह्मांस पाठविलें आहे काय ?

**महिपत०**—नाहीं. ते उटीखानावर हल्ला करावयास गेले आहेत.

**लालन**—कोठें ?

**महिपत०**—ह्या जवळच्या मैदानांत. आणि माझी पागा, पवार व मी इकडे आलों. आमच्या सरकारस्वारीशीं तुझें काय काम आहे ?

**लालन**— त्यांसच मीं शोधीत आहें. त्यांशीं माझें महत्वाचें काम आहे. त्यांच्याकरितांच मला इतकें संकट सोसावें लागत आहे.

**महिपत०**—त्यांशीं तुझें काम? मोठें आश्चर्यच ह्मणावयाचें!

**लालन**—काय करणार ?

**महिपत०**—बरें, तसें कां होईना. तुझी मर्जी असेल, तर हा आपला विश्वासु सदोबा तुला सुरक्षित दरवाजाबाहेर नेऊन लष्करांत पोंचवील.

**लालन**—मग तर आपले मजवर मोठेच उपकार! "बरें तर; तुह्मी माझ्यावरोबर चला. हरहर महादेव! भवानी देवीकी जय!" असें ह्मणून महिपतरावानें सदोबावरोबर लालनची रवानगी केली आणि बाकीच्या आपल्या लोकांसह तो तेथून निघाला.

लालन मोकळ्या हवेंत आली. तिच्या दृष्टीस घनघोर लढाई पडतांच तिची काय अवस्था झाली, त्याचें वर्णन करणें आमच्या शक्तीबाहेर आहे!

मराठ्यांच्या सैन्यानें मुसलमानांवर जो छापा घातला, त्यांत इतका वेळपर्यंत त्यांची फत्ते होती. लुतुफउल्लानें, बादशहास आगाऊ वर्दी दिल्यामुळें त्यानें आपली सर्व तयारी केली. तरी ती लगबगीनें केलेली; व्हावी तशी झाली नाहीं, असें ह्मणण्यास जागा रहाते. शहाचा समज असा होता कीं, गोविंदपंत बुंदेल्यास आह्मीं जो त्रास दिला, त्याचा सूड उगविण्याकरितांच मराठे आले असतील; आणि उटीखानावर हल्ला करून ते माघारे जातील. अशा त्याच्या समजामुळें त्यानें आपलें मजबूत घोडेस्वारांचें लष्कर व सुजाउद्दवल्याचे स्वार, उटीखानाच्या मदतीस पाठविण्याचा बेत केला. प्रसंग पडलाच, तर अफगाण पायदळाच्या कित्येक तुकड्या व हाफीजरहिमतखानाची टोळी, ह्यांस तयार रहाण्याचा त्यानें हुकूम दिला होता. वजिराच्या मुलाच्या छावणीवर जनकोजी व महादाजी हे चाल करून गेले; परंतु त्यांत त्यांचा हेतु मुख्य छाप्यास मजबुती मिळावी, इतकाच होता. तिकडे छापा जाईल, असें बादशहाच्या स्वप्नांत देखील आलें नव्हतें. त्यामुळें त्याणें तिकडील व्यवस्था न करितां, फक्त उटीखान व लुतुफउल्ला ह्यांचा बंदोबस्त करून आपली तयारी चोख ठेविली होती.

मराठ्यांस तितकी सवड मिळतांच ते लुतुफउल्लाच्या टोळीस पिछेहट करावयास लावून मोर्चाकडे वळले. पहांटेच्या सुमारास होळकरानें आपली तयारी चांगली केली;

आणि तो समशेर बहादर व विठ्ठल सदाशीव विंचुर-कर यांस बरोबर घेऊन हळू हळू सावधपणानें पुढें होऊं लागला. त्या सपाट्यांत तो, कित्येक मुसलमानांस मागें हटवून व कित्येकांस ठार मारून लुतुफउल्लाच्या दरवाजापासून सुमारें चारशें हातांवर आला. मराठ्यांच्या बंदुका, तोफा व तरवारी यांच्या मारापुढें मुसलमानांचा टिकाव निघेना. मराठे हाणामार करीत पुढें येऊं लागले. मराठ्यांचा जरीपटका बादशहाच्या लाल तंबूजवळ येत असतां वाटेंत गाड्यांनीं त्यास प्रतिबंध केला. मराठे मोठ्या जोमानें पुढें येत असल्यामुळें त्यांनीं गाड्यांची बेपर्वा केली. गाड्यांवरून पटापट उड्या मारून ते आंत घुसूं लागले. होळकर एका हातांत तरवार व दुसऱ्या हातांत जरीपटका घेऊन पुढें चालला. आपला धनी पुढें निघाला असें पहातांच, शेंकडों मराठे वीर "भवानी देवीकी जय! व हरहर महादेव" करीत पुढेंच निघाले. तेव्हां होळकर ह्मणाला, "वीरहो, हीच संधी आहे. होईल तितकी त्वरा करून पुढें व्हा. जो मराठ्याच्या वीर्याचा असेल, जो हिंदुधर्माभिमानी असेल, जो निमक हलाल असेल, तोच पुढें होईल." होळकराचें हें वीरश्रीयुक्त भाषण ऐकतांच मराठे, प्राणाची आशा सोडून बेधडक पुढें चाल करूं लागले. त्यांनीं कित्येक गाड्यांचा मोडून तोडून चुराडा केला. त्यांस बांधलेल्या दोऱ्या कापून टाकिल्या; आणि आंत शिरण्यास मोकळा मार्ग केला. तरी, पायदळ लष्कर पुढें गेल्याशिवाय त्यांस सुखानें आंत जातां येईना. तितक्यांत तेही पुढें झाले. त्यानें हां हां ह्मणतां रस्ता साफ केला. घोडेस्वारांस मोकळा

मार्ग होतांच ते समोर सांपडेल त्याचा चेंदा उडवीत पुढें चालले. तेव्हां होळकर ह्मणाला, "याचेंच नांव शौर्य!" आतां धनगराच्या मागून बकरां कशीं काबुली लोकांच्या डेऱ्यांत शिरत आहेत, तीं पहा!!

## प्रकरण १५ वें.

### मराठ्यांची पिछेहट.

झंजावायूनें जशी वृक्षसमुदायाची दशा होते, त्या प्रमाणें मराठ्यांनीं मुसलमानांची दशा केली. त्यांनीं एकदम दरवाजावर छापा घातला व छावणीजवळील सर्व बाजू साफ केल्या. बादशहाच्या प्रख्यात लाल-तंबु फाडून, त्यांनीं त्यांचा पवित्र हिरवा झेंडा मोडून टाकिला; परंतु बादशहा निद्रिंत असेल आणि आपण त्यास पकडूं अशी जी त्यांची धमक होती, ती फुकट गेली. कारण, त्या रात्रीस बादशहा लष्कराबरोबरच होता. पोपलझाई उमरावाचा तंबु सोडून लालन जाईपर्यंत मराठ्यांची चांगली फत्ते होती.

लुतुफउल्लाच्या आगाऊ सूचनेप्रमाणें अहमदशहा आपल्या तयारींत होता. मराठ्यांनीं आपल्या समजुती-प्रमाणें जरी त्यावर अकस्मात छापा घातला, तरी त्यानें कडेकोट तयारी केली. आपल्या लोकांच्या त्यानें दोन रांगा केल्या आणि त्यांस व्यवस्थित उभें केलें. आपल्या देशांतील लोकांची तंबु मारण्याची अव्यवस्था असते; परंतु अहमदशहानें तसें केलें नव्हतें, फक्त जाण्या येण्यास

मध्यें वाट ठेवून त्यानें समोरासमोर तंबू ठोकिले होते; त्यामुळें त्यास आपल्या लढाऊ लोकांस चांगल्या व्यवस्थेनें ठेवितां आलें. तंबच्या आजूबाजूस जे उंचवटे होते, त्यांवर त्यानें तोफा लाविल्या आणि सभोंवार खंदक खणले.

चांगलें उजाडतांच, पळालेले अफगाण आपल्या लढाईच्या तयारीनें पुनः तंबूजवळ आल्यामुळें मराठ्यांस त्यांजबरोबर टक्कर देणें भाग पडलें. तंबूच्या दोऱ्यांनीं आणि मेखांनीं मराठ्यांचे घोडे ठोंकर खाऊं लागले व त्यांतल्यात्यांत गुरफटून त्यांचा पुढें जाण्याचा नाइलाज झाला. तरी, मराठे मागें हटले नाहींत त्यांनीं आपली अडचण काढून टाकण्याकरितां एकदम तंबूंस आग लाविली. अफगाण लोकांनीं लोंकरी वस्त्रें घेतलीं होतीं; ह्यामुळें अग्निप्रळयानें मराठ्यांस चांगलेंच फावलें. ते जयनाद करीत हर्षानें पुढें जात असतां, त्यांस खंदकाचा प्रतिबंध झालेला पाहून अफगाणांनीं एकदम आपल्या तोफखान्यास बत्ती दिली.

होळकर छावणी नजीक होता. त्यानें अहमदशहाचा शोध करण्याच्या इराद्यानें पुढें चाल केली; परंतु त्यावर मुसलमानांनीं एकदम मारा सुरू केला. अहमदशहा, त्याचा वजीर व लुतुफउल्ला इत्यादि प्रमुख मंडळी तेथेंच होती. होळकर पुढें येतांच त्यास प्रतिबंध करण्याकरितां हाफीजरहिमतखानानें रोहिले लोक पुढें केले. डाव्या बाजूकडून नजीबउद्दवला उठला. अशा कुमाऱ्यांत सांपडल्यामुळें होळकरांचा नाइलाज झाला. आतां पुढें चाल केली, तर मरणाचा प्रसंग येईल असें होळकरास वाटतां

च त्यानें आपल्या फौजेस मागें फिरण्याचा गुप्तपणें हुकूम केला.

तेव्हां **लालन सदोबा**बरोबर दरवाजाबाहेर जात होती. तिचा रस्ता लोकांच्या प्रेतांनीं, तंबूंनीं, पळपट्या लोकांनीं, घायाळांनीं, घोड्यांनीं, उंटांनीं, गवतानें व रक्तानें सारखा भरला होता. त्या रस्त्यानें जाणें ह्मणजे संकट प्रसंगांतून जाणें, असें होतें. पण प्रेमापुढें अशा संकटांची पर्वा कोण करितें? प्रेमानें अवघें जग बांधलें आहे. असो. **लालन** तशा त्रासदायक मार्गानें जात असतां **सदोबानें** एक शानदार घोडा पाहिला, त्यावर स्वार नव्हता किंवा त्याला जखमही झालेली नव्हती. **सदोबा** त्या घोड्यावर स्वार झाला. त्यानें **लालनला** आपल्यामागें घेतली आणि रस्ता सुधारला. **लालननें** सहज मागें पाहिलें तों, **मराठे** लोकांची पिछेहट झाली असें तिच्या दृष्टीस पडलें. पुढच्या बाजूस अग्निप्रळय व तंबूंच्या राखेचे ढीग. **मल्हाररावाचा** जय होईल, अशी **सदोबास** फार आशा होती; परंतु, तो मागें हटला असें दृष्टीस पडतांच त्यांस फार वाईट वाटलें. **अफगाण**लोकांच्या तोफखान्यानें मराठ्यांची त्रेधा उडाली कित्येक लोक घायाळ झाले, कित्येक जखमी झाले आणि कित्येकांचा तर ठावठिकाण देखील राहिला नाहीं. **मराठ्यांच्या** पिछेहटीमुळें **सदोबासही** पंचाइत पडली. त्यावर सोंपविलेलें काम आस्थेनें करणें त्यास भाग होतें. **लालन** एकदां जिकडची तिकडे गेली ह्मणजे, आपल्या मागची दगदग गेली असेंच तो समजे. परंतु त्याचा घोडा पाठाळ चांगला होता. तो मृत देह व घायाळ लोक तुड-

वीत ज्या वाटेनें आपल्यास सुखानें जातां येईल तिकडून निघाला. इतक्यांत त्या बिचाऱ्यावर एक बंदुकीची गोळी येत आहे, असें सदोबानें पहातांच त्यानें त्यास दोन पायांवर उभा केला. घोड्यास भरधांव सोडून अफगाण छावणीपासून तीनशें हात लांबीवर आल्यावर सदोबानें घोडा उभा केला, आणि कोणत्या मार्गानें जावें हा विचार चालविला. लालननें इतका वेळ त्यास घट्ट धरिलें होतें. परंतु, आतां तिचे हात ढिले पडले असे त्यास वाटतांच त्यानें विचारिलें, "बाई, तुला गोळी लागली नाहींना? जिवंत असलीस ह्मणजे पुरे."

लालन मेली नव्हती. परंतु, तिला दोन दिवस सारखें जागरण झालेलें; तशांत श्रम व भीती यामुळें ती बेशुद्ध झाली. तिला शुद्धींत आणण्याची सदोबानें पुष्कळ खटपट केली, तेव्हां तिनें नेत्र उघडले. सदोबानें तिच्या मनास उत्साह येईल असें उत्तेजनपर भाषण करून पुनः घोडा सोडिला. घोडा बराच दूर आल्यावर त्यास बरूचे रान लागलें. सदोबानें घोडा सावकाश चालविला. अशा स्थितींत त्यांनीं कांहीं वेळ काढल्या नंतर त्यांस एक मैदान लागलें. तरी, अरुणोदय केव्हां होतो, हें सदोबा पहात होताच. इतक्यांत त्यानें नगाऱ्याचा ध्वनि ऐकिला आणि तो ह्मणाला, "नगारा मराठ्यांचा आहे. पण संभाळून जावें, हें चांगलें. बाई, मीं येईपर्यंत तूं घोड्याची लगाम धरून रहाशील?"

लालन 'होय' ह्मणाली. तिनें लगाम धरितांच सदोबा खालीं उतरला आणि चालू लागला. कांहींसा दूर गेल्यावर त्याची खात्री झाली कीं, हे लोक शिंद्याचे

आहेत. तो पुनः घोड्यावर बसला व रणस्तंभाजवळच्या मैदानांत आला.

तेथें शिंद्याच्या दोन पलटणी उभ्या होत्या. त्यांतील एक वरूच्या जंगलाकडे व दुसरी लष्करासमोर होती. असें करण्यांत शिंद्याचा हेतु, मागें फिरणाऱ्या होळकराच्या सैनेस भेटावें व शत्रूस भीति उत्पन्न व्हावी, इतकाच होता. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूस विंचूरकर व समशेरबहादर आपआपले घोडेस्वार व्यवस्थेनें हळू हळू चालवीत होते. शिंद्यानें उटीखानाच्या पुढें येणाऱ्या टोळीस होळकरास न समजूं देतां, व सैन्याच्या जाणाऱ्या वाटेस हरकत पडूंनये ह्मणून येथूनच हांकून लाविलें. अकस्मात हल्ला झाल्यामुळें, अंधारामुळें, मराठे लोकांच्या जमावामुळें व छावणीवर हल्ला होतो असें वर्तमान प्रधान पुत्रास एकाएकीं समजल्यामुळें जो गोंधळ उडाला, त्यामुळें त्या मराठ्यांस जय मिळाला. उटीखान कोणत्याही रीतीनें कमी नव्हता. चिलखत घातलेले लोक येऊन मिळतांच, त्यानें आपली गेलेली जागा पुनः मिळविली. उटीखानाची फौज मागें येणाऱ्या मराठ्यांस त्रासदायक होती. मराठ्यांचें लष्कर तरी खोगीर भरतीचेंच. त्यांची जाण्यायेण्याची पद्धति सुरळीत नव्हती. कोणी उजव्या मार्गानें, तर कोणी डाव्या दिशेनें जात होते. त्यांतही कित्येक लोकांस कांटे व वरू लागून इजा झाली; परंतु, ते जेमतेम करीत खुल्या जाग्यांत एक दोघे कसेबसे आले. शिंद्याच्या सैन्यांतील एक मनुष्य होळकराच्या फौजेंत जाऊन आला तोंच, नगारा वाजला; आणि मोर्चाची तयारी झाली. होळकरानें आपल्या लोकांस वीरश्री यावी ह्मणून

झाले ते सदुपाय केल्यामुळें मुसलमानांस सहजच मागें फिरण्याचा प्रसंग आला.

---

# प्रकरण १६ वें.

## महादजीची मुद्रा.

" तेथें-तेथें. " घोड्यावर बसलेल्या गृहस्थानें एका ठेंगण्या मनुष्याकडे बोट दाखवून ह्मटलें ' तिकडे सरकार आणि जनकोजीही आहेत, त्यांकडे जा. '

आपल्या प्रियकरास केव्हां भेटेन अशा इराद्यानें लालन ह्मणाली, ' होय. '

लालन महादजी शिंद्यास इतक्या उतावळीनें कां भेटूं इच्छिते, ह्याचें खरें कारण सदोबाच्या ध्यानांत आलें नाहीं. त्याचा इतकाच समज होता कीं, कसल्या तरी साधारण कामाकरितांच, हिची मुलाखत असेल. महिपतरावानें त्याला सांगितलें होतें कीं, लालनला घेऊन तूं लष्करांत जा. लालनचें काम शिंद्याकडे आहे असें समजतांच, बरूचे रानांतून येणाऱ्या शत्रुपक्षांतील लोकांस चुकवून पिछेहट झालेल्या लोकांबरोबर शिंद्याकडे जावें, असा त्यानें विचार ठरविला; तरी लालन काय सांगते तें ऐकण्याकरितां तो थोडा वेळ थांबला. लालन आपल्या प्रियकराजवळ येऊन पोंचली होती. त्यास केव्हां पाहीन आणि मनाचें शांतवन करीन असें तिला झालें असल्यामुळें, तिनें एकदम ' होय ' ह्मटलें. महादजींस तिची कांहींच माहिती नव्हती; आणि त्याचें तिजकडे

कांहीं कामही नव्हतें; पण, **लालन** फारच अगत्यानें व होईल तितक्या लवकर त्यास भेटूं इच्छीत होती.

लालनची व **महादजी**ची भेट होण्यापूर्वीच लढाईची ओरड पडली.

मुसलमान व **मराठे** यांचें जुंपलें आणि छावणीच्या उजव्या बाजूकडून कोणी येत नाहीं असें पहातांच, **उटीखानानें** आपल्या लोकांस सिरकीच्या जंगलाकडे पाठविलें.

तेव्हां, शत्रु पळ काढीत आहेत असा **महादजीचा** समज होऊन त्यानें नगारा वाजविला. रणशिंग वाजलें. **मराठ्यांनीं** पुनः **उटीखानावर** हल्ला केला. त्यांनीं त्याची जागा सर केली आणि ते शत्रूकडे धांवले. इतक्यांत रणस्तंभाकडे असणाऱ्या विंचुरकर व **समशेरबहादर** यांच्या फौजेनें 'हरहर महादेव' असा गजर केला. या **मराठ्यांच्या** सैन्यापुढें **मुसलमानांस** वाट सांपडेल तिकडे पळणें भाग पडलें. **मुसलमान** दाही दिशा उधळले. बक्षिसाच्या उमेदीनें ते रणभूमीवर पडलेलीं जीं शिरें गोळा करीत होते, तीं कोठच्या कोठें पडलीं, कोण जाणे! यवनास पळतां भुई थोडीशी झाली. **मल्हारराव** रणस्तंभाजवळचा नाला उतरला आणि **समशेरबहादर** व विंचुरकर यांच्या फौजेपुढें गेला. पण इतक्यांतच **त्र्यंबक सदाशीव पुरंदरे** व **अंताजी माणकेश्वर** ह्यांच्या हाताखालीं जें शिंद्याचें सैन्य होतें, तें व्यवस्थेनें मागें फिरूं लागलेलें पाहून **जनकोजी** व **महादजी** शिंद्यानें, **उटीखानाचा** पिच्छा सोडिला. आपल्यामागें लागलेलें सैन्य परतलें असें **उटीखानास** दिसतांच त्यानें पुनः हल्ल्याची

सुरवात केली; परंतु त्याचे सर्व श्रम व्यर्थ गेले. कारण, त्याचा हल्ला होण्यापूर्वींच मराठे छावणींत पोंचले. त्र्यंबक सदाशीव आला तेव्हांच शिंद्याची फौज रणस्तंभाजवळ दाखल झाली. उटीखानाला छावणीकडे जावयास चाहेल तेवढा मोकळा मार्ग होता. पिछेहट झालेल्या मराठ्यांस चार हात दाखवीन, अशी त्यास फार धमक होती; परंतु ती सर्व निष्फळ झाली. शिंद्यानें शत्रूंचा पिच्छा पुरविण्यांत शिकस्त केली. विजयानंदानें तो प्रफुल्लित झाला आणि गोलाकार फिरून डाव्या बाजूस वळला. आपल्या सदोबास शिंद्याच्या भेटीची आवश्यकता होती. शिंदा उटीखानाकडे निघाला, तेव्हां त्यास भेटण्याचा विचार सोडून देऊन सदोबा रणस्तंभाकडून समोर पानिपतकडे जाऊं लागला. वाटेंत शिंद्याचें डावे बाजूनें येणारें सैन्य आणि जनकोजी व महादजी हे जरीचा पटका घेऊन आपल्या लोकांसह जयघोष करीत येत असतांना त्याला भेटले. महादजी उंच काठेवाडी घोडीवर स्वार झाला होता. त्याचें पागोटें मोडून अंगरखाही फाटला होता. आपल्या नायिकेची व महादजी शिंद्याची नजरानजर होतांच, लालन ह्मणाली "महाराज, मजकडे पहा. मीं हजारों संकटें सोसून तुमच्या भेटीचा अभिलाष धरून आलें आहें. नाथ, मीं तुह्मांस तापी नदीवरील जंगलांत पाणी पाजिलें. मीं वैराग्याची मुलगी. जानकीदासाची कन्या. मला तुह्मीं मोहिनी घातली आणि सांगितलें कीं, माझ्यामागून यावें लागेल. त्याप्रमाणें मीं आलें. आतां मला आश्रय द्या. माझे मनोरथ

पूर्ण करा. नाहींतर, मीं तुह्मांस दुसऱ्यानें भेटण्यापूर्वींच मरून जाईन."

सदोबा—गप्प. तूं वेडी तर नाहींस? बाई, आमच्या सरकारास तूं हें काय सांगतेस? शुद्धीवर आहेस ना?

महादजीनें लालनचें सर्व भाषण ऐकून आपली घोडी फिरविली. पंचाळी घोडीवर दुप्पट भार पडला तरी तो, ती सहन करिते हें त्याला माहीत होतें. त्यानें लालनकडे पाहिलें. नंतर तो सदोबाकडे वळला. त्याचा इरादा विशेष तपास करावा असा होता; परंतु, इतक्यांत त्याचें लक्ष्य दुसरीकडे गेलें. तेव्हां त्यानें जो प्रकार पाहिला, तो विशेष महत्वाचा होता. मुसलमान घोडेस्वार आपल्यापासून दोनशें हातांच्या अंतरावर आहेत, असें त्याच्या दृष्टीस पडतांच तो फार घोटाळ्यांत पडला. कारण, मराठ्यांच्या दुप्पट मुसलमान होते. समशेर बहादर झाडाखालीं विसावा घेत होता; परंतु, तो येऊन पोंहचेल अशी खातरी नव्हती. त्र्यंबक सदाशीव जवळच होता, परंतु त्याचीही महादजीप्रमाणेंच अवस्था झाली. दोघेही महान् विचारांत पडले. पुढें काय करावें, ह्या मंत्राचा जप चालला आहे तोंच, मुसलमान रणस्तंभाजवळ आले.

द्वंद्वयुद्ध करणें हा आमच्या लोकांचा स्वाभाविक धर्म. पण भिन्नप्रकृति व भिन्नधर्माच्या लोकांस तें आवडणें असंभवनीय होतें. तशांतही विरुद्ध पक्षांतील लोकांची संख्या जास्त होती.

महादजीनें लालनची भेट तहकुबीवर ठेवून येणाऱ्या लष्कराचा विचार चालविला.

दहा हातांच्या अंतरावरून मुसलमानांनीं "ओहो; काफर!" अशी आरोळी मारिली; आणि त्यांतीलच एकानें विचारिलें, 'तुह्मांपैकीं खुरासानच्या बादशहास द्वंद्वयुद्ध करण्याकरितां कोणी बोलाविलें? दयासागर शहाशीं युद्ध करण्यास कोण शक्तिमान आहे? बादशहाचा मीं गुलाम आहें. जो बादशहाशीं लढावयास सिद्ध असेल, त्यानें ह्या गुलामाचें काळीज विदारण करावयास तयार व्हावें. कोणाची ही मुद्रा तुमच्या ओळखीची आहे? पहा.' असें ह्मणून, महादजीनें पूर्व दिवशीं गोसमहमदाकडे जी आंगठी दिली होती, ती त्यानें दाखविली.

**महादजी**—योग्य किंवा अयोग्य याचा निर्णय पुढें होईलच. ती मुद्रा या महादजी शिंद्याची आहे; समजलास? त्याशीं लढण्याची उमेद धरणारा तूं कोण?

**लुतुफउल्ला**—मी लुतुफुल्लाखान, फत्रुल्लाखानाचा पुत्र. हा पोपलझाई सरदार बादशहाच्या जातीचा आहे. तूं माझ्याशीं लढशील?

**महादजी**—( हंसून ) अरे, "बिब्बीनही, तो दासीसह" तुकराजा माझें मागणें कबूल करावयास भीत असेल किंवा त्यास अभिमान असेल, तर त्याच्या बदला मीं तुलाच कापून काढीन!

महादजीनें लुतुफउल्लाच्या हातांतील आंगठी काढून घेतली.

पहिली मागणी मान्य होतांच, दोन्हीं सैन्यें तेथच्या तेथेंच तळ देऊन स्वस्थ राहिलीं. मुसलमानी लष्कर रणस्तंभाजवळ निर्भय राहिलें; परंतु त्यांचा हेतु आपल्यास

आणखी मदत येईल, असा होता. आणि होळकर पानिपतचे मार्गानें रणस्तंभाजवळ येणार, असा मराठ्यांचा समज होता. महादजी दहा बारा हात अंतरावर गेला. त्यानें आपल्या घोड्यास थापटून थोपटून हुशार केलें. त्याची लगाम बराबर धरिली, हातांतील भाला चांगला तपासला आणि सर्व व्यवस्था यथास्थित केली.

महादजी लुतुफउल्लाखानास ह्मणाला, 'हुशार, सावध रहा.'

---

## प्रकरण १७ वें.

### मल्लयुद्ध.

लालन इतके दिवस ज्याला शोधीत होती, ज्याकरितां तिनें आपल्या पित्यास सोडिलें, ज्या साठीं तिनें कित्येक भयंकर रानें व कीर्र जंगलें उल्लंघन केलीं, ज्याकरितां नद्या नाले व मोठमोठे पर्वत पालथे घातले, स्त्री जातीस असह्य असे श्रम सोशिले, अन्ना-पाण्याची, बसण्या-उठण्याची किंवा हिंडण्या-फिरण्याचीही पर्वा ठेविली नाहीं, ज्याकरितां ऊन, थंडी किंवा पर्जन्य यांचे असह्य तडाके सोसून तिनें अविश्रांतपणें त्रिभुवन शोधिलें तो महादजी भीति आणि मरण यांच्या तडाक्यांत सांपडला असें पहातांच तिला काय वाटलें असेल, ह्याची कल्पना वाचकांनींच करावी. तुह्मींच पहा कीं, लालननें आपल्या प्रियकराकरितां किती दुःख व क्लेश सोशिले? पण,

शेवटीं त्याची भेट होऊनही तो लढाईसारख्या विपत्तींत पडलेला पाहून तिची काय अवस्था झाली असेल बरें ?

सदोबा तिला छावणींत येण्याविषयीं अत्याग्रह करीत होता; पण ती त्याचें आर्जव करून तेथेंच राहिली. सदोबाचा नाइलाज झाल्यामुळें तो लालनसह जनकोजी व इतर सरदार मंडळी जेथें होती, तेथेंच राहिला.

दक्षिणी योद्ध्याची तयारी होतीच. त्यानें आपली घोडी हळूहळू लुतुफउल्लाकडे नेली. मराठ्यांचा लांब लचक भाला, दोनवेळ इकडून तिकडे फिरवितांच काम करण्यास तयार झाला. तो पाहिजे तसा हातांत धरितां येऊं लागला. लुतुफउल्ला तयारींतच होता. तो आपल्या जाग्यावर स्थैर्यानें उभा राहिला. त्यानेंही आपला भाला सरसाविला. दोघांची सलामी झाली. दोघेही युद्धोत्सुक झाले. महादजीनें लुतुफउल्लावर प्रथम वार केला. त्या वेळचें वर्णन जवळ असलेल्या लोकांसही यथार्थ करितां येणार नाहीं. ' या अल्ला ' म्हणून लुतुफउल्लानें महादजीवर भाला फेंकिला; पण तितक्यांत महादजीनें आपली शिकाऊ घोडी चटकन फिरवून तो चुकाविला. पुनः ते परस्पर भेटले. पुनः त्यांनीं आपल्या भाल्याच्या टोंकास टोंक भिडवून परस्परांच्या शक्तींचा अंदाज पाहिला. त्या तडाक्यांत लुतुफउल्लाच्या भाल्याचें कणीस मोडल्यामुळें त्यानें तरवार काढिली. महादजी थट्टेनें म्हणाला, ' अरे लकडीनें बायका पोरें लढतात ! '

भाल्यांच्या युद्धाचा निकाल होतांच, दोघांनींही तरवारी सरसावल्या. महादजीनें विजेसारखी तरवार

फिरवून लुतुफउल्लावर वार केला; पण तो चिलखता-वर लागला. लुतुफउल्लानेंही परत वार केला; पण तो घोडीच्या जिनावर लागून व्यर्थ गेला. शेवटीं महादजीनें लुतुफउल्लाच्या मानेवर जखम केली; त्याबरोबर लुतुफउल्ला बेशुद्ध पडला.

लुतुफउल्ला खालीं पडतांच झमरुद, गोसमहमद, खोजारोषन, तातारी आणि दुसरे लढाऊ लोक महादजीवर धांवले. त्यांनीं घोडीची लगाम धरिली; पण, त्यानें तरवारीच्या एकाच झपाट्यानें सर्वांस दूर घालवून आनंदानें आपले लोक गांठिले. आपल्या लोकांच्या पद्धती प्रमाणें महादजीच्या विजयाचें वर्तमान मराठ्यांच्या छावणींत पाण्यावरील तैलबिंदुप्रमाणें फैलावलें. जो तो शिंद्याचा स्तुतिपाठ गाऊं लागला. त्याची तरवारबहाद्दरी पहातांच अफगाण लोक मनांतल्या मनांत गार झाले. त्यांची निंदा व मराठ्यांची कीर्ति सर्वत्र फैलावली.

इतका वेळ लालन चिंतेंत होती. पण, आपल्या प्रियकराचा पराक्रम पहातांच तिला अभिमान वाटला. विजयी प्रियकराचे अत्यानंदानें ती धन्यवाद गाऊं लागली. मराठें लष्कर छावणीकडे निघालें.

जातां जातां लालननें मागें वळून पाहिलें तों, जनकोजी व महादजी गोष्टी बोलत येत होते. हातानें इशारत करून ती कांहीं बोलली; पण, तें ऐकूं आलें नाहीं. शिंद्यानें आपली घोडी लालनजवळ आणिली आणि तिला विचारिलें ‘ तुह्मीं कोण व हा बरोबरचा मनुष्य कोण ? ’

**सदोबा**—( नम्रतेनें ) सरकार मीं **महिपतरावाचा** मनुष्य **सदोबा** बारगीर.

**महादजी**—ही स्त्री कोण? हिची तुह्मांला काय माहिती आहे?

**सदोबा**—मला माहिती नाहीं सरकार. हल्ल्याच्या-वेळीं धनीसाहेबांनीं हिला माझ्या स्वाधीन केली व अफगाण छावणींतून हिला मीं आणिली. **महिपतरावानीं** हिला संभाळून लष्करांत ने इतकेंच मला सांगितलें. ती सांगते कीं, सरकारस्वारीशीं आपलें फार अगत्याचें काम आहे.

**महादजी**—माझ्याशीं? तर मग हें आश्चर्यच! काल रणस्तंभाजवळ अफगाणांनीं आणून सोडिली, ती हीच स्त्री काय?

**सदोबा**—मला माहीत नाहीं.

**महादजीनें** लालनला प्रश्न केला. "कायग, तूं कोण आणि तुझें मजकडे काय काम आहे?"

**लालन** अविश्रांत श्रम सोसून **महादजीच्या** प्रेम-बंधनानें येथवर आलेली; ह्यास्तव तिच्या हिंमतीची व मनःकल्पित प्रेमाची सहज कल्पना होईल. तसेंच तिचें धैर्य, निर्भयता, हिंमत, श्रम सहन करण्याची शक्ति, धाडस व दृढनिश्चयी स्वभाव त्यांचीही ओळख वाचकांस झालीच असेल. तिनें परम भयंकर रणसंग्रामें निर्भय चित्तानें पाहिला होता व असह्य संकटें सोशिलीं होतीं; परंतु **महादजीच्या** प्रश्नांचें उत्तर देतांनां ती फार लज्जित होऊन तिनें कांहीं वेळपर्यंत अगदीं मौन धरिलें.

**महादजी**—बोल. भिऊं नको. तुझी काय इच्छा असेल ती स्पष्ट सांगितल्याशिवाय आह्मीं काय समजावें?

**लालन**—हें तुह्मीच कां विचारतां? सरकार, मीं तापी नदीवर तुह्मांस पाहिलें. शिकार करून येतांना तुह्मीं मला माझ्या पित्याच्या मठाजवळ भेटलां. मीं तुह्मांस पाणी प्यावयास दिलें. तुह्मीं ह्मटलें कीं, तुला माझ्या मागून यावें लागेल. त्याप्रमाणें मीं शेंकडों गांव शोधीत सरकारच्या मागून आलें आहें. तुह्मी आपलें बोलणें विसरलां वाटतें!

स्मित हास्य करून शिद्यानें आपली घोडी उजव्या बाजूस वळविली आणि तिला पुढें बोलण्याचा प्रतिबंध केला.

---

## प्रकरण १८ वें.

### पानिपतचा रस्ता.

महादजीनें लालनकडे पाहून ह्मटलें "जनकोजी इकडे ये. मोटी आश्चर्य करण्यासारखी गोष्ट आहे. तुला खरें दिसो किंवा खोटें वाटो; ही स्त्री मजवर मोहित होऊन खानदेशांतून येथें आली आहे. तिकडे मीं शिकार करीत होतों, तेव्हां हिनें मला पाहिलें. त्यावेळीं मीं हिला थट्टेनें किंवा विनोदानें असें ह्मटलें कीं, तुला माझ्या मागून यावें लागेल, असें मीं गौडबंगाल केलें आहे. त्या माझ्या भाषणावर विश्वास ठेवून ही कोठून कोठें मला शोधीत आली आहे पहा!"

**जनकोजी**—( आपल्या शूर-वीर नायिकेस नख-शिखांत पाहून ) तें कांहीं असो; पण ही अंग धुऊन स्वच्छ वस्त्र परिधान करील तर फार सुंदर दिसेल. काका, मीं तुह्मांला मनापासून हजारों धन्यवाद देतों कीं, तुह्मीं खरे भाग्यवान आहांत!

**महादजींची लालनवर** खरी प्रीति होती. तो तिला मनःपूर्वक चहात होता; परंतु **जनकोजींचे** वरील शब्द ऐकतांच, त्याला किंचित वाईट वाटलेंसें दिसलें.

**महादजी**—बाबा, तुला जगाचा अनुभव थोडा आहे. या कलियुगांत हिच्या सारखी दुसऱ्याच्या एका शब्दावर विश्वास ठेवून मागून येणारी स्त्री क्वचितच पाहण्यांत येईल.

**जनकोजी**—काका, तुह्मीं मोठे सरदार आहां! तेव्हां अशा हजारों स्त्रिया व पुरुष दिवाण्या सारखे हो-ऊन तुमच्या नादीं लागले, तर त्यांत आश्चर्य नाहीं.

**महा०**—ज्याला माझी माहिती आहे, त्याजविषयीं तूं असें ह्मटलेंस तर शोभेल, आणि मलाही मान्य करावें लागेल; पण मी कोण हें हिला बिलकूल माहीत नव्हतें. ( **लालनकडे वळून** ) अग, ज्याला तूं पाणी पाजिलेंस तोच मी शिकारी स्वार, असें तुला कोणी कधीं सांगितलें?

**लालन** दोघांचेंही भाषण एकत स्वस्थ उभी होती. आपला प्रियकर आपल्यावर प्रीति करितो किंवा आपली भावी स्थिति काय होतें, ह्या संशयांत तिचें मन गचक-ळ्या खात होतें. **महादजींनें** प्रश्न करितांच तिला उत्तर देण्यास सवड झाली. ती ह्मणाली, सरकार मी तुमच्या

गळ्याची शपथ वाहून सांगतें कीं, ह्याच लढाईच्या मैदानांत काल मीं तुह्मांस पाहिलें. तत्पूर्वी तुह्मीं कोण आणि करितां काय ह्याविषयीं मला कांहींच माहिती नव्हती.

**महादा०** —प्रिये, तर मग त्याच वेळेस तूं मला तसें कां नाहीं सांगितलेंस ?

**लालन**—तेव्हां तुह्मीं जवळ देखील आलां नाहीं आणि लज्जेनें माझी स्थितिही चमत्कारिक झाली होती.

**जनकोजी**—आणि आतां ती लाज कोठें गेली? आमच्या काकांस तूं प्रथम पाहिलेंस, तेव्हां तर मोठ्या हिंमतीनें बोलाविलेंस.

**लालन**—महाराज, गेलया रात्रीं मीं जीं संकटें सोशिलीं, तीं तुह्मीं ऐकलींत ह्मणजे प्रियकरास पाहतांच माझी काय दशा झाली, ती तुह्मांस सहज समजेल. ती आतां माझ्यानें सांगवत नाहीं, व सांगण्याची आवश्यकताही पण पडणार नाहीं.

**महादा०**—रात्रीस संकटें? तूं **महिपतरावाबरोबर** आमच्या लष्करांत गेलीस असें समजून मीं स्वस्थ होतों. मग पुनः म्लेंच्छांच्या छावणींत गेलीस वाटतें ?

**लालन**—होय, महाराज; आतां मल्लयुद्धांत ज्या अधमाचा तुह्मीं पराभव केला, तोच मला पाहून मोहित झाला; आणि त्या नीचानें **मोहनप्यारीच्या** घरावर धाड घालून मला तेथून नेलें.

**महादा०**—देवाची शपथ, मला तें कांहीं माहीत नाहीं. एकूण महदाश्चर्यच! मला वाटतें, ही एक कादंबरीच

झाली! कसें झालें, तें सांग पाहूं? त्या म्लेंच्छ डुकरांनीं पुढें काय केलें? नीचच ते!

**महादाजी** व **जनकोजी** रागानें म्लेंच्छांच्या छावणीकडे पाहूं लागले. **महादाजी**च्या सैन्याच्या दोन तुकड्या तेथें आल्या. **समशेरबहाद्दर** व विंचुरकर यांची पिछेहट झाली. **उटीखाना**चे लोक संयुक्त बलानें बलवान झाले, तरी त्यांचा हेतु आपल्या मुळच्या जाग्यावर यावें असा नव्हता. कारण, मराठ्यांसही मदत मिळून ते अतिप्रसंग आणतील अशी त्यांस भीति होतीच. ते **समशेरबहाद्दरा**पासून दोनशें कदम व **लालन** वगैरे होती तेथून चारशें कदम अंतरावर होते.

**महादाजी**—ठीक आहे, चालूंद्या. रस्त्यांत आह्मांस ही एक करमणूकच झाली ह्मणावयाची!

**लालन**नें जातां जातां आपण कोठें फिरलें, इकडे कशी व केव्हां आलें, काय काय दुःखें भोगिलीं, प्रथम कोणी पकडली, तेथून कशी सुटका झाली, पुनः म्लेंच्छांच्या तडाक्यांत कशी गांपडलें इत्यादि सर्व हकीगत आपल्या मधूर व रसभरित वाणीनें **महादाजी**स सांगितली.

**महादाजी** **लालन**चें भाषण लक्ष्यपूर्वक ऐकत होता आणि वारंवार तिची तारीफ करून तिला उत्तेजन देत होता. असें करण्यांत तिचें खरें प्रेम व हिंमत किती आहे तें पहावें, इतकाच त्याचा उद्देश होता.

एखाद्या पराक्रमी नायकावर एखाद्या शूर वीर-नायिकेचें मन जडलें व त्याची भेट झाली, ह्मणजे उभयतांनीं 'एकदम परस्परांस भेटणें हें युरोपियन लोक विशेष प्रेमाचें लक्षण मानितात; आणि त्यांच्या ग्रंथांत बहुतेक प्रकार

असेंच अवलोकनांत येतात; परंतु आमच्या भरतखंडांत त्यांच्या रीतीभातांचें, ज्ञानाचें व नास्तिकपणाचें अवलंबन अद्याप सर्वांशीं झालेलें नाहीं. तेव्हां आमच्या पद्धतीप्रमाणें तो प्रकार समयीं फाजीलपणांत गणला जावयाचा; ह्मणून हात आटोपावा, हें बरें. असो. **महादाजी** आपली लग्नाची स्त्री व प्रीतिपात्र ह्यांत किती तफावत असते, हें चांगलें जाणत होता; आणि त्याप्रमाणें त्यानें **लालन**शीं वर्तन ठेविलें. त्यानें तिला जे प्रश्न विचारिले, ते सभ्यपणास व हिंदुलोकांच्या पद्धतीस अनुसरूनच होते. तशांतही तिजवर प्रेमदृष्टि करून तिला आपल्याजवळ ठेवावी, कीं तिचा धिःकार करावा, तिला आलीस तशी जा ह्मणून सांगवें, कीं तिला आपलीशी ह्मणून तिचें पोषण करावें, हा अथवा अशापैकीं कोणताच विचार अद्याप ठरला नव्हता.

**लालन**चीही तीच स्थिति होती. कारण, तिनें **जानकीदासा**चें झोपडें सोडल्यापासून ज्याकरितां थंडीवाऱ्यांत पुष्कळ दिवस दुःखें भोगिलीं आणि हाडांचीं काडें व रक्ताचें पाणी करून येथवर पल्ला झेपला, त्या प्रियकराची जरी तिला भेट झाली, तरी तो पुढें काय सांगतो ह्या संशयांत तिचें मन घोंटाळणें स्वाभाविकच होतें.

बहुतेक वेळ चालण्यांत गेला. **पानिपत** व लष्कर दिसूं लागलें. छावणीच्या बाहेर जवळच **दामाजी गायकवाडा**चे घोडेस्वार तयार होते. पण, ते कांहीं गडबड करीत आहेत, असा दुरून भास झाला.

**मुसलमानांची** स्थितिही तशीच होती. त्यांच्या सेनेस नव्या दमाच्या लोकांची मदत मिळाल्यामुळें तेही विशेष

बलवान झाले. मल्हाररावानें छापा घातला तेव्हां जे लोक दाही दिशा उधळले होते, ते हत्यारांनीं व कपड्यालत्त्यांनीं पुनः सज्ज होऊन आले. बरखुरदारखान व दुसरे कित्येक रोहिले आले. लुतुफउल्लाखानही सावध होऊन आपलें गतवैभव पुनः संपादन करण्यास तयार झाला. उटीखान, मराठे गोळीच्या टप्यांत सांपडतांच त्यांची रांगोळी उडविण्यास सिद्ध होताच.

होळकराचे लोक पानिपतच्या मैदानांत आले. विंचुरकर व इतर मानकरी यांचा असा समज होता कीं, आतां बहुतेक काम आटोपलें. मागें त्र्यंबक सदाशिव व शिंद्याचे लोक आहेत, ते मुसलमानांची देखरेख ठेवतीलच. मल्हाररावाच्या गुप्त हुकुमाप्रमाणें ते सर्व व्यवस्था पाहतील. समशेरबहादरास तर अफगाण लोकांपेक्षां आपले घोडेस्वार तरतरीत आहेत, असा अभिमान असल्यामुळें, तो शिंद्याच्या उजव्या बाजूच्या तुकडीजवळच होता.

पुरंदऱ्यानें मागें फिरण्याच्या स्थळाजवळ चिखलाची भिंत बांधिली होती. समशेरबहादराच्या उजव्या बाजूस जें मोकळें मैदान होतें, तें आजूबाजूच्या जमिनीपेक्षां सखल होतें. ती जागा 'झील' ह्या नांवानें सुप्रसिद्ध असून लहान-सहान झाडां–झुडपांनीं आच्छादित होती. एकंदरींत मुसलमानांस मराठ्यांवर एकदम हल्ला करण्यास उत्तम सोय होती.

मागें फिरणाऱ्या लष्करास भेटा, असा उटीखानानें हुकुम देतांच लुतुफखान व उटीखानाचे घोडेस्वारांनीं

झपाट्यानें कूच केलें. दुराणी व हिंदुस्थानी योद्धे दीन! दीन! असा रणशब्द करीत त्वरेनें पुढें चालले.

पहिल्या आरोळीच्या वेळीं **महादाजी** आपल्या प्रियपात्राशीं संभाषण करीत होता. त्यानें शत्रूंची ओरड ऐकतांच तिकडे पाहिलें आणि ह्मटलें, " ते येताहेत-ते आले-चांगलें झालें-येऊंद्या-त्यांचेंच काम होतें. **सदोबा** त्वरा कर, आणि हिला घेऊन त्या धुळीच्या ढिगावरून लष्कराजवळ माझी वाट पहात रहा. जा-जा इतक्यांत मीं आलोंच."

मराठ्यांच्या छावणींत **लालन** आली तोंच, मुसलमान घोडेस्वार मराठ्यांजवळ येऊन पोंचले. **समशेरबहादर** आपल्या अभिमानामुळें सावकाश येत होता. परंतु आतां हें स्थैर्य कामाचें नाहीं असें वाटतांच त्यानें आपला घोडा भरधांव सोडिला. मुसलमानांनीं विजयनाद करून घोड्यांची लगाम ढिली सोडिली. मराठे चिखलाच्या भिंतीजवळ उजव्या बाजूनें येऊं लागले तों मुसलमानही त्यांस भेटण्याकरितां पुढें सरले. भिंताडाजवळ बंदुकांच्या कित्येक गोळ्या झडल्या. गोळ्यांच्या वर्षावामुळें मुसलमानांचा नाइलाज झाला. त्यांस निर्भयतेनें मागें फिरण्यास किंवा तथेंच थांबण्यास सवड होती; पण पुढें जाणारी टोळी मागें वळली आणि समोरची तथेंच राहिल्यामुळें त्यांची फार अव्यवस्था झाली. कित्येक लोक सुसाट पळूं लागले. कित्येक पळण्याच्या तयारींत होते. ह्यामुळें मुसलमानांची पुढें जाण्याची गति खुंटली व या ठिकाणींच भयंकर युद्धास प्रारंभ झाला. **उटीखानानें** आपल्याकडे शिल्लक होते तितकेच लोक बरोबर घेतले आणि भिंताड कबजांत

घेण्याचा प्रयत्न केला. दुराणी लोकांचे कित्येक चांगले नांवाजलेले सरदार व सुजाउद्दवल्याचे कित्येक घोडेस्वार लुतुफखान व बरखुरदारखानास मिळाले आणि सर्वांनीं भिंताडाकडे चाल केली; परंतु त्या सर्वांचे प्रयत्न व्यर्थ झाले. कारण, बंदुकींच्या अचानक गोळ्यांचा वर्षाव होऊं लागला ह्मणून जें सांगितलें, तो इब्राहीमखान गार्द्यांच्या कवाइती पलटणींतील लोकांचा होता. ते तेथून शंभर हातांवर असून त्यांनीं दोन्ही बाजूनें गोळ्यांचा पर्जन्य चालविल्यामुळें दुराणीचा टिकाव निघेना.

**लुतुफखान**—काफर लोकांवर चाल करा—अरे भ्याडासारखे पळतां काय? शत्रूंचा नाश करा—हिंमत धरा-वांचाल तर गाजी ह्मणवून घ्याल—तुमची कीर्ति होईल आणि मराल तर धर्माखातर मेलांत असा लौकिक होईल. दोन्हीं कडून गोळ्या येत आहेत आणि दोन्हीं बाजूंनीं तुमचा फायदाच आहे. धैर्य सोडूं नका.

**उटीखान**—थांबा—थांबा ! खुदा करितां थोडा धीर धरा—हात पाय गाळूं नका—असे भिऊन तुह्मीं मागें फिरतां? पैगंबर आणि काबाच्या नांवांकरितां परस्परांस सवड द्या.

**इब्राहीमखान**—शाबास त्वरा करा. अचुक-नेम-धरा. दुराणी लोकांची धांदल झाली. हीच संधि-शाबास—बहाद्दर. आह्मीं पगार खातों त्याचें कसें सार्थक करतों, तें रावसाहेबांस आज दाखवूं !

याप्रमाणें उभय सैन्यांतील योद्धे आपआपल्या लोकांस उत्तेजन देत होते; पण शेवटीं मुसलमानांस पळण्याशिवाय अन्य मार्गच राहिला नाहीं. तेव्हां ज्याला जिकडे

जावें असें वाटलें, तिकडे तो बेधडक पळूं लागला. त्यांची फाटाफूट झाली. ही शत्रूंची स्थिति पाहतांच **इब्राहीमखानास** विशेष अवसान आलें. तो आपल्या लोकांस नवा दम व उत्तेजन देत असल्यामुळें त्याच्या हाताखालील लोकांस जास्त चेव आला व ते आपल्या प्राणाचीही पर्वा न करितां बंदुका सोडूं लागले. त्या तंडाक्यांत **उटीखानाच्या** घोड्यास गोळी लागली व तो तुफान होऊन उधळला. **बरखुरदारखानाच्या** हातास गोळी लागली व **लुतुफखानाच्या** मानेस लागली. कित्येक लोक तर अगदीं ठार झाले व कित्येक जखमी पडले. इकडे **समशेरबहाद्दरानें** आपला घोडा मागें फिरणाऱ्या शत्रूंवर चालविला; परंतु तसें करण्यांत कांहीं फायदा नव्हता. कारण, मुसलमानी लष्कर कावरेंबावरें होऊन पळत सुटलें होतें.

होळकराचा पराभव झाला आणि आपण विजयी झालों, अशा अंतरंग साभिमानानें हर्षनाद करीत **महादाजी शिंदा** आपल्या प्रियपात्राकडे **पानिपतच्या** बाजूस निघाला. तो छावणीच्या दारांत येतो तों **सदाशिवराव** आणि इतर सरदारमंडळ त्यास भेटलें.

**सदाशिवराव**—शाबास **महादाजी**! आज तुह्मीं चांगली तरवार गाजविली. **दुराणीस मराठ्यांचा** चांगला तडाका दाखविला. आपल्या शक्तीचें, धैर्याचें, शौर्याचें व तरवारबहाद्दरपणाचें सार्थक केलें. रात्रीच्या गोष्टीचा असा परिणाम झाला. असो, प्रभुसत्ता.

**महादा०**—मी दुसऱ्याविषयीं कांहींच बोलूं इच्छित

नाहीं. माझा निश्चय मीं पूर्वींच सांगितला आहे. धन्याची एकनिष्ठेनें चाकरी करावयाची इतकेंच मला माहीत.

बळवंतराव—जेथें पदरच्या मंडळीचा एक निश्चय तेथें ईश्वराचें साहाय्य आहेच. आतां मला असें वाटतें कीं, ह्या सर्व भानगडींचा वींमोड झाला पाहिजे. जंगी लढाई जितक्या लौकर होईल तितकें चांगलें. 'शुभस्यशीघ्रम्.'

---

## प्रकरण १९ वें.

### मानलेला बाप.

या वेळीं बहुधा प्रत्येक मराठे—सरदाराचा जनानखाना बरोबर होताच. साधारण शिपाई लोकांनीं देखील आपली बायका-पोरें बरोबर नेलीं होतीं. महादाजीच्या कुटुंबांतील बहुतेक मनुष्यें त्याच्या बरोबर होतीं. त्यांतच लालन राहील, असा प्रथम त्याचा विचार होता; परंतु कित्येक कारणांमुळें तसें करणें चांगलें नव्हे, असें पुनः त्याच्या मनांत आलें. हिंदु लोकांच्या स्त्रियांस "लोण्याची संवत देखील सहन होत नाहीं" अशी सर्वत्र प्रसिद्धि आहेच. त्यामुळें महादाजी पुनः विचारांत पडला. साधारणतः अशा स्त्रिया जोंपर्यंत लग्नाच्या स्त्रियांशीं सलोख्यानें वागूं लागल्या नाहींत, तोंपर्यंत त्यांची व्यवस्था स्वतंत्रच ठेवावी लागते. आणि तशी स्वतंत्र व्यवस्था ठेविली व त्या एका भावानें वागूं लागल्या, तरी लग्नाच्या स्त्रिया त्यांशीं प्रेमानें वागत नाहींत, हें खचीत.

वरील प्रकार कसाही असला, तरी महादाजीस लालनला आपल्या घरीं ठेवितां आलें नसतें. तिची स्वतंत्र

व्यवस्था लावणें भाग; पण तशी व्यवस्था करण्याचीही पंचाइतच. कारण, छावणींत अंदाधुंदी आणि सर्वांचें मन युद्धाच्या परिणामाकडे लागलेलें. शेवटीं काय होईल तें होवो, तिला एखाद्या स्वतंत्र घरांत ठेवावयाची, असा त्याचा निश्चय झाला. घराच्या शोधांत त्याचें मन गढलें आहे, तोंच महिपतरावाची त्याला आठवण झाली.

महिपतराव, होळकराच्या तैनातींतील एक विश्वासु अंमलदार होता. मल्हाररावान रात्रीं जो छापा घातला, त्यांत महिपतराव जखमी झाला होता. तो एका खाटल्यावर पडला असून त्यापुढें त्याचा मोतद्दार घोड्यावरील जीन वगैरे उतरीत होता. महिपतरावास बंदुकीची गोळी लागली होती ती हजामानें काढून त्यावर मेण, तेल, कापूर व आंबेहळद एकत्र करून मलमपट्टी बसविली. त्या हजामाशीं महिपतराव बोलत व हुक्का गुडगुडावीत होता, इतक्यांत महादाजी तेथें गेला. तेव्हां महिपतरावानें हजामास तंबी देऊन 'लौकर आटोप' ह्मणून सांगितलें आणि हुक्का बाजूस ठेवून आपण उठून बसला.

महादाजी—निजा, निजा; तुह्मांला गोळी लागली वाटतें? जुने लढवय्ये तुह्मीं. ही दुसरी गोळी!

महिपतराव—मीं घोड्यावरून उतरत होतों, इतक्यांत मागें फिरण्याचा हुकुम झाला; तेव्हां ही ढोंपरास गोळी लागली. माझा घोडा चांगला ह्मणून त्यानें तुमच्या कृपेनें मला येथें आणून सोडिलें.

इतक्यांत सदोबा आला व त्यानें महिपतरावास

रामराम करून सांगितलें "आपल्या आज्ञेप्रमाणें त्या बाईस मीं सुरक्षीत सरकारच्या स्वाधीन केली."

**महिपतराव**—अरे, ती बैरागीण. तिचें सरकार-स्वारीकडे काय काम?

**महादाजी**—( हंसत ) अहो, त्या सुंदरीचें माझ्या-सारख्या तरुणाकडे प्रीतिशिवाय दुसरें कसलें काम!

**महिपत०**—सरकार ह्मणतील तेंच खरें. ( **महादाजीनें** गमनीखातर कांहीं सांगितलें असें समजून ) माझ्यानें कांहींच ह्मणवत नाहीं.

**महादाजी**—मीं खरें सांगितलें **महिपतराव**. त्या संबंधानें माझें तुह्मांकडे काम होतें ह्मणून मीं आलों आहें, कराल काय?

**महिपत०**—सरकार जी आज्ञा करतील, ती मला शिरसा वंद्य आहे.

**महादाजी**—असें पहा, ती बैरागीण प्रेमबद्ध होऊन मजकडे आली. तिला जनान्यांत ठेवावी, तर बायका धुसफुस करणार, विनाकारण त्यांचीं भांडणें ऐकावीं लागणार, तें चांगलें नव्हे. तेव्हां तुह्मीं तिला सुरक्षित ठेवाल काय?

**महिपत०**—हो; मीं त्या बाईला पाहिल्यापासून तिच्याविषयीं माझ्या मनांत दया उपजली आहे. त्यांत सरकारचें प्रीतिपात्र; तर माझ्या कन्येप्रमाणें माझ्याकडून होईल तितकी खटपट करून मी तिला येथें सुखांत ठेवीन. त्याविषयीं सरकारास चिंता करणें नलगे.

**महादाजी**—तुह्मांविषयीं माझी खातरी आहे. ( ला-

लनकडे पाहून ) कसें, तूं ह्या विश्वासु महिपतरावाच्या विऱ्हाडीं रहा. आमच्या जनानखान्यांत रहाण्यापेक्षां येथें विशेष सौख्य होईल. ह्यांजकडे सर्व व्यवस्था चांगली राहील.

लालन—सरकार—स्वारीकडे ठेवण्यासारखी सवड नसेल, तर दुसऱ्या कोठेंहीं राहण्यापेक्षां रावसाहेबांकडे मी सुखानें राहीन. कारण, ह्यांनींच माझी अफगाण-छावणींतून मुक्तता केली, आणि आतां संरक्षणभारही घेण्यास तयार; तेव्हां माझा बाप जानकीदास दूर, पण हे जवळ असें मी समजतें.

महिपतरावाकडे लालनची व्यवस्था लावून महादाजी तेथून गेला. महिपतराव चांगला विश्वासु होता. आमच्या देशांत इंग्रजांचा अंमल झाल्यापासून हिंदुलोकांचा आचार-विचार बदलला. त्याचा परिणाम चांगला किंवा वाईट झाला आहे, ही गोष्ट स्वतंत्र आहे; तिचा विचार करण्याचें हें स्थळ नव्हे. पूर्वी एखाद्यानें एखाद्या स्त्रीस कन्येप्रमाणें मानिली, तर तो तिचें पालन-पोषण तसेंच करी. लालन आपल्या कन्येप्रमाणें असें महिपतरावानें कबूल केलें, आणि लालनही त्यास जानकीदासाप्रमाणें मानूं लागली. त्या घरांत दोन तीन बिछाने पडले होते. एक रिकामी खोली होती. तींत बराच कचरा व राखेचे ढीग होते. घोडा बांधण्याच्या ठिकाणाजवळच स्वयंपाकघर होतें. त्याच्या आजूबाजूस घोड्याचें व उंटाचें सामान आणि एक शेगडी होती.

लालन सौख्यसंपदेंत जरी रुळलेली नव्हती, तरी स्वच्छ होती. तिनें पुष्कळ प्रवास केला असल्यामुळें पुष्कळ गोष्टींचा

तिला अनुभव आला होता. स्वच्छतेनें रहावें, घरदार साफ असावें, वगैरे गोष्टी तिला चांगल्या अवगत होत्या. लहानपणापासून ती घरसंसारांत गुंतली असल्यामुळें तिला तत्संबंधानें चांगला अनुभव होता. तिनें **माहिपतरावाचें** घर झाडून सारवून स्वच्छ केलें, आणि एक बिछाना स्वच्छ झाडून त्यावर चादर आंथरून ती झोंपी गेली.

**माहिपतराव**—( संध्याकाळ होत चाललेली पाहून ) ऊठ बाई, संध्याकाळ झाली. तोंड धू. स्वयंपाक झालाच आहे. तुला भूक नाहीं का लागली ?

**लालन** उठली, तिनें आपलें अंगवस्त्र नीटनेटकें केलें, आणि मानलेल्या पित्यास नमस्कार केला. **माहिपतरावानें** तिला आशीरवाद दिला.

**माहिपतराव** तिला घेऊन तंबूजवळ आला. तेथें उभयतांनीं मुखप्रक्षालन केलें. **लालन** स्वयंपाकगृहांत गेली. स्वयंपाक्यानें दक्षणी लोकांच्या पद्धतीप्रमाणें भात, भाकरी, आंबटी व चटणी तयार केली होती. उभयतांनीं भोजन केलें.

**माहिपत०**—मीं तुझ्याइतक्याच वयाच्या माझ्या मुलीस अजमिरांत ठेविली आहे. तुला पहातांच मला तिची स्मृति झाली. तुला निराधार पहातांच मला वाईट वाटलें, आणि माझें मन तुजवर प्रीति करूं लागलें. त्यांत तूं सरकारच्या प्रीतीची असें समजल्यापासून मीं तुजवर विशेष प्रेम करूं लागलों. आमची तूर्तची स्थिति फार वाईट आहे. गेली घडी सुखाची. उद्यां काय होईल भगवान जाणे! आत्ती मरूं किंवा जगूं हें कांहींच सांगवत

नाहीं; पण, तूं मला आपल्या पित्याप्रमाणें मानिलेंस व मींही तुला कन्येप्रमाणें मानिली आहे त्या अर्थी, माझ्या कन्येप्रमाणें मी तुझें रक्षण करीन. तूं कांहीं काळजी करूं नकोस हें तुझें माहेरघरच समज. मी जिवंत असेपर्यंत तुझ्या एका केंसासही धक्का लागूं देणार नाहीं. आतां हात धू आणि सरकारस्वारीनें तुझ्याकरितां काय पाठविलें आहे, तें पहा.

**लालन** निजली होती तेव्हां, **महादाजीनें** तिजकरितां दोन लुगडीं, एक भरजरी काळी चंद्रकळा, चार पांच खण, चांदीचे तोडे, सोन्याचे कित्येक दागीने आणि कांकणें पाठविलीं होतीं.

**महिपतराव**—बाई, आतां अंधार झाला ह्मणजे स्नान करून तूं हीं वस्त्रें-भूषणें अंगावर घाल. सरकार केव्हां येतील, याचा नेम नाहीं.

---

# प्रकरण २० वें.

## तपासाची समाप्ति.

स्नान करितांना **लालनची** दृष्टि आसमंतांतील देखाव्याकडे गेली. नक्षत्रमालेच्या प्रकाशानें जवळ बांधलेले घोडे, उंट आणि गाड्यांस जुंपावयाचे बैल दिसत होते. कित्येक ठिकाणीं परसे पेटत होते. कोठें स्वैयपाक चालला होता. कोणी भोजन करीत. कोणी गात व वाजवीत होते. कोणी चिलीम फुंकीत होते. मराठ्यांच्या छावणीच्या इतर भागांपेक्षा त्या बाजूस लोकांची गर्दी कमी होती. परंतु तंबूवरून बाजारांतील गडबड ऐकूं येई. कित्येक लोक

सुस्वर वाद्यें वाजवीत गात जात. कित्येक स्त्रिया आपल्या सरदारांकरितां पाणी नेत होत्या. जवळच्याच एका तंबूंत एक तरुणी गात व नाचत होती. एकीकडे जुगाराचा धुमाकुळ माजला होता. मधून मधून लढाईतील कोलाहलध्वनि ऐकूं येई.

लांकडाच्या तुकड्यावर बसून **लालन** स्नान करूं लागली. तिनें आपलें आंग स्वच्छ केलें. ती **महादाजीनें** पाठविलेली चंद्रकळा नेसत होती. इतक्यांत त्या तंबूकडे कोणी येत आहे, असा तिला भास झाल्यामुळें ती आंत आली. ती आपले केंस वाळवीत असतां **महादाजी** बाहेर बोलत आहे, असें तिनें ऐकिलें. इतक्यांत रुमालांत गुंडाळून एका चाकरानें एक बाटली आणिली. त्याच चाकरानें जवळच्या तंबूंत बिछाना आणून टाकिला आणि दिवाबत्ती करून बिछाना घालून तो गेला. **लालननें** आजपर्यंत जीं संकटें सहन केलीं, त्याचा मोबदला तिला आज मिळावयाचा होता! तरी ती भयानें कांपत अंगावर एक वस्त्र घेऊन एका कोंपऱ्यांत उभी राहिली.

**महादाजी** आंत आला. त्यानें आपला लढाऊ पोषाख काढून दुसरा पोषाख केला होता. अंगांत सफेत मजलीनची पैरण आणि डोकीस जरीचा फेटा होता. शेंडीस सुगंधी तैलाचा चांगला वास येत होता.

तंबूंत **लालन** त्याला कोठें दिसेना. तेव्हां तो फार अचंब्यांत पडला, आणि इकडे तिकडे पाहूं लागला. ती त्याच्या दृष्टीस पडतांच तो जवळ गेला आणि हसून ह्मणाला "सुंदरी, तूं इकडे कां उभी आहेस? माझ्यासारख्या शूर व तरवारबहाद्दर सरदाराची स्त्री भित्री हें

आश्चर्यच! तर मग तूं इतका प्रवास कां केलास? इकडे येण्याचे श्रम कां सहन केलेस? तापी नदीच्या जंगलांतच रहावयाचें होतेंस."

महादाजीनें तिला कुरवाळिली, तरी लालन कांपतच होती. ती आपलें मस्तक महादाजीच्या हृदयावर ठेवून स्वस्थ राहिली. तो ह्मणाला "वेडी कशी! चल भिऊं नको, प्रिये, मी कांहीं वाघ नव्हे; तुला खाणार नाहीं. व्यर्थ भितेस कां?"

लालन महादाजीच्या हातून सुटण्याचा प्रयत्न करीत होती. परंतु महादाजी स्त्रियांच्या स्वभावाविषयीं पुरा माहितगार होता. त्यानें तिची समजूत करून तिला बिछान्यावर आणून बसविलें; तरी ती तोंडावरून पदर घेऊन स्वस्थच होती.

महादाजी—(तिच्या तोंडावरचा बुरखा हळूच एकीकडे करीत) असें काय वेड्यासारखें करावें? ह्याचें नांव तरी काय? बोलावयाचें नाहीं? माझ्याकडे पाहावयाचें देखील जर नाहीं, तर मग इतकें दुःख भोगून तूं इकडे आलीस कशाला? इकडे पहा, मी तुला थोडें औषध देतों; ह्मणजे चटसारी तुझी भीति नाहींशी होईल. (असें ह्मणून त्यानें बाटली उघडली; आणि त्यांतील थोडीशी दारू पेल्यांत ओतिली.)

लालन—(भीत भीत नम्रतेनें) तुमच्या दासीला दारू पिण्याची संवय नाहीं. आजन्मांत मीं तिला स्पर्श सुद्धां केला नाहीं. कृपा करून मला क्षमा करा. मी गरीब रानटी मुलगी आहें. मला छावणीचा किंवा सरकारचा

अनुभव नाहीं. तुह्मींच विचार करा. तुह्मांसारख्या शूर वीर सरदारांस मी भिणार नाहीं असें कसें होईल? माझें शरीर, माझें मन आणि माझें अवघें जीवन सरकारचें आहे. त्याचे तुह्मीं मालक आहां. तुह्मांपेक्षां या जगांत मला कोणीच प्रीय नाहीं. तुह्मीं जितके मला आवडतां तितकें मला कोणीच आवडत नाहीं. माझें घरदार व आईबाप सोडून केवळ हे पाय शोधीत मी इकडे आलें. येथें तुह्मीं आणि वर ईश्वर माझे संरक्षक. तुमची आज्ञा मला शिरसावंद्य आहे; परंतु आजपर्यंत ज्या पदार्थाची मीं रुचि घेतली नाहीं, तो स्वीकारण्याविषयीं तुह्मीं मला आग्रह करूं नका.

महादाजी—( प्रेमानें हनुवटी धरून ) प्रिये, तूं सांगतेस तें खरें; परंतु माझें सांगणें तुला ऐकिलें पाहिजे. तें कांहीं चालावयाचें नाहीं. त्याशिवाय तुझ्या मनांतील भीति जाणार नाहीं. माझी शपथ घालून सांगतों कीं, पी. प्यालीच पाहिजे. पहा तरी हिची कशी गोडी आहे ती!

लालन—शपथ घालूं नका. नाहीं प्यालें, तर काय हरकत आहे?

महादाजी—तें मला माहित आहे. आपल्यास काय? पी ह्मटलें, प्यालें! हूँ, वेळ नको.

लालन—जशी आपली मर्जी. प्रियकरा, ही तर दारूच आहे; पण तुह्मीं मला जलाल वीष जरी प्यावयाला सांगितलें, तरी मी कांकूं करणार नाहीं.

महादाजी—शाबास! घे तर मग.'

लालन कडक दारूच्या वासानें कंटाळली. तिनें तोंड वाईट करून फिरविलें. पेला खालीं ठेविला. तेव्हां महा-

दाजी ह्मणाला " तुला अनुभव नाहीं असें ह्मणतेस ह्मणून सांगावयाचें, आतां हा पेला भरून तूं मला दिला पाहिजे. "

लालन—प्राणप्रिया, मीं अगदीं मूर्खच जन्मलें असें तुह्मांस वाटतें? मीं आपल्या शोधाकरितां फिरतांना पुष्कळ दारू पिणारे लोक पाहिले. तुह्मीं मला अज्ञान समजूं नका. ( एक पेला भरून तिनें महादाजीच्या मुखाजवळ नेला ) जगदीश, हें मदिरापान माझे प्राणप्रियास अमृततुल्य होवो.

लालन आणखी एक पेला पितांच तिची स्थिति चमत्कारिकच झाली. शिंद्यानें पूर्वी तिला पाहिली त्यापेक्षां त्या वेळची तिची चर्या त्याला मनोरम वाटली. आणि ती एक सुंदर चीज आहे, असा त्याचा समज झाला. तो ह्मणाला " तुझ्या पित्याच्या मठांत मीं सहज तुझी थट्टा केली; परंतु तूं माझ्या मागून येशील आणि सर्वस्वी माझें मन जिंकशील असें मला तेव्हां वाटलें नव्हतें. "

लालन—( आणखी एक पेला भरून देतांना ) प्रिया, मनोमन ईश्वर साक्ष. मीं शुद्ध प्रेमानें किती अचाट श्रम सोशिले, तें जगदीश जाणत असेल. तो माझे श्रम व्यर्थ कां जाऊं देईल?

महादाजी—आतां तर तूं सुखी झालीस ना?

लालन—तें विचारावयास नकोच. अवघें जग मीं तुह्मांकरितां शोधिलें. तुह्मीं माझे सर्वाधार जवळ असतांना मला दुःख कां होईल?

महादाजी—दुःख? दुःखाचें नांव देखील घेऊं नको. महादाजी शिंद्याला तुझ्यासारख्या प्रियकरणीस अन्नवस्त्र द्यावयास जड जाईल असें तुला वाटतें? ज्या तरवारीनें

हजारों मनुष्यांचा प्राण वांचविला, ती तुझें संरक्षण करणार नाहीं?

**लालन**—प्राणनाथ, सत्य आहे.

**महादाजीच्या** मनांत कांहीं विचार सुचून तो कांहीं सांगत होता; परंतु तितक्यांत तो थांबला. तेव्हां **लालन** विचारूं लागली "काय झालें प्राणनाथ? तुह्मीं कां थांबलां? मला न सांगण्यासारखा कोणता विषय आहे? तुह्मांकरितां मीं प्राणाचीही पर्वा केली नाहीं. तुह्मीं केवळ माझे प्राण असें मी समजतें. प्रसंग आला तर मी तुह्मांकरितां प्राण देण्यास तयार! आणि तुमच्या मनांत मजविषयीं संशय?"

**महादाजी**—(तिला आलिंगून) प्रिये, तें सांगण्यांत अर्थ नाहीं.

**लालन**—अर्थ असो किंवा नसो. सांगावयाचें आहे कीं नाहीं?

**महादाजी**—मी सांगणार होतों, ती गोष्ट सार्वजनिक आहे. तिचा अशा खाण्या-पिण्यांत व मौजेच्या वेळेस कांहींच संबंध नाहीं.

"तुमच्या मनांत काय असेल तें मला तर माहीत नाहीं. सांगा ना काय तें?" असें ह्मणून **महादाजीच्या** मानेवर हात टाकून आणि हनुवटी धरून व लडिवाळपणानें पायास हात लावून **लालन** पुनः ह्मणाली "माझी शपथ आहे. माझ्या गळ्याची शपथ आहे. मनांत जें तेंच सांगावयाचें बरें का?"

औदासीन्यानें अडखळत **महादाजी** ह्मणाला "मी तुझ्याशीं बोलत होतों; परंतु माझें चित्त लष्करी स्थिती-

कडे होतें. माझी तरवार माझें रक्षण करील कीं नाहीं? व तुझ्यापेक्षांही ज्यांचा मला विशेष संबंध, ज्यांनीं कधीं थंडी किंवा वारा पाहिला नाहीं, फार तर काय ज्यांचें सूर्यास देखील दर्शन नाहीं; अशा माझ्या बायकामुलांचें माझ्या हातून संरक्षण होईल किंवा नाहीं हें जगदीश जाणे. असे माझ्या मनांत विचार येत होते "

**महादाजींचें** भाषण ऐकतांच **लालन** उदास दिसूं लागली. तिच्या मनांतील शांति गेली. शिद्यावर भयंकर संकट आहे, असें ऐकतांच तिचा धीर खचला; आणि तिच्या अंतःकरणांत भीतीचा संचार झाला.

**लालन**—महाराज, असा कोणता आणीबाणीचा व जिवावरील प्रसंग आला आहे? लाखो शौर्यसंपन्न वीर हजारो, चपल पाणीदार घोडे, शेंकडो मदोन्मत्त हत्ती, शत्रु-संहारक बंदुका, विपक्षाची धुळधाण करणाऱ्या तोफा आणि दुष्टांचें रक्त प्राशन करण्यास उत्सुक शस्त्रास्त्रें कोणत्या शत्रूचा नाश करण्यास असमर्थ आहेत? तुह्मांस जय मिळणार नाहीं असा काळ आला किंवा झालें तरी काय? मनाची अशी निरुत्साही स्थिति कां? **मल्हारराव** होळकराचा आज पराजय झाला ह्मणून काय झालें? प्रातःकाळीं अफगाणछावणीवर परम भयंकर छापा त्यानींच घातला ना? तुह्मीं काल रात्रीं मैदानांतील लढाईंत जय मिळविला असें मी ऐकतें तें खरें का? त्या काळस्वरूप अमीरास पहिल्याच तडाक्यांत कोणी जमीनदोस्त केलें? आमच्या पाठलागावर असलेल्या शेंकडों पठाणांचा कोणी धुव्वा उडविला? हीं पराभवाचीं कीं जयाचीं चिन्हें?

**महादाजी**—( स्मित हास्य करून मस्तक हालवीत ) तें खरें; पण भाऊंच्या मताप्रमाणें आमचा जय नाहीं. खरोखरच पराजय आहे. बरें, इतकें होऊनही पुढें जय मिळतो कीं पराजय होतो ही शंकाच आहे.

**लालन**—ती कां? तुमचे सर्व लोक शूर, साहसी, निग्रही व चांगले योद्धे आहेत. शस्त्रास्त्रांची तयारी चांगली, घोडे उत्तम. तुमच्याकडे तोफाही पुष्कळ आणि माझ्या अंदाजाप्रमाणें तुमचें लष्कर दुराणी बादशहापेक्षां जास्त आहे. मग तुह्मांस कां जय मिळणार नाहीं?

**महादाजी**—आमचें लष्कर पाहिजे तसें हिंमतदार व चलाख आहे. आमचा सरंजाम पाहिजे तसा चांगला आहे. आणि आमचें सैन्यही अफगाणांस खाऊन टाकण्यासारखें आहे खरें; परंतु वैषम्य, वृथाभिमान, अनैक्य, द्वेषबुद्धि, स्वार्थ इत्याद्यनेक घातुक विकारांपुढें काय करणार? ह्या दुर्गुणांनींच आजपर्यंत आपल्या देशाचा सत्यानाश झाला; आणि पुढेंही तो धुळीस मिळण्यास हेच दुर्गुण कारणीभूत होणार. आपण हिंदुस्थानाचा संरक्षक अशी भाऊंस कीर्ति पाहिजे! आलमगिरानें हिंदु लोकांच्या पूज्य देवालयांत गो-हिंसा केली. त्याचें उसनें फेडण्याकरितां मशिदींत डुकर कापावयाचें, ही त्यांची मनीषा. त्यामुळें पुढें काय होईल हें जरी त्यांस दिसत असलें, तरी डोळ्यांवर कातडें ओढून अभिमानाखालींच चूर. पंजाबांतील व हिंदुस्थानांतील मुसलमान प्रथम त्या दुराणी कुत्र्यांचा धिःकार करीत होते; पण भाऊंच्या दुरभिमानामुळें व वेडगळ कृतीमुळें ते आज उलट आह्मांसच पाण्यांत पाहूं लागले आहेत. **हाफिजरहिमत**

व सुजाउद्दवला हे मराठ्यांचा स्नेह संपादून होते; पण दिल्लीचें तक्त गाळून टाकावयाचें व दिल्लीच्या बादशाही गादीवर विश्वासरावास बसवावयाचें अशा भाऊंच्या उद्देशामुळें तेही शत्रुपक्षास मिळाले. रजपूत लोक भाऊंच्या अशाच कर्मानें विथरले व ह्या कठिण प्रसंगीं आह्मांस सोडून गेले. भाऊ शेतकऱ्यांचा तिरस्कार करितात, ह्या निमित्त्यानें जाट लोकांचाही नकशा फिरला.

मल्हारराव फार चतुर व शूर आहे; परंतु महत्वाकांक्षी. त्याच्या मनांत इब्राहीमखानाविषयीं व पुणेकराविषयीं द्वेष उत्पन्न झाला आहे. त्याच्या युक्ति चांगल्या असतात, परंतु अंतरंग दूषित असल्यामुळें परिणाम चांगला न होतां भलताच गोंधळ माजून राहिला आहे. एखादें काम ढांसळलें ह्मणजे प्रत्येक अमीर-उमराव त्याचें अपयश दुसऱ्यावर लोटूं पहातो. एखाद्यानें चांगली कामगिरी बजाविली, तरी त्याचें यश भलत्यासच मिळतें. ह्यामुळें भाऊसाहेबांवर सर्वांचा रोष. पण भाऊ तरी काय करणार? ते कांहीं सर्वज्ञ परमेश्वर नव्हेत. समशेरबहादर आणि पुणेकर आह्मांविषयीं साशंक. उत्तरेकडील मोठमोठ्या सुभ्यांस स्वातंत्र्य पाहिजे व त्याकरितां ते हजारों प्रयत्न करितात; असा त्याचा पक्का समज. मल्हारराव आपल्या मनांत असें समजतो कीं, पुणेकराचीं, आमचीं व जनकोजीचीं सुजाउद्दवल्याकडे गुप्त कारस्थानें सुरू आहेत; आणि त्यांत आपलें नुकसान करावें असा सर्वांचा उद्देश आहे. जनकोजीचा संशय कीं, होळकर व नजीबउद्दवला यांचें आंतून सुत्र एक आहे भाऊसाहेबांस तर सर्वांचाच संशय. ह्यामुळें भाऊ फार मगरूर

व खराब सरदार आहे, असें सर्व समजतात. तिकडे सुजाउद्दवला आह्मांकडे व भाऊंकडे कारस्थानें करूं पहाणार. नजीबउद्दवला तर मल्हाररावाशीं कपट कसें रचतां येईल या विवंचनेंत निमग्न. नेहमी रणस्तंभाजवळ गुप्त कारस्थानें चालू आहेतच. तेव्हां मनास वाटेल त्यानें चाहेल तसें वागावें, असा जेथें सर्वच अव्यवस्थित व प्रपंची प्रकार तेथें जयाची आशा कशी करितां येईल?

**लालन**—नाथ, मुसलमानांतही जातीभेद व पुष्कळ पुढारी आहेत ना?

**महादाजी**—होय. पण ते मुसलमान. धर्मसंबंधानें त्यांची मजबुती चांगली. तुर्कराजा भाऊंपेक्षां चांगला आहे, असा अर्थ नाहीं. त्यास **सुजाउद्दवला** व **नजीबउद्दवला** ह्यांनीं मुद्दाम इकडे आणिलें. त्याचा सर्व विश्वास त्यांवर. त्यांच्या अनुमतानें तो वागतो. आमच्या **भाऊंनीं** त्यास अगदीं उच्छृंखल केलें. **मराठे** विजयी झाले तर आपलें कसें होईल! ही भीति त्याच्या छातींत वाढण्यास **भाऊच** कारण. कांहीं असो. आपले वृद्ध **बळवंतराव गणपत** ह्मणतात त्याप्रमाणेंच झालें पाहिजे. आतां एकदां जंगी लढाई करावी हाच आमचा सदुपाय. त्याशिवाय गत्यंतरच नाहीं. आणि तिही जितकी लौकर तितकी चांगली.

**लालन**—प्राणनाथ, ईश्वरीसत्ता बलवान आहे. प्रभूच्या मनांत असेल तसें तो करील. त्याच्या इच्छेनें रावाचा रंक आणि रंकाचा राव होईल. उगाच दुःख करून दिलगीर होणें अनुचित. आजची रात्र आह्मीं सौख्यांत आहों. जाते घटका हीच आनंदाची. उद्यांचें—

ठीक. मीं माझ्या प्रियकराबरोबर अत्यानंदानें मरावयास सिद्ध आहें.

**महादा०**—( दृढ आलिंगन देऊन ) प्रिये, जोंपर्यंत या **महादाजीच्या** हृदयांत प्राण आहे, तोंपर्यंत तुला भयाची वार्ता देखील ऐकावयास नको. पुढें जगदीश समर्थ.

---

## प्रकरण २१ वें.

### अव्यवस्था.

लढाई बंद असल्यामुळें **महादाजीस** सवड होती. तो **लालन**कडे असे. महिपतरावही तिचें पालन-पोषण काळजीनें आपल्या कन्येप्रमाणें करी. ह्यामुळें तिचे दिवस आनंदानें जात. **महादाजीवर** तिचें अपूर्व प्रेम होतें. **महादाजीसारख्या** नामांकित सरदाराचें **लालन** प्रीतिपात्र. राजेरजवाड्यांच्या स्त्रियांप्रमाणें तिची योग्यता. **लालन** रहात असे तो तंबू सौख्य-संपदेनें ओतप्रोत भरला होता; परंतु ज्यांना शत्रूंच्या भाल्यावर नाचावयाचें, तरवारीच्या जाज्वल्य धारेशीं लढावयाचें आणि गोळागोळीच्या अनिवार प्रळयामधून पार व्हावयाचें त्यांच्या जिवाची हुरहुर कशी चुकणार?

गेल्या लढाईनें मराठ-सेनेंत अनेक प्रकारच्या कल्पना चालू लागल्या. मुसलमान, मराठ्यांच्या तडाक्यांनीं मग़रूर झाले. **महादाजीनें** रात्रीं छापा घालून जय मिळविला; आणि **इब्राहीमखाना**च्या अनिवार मारानें शत्रूस मागें हटावें लागलें. **मल्हाररावाची** पिछेहट

झाल्यामुळें मुसलमानांप्रमाणें तेही विवंचनेंत होते. सारांश, दोन्ही सेना विचारलहरींत सांपडलेल्या. मराठे लोकांची तर जयाबद्दल निराशाच होत चालली होती. मुसलमानांसही वाटत असे कीं, द्वंद्वयुद्धांत किंवा मल्लयुद्धांत मराठ्यांनीं आपला पराभव केल्याप्रमाणेंच लहानसहान छाप्यांनीं किंवा हल्ल्यांनीं ते आपला सहज पराजय करणार नाहींत कशावरून? कसेंही असो. उभयपक्ष युद्धाच्या भावी परिणामाविषयीं साशंक होते.

अफगाण-सेनेचा विचार दुटप्पी होता; पण शेवटीं अहमदशहानें आपला दृढ विचार ठरविला. कारण, आपलें व मराठ्यांचें साहित्य आणि त्याचा भावी परिणाम तो समजून चुकला होता. त्यास त्याच्या मित्रत्वांतील व शत्रुत्वांतील पुष्कळ लोकांनीं अनेक मसलती व हकीगती सांगितल्या; तरी "सबका सुन्ना और दिलका करना" ह्याच नियमाप्रमाणें वागावयाचें, असा त्याचा पक्का निश्चय ठरला.

सार्वत्रिक स्थितीचा अंमल मराठ्यांवरही चांगलाच बसला. मल्हाररावाचा पराभव झाल्यामुळें त्याचें मन विरस झालें; पण त्याच्या योगानें शिंदा, पुणेकर व इब्राहीमखान ह्यांस बरें वाटलें.

हा प्रकार कसाही असो; परंतु इतिहासदृष्टीनें विचार केला तर अशी स्थिति असणें केव्हांही चांगलें नव्हे. मल्हारराव ज्या संकटावस्थेंत पडला होता तींतून पारपडणें फार कठीण होतें. "आपण योजलेल्या युक्तीनें विजय प्राप्त होण्याची आशा सफाई व्यर्थ" असें त्यासह्गो वाटे खरें; तथापि अविचार मनांत न आणितां किंवा

मत्सरबुद्धीच्या स्वाधीन न होतां त्यानें धिमेपणा धारिला असता, तर दुष्ट प्रसंग खचीत टळला असता; पण तें व्हावें कसें ?

समशेरबहाद्दराच्या मतास विश्वासरावानें व शिंद्यानें अनुमत दिलें; परंतु भाऊसाहेब, इब्राहीमखान व बळवंतराव गणपत मेंडळे हे शत्रूवर एकदम हल्ला करण्याच्या मसलतीस प्रतिकूळ. सूरजमल्ल जाट निघून जाण्यास व सुजाउद्दवल्याची गैरमर्जी व्हावयास, तेंच कारण, असें कित्येकांचें ह्मणणें आहे. कांहीं कां असेना; परंतु परस्परांत चुरस येण्यास व एका विरुद्ध दुसऱ्यानें, दुसऱ्या विरुद्ध तिसऱ्यानें, अशा प्रकारचे लफडेखोर डावपेंच सुरू होण्यास आपसांतील वैमनस्य, वृथाभिमान, अहंकार अशीं निरनिराळीं कारणें होतीं. प्रत्येकाचे स्नेही निरनिराळे. ते पहावें तेव्हां छावणींत आहेतच. त्यांत कित्येक प्रामाणिक व कित्येक कपटी असत. सुजाउद्दवला सर्वांचा स्नेही—जगन्मित्र. त्याचें भाऊसाहेबाकडे, इतर सरदारांकडे, अफगाण अमीरउमरावांकडे व स्वतः अहमदशहाकडे देखील सूत्र चालू होतें. आपला स्वार्थ कसा साधेल, हाच त्याचा प्रबल विचार. ज्याचा जय होईल, त्याकडून कांहीं ना कांहीं मिळविण्याकरितां त्याची सारी खटपट. गेल्या लढाईत मराठ्यांचा जय व मुसलमानांचा पराजय, असा प्रकार झाल्यामुळें मराठ्यांशीं अहमदशहानें तह करावा, अशा अर्थाचीं त्यांचीं बोलणीं सुरू झालीं होतींच. बरें; अशा दगलबाज, बेइमान, विश्वासघातक्याशीं संबंध देखील ठेवूं नये, किंवा त्याचें मुखावलोकनही करूं नये, तर शिंद्याच्या व भा-

ऊसाहेबाच्या कुटुंबाचें सरंक्षण त्याचे हातांत. तेव्हां त्याशीं गोडीगुलाबी ह्मणा किंवा खरें सख्य ह्मणा ठेवणें प्राप्त. भाऊसाहेबाचा त्यावर पुरा विश्वास. कारण, तो ज्या मसलती सांगे व व्यूह रची, त्यामुळें तो आपल्या पक्षास खचित येऊन मिळेल, असें भाऊसाहेबास वाटत होतें.

मल्हाररावाच्या खासगींतही अशी एक व्यक्ति होती. पण ती लखनौच्या सुभ्यापेक्षां कांहीं बरी. "दगडापेक्षां वीट मऊ" ही व्यक्ति नजीबउद्दवला. शिंद्याशीं त्याचें वैषम्य; आणि शिंद्याशीं बेबनाव होण्यास होळकराचें सख्य हेंच कारण. मल्हारराव बिथरला कीं नजीबउद्दवला बिघडला. तिकडे बादशहाच्या मसलतींतही नजीबउद्दवला मुख्य होताच.

"नजीबउद्दवला व सुजाउद्दवला ह्यांच्या विरुद्ध लागेल ती मदत करूं" असें शिंद्यानें हाफीजरहिमत यास वचन दिलें. तेव्हां "मल्हाररावाचा नाद सोडून भाऊसाहेबांस मिळावयाचें" असा त्याचा विचार ठरला. इतकें झाल्यावर शिंद्यानें "नारो शंकर व विंचुरकर दिल्लीहून खोराकी सामान आणित आहेत, सूरजमल्ल जाट मराठ्यांस सामील होऊन दुराणीशीं युद्ध करण्यास निघाला; आणि रजपूत सरदारांनीं हिंदु लष्कराच्या मदतीस येण्याचें अभिवचन दिलें." अशा अनेक कंड्या पिकविल्या.

ही सर्व मसलत लष्करानें स्वस्थ रहावें, कांहीं गडबड करूं नये, इतक्याकरितांच होती. दिवसामागून दिवस जाऊं लागले. आज सुजाउद्दवला अहमदशहास सोडून येईल, उद्यां हाफीजरहिमतकडून मदत मिळेल,

आज खोराकी सामान येणार, उद्यां लष्कर येणार, आज रजपूत सरदार निघाले असतील, उद्यां आपली जय्यत तयारी होईल, असें आज उद्यां करितां करितां छावणींत दुष्काळाचा अंमल बसला. लोकांस अन्न मिळण्याची मारामार होऊं लागली. हत्ती-घोड्यांच्या चंदी-वैरणीची पंचाईत, तेथें उंटांचा आणि गाडी-बैलांचा विचार करितो कोण? सरदारांस अन्न नाहीं, मग शिपायांची कथा काय? कित्येकांनीं पानिपत गांव अन्नाकरितां लुटलें; पण त्यापासून लाखों लोकांचा निर्वाह होणार कसा? तेव्हां सर्व लोक भाऊवर उठले. अन्न द्या, नाहींतर लढाई करून मरावयाचा तरी हुकूम करा, असें बहुतेक लोक ह्मणूं लागले. भाऊ अजूनही लखनौच्या सुभ्याबरोबर खलबत करीत होते. तसें नसतें तर त्यांनीं 'लढाई करा' अशी केव्हांच आज्ञा दिली असती. "आतां अन्नाविणें तळमळत मरण्यापेक्षां धारातीर्थी लढतां लढतां मेलेलें चांगलें," असे लाखों लोकांचे उद्गार निघूं लागले. ते भाऊच्या कानीं गेले, तरी खलबतांतून तो मोकळा होईना. त्याचें नेहमीं नवीन कारस्थान! लढाईचा प्रसंग लांबणीवर पडेल तितकें चांगलें; आज दिवस दुःखांत गेला; उद्यांचा तरी सुखाचा उगवेल; वाईट होतें तें चांगल्या करितां; अशा प्रकारच्या अनेक आशातरंगांत तो तरंगत होता.

पूर्ण भरलेल्या भांड्यांत आणखी पाणी ओतावयाचें, तें बाहेर पडून नाश व्हावा इतक्याकरितांच. बळवंतराव, "एकदां जंगी लढाई झाली पाहिजे, आणि ती लौकर होईल तर चांगलें" असें पूर्वीपासून ह्मणतच होता. त्यानें

आपल्या जासुदाकडून असें वर्तमान ऐकिलें कीं, तारीख २३ डिसेंबर रोजीं बादशहा मशिदींत निमाज पढावयास जाणार. बळवंतरावास इतकें वृत्त समजतांच, तो भाऊसाहेबाकडे आला आणि त्यानें आपसांत मसलत करून असें ठरविलें कीं, ही संधि आमच्या सुदैवानें फुकटची चालून आली आहे; तर आपण त्याच दिवशीं बादशहावर हल्ला करावा. भाऊसाहेब, विश्वासराव, बळवंतराव व होळकर ह्यांनीं आपल्या तयारीनें निघावें ह्मणजे झालें.

ठरावाप्रमाणें सर्व व्यवस्था झाली. विरुद्ध पक्षाची तयारी होतीच. ह्या धमकावणीचा परिणाम जंगी लढाई होऊन त्यांत काय तो निकाल होईल, असा सर्वांचा समज होता. परंतु, मराठे लोक युद्धक्षेत्रापासून फार दूर होते. इतक्यांत नजीबउद्दवला वजीराच्या मदतीस धांवला. त्यानें बळवंतरावास जखमी केलें. अफगाणांनीं मराठ्यांस हांकून लावून त्यांच्या तोफा घेतल्या. अखेरीस " त्वरा तितकी चांगली " या जुन्या लढवय्यांच्या सूत्राचें पर्यवसान " उतावळीनें केलेलें काम कच्चें होतें " असें होऊन ज्याचा त्याला चांगलाच अनुभव आला. असें होतांच झाल्या गोष्टीचा पश्चात्ताप करीत भाऊसाहेब पुनः विचारांत निमग्न झाला.

दहा दिवसांनंतर हलक्या दर्जाच्या शिपायांनीं व दुसऱ्या कित्येक लोकांनीं रात्रीच्या वेळीं आपल्या छावणींतून अफगाण-छावणीच्या बाजूनें जावें, असा विचार केला. त्यांचा तो विचार एका अर्थानें सयुक्तिक होता. कारण, दुःखनिर्मुक्त व्हावयाचा तो सोपा मार्ग. पण,

" मन चिंती एक व दैव चिंती निराळेंच " अशी त्या बिचाऱ्यांची अवस्था झाली. त्यांतील बहुतेकांस अफगाणांनीं पकडिलें आणि कापून काढिलें.

भाऊ आपल्या तंबूंत बायकांबरोबर बोलत बसला होता. त्यानें पळून जाणाऱ्या लोकांच्या स्त्रियांचा कल्पांत ऐकिला. त्या ओरडत, किंकाळत, भाऊच्या तंबूजवळ आल्या; आणि त्यांनीं रडून, ओरडून दाही दिशा एकत्र करून टाकिल्या. शिपायानें त्यांस तेथून वाटेस लाविलें. इतक्यांत भाऊच्या नांवानें अन्नाकरितां ओरड करीत कित्येक लोक आले. ते मोठमोठ्यानें ओरडून ह्मणाले " भाऊसाहेब, बाहेर या. बाहेर या महाराज! मुलांबाळांबरोबर बसून गुलगुल गोष्टी सांगण्याचा हा वेळ नव्हे. आह्मी मनुष्य आहों किं पशु? आह्मांला असे मारूं नका. शत्रूंवर चाल करून जावयास आज्ञा द्या. मरतां मरतां आह्मांस शत्रूंच्या नरडीचा घोंट घेऊं द्या. " जय कालीका भवानी " जगदंबेला मनुष्याच्या रक्ताची इच्छा झाली आहे. आणि स्वर्गांतील अप्सरा आपल्या प्रियांची मार्गप्रतीक्षा करीत आहेत. केशरीकरा. पुढें जगदीश समर्थ आहे. "

तें ऐकतांच भाऊ तंबूच्या दरवाजांत आला त्यानें आपल्या एका नोकरास जवळ बोलावून सांगितलें, " महादाजीस बोलाव. "

# प्रकरण २२ वें.

## भाऊसाहेबाची मसलत.

भाऊसाहेबाचा जासूद महादाजी शिंद्याकडे गेला. तेव्हां तो लालनबरोबर महिपतरावाच्या तंबूंत बोलत होता. भाऊसाहेबाचा संदेश त्यास समजतांच तो तेथून उठला व आपल्या डेऱ्यांत जाऊन लढाऊ पोषाख करून घोड्यावर स्वार होऊन पेशव्याकडे निघाला.

महादाजी भाऊसाहेबाच्या तंबूजवळ येतांच त्यास फार आश्चर्य वाटलें. कारण, भाऊ आपल्या खासगी तंबूंत एकटाच होता. त्याच्याजवळ दुसरें कोणीच नव्हतें. त्यावरून महादाजीनें सहज तर्क केला कीं, मला एकट्यालाच बोलाविलें असावें. भाऊ रुप्याच्या पलंगावर बसला होता. त्याचा चढ़सारा अभिमान, त्याचा निरुपम उत्साह आणि त्याची असामान्य वीरश्री नाहींशी झाली, असें त्याची मुखश्रीच सांगत होती. एखाद्या महत्संकटांत निमग्न झाल्याप्रमाणें तो उदास व सौम्य दिसूं लागला. "काय करूं, कसें करूं" ह्या अष्टाक्षरी मंत्राचा जप व तळमळ चालली होती. त्याच्या मस्तकावर पागोटें किंवा फेटा नव्हता. त्याची साध्वी स्त्री, बहीण व इतर लहान बालकें त्याच तंबूंत इकडे तिकडे फिरत होतीं. त्यांची स्थितिही परम भयानक दिसत होती. न जाणो, एखाद्या महत्संकटांत भाग घ्यावयास तर तीं एकत्र जमलीं नाहींत ना? असें त्यांस पहातांच वाटे.

त्यांस औदासीन्यांत गर्क पहातांच महादाजीनें आपल्या चाणाक्षपणावरून भावी तर्क तेव्हांच केला. भाऊ-

नें आपली आशा, संतोष व दुराग्रह सोडून तंबूबाहेर जे लोक हलकल्लोळ करीत होते, त्यांची स्थीरस्थावरता कशी करावी, हा विचार चालविला होता. दैवाची गति परम गहन आहे! नाहींतर, ज्या भाऊसाहेबानें मोठमोठ्या लढायांत जय संपादन केला, ज्यानें कधीं शत्रूस पाठ दाखविली नाहीं, इतके दिवस मरण किंवा जय अशा आशेवर जो वांचलेला, नेहमीं लढाईच करावयाची असा ज्याचा हिय्या, हिंदुस्थानची बादशाही करावी असी ज्याच्या मनाची उमेद, रूमशामचें राज्य खालसा करावयाचें ही ज्याची बलवत्तर इच्छा, विश्वासु, चतुर, शूर, वीर, तरवार-बहाद्दर असे अनेक पुरुष ज्याच्या तैनातींत हात जोडून तयार, जावें त्या लढाईत ज्यानें विजयी व्हावें, ज्याच्या धाकदराऱ्यानें अवघें भरतखंड थरकांप भीत असे, ज्यानें आपल्या बाहु-बल-प्रतापानें अनेक शत्रूंस धूळ चारिली त्या भाऊसाहेबावर हतवीर्य होऊन विचार करीत बसण्याचा प्रसंग यावा काय!! पुढें काय करावें हें त्यास सुचूं नये, आणि सुचलें तरी त्याचा उपयोग होऊं नये, हा नशीबाचा विचित्र खेळ नव्हे तर काय! मराठ्यांचीं बायका-पोरें, धन-दौलत वगैरे सर्व भानगडी बरोबर होत्या. पराजय झाला, तर सर्व नाश होण्याचा संभव. पळून जावें, तर शत्रु दारांत उभे. जिवंत जावयास मार्ग नाहींच. जावें तर मस्तक ठेवावें, आणि लागेल तिकडे जावें, अशी दशा!!! मराठ्यांचा पराभव झाला, तर पुन्हां हिंदुस्थानांत तोंड दाखवावयास जागा नाहीं, हें महादाजी पक्कें समजून होता. या पराभवाचा अर्थ आपल्या सर्वांच्या कीर्तीचा व राज्याचा नाश

व जयाचा अर्थ हरिद्वारापासून रामनाथ व सिंध प्रांतापासून सिलहट पर्यंत राज्यप्राप्ति इतकाच होता. आणि त्यास दीनावधीही मुळींच नव्हती. उदयीक सूर्य अस्तास जाण्याचे पूर्वीच काय तो निकाल!

महादाजीनें भाऊसाहेबास लवून वंदन केलें, तेव्हां तो ह्मणाला "इकडे या महादाजी, असे माझ्या जवळ बसा. हा समय राजदरबारची रीति किंवा आदब बजावण्याचा नव्हे. जवळ बसा, आणि एक खरा मित्र आपल्या खऱ्या मित्राशीं निर्मळ अंतःकरणानें जसा बोलतो, तसें मीं विचारतों तें सांगा.

"मी आपला आज्ञाधारक सेवक आहें" असें ह्मणून शिंदा पलंगाच्या एका टोंकास बसून भाऊसाहेब काय सांगतो तें लक्षपूर्वक ऐकूं लागला.

भाऊनें कांहीं वेळ विचार केला. ह्यावरून पुढें काय सांगावयाचें त्याची जुळणी तो करीत होता, असें दिसलें. सर्व मजकूर ध्यानांत येतांच, भाऊसाहेब ह्मणाला "महादाजी, तुह्मीं निस्पृहतेनें तुमचा विचार सत्य समजून सांगाल, अशी मला पूर्ण आशा आहे. परंतु, प्रसंगावर दृष्टि देऊन माझ्या मनाचें समाधान करण्याकरितां खोटें सांगावें किंवा वेळ मारून नेण्याकरितां हांजी हांजी करावें असें तुह्मीं मनांत आणाल, तर तुह्मांस गाई-ब्राह्मणांची व तुमच्या कुलस्वामीची शपथ आहे. एक लक्ष गाई व ब्राह्मण यांस ठार मारण्याचें जें महत्पाप, तें तुह्मी एक शब्द खोटा सांगाल तर तुह्मांस भोगावें लागेल. आतां मला खुशामत नको, किंवा माझ्या विचारांस पुष्टी देण्याचेंही कांहीं कारण नाहीं. तुमच्या मनास जें

सत्य वाटत असेल, तेंच मला पाहिजे. महाराजी, प्रत्येकाच्या मनांत अशी एक सखोल जागा असते कीं, तेथील विचार ज्याचे त्यालाच माहीत असतात. ते स्वतः उघड केल्याशिवाय दुसऱ्यास समजत नाहींत. ती जागा तुह्मीं आतां खुली करा आणि काय तें सांगा. आतां माझें शहाणपण गेलें, माझा सर्व विश्वास गेला, मला फक्त दुसऱ्याच्या खऱ्या सल्ल्याची अत्यावश्यकता आहे. विश्वासराव बालक आहे. तो नानासाहेब व गोपिकाबाई त्यांच्या प्राणांचा प्राण आहे. त्यास ते मजबरोबर पाठविण्यास राजी नव्हते. परंतु, माझ्या अत्याग्रहास्तव त्यांनीं त्यास पाठविलें; आणि तोही माझ्या ममतेमुळें किंवा मानसिक उत्साहानें आह्मांबरोबर आला. आतां तूर्त कसा दुर्घट प्रसंग आला आहे, तो तुह्मीं पहात आहांच. समशेरबहादर तर वांकडा. इब्राहीमखान एक सरदारगडी आहे; पण, गोळ्यांची बहार उडवावी इतकेंच त्याला माहीत राजकीय भानगडींत त्याचें लक्ष नाहीं, आणि त्यांत त्याला कांहीं समजतही नाहीं. गणपतराव तर गेलाच बिचारा! आणि असता, तरी त्याच्या अंगातही तलवारबहाद्दरपणाच होता. मेंदूची शक्ति कमीच. दामाजी फक्त आपल्या पोटापुरता लभ्यांश पहात आहे. पवार तर माझ्यापेक्षां घरांत बसून रहाणें विशेष पसंत करितो. बाकीचे कित्येक ब्राह्मण निव्वळ भ्याड आहेत! त्यांच्या आंगीं पौरुषास जे गुण अत्यावश्य त्यांतील एकाचाही गंध वसत नाहीं. मल्हारराव काळतोंड्या—विश्वासपात्र नव्हे. इतक्याकरितांच मीं मुद्दाम तुह्मांस बोलाविलें. तुमचा सुजाउद्दवल्याच्या वचनावर

विश्वास आहे कीं कसें? महादाजी, मी तुह्माला स्पष्ट विचारतों, तो आपला मित्र आहे कीं शत्रु ?"

महादाजीला शपथ घातल्यामुळें विचार करून उत्तर देण्यास थोडासा विलंब लागला. तो ह्मणाला "सुजाउद्दवला आपल्याशीं मित्रत्वाच्या नात्यानें वागतो व तो अफगाणांपेक्षां आह्मांस विशेष चहातो हें खरें; पण स्वतांस इजा होऊं न देतां, झाल्यास आह्मांस मदत करण्यास तो राजी असेल, असा माझा समज आहे. तो अहमदशहाशीं किंवा रोहिल्यांशीं मनाच्या खऱ्या प्रेमानें वागत नाहीं असें मला वाटतें. कदाचित् तो माझा समज चुकीचा असेल. कारण, मनुष्यमात्र चुकीला पात्रच आहे. माझ्या ध्यानांत तुमच्या सर्व शपथा आहेत. तुमची सर्व पूर्वीची व हल्लींची स्थिति मी पहात आहें व भावी परिणामही मला दिसत आहे. तुह्मीं त्याला वजीरीची जी आशा लाविली, ती ठीकच आहे; परंतु, तूर्तच्या स्थितींत त्याकडून कोणत्याही प्रकारच्या मदतीची आशा करणें व्यर्थ आहे असें माझ्या बुद्धीला वाटतें.

भाऊ—असें कां? त्याच्या आचरणावरून तर तसें दिसत नाहीं!

महादाजी—दिसो किंवा न दिसो; त्याविषयीं मी कांहीच सांगत नाहीं. तो मुसलमानी धर्माच्या लोकांस सोडून हिंदु लोकांस मिळावयाची वासना कदापि धरणार नाहीं, आणि कदाचित् कर्मधर्मसंयोगानें तो जरी आह्मांस सामील झाला, तरी केवळ एकटा. त्याचे शिपाई त्याबरोबर प्राण गेला तरी आह्मांकडे येणार नाहींत! ते त्याला सोडतील किंवा हटकून फशीं पाडतील.

भाऊ—बरें; पुढें कसें? एकेका प्रकरणाचा निकाल करा. मागें पुढें नको.

महादाजी—महाराज, तुह्मीं मला नाहीं नाहीं त्या शपथा घातल्या, ह्मणून मला सत्य सांगणें भाग पडलें. रागाऊं नका. मी सांगतों त्याचा शांत मनानें विचार करून खऱ्याखोट्याचा निर्णय करा.

भाऊ—चालूं द्या. मीं तुह्मांला प्रारंभींच सांगितले ना? आतां मला राग नाहीं. तुह्मीं कांहींही बोला. मी रागावणार नाहीं. मी रागावत नाहीं, असें तुह्मांला त्रिवार वचन देतों. बोला; तुह्मांला सदर परवानगी आहे.

महादाजी—महाराज, तुह्मीं हिंदुस्थानांत काय प्रसिद्ध केलें आहे, त्याचा विचार करा. लाल किल्ला लुटला; विश्वासरावास दिल्लीच्या बादशाही तक्तावर बसाविलें; असें एक कीं दोन? मग तुह्मीं, मुसलमान लोक आह्मांस मदत करतील, ही मृगजलवत् आशा कशी बरें करितां? सुजाउद्दवल्याचा बादशहापेक्षां आह्मांकडे ओढा विशेष आहे त्याचें कारण केवळ वजीरीची लालूच. परंतु, अफगाणांचा पराभव झाल्यास तुह्मीं आपलें वचन मोडणार नाहीं व हिंदु बादशहास हिंदु वजीर नेमणार नाहीं, असा त्याला पक्का विश्वास लागावा तरी कसा? तेव्हां मला तर वाटतें कीं, त्याची वजीरी मिळविण्याची आणि तुह्मांस मुसलमानांकडून मदत मिळण्याची ह्या दोन्ही आशा व्यर्थ आहेत. मग त्यानें आह्मांस काय ह्मणून सहाय करावें? आणि आह्मी तरी त्याच्या मदतीची आशा धरून अर्थ काय? 'मनोमन ईश्वर साक्ष' ह्या गोष्टी दुसऱ्यानें बोलून दाखविण्यांत मजा नाहीं.

याप्रमाणें निस्पृहतेनें ज्याची चूक त्याच्या पदरांत घालतांच भाऊचे नेत्र उघडले, आणि त्याच्या छातींत धस्स झालें. तो ह्मणाला, " तर मग त्याकडून आह्मांस मदत मिळेल, ही आशा व्यर्थच ! "

**महादाजी**—हें मजसारख्या बरवर बुद्धीच्यां मनुष्यास देखील समजतें. तो अफगाणांशीं विरुद्ध व तुह्मांला सामील ही गोष्ट कधींही होणार नाहीं. आधीं त्यानें आपल्या लोकांस तुमच्या मदतीस पाठविणें हें दुरापास्त. बरें; यदाकदाचित् तसें झालें, तरी त्यानें पाठविलेले लोक त्याची आज्ञा प्राण गेला तरी मान्य करणार नाहींत, हें मी खात्रीनें सांगतों.

**भाऊ**—तो नेहमीं कांहींना कांहीं युक्ति सांगतो व वारंवार जीं नवीन वचनें देतो, तीं सर्व निरर्थकच ह्मणावयाचीं तर? रावसाहेब, त्यांत कांहींच अर्थ नाहीं ? बरें; पण, असें करण्यांत त्याचा हेतु तरी काय असेल?

**महादाजी**—सरकार, हा सारा वेळ काढण्याचा प्रकार. अशा ठकवाठकवींत काडीइतका लाभ नाहीं. अहमदशहा ह्या सर्व गोष्टी समजून आहे. सुजाउद्दवला अफगाणांपेक्षां मराठ्यांस फार चहातो, तो आमचा मित्र आहे. प्रसंगीं तो आपल्या उपयोगीं पडावयाचा नाहीं, अशी त्याची बालंबाल खात्री झाली आहे. तुह्मीं त्याला कमी समजूं नका. सुजाउद्दवला गोड गोड बोलून जसा आह्मांस दूर पहातो, किंवा आह्मांपासून दूर दूर रहातो, तसाच अहमदशहा त्याशीं तोंडानें मात्र गोड. दोघेही अघळ-पघळ बोलतात; पण, तें भाषण केवळ

अन्न पचनार्थ. तो संबंध सर्व बोलण्यापुरताच. आंतून तो त्याला ओळखून आहे.

**भाऊ**—बरें; तुम्ही अशी कल्पना करा कीं, लढाई झाली आणि त्यांत आमचा पराजय झाला, तर आम्हांकरितां नव्हे, परंतु (बायका-मुलांकडे हात दाखवून) ह्यांच्याकरितां तरी तो कांहीं मदत करण्याचें मनांत आणणार नाहीं काय?

**महादाजी**—भाऊसाहेब, तो रामराज्य करण्याचें मनांत आणील; परंतु हातानें झालें पाहिजे ना?

**भाऊ**—तर मग, त्याच्या हातानें आम्हांस किंवा आमच्या कुटुंबांतील मनुष्यांस मदत व्हावयाची नाहीं, असा तुमचा सिद्धांत?

**महादाजी**—असेंच केवळ नव्हे. तो काय करील, तें खरें एक जगदीश जाणत असेल! परंतु, मला वाटतें तें मी सांगतों. एखादा बिथरलेला मुसलमान एखाद्या हिंदूचें जितकें चांगलें करील, तितकेंच सुजाउद्दवल्याच्या हातून व्हावयाचें! शत्रूच्या छावणींत आमचे पुष्कळ स्नेही आहेत, तुमचे सुभे आहेत, आमचा हाफिजरहिमत आहे, व होळकरांचा नजीबउद्दवला आहे. पण, प्रसंग आला असतां ते आम्हांला कितपत उपयोगीं पडतील आणि कितपत नाहीं, हें कांहींच सांगतां येत नाहीं. तेव्हां आम्हांला दैवावर व जगदीशावर विश्वास ठेवून राहिलें पाहिजे. तो काय कृपा करील ती खरी. त्याशिवाय इतरांची आशा फुकट.

(भाऊनें मस्तक हातावर ठेवून दीर्घश्वास सोडिला.)

पार्वती—( भाऊसाहेब चिंताकुल झालेले पाहून विनयानें ) हें काय! प्रसंग बेतल्यावर दुःख काय कामाचें? सावधपणें विचार करा. आम्हां स्त्रियांमुळें व मुलां-लेंकरां-मुळें तुम्हांस त्रास किंवा अडचण होत असेल, तर तुम्ही केशरी करा आणि आम्हांस जोहार करण्याची आज्ञा द्या. इतक्या संकटांत कां पडतां?

'जोहार' हे शब्द ऐकतांच महादाजी अस्वस्थ झाला. कारण, जोहाराचा प्रसंग येईल, तर आपल्या बायकां-मुलांस मुकाट्यानें कापून काढणें किंवा अग्नीच्या स्वाधीन करणें भाग पडणार, असें त्याच्या मनांत आलें.

सदाशीवराव दुःखातिशयानें मान खालीं घालून बसला होता. त्यानें एकदम वर पाहिलें आणि म्हटलें "अग, येथें जोहार करितां येत नाहीं."

पार्वतीबाई—तो कां? रजपूत लोक हिंदु आहेत; केवळ क्षत्रिय असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांच्या स्त्रिया बेधडक जोहार करितात, मग आम्हां ब्राह्मण-स्त्रियांस कोणता व्यत्यय आहे? आम्हींच हातांत कांकणें भरलीं आहेत आणि त्यांनीं वज्रचुडे भरले आहेत कीं काय? स्त्रिया तथून सर्व सारख्या. तुमच्या मागें जिवंत रहावें आणि काळतोंड करून माघारें जावें, त्यापेक्षां कृपा करून आज्ञा द्याल तर आम्हांवर महत् उपकार होतील.

भाऊ—दक्षणी लोकांत जोहाराची पद्धत नाहीं. आमचा पराजय होईल आणि तुमचें रक्षण आमच्या हातून होत नाहीं अशी वेळ येईल, तेव्हां तुमचें दैव तुमचें संरक्षण करील.

पार्वतीबाई—आम्ही, आमचें, आमच्या अबरूचें आणि आमच्या मुलां-बाळांचें संरक्षण करावयास तयार असून दैवाची प्रतिष्ठा कां सांगणें होत आहे, हें समजत नाहीं! आम्हीं जोहार केला ह्मणजे आमच्या पातिव्रत्य कीर्तीचें रक्षण झालें, व तुह्मांला निर्धास्तपणें लढाई करून विजय मिळविण्यास साधन झालें. एका कार्यांत दोन कामें सहज होतील. आमची काय दशा होईल, हा विचारसुद्धां मनांत आणावयास नको. माझ्या अल्प बुद्धीस जें वाटलें, तें मीं सांगितलें. अशा संकटसमयीं माझें अबलेचें ऐकणें होईल, तर मात्र आमचें व आपलें संरक्षण झाल्यासारखें होईल. आणि आपलाच हेका खरा करावयाचा असेल, तर निरुपाय!

भाऊ—बरें आहे. त्याचा विचार पुढें पाहूं. तूं आंत जा.

पतिव्रता पार्वती नाइलाजामुळें रडत दुसऱ्या तंबूंत गेली. कारण, तिचें धारिष्टपणाचें सांगणें भाऊसाहेबानें अमान्य केलें.

भाऊ—महादाजी, मला आणखी एक गोष्ट सांगावयाची आहे. आणखी एका युक्तीचा अनुभव पहावयाचा आहे. पुनः सुजाउद्दवल्यास पत्र पाठवावें असें मला वाटतें. पण, त्याकडे पाठविण्यासारखा विश्वासु मनुष्य मजकडे तर कोणीच नाहीं. मला असा एक विश्वासु गृहस्थ पाहिजे आहे कीं, तो माझ्या नांवावर नव्हे, पण आपल्या हुपारीनें सुजाउद्दवल्याकडून जबाब आणील. अशा आणीबाणीच्या वेळीं नोकर लोकांचा मुळींच विश्वास धरितां कामा नये. तो लबाड काशीराय आमच्या

गोष्टी मुजाउद्दवल्यास उलट्या सांगतो, किंवा त्यानें त्या नाकबूल कराव्या अशा रीतीनें समजावितो, देव जाणे! कोण मिळेल बरें विश्वासु मनुष्य?

**महादाजी**—( किंचित् विचार करून ) जावें, तर मीं. त्याशिवाय माझ्या विश्वासाचा तरी असा कोण आहे?

**भाऊ**—छीः छीः तें बरें नव्हे. तुह्मीं जाणें फारच नाशकारक.

**महादाजी**—महाराज, मी वेष बदलून गेलों, तर चालेल कीं नाहीं?

**भाऊ**—तुह्मी वेषांतर करण्यांत फार कुशल आहां. सुजाउद्दवल्याचा आणि तुमचा चांगला परिचय असला, तरी तो तुह्मांस ओळखणार नाहीं. परंतु, त्या दुष्ट नजीबउद्दवल्याच्या सपाट्यांत तुमचा बचाव व्हावयाचा नाहीं!

**महादाजी**—तो काय ओळखतो? आज्ञा होत असेल, तर तयारी करितों.

**भाऊ**—आणि तुह्मांशिवाय मी लढाई कोणाच्या अवसानावर करूं?

**महादाजी** मनांतल्या मनांत कांहीं आकास्मिक विचार सुचल्यामुळें ह्मणाला " समर्थीं " पुनः त्यानें आपली जीभ चावली आणि बोलणें बंद केलें.

**भाऊ**—कां महादाजी, तुह्मी काय सांगत होतां तें स्पष्ट सांगा. संकोच नको.

**महादाजी**—परशुराम अवतार, मनांत आलें तें मी बडबडत होतों; पण त्यांत कांहीं अर्थ नाहीं.

**भाऊ**—नाहीं नाहीं. तुह्मी खरोखर मला फसवूं पहातां. तुमच्या मनांत कोणी तरी विश्वासु मनुष्य सुचला आहे. पण, त्यास पाठवूं नये किंवा पाठविणें चांगलें नव्हे, असें वाटून तुह्मीं आपल्या भाषणाचा रोंख बदलला असें दिसतें.

**महादाजी**—तें उगीच महाराज, जरी कांहीं मनांत आलें, तरी तें असंभवनीय!

**भाऊ**—( आग्रहानें ) वा! तें कसें असलें तरी मला सांगावयास कां संकोच? नाहीं नाहीं. सांगितलेंच पाहिजे.

**महादाजी**—कांहीं नाहीं, रावसाहेब. त्यांत सांगण्यासारखा तथ्यांश नाहीं. कोणत्याच बाजूनें हांसल नाहीं.

**भाऊ**—तुह्मांला तुमच्या पित्याची शपथ. तुह्मी मला फसवाल, तर कलियुगाचें अवघें पाप तुमच्या मस्तकीं पडेल. बोला. खरा हेतु सांगा.

पातकाच्या भीतीनें **महादाजीस** खरें सांगणें भाग पडलें. तो ह्मणाला " महाराज, एक हलक्या जातीची बेवकूफ अबला स्त्री, माझ्या प्रेमानें खानदेशांतून इकडे आली आहे. ती मात्र मजकरितां काय पाहिजे तें करण्यास तयार आहे. मला फसविण्यापेक्षां किंवा खोटें सांगण्यापेक्षां मरणें बरें, असें ती समजते. तिला पाठवावें असा मला प्रथम विचार सुचला; परंतु त्यांत कांहीं अर्थ नाहीं असें नंतर वाटलें. कारण, ती फार भित्री आहे. तशांत स्त्री जात! तेव्हां तिच्या हिंमतीविषयीं तरी कोणी खात्री धरावी?

**भाऊ—महादाजी**, ती खानदेशांतून तुमच्या मागून आली? तर मग, ती डगमगणारी नसेल. पुष्कळ अनुभव येऊन ती शहाणी व चतुर झालेली असेल. ती जातीनें कोण?

**महादाजी—भाऊसाहेब**, ती जातीनें वैरागीण.

**भाऊ**—तेंही चांगलेंच. ते लोक, फार चलाख व हुषार असतात. बरें; तिचें वय?

**महादाजी**—सुमारें सोळा वर्षांचें.

**भाऊ**—वाः हेंही उत्तमच. तिलाच पुरुषवेष द्यावा, ह्मणजे झालें. ती सुंदर आहे?

**महादाजी**—तें विचारावयास नकोच. ती सुंदर नसती, तर मीं तिला जवळ ठेविलीच नसती.

**भाऊ**—मग तर, हा सर्व योगायोग फारच उत्तम जमला. समर्थीं तिला कोणी पकडली, तर तिचें सौंदर्य पाहून तो तिला दुःख देणार नाहीं.

**महादाजीस भाऊसाहेबाचें** ह्मणणें आवडलें नाहीं. पण, **भाऊ** मनुष्याच्या मुखचर्येवरून त्याचा अंतरंग हेतु ओळखण्यांत चांगला प्रवीण असे. ज्याअर्थी आपलें भाषण महादाजीस रुचलें नाहीं व त्या स्त्रीस पाठवावें असें त्याच्या मनांत नाहीं, त्याअर्थीं तिच्या अंगीं तसाच कांहीं अद्वितीय गुण असावा, असें वाटून तो **महादाजीस** फार आग्रहानें सांगूं लागला "**महादाजी**, तुह्मीं तिला मजकरितां पाठविली पाहिजे."

**महादाजी**—एखाद्या समंजस मनुष्यास पाठवावें हें माझ्या मतें चांगलें. तुह्मी विचार करा. आपले सर्व वि-

श्वासु लोक शत्रूंचे जासूद बनलेले. मग ह्या अबलेचा कोण विश्वास धरील?

भाऊ—तें कांहीं नाहीं. तुह्मीं तिला पाठविली पाहिजे. आपल्याकरितां, आपल्या कुटुंबाकरितां, दिल्लीच्या गादीकरितां आणि पेशव्यांच्या राज्याकरितां तिला तुह्मी पाठवा, असें मी अत्याग्रहानें सांगतों.

महादाजीनें पुष्कळ आढेवेढे घेतले. परंतु, तिला पाठविल्यावांचून सुटका नाहीं असें वाटतांच, तो नाखुषीनें ह्मणाला "जशी सरकारची आज्ञा! ठीक आहे. परंतु, माझी इतकीच विनंति आहे कीं, स्वतांवर एकनिष्ठेनें प्रीति करणारी व स्वतांच्या जिवाकरितां मरावयास तयार असलेली एखादी सुंदर स्त्री, मृत्यूच्या दाढेंत लोटावयास कोणासही जड जातें, वाईट वाटतें, नाखुषी असते! आज सरकारच्या पदरीं जरी ती असती, तरी अशा आणीबाणीच्या प्रसंगीं तिला पाठविणें सरकारासही पण मरणप्राय वाटतें."

भाऊ—मी तें सर्व समजतों महादाजी! माझी तुमच्यासारखी किंवा तुमच्यापेक्षांही हृदयद्रावक व शोकजनक दशा होती. जें व्हावयाचें, तें देवादिकांसही चुकत नाहीं.

महादाजी—बरें; तिनें आपल्यास अथवा लखनौच्या सुभ्यास कोठें भेटावें? तिच्याबरोबर जाणार कोण? व ते तिला भेटणार कोठें?

भाऊ—महादाजी, ती सर्व व्यवस्था मी करितों. त्याविषयीं तुह्मी निर्धास्त असा. आजपर्यंत सुभ्यास मीं

थोडे कां संदेश पाठविले? पण, ती हें काम खुषीनें करील कीं? स्पष्ट नाहीं तर ह्मणणार नाहीं ना?

महादाजी—ती शंकाच नको. मीं प्रथमच सांगिलें कीं, ती माझ्या अर्ध्या वचनांत वागावयास तयार आहे.

भाऊ—फार चांगलें; तिला स्मृतिपूर्वक सांगा कीं, मोठ्या पहांटेपूर्वीं होईल तितका लौकर जबाब आणिला पाहिजे. आतां, मी तुह्मांकडे कागद देतों. बाकीची व्यवस्था अर्ध्या घटकेंत करीन. तिच्याबरोबर जाणारे लोकांस मी तुह्मांकडेच पाठवितों. कोण आहे? माझें कलमदान आणि दप्तर इकडे आण.

एका दासीनें कलमदान व दप्तर आणून भाऊपुढें ठेविलें. भाऊनें दप्तरांतून एक पिंवळा कागद काढिला. त्यावर बरूच्या लेखणीनें चार ओळी लिहिल्या. कागद लखोट्यांत घालून त्यावर आपली खुणेची मोहोर केली व लालनकडे देण्याकरितां तो महादाजीच्या हवालीं केला. महादाजीनें दोन्ही हातांनीं वंदन करून सरकाराचा निरोप घेतला.

---

# प्रकरण २३ वें.

## थट्टेबाज ब्राह्मण.

महादाजी जात असतांना त्यानें एक वृद्ध ब्राह्मण, धर्माच्या नांवानें भिक्षा मागत आहे असें पाहिलें.

ब्राह्मण—ब्राह्मणास देणें आणि ईश्वरास देणें बरो-

वर आहे. कोणी तरी या गरीब निराधार ब्राह्मणाचें रक्षण करा. या ब्राह्मणास देऊन जें पुण्य लागेल तें हजार गाई कसाबाच्या हातून वांचविण्यासारखें आहे. अहो, आज दोन दिवसांत अन्नाचा स्पर्शही नाहीं. देवा! देवा! राम! राम!

मराठ्यांच्या छावणींत पैशाची टंचाई होतीच; परंतु त्यापेक्षां धान्याचा दुष्काळ फार होता. ह्यामुळें वृद्ध ब्राह्मणाच्या ओरडीकडे कोणी लक्ष्य दिलें नाहीं. "आधीं पोटोबा आणि मग विठोबा" ही ह्मण अक्षरशः खरी आहे.

महादाजी शिंदा विचारांत निमग्न होता. त्यानें ब्राह्मणाच्या आकांताकडे फारसें लक्ष्य दिलें नाहीं, किंवा त्याकडे पाहिलेंही नाहीं. चांगला प्रकाश असता आणि तो त्यास लक्ष्यपूर्वक पहाता, तर तेव्हांच ओळख पटती. असो. महादाजीनें त्या ब्राह्मणास एक रुपया दिला आणि रस्ता सुधारला.

ब्राह्मण—अरे घोडेस्वार, तुला पुष्कळ संपत्ति मिळो! पण मला पैसा नको, अन्न पाहिजे होतें. कोणी तरी दया करा आणि मुठ-पसा धान्य द्या! (असें ओरडत तो महादाजीच्या दृष्टीआड झाला, आणि तेथीलच एका शिपायास विचारूं लागला) शिपाईदादा, तो सरदार महादाजी शिंदा काय?

शिपाई—होय.

मिळालेली सामुग्री एकत्र करीत तो ब्राह्मण सफेत तंबूंच्या रांगेंत शिरला. तेव्हां त्यास बंदुकवाल्या बलूची

चौकीदारानें प्रतिबंध केला. तो ह्मणाला "अरे बम्मन, किदर जाताहै? इधर उधर क्या देखता?"

वृद्ध ब्राह्मणानें जन्मपत्रिकेच्या गुंडाळ्यासारखें एक कागदांचें गुंडाळें शिपायाच्या हातीं देऊन सांगितलें "हें घेऊन जा, आणि तुमचे मालिक मल्हारराव होळकराकडे देऊन त्यांस सांग कीं, गंगादास ब्राह्मणाचें तुह्मांकडे काम आहे."

शिपायानें मुख्य चौकीदारास बोलावून ते कागद दाखविले. त्यानें त्या वृद्धाकडे बारीक दृष्टीनें पाहिलें, आणि ओळख पटतांच त्यास चिलीम ओढावयास बसवून ते कागद दुसऱ्या शिपायाबरोबर रवाना केले.

इतक्यांत 'गंगादासास होळकराकडे पाठवा' अशी वर्दी आली.

मल्हारराव होळकरानें त्यास कचेरींतील लहानशा एका तंबूंत बोलाविलें. त्या तंबूंत पितळेचा एक लहानसा दिवा, हुक्का, पाण्याचें भांडें आणि मोहाच्या दारूच्या दोन तीन रिकाम्या बाटल्या होत्या. वृद्ध आंत जातांच आंतील कारकुनांस बाहेर जाण्याचा हुकूम झाला. त्यांच्या चोपड्या व इतर कागद-पत्र हीं जशींच्या तशींच पडलीं होतीं. त्या तंबूच्या बाहेर चारपांच हातांवर एक ह्मातारा मराठा, जाणायेणाराचा तपास करीत होता.

मल्हारराव बिछान्यावर बसला आहे आणि त्याच्याजवळ एक पिस्तोल पडलें आहे, असें वृद्धानें पाहिलें. ब्राह्मणानें लवून सलाम केला. पण हें काय! ब्राह्मणांस बलवान् व सत्ताधीश हिंदुराजे उठून दंडवत प्रणाम क-

रितात; मग हें असें कसें? असो; काय असेल तें लौकरच उघडकीस येईल.

होळकरानें हळूच मस्तक हालवून रामरामाचा स्वीकार केला असें सुचविलें आणि विचारिलें "कसें काय वीरबल? बसा. माझ्या मित्राचा काय समाचार आहे?"

**वीरबल,** हा मुसलमानांचा पगार खाणारा जासूद. **लुतुफउल्लानें** ह्याच **वीरबलास** जाटस्वरूपानें **लालन**-बरोबर पाठविलें होतें. आतां हा भट बनून आला; हाच **गंगादास.** त्यानें पुनः रामराम केला आणि बन्यानच्या आंतील खिशांतून एक लखोटा काढून होळकराच्या हातीं विनयानें देऊन सांगितलें "हें पत्र लढाईंत जय मिळविणाऱ्या राज्याधिपति **नजीबखान नजीबउद्दवल्यानें** दिलें आहे."

होळकरानें हात पुढें केला. तें पत्र घेतलें, आणि हुक्का पितां पितां चिलिमींतील विस्तवांत जाळून त्याची राख-रांगोळी केली! तो ह्मणाला "आग लागली या पत्रास! मला त्याची बिलकुल गरज नाहीं. मीं वारंवार सांगत असतां पत्रें पाठविणें ह्मणजे शुद्ध अज्ञान! स्वतः मला वाचावयास येत नाहीं, व या कारकुनांसारख्या लबाड लोकांवर माझा बिलकुल विश्वास नाहीं. कागद-पत्र दुसऱ्याच्या हातीं सांपडले, तर कोण पंचाईत! आतांच या पत्रानें काय संकट ओढवतें! आमच्यासारख्या किंवा **नजीबउद्दवल्यासारख्या** जुन्या लढाऊ सरदारबहाद्दरांस लिहिण्यावाचण्याशीं काय काम? बरें, राहो तें. तो मला ओळखतो आणि मी त्याला ओळखतों. पुष्कळ झालें. तो काय ह्मणतो तें सांग.

**जामूद**--( किंचित् मागें हटून ) आतां ते सांगतील तसें तुह्मीं मान्य केलें पाहिजे. ते तुमचा सत्कार केल्याशिवाय रहाणार नाहींत.

**होळकर**—पुरे, तो त्यांचा सत्कार! ते, माझें मस्तक किंवा सेनेंत जी माझी अबरु आहे, ती घेऊं पहातात. पण, मी तें जाणून आहें. त्यांनीं मला सांगावयास तुला तोंडीं कांहीं सांगितलें आहे काय? कागदांतील मला कांहीं नको.

**बीरबल**—होय, सरकार. त्यांनीं तुह्मांस जुन्या मित्रत्वाची व नात्याची आठवण करावयास सांगितलें आहे. आणखी ते असेंही ह्मणाले कीं, पुढें जे दिवस येत आहेत, त्यांत तुह्मीं व आह्मीं खऱ्या बंधुत्वानें वागावें.

**होळकर**—देवाची शपथ. माझीही तशीच इच्छा आहे. तो मूर्ख ब्राह्मण माझा विश्वास अथवा अबरु ठेवूं इच्छीत नाहीं. त्यानें त्या मुसलमान गाढवाकडून माझा अपमान करविला आणि उभयतां शिंद्यांकडून माझी थट्टा करविली. पण, तो होळकरास ओळखत नाहीं असें मी समजतों. गंगेची शपथ घेऊन सांगतों कीं, मीं जें शेवटीं सांगितलें आहे, त्याप्रमाणें वागेन. विशेष नाहीं. मी फार करूं जाईन तर मराठे लोकांत माझी छीः थूः होईल आणि ते वचनभंग करतील, तर ईश्वरास फसविल्याप्रमाणें होईल. ते नरकांत पडतील! डुक्कर खाऊ होतील! तूं जा आतां. इतकेंच पुरे.

**बीरबल** सलाम करून तंबूबाहेर आला. बाहेरच्या बाजूस ओरडाओरड व धांदल चालली होतीच.

इतक्यांत ' हुजूर! हुजूर! तुह्मांस आतांच्या आता भाऊसाहेबांनीं बोलाविलें आहे. " अशी आज्ञा एका हुजऱ्यानें होळकरांस सांगितली.

" ही आणखी दगदग आली, काय कंटाळा! कपाळ उठलें! " असें ह्मणून होळकरानें आपलीं वस्त्रें नीट-नेटकीं केलीं; तरी. तो मनांत फार घाबरला होता, असें दिसत होतें. तो ह्मणाला, " त्याला आज माझें काम पडलें? वारंवार पडत नाहीं; आतां दिवस जवळ आले! खंडू. फुलमतीवर जीन घालावयास सांग. "

# प्रकरण २४ वें.

## भाऊचा शाप.

महादाजी जसा भाऊसाहेबास भेटला आणि त्या परस्परांचें जसें निस्पृहतेनें व मोकळ्या मनानें भाषण झालें, तसें मल्हारराव होळकराशीं झालें नाहीं. होळकराच्या मनांत कपट वागत होतें. भाऊसाहेबाच्या वीरश्रीसंपन्न मुखश्रीवरील उत्साह, शौर्य इत्यादि सर्व गुणांची प्रभा मावळल्यामुळें तें निस्तेज दिसत होतें तो सरदारांची शेवटची मुलाखत घेण्यासाठीं एका तंबूत बसला होता. होळकर तंबूच्या दारांत येतांच भाऊसाहेबानें स्वतः उठून जाऊन त्यांना आदरसत्कार केला. मल्हारराव खालीं बसेपर्यंत तो उभाच होता. भाऊनें होळकराबरोबर आलेल्या लोकांस दूर जाण्याविषयीं सूचना केली, आणि उभयतांच्या संभाषणास प्रारंभ झाला.

भाऊ—रावसाहेब, असें किती दिवस चालेल? उद्यीक सर्वांचा निकाल करावा, असा बेत आहे, तुमचें मत कसें?

इतकें भाषण करून भाऊ स्वस्थ राहिला आणि होळकराच्या मुखचर्येंत कसकसा बदल होतो, हें पाहूं लागला. पण होळकर कसला वस्ताद! त्यानें आपल्या चेहऱ्यांत बिलकुल तफावत होऊं दिली नाहीं. होळकरास युद्धपरिणामाची मुळींच पर्वा नव्हती. जय झाला तरी सारखाच व पराजय झाला तरी सारखाच. तो पराक्रमी होता, हा प्रकार निराळा. परंतु, त्याचा स्वभाव कृपण, स्वार्थसाधू व घातुक असे. तो भाऊचें भाषण ऐकून शांतपणानें ह्मणाला, " फार चांगलें, महाराज. आह्मांला काय? कधींना कधीं तरी मरावयाचेंच. त्यांतून आह्मांसारख्या शिपायांस समरक्षेत्रांत मृत्यु येणें हेंच उचित.

भाऊ—रावसाहेब, एकूण तुमचा मरण्याचा विचार आहे!

भाऊचा बाह्यसात्विक पण अंतरंगी कावेबाजपणाचा प्रश्न ऐकतांच होळकर मनांतल्या मनांत चपापला. तरी, बाह्यात्कारीं तसें न दाखवितां त्यानें सरळ जबाब दिला. " कोणाचेंही मरण त्याच्या स्वाधीन नसतें. मरावें असें कोणाच्या मनांत आलें, तरी तें येणें कठीण. आणि येतें, तेव्हां तें कोणाला सांगून येत नाहीं. जगदीशाच्या मनांत मीं मरावें असें नसलें, तर त्यानें आजपर्यंत वीस लढायांत जसें मला वांचविलें, तसेंच तो या लढाईंतही माझें संरक्षण करील."

सदाशीवराव, होळकराच्या मुखचर्येंत कांहीं फेरबदल होतो कीं काय, हें फार सूक्ष्मदृष्टीनें पहात होता. मुखचर्येवरून दुसऱ्याच्या मनांत काय काय तरंग येतात, त्याची कशी स्थिति होते, वगैरे परीक्षा करण्यांत भाऊ फार चाणाक्ष होता; परंतु त्याचा होळकरापुढें इलाज चालेना. तेव्हां त्यानें अन्य युक्तीचें अवलंबन केलें. तो ह्मणाला, "मल्हारराव, नेहमींप्रमाणें तुमचा पेशव्यांशीं निमकहलालपणानें वागण्याचा निश्चय आहे ना?"

होळकर—सरकार, असा प्रश्न कां बरें झाला? माझें कोणतें आचरण आपल्यास संशयाचें वाटलें?

भाऊ—मी स्पष्ट सांगतों कीं, मला तुह्मांविषयीं किंचित् संशय वाटतो.

होळकर—कां बरें? मीं काय केलें? महाराज, माझी कोणती हरामखोरी तुह्मीं पकडली ती माझ्या पदरांत घाला; उगीच संशय आहे ह्मणून सांगण्यांत हांसल नाहीं.

होळकराच्या प्रश्नाचा जबाब देणें कठीण होतें; तेव्हां भाऊ कांहीं वेळ स्तब्ध राहिला. पुढें भाऊनें आपल्या बोलण्याचा रोखच एकदम बदलला.

भाऊ—असें नव्हे, रावसाहेब! मी तुमची हरामखोरी ह्मणतों असा अर्थ नाहीं. परंतु, माझ्या मनांत असा अंदेशा आहे कीं, तुह्मी मजवर रागावलां आहां. इब्राहीमखानाविरुद्ध तुमच्या मनाचा झोंक आहे. समशेरबहादर व महादाजी शिंद्याविषयींही तुमच्या मनांत वैमनस्य आहे. यावरून कोणीही मी ह्मणतों असेंच स-

मजेल. जरी तुम्ही निमकहराम नसलां, तरी तुमच्या मनाची तूर्त जी स्थिति दिसते, ती कोणालाही विचित्र वाटण्यासारखी आहे. परंतु रावसाहेब, तुम्ही मोकळ्या मनानें आम्हां सर्वांच्या स्थितीचा क्षणभर विचार करा; म्हणजे आम्ही म्हणतों तें किती खरें आहे, आणि आपली स्थिति सुधारण्याकरितां तुम्हीं आपलें मन स्वच्छ ठेवणें किती अवश्यक आहे, हें सहज तुम्हांस समजेल. आज आम्हां सर्व मराठ्यांची स्थिति सांपळ्यांत सांपडलेल्या वाघाच्या अवस्थेपेक्षांही वाईट आहे. तेव्हां, अशा स्थितींत आम्ही सर्व एक दिलानें वागूं, आमचे खासगी द्वेष एका बाजूस ठेवूं, आपल्या देशाचा, आपल्या जातीचा व आपल्या धर्माचा विचार करूं, तरच आपली स्थिति सुधारणार. आज आम्ही आमचीं सर्व वैमनस्यें एका बाजूस ठेवून इमानें-इतबारें केवळ आपल्या धन्याच्या हिताकरितां लढण्यास सिद्ध झालों, तर अहमदशहाची विशाद कसली? देवानें आम्हांस दोन व त्या दुष्ट शिखानष्टास चार हात दिले आहेत असें तर नाहीं? जसे त्यांकडे सरदार आहेत, तसे आम्हांकडेही आहेत. त्यांच्यापेक्षां आमची तयारी किंवा फौज-फांटा, बंदुका, तोफा, घोडे, हत्ती इत्यादि युद्धोपयोगी सरंजाम चांगला आहे. असें असतां आम्हीं विचारसागरांत गटकळ्या खात रहावें, ह्यांत काय मजा आहे?

होळकर—( दिलगिरी दाखवून ) महाराज, आपण नेहमीं असा विचार करीत नाहीं, यापूर्वी कधीं माझ्यासारख्या गरीब मनुष्यास तुम्हीं खासगी मसलतींत बोला-

विलें नाहीं. तुम्ही माझें ऐकतां, तर असा प्रसंगच आला नसता!

भाऊ—( खिन्न मुद्रेनें ) काय झालें, तें एक जगदीश जाणत असेल! पण, जें झालें तें आतां मागें तर घेतां येत नाहीं? झालें तें गेलें. आतां त्याचा विचार निरर्थक. परंतु जें व्हावयाचें आहे त्यांत जर सुधारणा कारेतां येत असेल, तर तुम्हांसारख्या हितचिंतकांनीं स्वस्थ बसणें चांगलें काय? व्हावयाचें तें होणार हें तर खरेंच. परंतु, आम्हीं केशरी करीपर्यंत झाल्या गोष्टींची तुम्ही आम्हांस क्षमा करा. यापेक्षां आतां आणखी काय सांगितलें तर तुमच्या मनाची समजूत होईल तें मला समजत नाहीं! तुम्हांसारख्या वीरशिरोमणी, वृद्ध, विचारी व पोक्त सज्जनांनीं आपलाच हेका खरा करण्यांत भूषण नाहीं.

मल्हारराव स्वस्थ होता. त्यानें आपल्या चेहऱ्यावर कोणताच भाव प्रकट केला नाहीं. तरी त्यानें आपला मोबदला मिळविलाच. आणि भाऊचा अभिमान जावयास तेंच खरें साधन होतें. तो शांतपणानें म्हणाला "महाराज, क्षमा करण्यासारखें यांत काय आहे? नोकर आणि धनी ह्यांत क्षमेचा प्रकार कसा रहाणार?"

भाऊ—ठीक आहे. आजचा निदान-समय आहे. तुम्ही, रावसाहेब व अप्पासाहेब ह्यांच्या वेळचे प्रमुख सरदार आहां. आजपर्यंत विश्वासानें वागत आलां, आणि तसेंच पुढें वागून आपण निष्कलंक आहों असें जगास दाखविणें तुमचें कर्तव्य होय. तुमचे पूर्वज तुम्हांस स्वर्गीं चांगलें म्हणतील तें करणें, आणि पुढील पिढीनें तुमचा गौरव करावा असें आचरण ठेवणें, यांतच खरा

पुरुषार्थ आहे. तुम्ही आपल्या कर्तव्यावर दृष्टि ठेवून वागाल, अशी मी आशा करितों. सर्वांशीं माझा समज असा आहे कीं, यशापयशाची सर्व जबाबदारी तुम्हांकडे आहे. केवळ शब्दानें शब्द वाढवून वाद करीत बसण्यांत मजा नाहीं. तुमचें अंतःकरण साफ व्हावें, आणि तुम्हीं सर्व मराठ्यांशीं एक दिलानें वागावें, इतक्याकरितांच मीं तुम्हांस येथवर येण्याची तसदी दिली.

होळकर—माझें मन प्रारंभापासूनच साफ आहे. तुम्ही इकडे यऊं नका, असें मी प्रारंभापासूनच सांगत होतों. परंतु, तुम्ही कोणत्या इराद्यानें आलां, तें प्रभु जाणत असेल! आतां त्या गोष्टी व्यर्थ आहेत.

भाऊ—समजलों. आतां, आम्ही सांगूं तें तुम्हांला ऐकावयाचें आहे?

होळकर— सरकार, मी आपला ताबेदार आहें.

भाऊ—कसेंही असो. पण, आतां माझें सांगणें एवढेंच आहे कीं, मनांतील राग टाका. झालेल्या कामांत सर्व चूक तुमचीच आहे असें मी म्हणत नाहीं. अशा संकटकाळीं, मी सदाशीवरावभाऊ–पेशव्यांपैकीं एक–बाजीरावाचा भाऊ जो चिमणाजीअप्पा त्याचा पुत्र तुम्हांकडे पदर पसरितों. मी तुम्हांला शरण आलों आहें, असें समजा; आणि एकंदर मराठ्यांकरितां तुमच्या हातून होईल तर आमचें रक्षण करा. आतां आमच्या यशापयशाचे, सुख-दुःखाचे, फार तर काय, पण जीवन-मरणाचेही धनी तुम्हीं. तुम्ही पेशव्यांशीं निमकहलाल आहां. पण, तुमच्या मनांत आतां काय वागत आहे, हें

एक तुम्ही किंवा जगदीश जाणे. मनांतील गोष्ट जाणणें हें काम ईश्वरानें आपल्याकडे ठेविलें आहे. काळ, केव्हां काय घडवील, हेंही कोणास समजत नाहीं आतां आम्ही बोलत आहों; परंतु एका क्षणांत आमचें काय होईल, हें सांगण्यास आम्ही अज्ञान जीव असमर्थ आहों. ह्यासाठीं तुम्हांस जें करावयाचें त्याचा पूर्ण विचार करा. मग, तुम्हांला वाटेल तसें करण्यास तुम्ही मुखत्यार आहां. आतां तुम्हांला अगदीं शेवटचें ‹..›ांगणें मी इतकेंच सांगतों कीं, पेशव्यांशीं, शिंद्यांशीं, इब्राहीमखानाशीं, बळवंतरावाशीं, समशेरबहादुराशीं अथवा आमच्या फौजेंतील कोणत्याही लहान मोठ्या सरदाराशीं कोणत्याही कारणानें तुमच्या मनांत वैमनस्य असेल व त्याचा सूड उगविण्याकरितां तुम्ही मराठे सेनेचा आणि पेशव्यांच्या अक्षय्य कीर्तीचा विनाश करावा असें मनांत आणाल, अथवा त्याकरितां कोणत्याही दुष्ट अविश्वासाचा व हानिकारक प्रकार कराल, तर अवघ्या कलियुगांत आजपर्यंत जीं जीं लहान मोठीं पातकें घडलीं असतील. तीं सर्व तुमचे मस्तकीं पडतील!! त्याकरितां तुम्हांस लक्षावधि जन्म रौरव नरकांत पचावें लागेल! तुम्ही असें समजूं नका कीं, इहलोकचा स्वार्थ तुमचे उपयोगीं पडेल!! तुमची धन-दौलत, माल, खजिना, किंवा तुमच्या स्वामित्वाच्या ज्या ज्या वस्तु येथें आहेत, त्यांपैकीं एक फुटका छदाम देखील तुमच्याबरोबर येणार नाहीं. केवळ कीर्ति किंवा अपकीर्ति बरोबर येईल; समजलां? मी ब्राम्हण आहें व तुम्ही वृद्ध सरदार आहां. मी मरणोन्मुखावस्थेंत तुम्हांस नम्रपणानें सर्व सांगत आहें. खरोखर

मी देहभानावर नाहीं; तरी, तुम्ही पक्कें ध्यानांत ठेवा कीं, माझें सांगणें बिलकुल मिथ्या होणार नाहीं!

वृद्ध सरदार स्वस्थ होता. परंतु, भाऊच्या ह्या भाषणानें त्याचें हृदय दुःखित झालें असें दिसूं लागलें. आणखी भाऊ त्वेषानें ह्मणाला "मीं तुमची जितकी विनवणी केली तितकी एखाद्या दगडाची केली असती, तर त्यालाही पाझर फुटते. उदयीक आमचा पराजय झाला, तर मी वांचणार नाहीं आणि वांचलों तरी असें कृष्णवदन नानासाहेबांस दाखविणार नाहीं. मी आतां ह्या जगांत राहूं इच्छित नाहीं. केवळ, इहलोकीं मी नाहीं असें समजून तुह्मांस सांगतों कीं, आमचा पराजय झाला आणि दुर्दैवानें आमच्या कुटुंबांतील बायका-मुलें दुष्ट म्लेंच्छां-च्या हातीं लागलीं, तर तुम्ही नजीबउद्दवल्याचे परम-स्नेही आहां, नजीबाचें सांगणें अहमदशहा अमान्य करणार नाहीं, इतक्याकरितांच सांगतों कीं, तुम्ही होतील तितके भगीरथ प्रयत्न करून बायकां-मुलांचें संर-क्षण करा. मल्हारराव, एका मरणोन्मुखाचे हे शेवटील शब्द तुम्ही ऐकतां आहां ना?

होळकर—ऐकतों आहे महाराज! आपण सांगतां तसें झालें, तर माझ्या हातून होईल तितकें मी करीन.

होळकराचें हें भाषण पूर्वीच्या शब्दांपेक्षां जास्त नेटाचें दिसल्यामळें भाऊच्या मनाला त्या संबंधानें जास्त धीर पोंचला असें वाटलें. कारण, तो म्हणाला "बस्स झालें. समयीं, मी तुमचा शत्रु असलों तरी तें शत्रुत्व माझ्याबरोबरच जाईल. माझ्या बायकां-मुलांशीं त्याचा

काडीइतका संबंध नाहीं. विचार करा; येथें ईश्वर साक्ष आहे. आतां तुम्ही चला. आणखी एका तासांत भारी युद्धाविषयीं विचार करावयाचा आहे. तुम्ही लौकरच कचेरीस या.

"मी, सरकारच्या हुकुमाचा ताबेदार आहें." असें ह्मणून होळकरानें आपल्या पूर्व-पद्धतीप्रमाणें वंदन करून पेशव्यांची रजा घेतली.

जातां जातां होळकर मनांत ह्मणूं लागला. "सर्प वांकडा खरा, पण बिळांत सरळ जातो. भाऊ आतां गोड गोष्टी सांगतो; पण शत्रूशीं प्रसंग पडेल तेव्हां समजेल. त्याच्या कपटजाळांत फसतां नये. तो इब्राहीमखान, समशेरबहादर आणि शिंद्यास विजयी समजतो. ठीक आहे; पहातां येईल. त्यांसारखे पृथ्वीवर वीर नाहींतच! खरेंच, "मुर्ख मित्रापेक्षां शहाणा शत्रु चांगला" मी नजीबउद्दवल्याच्या बाजूस उभा राहीन, आणि तो माझ्या बाजूस राहील. ब्राह्मणांचा विश्वास धरण्यापेक्षां तुर्कांचा धरणें चांगलें."

होळकराच्या मनांत कपट आहे. अशी भाऊची खातरी झाली, तो मनांत म्हणाला "उदयीक आपण विजयी झालों, तर होळकराचा विचार पाहिजे तसा करूं."

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे.

# प्रकरण २५ वें.

## अखेरचा निरोप.

महादाजी लालनकडे आला व हातांतील तरवार खालीं ठेवून ती बसली होती तिच्या जवळ जाऊन बसला. तेव्हां लालन म्हणाली, "सरकार, कसें काय झालें?"

महादाजी—(दिलगिरीनें) कम नशीब! दुसरें काय सांगूं प्रिये?

लालन—ह्या दिवसांत कम नशिबास लांब जावयास नको. पण तें कसें?

महादाजी—युद्धप्रसंगासंबंधानें दुर्दैवाचा प्रकार निराळा. परंतु, तें आपल्या सबंधानेंच आहे. त्याच्या मनांत तुझी व माझी ताटातूट करावी, असें आलें आहे.

लालन—काय म्हटलें? तुमची व माझी ताटातूट! तुम्ही मला सोडून कोठें जाणार?

महादाजी—नाहीं नाहीं. एका महत्वाच्या कामाकरितां मला सोडून तुलाच गेलें पाहिजे. परंतु, तें काम करण्याजोगी तूं धैर्यवान नाहींस, ह्यामुळें तुला पाठविणें फार जिवावर येतें.

लालन—धैर्यवान? तुमच्या हितांकरितां काय पाहिजे तें करण्यास मी तयार आहें.

महादाजी—फिकीर नाहीं, ऐक तर. तूं खानदेशांतून इकडे आलीस वगैरे सविस्तर हकीगत मीं भाऊसाहेबांस केवळ अज्ञानपणानें सांगितली. त्यांना सुजाउद्दवल्याकडे पाठविण्याकरितां एका विश्वासु मनुष्याची अवश्यकता आहे. तेव्हां तुलाच तिकडे पाठवावें असें

ठरलें. मी काय करूं? त्यांना पुष्कळ सांगितलें परंतु, ते ऐकेनात, आणि आपला हेका सोडीनात. शेवटीं, मी जातों, असेंही त्यांस सांगितलें. ते म्हणाले "तुम्हांस कोणी ओळखील सवरील आणि मला पंचाईत करावी लागेल." आतां, काय करावें हें सुचत नाहीं. वचन तर देऊन चुकलों.

लालन भीतीनें महादाजीकडे पहात होती. तिच्या चेहऱ्यावर धास्ती, दुःख व विचार इतका फैलावला कीं, ती बोलण्यासही असमर्थ आहे असें दिसूं लागलें.

महादाजीनेंही तिची स्थिति ओळखिली. परंतु, तो तरी करतो काय? त्यानें तिला उत्तेजन व धैर्य यावें अशा इराद्यानें दृढालिंगन दिलें.

लालन—( महादाजीच्या तोंडाकडे पाहून स्फुंदत ) मरणास मी भीत नाहीं. स्त्रियांनीं मरेपर्यंत दुःखच भोगावें, त्यांच्या कपाळीं सुखाचा लवलेशही असूं नये, हें ठरलेंच आहे. त्या चांडाळ व क्रूर दुराणी लोकांच्या तावडींतून मी एकदां सुटलें; आणि आतां पुनः तिकडे जावयाचें, म्हणजे अग्नींत आपण होऊन उडी टाकण्यासारखेंच आहे. खरेंच, प्राणनाथ! मला हें गहन संकट दिसतें.

महादाजी—( तिला उत्साह यावा अशा उमेदीनें ) पण प्रिये, आतां दुराणी लोकांच्या छावणींत नाहीं जावयाचें. सुजाउद्दवला दुराणी नव्हे. तो आपल्या हिंदुस्थानांतलिच. काबुली म्हणजे केवळ राक्षस! त्यांपेक्षां आपल्या देशांतील मुसलमान पुष्कळ बरे. आणखी, येथील कित्येक लोक त्याच्या छावणींत जा-ये करणारे तुझ्या

बरोबर येतील. भाऊचें पत्र नेणारा तूं एक विश्वासु मनुष्य. तुला आम्ही पुरुषवेष देऊं. पण, तूं खरोखरच भीत असशील, तर मात्र सर्व मसलत व्यर्थ. मग मी जातों; तूं येथें रहा.

**लालन**—तें कांहीं नको. मजवर कितीही संकटें आलीं तरी चालतील. तुमचा आणि माझा विचार केला, तर जमीन-अस्मानाचें अंतर. मीच जातें. प्रवासांत संकट सहन करण्याची मला संवय झाली आहे. मी गेलें आणखी विजयी झालें, तर तुमच्या दासीच्या विनयानें तुमची सर्वत्र कीर्ति होईल. समर्थी, आलें नाहीं तिकडेच मेलें, तर आपल्याकरितां हिनें प्राण दिला अशी तरी तुह्मांस माझी आठवण राहील.

**महादाजी**—असें नको प्रिये. आरंभिलेलें काम यथासांग शेवटास नेईन असें तुला धैर्य असेल, तरच जा. नाहीं तर, विनाकारण दोघांच्याही जिवास हुरहुर नको. देवाच्या मनांत स्त्रीच्याच हातून आमचें कल्याण करावें असें आलें असेल, ह्मणूनच त्यानें भाऊसाहेबांस तशी बुद्धि दिली नसेल ह्मणून कशावरून? तूं वेड्यासारखी हट्टास पेटून जाशील आणि फजीत पावशील, त्यांत कांहीं हांसल नाहीं. त्यापेक्षां न गेलें बरें. नाहीं तर, तुला पाठवा आणि सपाट्याबरोबर आपला संहार करून घ्या; हा शहाणपणा कामाचा नाहीं. कसें?

**लालन** आपल्या प्रियकरास भेटली नव्हती तोंपर्यंत तिच्या अंगीं धैर्य, शौर्य, सहनशीलता, विचारीपणा, चातुर्य, उत्साह, समंजसता इत्यादि जे सद्गुण आपण पाहिले, ते पुनः उद्भवले असें दिसूं लागलें. ती **महादाजी**-

जवळून उठून उभी राहिली आणि केंश सारखे करून ह्मणाली, "मी जाणार; तुह्मी निर्धास्त असा. मी कित्येक महिने रानावनांत एकटी हिंडलें आहें व वर्षेंचीं वर्षें संकटांत, दुःखांत, त्रासांत आणि हालविपत्तींत काढिलीं आहेत; तेव्हां आतांच केवळ तुह्मांकरितां एकदोन दिवस तशा स्थितींत घालविण्यास मला भीति वाटेल असें तुह्मी समजतां काय? नाहीं मी जातें. मी माझ्या प्रियकराकरितां जाणार.

**महादाजी**—प्रिये, तुझें धाडस आणि शौर्य पाहून फार समाधान होतें, आणि तुला पाठवावयाचें ह्मणून दुःखही वाटतें. पण, वेळ येईल तसा काढला पाहिजे. खरोखर, तूं वीरसुता आहेस.

**लालन**—वीरपत्नि कां ह्मणाना? वीरमाता व्हावें असें माझ्या मनांत आहे; आणि तसेंच मरण यावें, अशी मी जगदीशापाशीं प्रार्थना करितें.

**महादाजी**च्या मनास समाधान वाटलें. आपल्यास जी तरुण स्त्री मिळाली, ती केवळ ऐषआरामाचीच वस्तु नसून फार सद्गुणी व मौल्यवान रत्न आहे, असें त्यास वाटलें. तो आणखी मनांत असेंही ह्मणाला कीं, ही सुरक्षित परत आली, तर हिला तूर्तच्या स्थितीहून फार चांगल्या स्थितींत ठेवूं. उद्यां आपल्यावर, आपल्या हजारों शिपायांवर आणि एकंदर मराठ्यांवर काय संकटप्रसंग येतो कोण जाणे! **महादाजी**नें तिला पुनः एकदां दृढालिंगन दिलें आणि आपल्या सैन्याची व शत्रूच्या लष्कराची स्थिति, बंडाचा संभव, दुष्काळाची भीति,

भाऊची दशा, दोन्ही सेनेचे राजकीय विभाग, होळक-राच्या व **नजीबउद्दवल्याच्या** प्रपंचकर्माची हकीगत, लखनौच्या सुभ्याचें भय, त्याकडून कोणत्या युक्ति-प्रयुक्तीनें आपला कार्यभाग कसा व किती साध्य होईल, **सुजाउद्दवल्याकडून** काय होईल आणि काय नाहीं, शत्रूशीं कसें वागावें, प्रसंगीं कशी सावधगिरी धरावी, जावें कसें, बोलावें काय, **नजीबउद्दवला** व **सुजाउद्दवला** ह्या दोहोंतून कोण कोण कशा हेतूनें वजीरीचा प्रयत्न करीत आहेत इत्यादि चट्सारी माहिती **लालन**ला सांगितली. इतक्यांत **महिपतराव** आंत आला आणि सांगूं लागला, " **भाऊसाहेबाकडून** लोक आले आहेत. "

**महादाजी** बाहेर आला. **भाऊकडून** चार घोडेस्वार व एक उंट आला असें त्यानें पाहिलें. आह्मांस **भाऊसाहेबांनीं** पाठविलें असें सांगण्याची त्या स्वारांस गरज राहिली नाहीं. **लालन** मर्दानी पोषाख करून आली. तिनें अंगांत अंगरखा घातला. पायांत तंग इजार, डोकीस फेंटा, हातांत तरवार, कमरपट्यांत पिस्तोल, जंबिया वगैरे सर्व तयारी पहातांच **महादाजी** फार खुष झाला. स्वाभाविक रीतीनें स्त्रियांस पुरुषवेष चांगला शोभतो, त्यांत **लालन**सारखी सुंदर व तरुण स्त्री असली, ह्मणजे तर त्या शोभेस सीमाच नाहीं. उभयतां भेटलीं. **लालन** निघतांना **महादाजीची** काय अवस्था झाली असेल, ही कल्पना तुह्मी करालच. आह्मां लोकांच्या पद्धतीप्रमाणें प्रयाणप्रसंगीं दुःख करणें अनुचित. परंतु, **लालन**चे नेत्र अश्रूंनीं भरले. शिंद्याचीही तीच दशा. आपले सरदारी बाण्यास लांछन लागेल इतक्याकरितांच

तो चित्राप्रमाणें तटस्थ होता. परंतु, त्याच्या मानसिक दुःखास सीमाच नव्हती.

लालन उंटावर बसली. इतक्यांत एक पांचवा स्वार आला. तो कोण असावा, ह्याविषयीं वाचकांचा तर्क धांवलाच असेल. तो महिपतराव; त्यानें रजपूतवेष घेतला होता. ढाल, तरवार, कट्यार वगैरे शस्त्रास्त्रांनीं तो सज्ज झाला होता.

महादाजीस कांहीं संशय आला, ह्मणून त्यानें आपल्या पिस्तोलाचा घोडा ओढून पांचव्या स्वारास त्याचें नांव विचारिलें.

तेव्हां महिपतराव महादाजीपाशीं येऊन हळूच ह्मणाला " महाराज, ती माझी कन्या. तिला एकटीला मी जाऊं देणार नाहीं. ती जाते असें मला समजतांच मी समशेरबहादराचे पागेंतील हनुमानसिंहाकडे गेलों. तेव्हां तो कलालाच्या दुकानीं दारू पीत बसला होता. त्याला मीं सांगितलें, " मला गम्मत करावयाची आहे, तुझे कपडे दे. " आतां तुह्मी मला हरकत करूं नका. ह्या कन्येकरितां मी माझें शीर द्यावयास राजी आहें. तुह्मी चिंता करूं नका. कदाचित् मी मेलोंच, तर माझी कन्या अजमिरांत आहे तिचा तुह्मी प्रतिपाळ करा, ह्मणजे झालें.

महादाजी—मी वांचलों तर करीन; मेलों तर सर्वच संपलें! तुमची इच्छा असेल तर चला.

महादाजीनें मागें येतां येतां लालनच्या कानांत सांगितलें " प्रिये, संभाळून जा. लौकर फत्ते करून ये.

महिपतराव वेषांतर करून तुजबरोबर येत आहे. तुझ्या सर्व विपत्ति दूर होवोत. सप्तभैरव आणि अष्टदिक्पाल तुझें संरक्षण करोत. जगदीश तुला आनंदानें ठेवून सौख्य देवो.

उंट उठले, आणि ती टोळी त्वरेनें निघाली. महादाजी शिंदा घोड्यांच्या पावलांचा शब्द ऐकूं येईपर्यंत व उंट दिसेपर्यंत तेथेंच स्तब्ध होता; इतक्यांत नगारा झाला. तोफांचा कडाका ऐकूं येऊं लागला. जिकडे तिकडे मशाली चमकूं लागल्या. पेशव्यांचे वकील सर-सेनापति परशुरामअवतार सदाशीवराव भाऊसाहेब बहादूर सर्वांस कचेरींत बोलावीत आहेत, असें चोपदार ओरडूं लागला.

इकडे दुष्काळपीडित लोकांचा आकांत व करुणारव शब्द ऐकूं येऊं लागला. " केशरी करा, केशरी करा! भुकेनें मरण्यापेक्षां भाल्यानें मरूं द्या! आह्मांला कुत्र्याप्रमाणें कां मारतां? बाहेर या, बाहेर! परशुरामअवतार, आम्हांस रणक्षेत्रांत उभे करा. आमच्या सरदारांनीं हातीं बांगड्या भरल्या आहेत काय? चला, उठा, तुर्कांस ठार मारा. दुष्टांचा सर्व नाश करा." हे शब्द ऐकतांच महादाजी वीरश्रीनें रोमांचित होऊन भाऊच्या तंबूकडे निघाला.

# प्रकरण २६ वें.

## केशरी करा.

भाऊसाहेबाच्या तंबूजवळ मराठ्यांच्या छावणींतील बहुतेक सर्व सैन्य व सरदार जमले. जिकडे तिकडे लोकांची दाटी झाली. लौकरच जवळची मोकळी जागा चिकार भरली. आतां काय तो अखेरचा निकाल होईल, अशी सर्वांची समजूत होती.

तंबूंत दिवटी आणि छत्री धरणारे सरदारांसदेखील जागा मिळण्याची मारामार उडाली. त्यांचा आंत रिघाव होईना. शेवटचा आणि केवळ आणीबाणीचा वेळ, ह्यामुळें लोकांच्या दाटीस सीमाच नव्हती. नगारखाना सुरू होता. जिकडे जावें तिकडे उत्साहानें लोकांचीं मुखकमलें प्रफुल्ल दिसत होतीं. प्रत्येकाच्या आंगीं वीरश्रीचें अवलोकनीय तेज फांकलें होतें. सर्वांनीं रणांगणींचा शृंगार केला होता. घुग्या, बखतर, टोप, चिलखतें, बिन्या व बिरजे घातलेले चित्रविचित्र वेषाचे हजारों लोक जमले. कलगीस कलगी, तुऱ्यास तुरा अबदागिरी व छत्र-चामरादि राजचिन्हें जिकडे तिकडे लगटलीं होतीं.

पट्टे, गुरगुज, फिरंगाण, बिचवे, कट्यारी, वाघनखें, पेष्कवज, परीत्र, पट्टीश, गदा, फरश, बंदुका, बरच्या व भाले. ह्यांच्या चकचकाटानें दाही दिशा फांकल्या होत्या. कित्येकांनीं पाठीवर समले सोडिले होते. कित्येकांनीं पागोटीं घातलीं होतीं. कित्येक फेंटे घालून जरीभर्जरी पोषाख करून आणि मौल्यवान कंठ-भूषणें व

बाहु-भूषणें घालून आले होते. भाऊसाहेब गादीवर बसले. समोर नायकिणींचा नाच सुरू होता. शेवटची रात्र. पुढें सुख मिळतें किंवा नाहीं असा संशय असल्या-मुळें, सर्वांनीं ख्याली-खुशालींत आणि ऐष-आरामांत रात्र घालवावी, असा संकेत. भाऊसाहेबाजवळ विश्वास-राव बसला. त्याच्या मागें इब्राहीमखान गारदी आपल्या फक्कड पोषाखानें ऐटींत उभा होता. जिकडे तिकडे मोर्चेलें चमकत होतीं. सारांश, त्या वेळच्या अवर्णनीय थाटामाटाचें वर्णन सांगावें तितकें थोडेंच. खरोखरच, पराक्रमी पुरुषांच्या स्वागतास तो दरबार योग्य होता.

नाचणाऱ्या तरुण कलावंतिणींचा नाच सुरू झाला आहे इतक्यांत महादाजी शिंदा, वीर-पुरुषोचित पोषा-खानें आला. त्यानें नम्रतेनें भाऊसाहेबांस वंदन केलें. तेव्हां "निगाह किजीये मेहेरबान संग्राम-विजयी, तर-वार-बहाद्दर, महादाजी शिंदेके सलाम पर निगाह किजीये" असें मुख्य चोपदार ओरडला.

भाऊनें शिंद्याकडे पाहून "तें केलें?" असा प्रश्न करून वंदन-स्वीकार केला. "केलें." असें महादाजीनें सुचविलें. भाऊची आज्ञा होतांच शिंदा स्वस्थानीं वि-राजमान झाला. एकामागून एक सरदार येत होते आणि आपआपल्या योग्यतेप्रमाणें बसत होते. शेवटीं इतकी दाटी झाली कीं, चोपदार पुकारावयाचा बंद झाला. बाहेरील तोफखान्याजवळ व हत्ती-घोड्यांजवळही लो-कांची गर्दी जमली. मिजलसींत बसण्याचा ज्यांस हक्क, ते तर आलेच; पण आजारी किंवा घायाळही आपल्या

तंबूंत राहिले नाहींत. कवाईत झाली. सर्व आले असें भाऊस वाटतांच त्यानें सोन्याची काठी धरणाऱ्या भालदारास सांगितलें कीं, " गडबड बंद करा. "

**चोपदार**—गप्प रहा; गोंगाट बंद करा.

नगारखाना बंद झाला. जिकडे तिकडे शांत झालें. तेव्हां भाऊ ह्मणाला " नायकिणीला गझल बंद करावयास सांग आणि वीररसप्राधान्य एक मराठी लावणी सुरू होऊं दे. "

हुकूम होतांच दुसरी एक कलावंतीण पुढें आली. तिचें वय लहान होतें. तिचा हावभाव व पोषाख तारीफ करण्यासारखा दिसे. तिनें तंबुरा व डफ दुरुस्त करविला आणि एक लावणी ह्मटली. तींत मराठ्यांचा पराक्रम, बल, कीर्ति व यश यांचें उत्तम व चटकदार वर्णन होतें. तें ऐकतांच कित्येक सरदारांचे बंद तटातट तुटले. कित्येकांनीं शस्त्रें सरसाविलीं. कित्येक त्वेषानें दांत ओंठ चावीत म्लेंच्छांचा ज्या दिशेस तळ होता, तिकडे पाहूं लागले आणि कित्येक शौर्यरससागरांत विलीन झाले.

**भाऊ**—( वीरासन घालून ) भवानीकी जय !

मराठ्यांचा विजयध्वज आज खुरासानच्या पहाडावरून खचीत फडकेल.

इतक्यांत कित्येकांनीं सांगितलें, " केशरी करा. भुकेनें मरण्यापेक्षां भाल्यानें मारतां मारतां मरावें, हें चांगलें. आह्मांला रणक्षेत्रांत उभे करा. " इतकें होत आहे तों, एक पुरोहित उघड्या मस्तकानें तेथें आला.

त्याच्या एका हातांत पूर्ण सुवर्ण-कलश व दुसऱ्या हातांत पूजा-साहित्य गंध, पुष्प, अक्षता वगैरे होतें.

**भाऊसाहेब** —( सर्व तयारी झाल्यावर ) मराठे सरदार अमीर–उमराव व सभ्यजन हो, आज तुह्मी येथें कां जमलां किंवा तुह्मांस कचेरींत येण्याविषयीं पेशवे सरकारची कां आज्ञा झाली, हें येथें विस्तारानें सांगितलें पाहिजे असें नाहीं. सर्वत्रांच्या मनांत जो विषय आहे, तोच मीं पुनः सांगणें ह्मणजे केवळ काळाचा अपव्यय करणें होय. तूर्तची आमची किती चमत्कारिक स्थिति आहे, हें बोलून दाखविण्याची जरूर नाहीं. गतगोष्टींविषयीं शोक करणें अबलांचें काम; तेव्हां तीही चर्चा आतां नको. उद्यां जय संपादन करण्याकरितां किंवा मरण्याकरितां सर्वांनीं तयार व्हावें. पूर्व पुण्याईनें आह्मां सर्वांस हा मनुष्य जन्म मिळाला आहे. जितकें दिसतें तितकें सर्व विनाशी. परंतु, जगदीशानें आह्मां मनुष्यांस आपलें नांव अजरामर करण्यास सत्कृति हें सर्वोत्तम साधन दिलें आहे. आजच्या युद्धाचा समय फार कठीण आहे; परंतु, आह्मी विजयी होऊं किंवा आपले दुष्ट शत्रु विजयी होतील, ह्याचा बिलकुल नियम नाहीं. आह्मी विजयी झालों, तर कीर्तीच्या शिखरास चढूं आणि आमच्या दुर्दैवानें अपयश पदरीं आलें, तरी आतां यापुढें आह्मांला अन्नाची काळजी करावयास नको. जें शिल्लक आहे, तें सर्व शिपाई-प्यादे, चाकर-नोकर, हत्ती-घोडे, उंट-बैल, बायका-मुलें ह्या सर्वांस द्या. त्यांचा उपभोग तुह्मी आनंदानें करा आणि उद्यां मजबूत होऊन या. न जाणो उद्यां आह्मांस विपुल धान्य-संपत्ति मिळेल किंवा तिची

आम्हांस पर्वाच रहाणार नाहीं. आतां विशेष सांगण्यांत अर्थ नाहीं. तुम्ही शूर आहां, वीर आहां, समंजस आहां, शस्त्रास्त्र-कुशल आहां, पौरुष-संपन्न आहां, तुम्हांला इहपर-स्वार्थ, कीर्ति-अपकीर्ति, सुख-दुःख, चांगलें-वाईट सर्व समजतें. आतां मी काय करितों तें पहा आणि तुम्हीही तसेंच करा. जय किंवा अपजय अनित्य आहे. आपण मारूं किंवा मरूं अशा दृढ निश्चयानें युद्ध केलें, परस्परांशीं सख्यत्वानें वागून लढलों, निमकहरामपणा किंवा विश्वासघात केला नाहीं, स्वामीसेवकभाव स्मरून इमानें इतबारें वागलों, तर यश संपादनास वेळ नाहीं. जेथें आम्ही जन्मास येतों, तें स्थान आम्ही मातापित्याप्रमाणें परमपूज्य मानितों. या भरतखंडांत आपण जन्म घेतला आहे. तेव्हां, ह्या देशाकरितां आम्हीं अंतःकरणांत पूज्य बुद्धि बाळगून त्याच्या कीर्तीचें संरक्षण करण्याकरितां अविश्रांत श्रम केलेच पाहिजेत. कारण, तें आपलें कर्तव्यच. आमच्या माता-पितरांवर हात टाकण्यास आज हे धर्मभ्रष्ट, कर्मनष्ट, दुष्ट चांडाळ दुराणी सरसावले आहेत; तर या वेळीं प्राणाकडे न पाहतां त्यांचा संहार करणें आम्हांस भाग; तें जर आम्हीं करणार नाहीं, तर आम्हांत व पशूंत बिलकुल अंतर नाहीं, असें म्हणावें लागेल! त्यांनीं आमच्या देवालयांचा विध्वंस केला, धर्माच्या बाबतींत हात घातला, करूं नये तशीं घोर कर्में केलीं, म्हणून श्री शिवाजी महाराजांनीं त्यांस चांगली 'शिक्षा केली. त्यानंतर बाजीराव काकांनींही त्यांची पुष्कळ खोड जिरविली त्याप्रमाणेंच आतां तुम्ही आपल्या देशाकरितां, आपल्या जाती

करितां, आपल्या धर्माकरितां किंवा स्वतःच्या कीर्तीकरितां शत्रूंचीं पाळें-मुळें खणून टाकण्याकरितां आंगीं हिंमत धराल अशी मला उमेद असून ती पूर्ण करणें तुमचे हातीं आहे. आमचीं आपसांत शेंकडों तऱ्हेचीं वैमनस्यें असतील. परंतु, या वेळीं तीं मनांत न आणितां आपण सर्व हिंदु आहोंत, स्वदेश-बांधव आहोंत, व मायदेशासाठीं एक दिलानें शत्रूंशीं लढणें हें आपलें कर्तव्य, असें समजून तूर्त जो बिकट प्रसंग आला आहे, त्याच्या निवारणार्थ सर्वांनीं तयार व्हावें व व्हाल अशी मला उमेद आहे. ती पूर्ण करण्याविषयींची सद्वासना तुम्हां सर्वांस जगदीश देवो, म्हणजे झालें.

भाऊचें भाषण संपतांच पुरोहितानें पूजासाहित्यावरील आच्छादन काढिलें; आणि फुलें, तुरे, विडे व केशरी रंगाचीं वस्त्रें भाऊच्या पुढें ठेविलीं. मग, त्यानें कित्येक संस्कृत श्लोक म्हटले व सदाशिवरावास केशरी तिलक लाविला, गळ्यांत हार घातला, तुरा लाविला व यथायोग्य वस्त्रें लेवविलीं. तेव्हां भाऊनें सुवर्णकलशांतील उदक आपल्या दोन्ही हातांच्या अंजुळींत घेऊन म्हटलें " मी ह्या गंगाजलाची शपथ वाहून सांगतों कीं, उद्यांक जर आम्हांस जय मिळाला नाहीं, तर मी तोंड दाखविणार नाहीं. "

कांहीं वेळ दरबारांत शांतता होती. भाऊनें केशरी करितांच बहुतेकांनीं विडे उचलून केशरी केले. कित्येकांच्या मुखश्रीवर उत्साहाची वीरश्री चमकूं लागली. जिकडे तिकडे जय-गर्जना सुरू झाली. "केशरी

केले, फार चांगलें झालें. आम्हांस शत्रूंवर पाठवा, म्लें-च्छांस ठार मारा, जय किंवा मरण!"

लोकांची उच्छृंखलता कमी होतांच सदाशीवराव पुनः म्हणाले "शूर वीर हो, उदयीक नशीबाची परीक्षा आहे. आतां एक गोष्ट शिल्लक राहिली आहे ती इतकीच कीं, युद्धप्रारंभ केव्हां करावा? माझ्या मतें प्रातःकाळींच लढाई सुरू करावी. तुमचें मत कसें?"

इब्राहीमखान—सूर्योदय होतांच सुरवात व्हावी. एकदां अंगांत चिलखत चढविल्यावर मग अवकाश करणें चांगलें नाहीं, रात्रीं हल्ला केला तर घोडे अडतात, तोफखानेवाले झोंपतात, आणि बंदुका साफ नसल्यामुळें विनाकारण नुकसान. "हरकत नाहीं. सूर्योदय होतां-च." "जितकें लौकर तितकें चांगलें." असे कित्येक शुभसूचक ध्वनि झाले.

भाऊ—ठीक आहे. सर्वांच्या विचाराबाहेर आमचा विचार नाहीं. सूर्योदयीं आह्मांस हल्ला करावयाचा आहे. त्यापूर्वीं चार घटका आपण बाहेर पडूं. आह्मी पूर्व दरवाजानें जाऊं. दामाजी गायकवाडानीं पुढें जावें. त्यांच्या मागून इब्राहीमखानाचें सैन्य जाईल. मध्यें, भिंताडावर ठेविल्या नाहींत अशा सुतरनाला वगैरे तोफा आणि इतर लष्कर राहील. त्याच्या मागें विंचुरकर रहातील. आह्मी, विश्वासराव, खासपागा, लहान लहान मानकरी आणि समशेरबहाद्दर बरोबरच जाऊं. मल्हा-रराव मागून येतील. बाकी सेनेसह शिंदे त्यांमागून येतील. आरब व कडाबीनवाले छावणीचें रक्षण करतील.

ह्या व्यवस्थेंत कोणाची कांहीं तक्रार असेल, तर सांगा.

कोणी कांहीं सांगितलें नाहीं.

**भाऊ**—तर मग, हाच हुकूम. हुकुमाप्रमाणें सर्वांनीं तयार व्हावें.

दरबार बरखास्त झाला व पुनः नगारा सुरू झाला. थोडक्या वेळांतच तेथें दरबार भरला होता कीं नव्हता, असें दिसूं लागलें.

---

## प्रकरण २७ वें.

### लढाईची रात्र.

**महादाजी** तडक आपल्या तंबूंत गेला नाहीं. **लालन** गेल्यापासून त्याचें चित्त उदास झाल्यामुळें त्याला दाही दिशा शून्य दिसूं लागल्या होत्या. त्याचें लक्ष्य कोठेंच लागेना. मन चिंतेनें व्याकुळ झालें. अफगाण लोकांशीं प्रसंग! त्यांची चाल निराळी, जात निराळी, भाषा निराळी इत्यादि कारणांमुळे मनास हुरहुर लागणें स्वाभाविक होतें, असें तुह्मांसही वाटेल. काळजीनें त्याचें मन अधीर झालें. परंतु, तिच्या निरसनार्थ त्याच्या हातून कांहींच व्हावयासारखें नव्हतें. आपल्या हातून होईल तितकी तजवीज त्यानें केली होतीच.

उदयीक ज्या भागाकडे लढाईस आरंभ व्हावयाचा तिकडे तरी सहज फिरावें, तिकडचा देखावा पहावा, आपल्या संरक्षणाची कांहीं तरी तजवीज करितां आली तर पहावी अशा इराद्यानें तो पुढें निघाला. खरोखर तो देखावा

फार भयंकर, जंगली आणि चमत्कारिक होता. तरी, त्यांत प्रेक्षणीय प्रकार पुष्कळ होते. आतां, महादाजी-च्या मागून आपणही जाऊं; ह्मणजे तो देखावा सहजच आपल्या दृष्टीस पडेल.

"ही पहा, येथें गुलजार व चैनी तरुण शिपायांची टोळी. ह्यांच्या लक्षणावरून उद्यांक काय परिणाम होणार हें स्पष्ट दिसतेंच आहे. पण, तें त्यांच्या स्वप्नींही वसत नाहीं! असतें, तर हे अशा रंग-रागांत व स्त्रियांच्या मौजेच्या बहारींत गर्क झाले नसते. वेश्यांनीं गळ्यांत हार काय घातले आहेत आणि भांगेच्या लहरींत व दा-रूच्या कैफींत ढोलकीं वाजवून हे अद्वातद्वा काय गात आहेत? नायकिणीशीं कशी थट्टामस्करी चालविली आहे पहा? अठरा कारखाने सुरू आहेतच. मध्यें तें तळलेलें मांस पडलें आहे. वा! त्यांतच सर्व हात घालून सर्वांचें मनःपूत खाणें चाललें आहे. ते तिकडे मुसलमान फकीर, या बाजूस हे भिकारी, व ज्यांचे धनी लढाईंत पडले त्या निराधार स्त्रिया बसल्या आहेत. ह्या कुत्र्यांच्या भुंकण्यानें तर त्रास येऊन गेला. बरें तें राहूंदे. आतां, इकडे ह्या शिपायांचें काय भाषण चाललें आहे, तें ऐकूं."

"राम्या, अरे राम्या, भगवंताच्या नांवावर एक पेला चढव. तो उद्यां आह्मांस सुरक्षित ठेवून यश देईल. अरे तुझी ह्मातारी मेली! ती बाटली खालीं आहे ना?" "राधा कृष्ण! राधा कृष्ण!" "तरवारबहा-द्दर दयाळु व शूर आहेत." "आशक, ह्या माशुकला तुम-च्या हातांतील ती सुवर्णाची आंगठी देत नाहीं?" "माशुक घे घे. तुझ्यापेक्षां जास्त काय आहे!" री री री री रां रां

रां री ई हा सारंगीचा आवाज. "जय माता भवानी! अरे मर्दा, उद्यां पहा आपण कशी तरवार गाजवूं! अरे, त्या कुत्र्यानें भाकर लांबविली. हाण त्याला. बेवकुफ, त्याला जाऊं दिलेंस? मार त्याला." कुत्र्यावर काठी बसतांच तो किंकाळत गेला.

"अरे सरकार! आह्मी भुकेनें मरतों. आह्मांला कांहीं तरी दे." "रस्ता सोडा रस्ता. ब्राह्मणास शिवाशीव करूं पहातां? थांबा तुह्मी" "आह्मी भिक्षा मागून खातों महाराज! अल्लाके नामपर देव दाता, खुदाके नामपर देव दाता."

"तो पहा, तो मुसलमान शिपाई कुराण वाचीत आहे. त्याच्या तंबूंत मंद दिवा असून आपल्यास उद्यां स्वज्ञातिबांधवांशीं युद्ध करावें लागणार, ह्मणून तो निमकहलाल तोबा करूं लागला आहे."

"हा शिकलगार वाटतें. काय गर्दी ही!" "अरे, माझी तरवार?" "जा जा, मोटा तरवारबहाद्दर आला आहे! मला रावणासारखे वीस हात नाहींत!"

"हा रजपूत वाटतें. ह्यानें कपाळीं तीलक लाविला आहे, अंगास चंदन फांसलें आहे, केशरी रंगाचा पोषाख केला आहे. तो आरती करूं लागला वाटतें! रजपुतांसारखी इमानी जात नाहीं. हे लोक फार विश्वासु आणि सत्यवचनी खरे. सर्व गेलें तरी वचनास फिरणार नाहींत.

महारांनीं काय दंगल माजविली ही! बैल कापतांच त्याच्या मांसावर माशांसारख्या मनुष्यांच्या उड्या पडूं लागल्या.

ही इकडे मेजवानी चालली आहे. सर्वच रांधतात व

सर्वच जेवतात! हे तिथे ऐटबाज पोषाख करीत आहेत. हा म्हातारा चिलीम ओढीत आहे. ही एक दुर्बळ स्त्री पडतझडत कशी गाडीस धरीत जाते आहे! हिच्या पायांत तंग इजार आहे. ही मुसलमानी दासी असावी. ती काय म्हणते तें ऐकूं. "परवरं दिगारके नामपर कोई कुछ खानेकेवास्ते देगा, तो इलाही उन्के तन दुरुस्त रखेगा. आज चार दिन मुझके अनाजका एक निवालाभी नहीं मिला. मेरा मालिक मरगया. अल्लाके नामपर, अपने बाल बच्चेके नामपर, मुज गरीबको कुछ देवो. नहींतो मैं मर-जाऊंगी." महादाजीनें तिला एक रुपया दिला. "मेरे मालिक! मेरे धनी! पैसा लेके मैं क्या करूं? मुझको अनाज चाहिये. मेरे तनमे ताकद नहीं, और मै जाऊंगी, तो भी कोई न देवेगा. खोराक होना, खोराक! तु-म्हारे माकी कसम; खोराक नहीं तो मर जाऊंगी." "बाई, मजकडे खोराक नाहीं." असें म्हणून महादा-जी पुढें निघाला.

इतक्यांत भयानक ओरड ऐकूं आली. पिस्तोल उडा-लें. सहा सात इसम रेशमी कापड व रुप्याचीं भांडीं घेऊन आले. ते ओरडूं लागले, "चोर! चोर! पक-डा. चोर!"

महादाजीनें पिस्तोल सरसावलें. चोरामागून तरवार घेऊन एक गृहस्थ आला. तो म्हणाला "पळून जा. बेवकूफ चालता हो. यांचा समाचार मी घेतों" महादा-जीनें पिस्तोल झाडलें. एक गोळी चोराच्या पायास लागली. दुसरी "पळून जा" म्हणणाराच्या छातींत

बसून तो तेथेंच ठार झाला. पुष्कळ लोक जमले. पळपत्या चोरास दुसऱ्या एकानें पकडलें.

शिंदा पिस्तोल भरून पुढें चालला. तो तेथें राहून काय करणार? भुकेनें मरणारे व लुच्चे लोक, मोठ्या सरदाराच्या अबरूची क्षणांत बेअबरु करिते. त्यास ते दुनियेंतून उठविण्यासही मागें पुढें पहाते नसते! महादाजी कलालाच्या दुकानाजवळ आला. तेथेंही पुष्कळ लोक जमले होते. ते बहुतक दारू पिऊन आपसांत शिव्या देत, भांडत. गात, एकमेकांच्या अंगावर पडत, थुंकत, ओकत आणि लढाईच्या अर्धवट गोष्टी बोलत होते.

त्यापुढें, एक तंबू जळत असलेला त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां त्यानें विचारिलें ' असें कसें झालें?" तंबूचे दारापुढें असलेले मनुष्यानें उत्तर दिलें नाहीं. पुनः महादाजीनें त्याच्या खांद्यावर हात ठेवून व त्यास हालवून विचारिलें " असें कसें झालें?"

त्यानें महादाजीस ओळखलें. त्याच्या हातांत तरवार होती, आणि तो कोणास पुढें येऊं देत नव्हता. महादाजीस पहातांच त्यानें रामराम करून सांगितलें "सरकार, माझी स्त्री तरुण व देखणी होती. मी तिला प्राणाप्रमाणें चहात असें. तिचीही मजवर प्रीति होती. माझीं दोन मुलें, गळ्यांतील ताईताप्रमाणें आम्हीं संभाळलेलीं. न जाणो, उद्यां जर मी समरक्षेत्रांत मरण पावलों, तर त्यांस दुष्ट शत्रूंच्या स्वाधीन व्हावें लागेल. मग, त्यांना ते कसे वागवितील कोण जाणे! त्या नीचांच्या विश्वासावर कोणी रहावें? मी, हाडाचा रजपूत आणि माझी स्त्री राठोड.

माझ्या वडिलांच्या पद्धतीप्रमाणें मीं जोहार केला. मीं माझ्या या तरवारीनें तिघांसही ठार मारिलें आणि माझें सामानसुमान वगैरे जें काय होतें नव्हतें, तें या तंबूत भरून त्यास आग लावून दिली. जगदीश सर्वसमर्थ आहे. तीं इतक्यांत स्वर्गी पोंचून आणखी माझी वाट पहात असतील. मी उद्यां तिकडे जाईन, आणि खुशाल आनंदांत राहीन. आतां चांडाळ म्लेंच्छांची मान कापावयास मी या तरवारीस चांगली धार काढितों. सरकार, ह्या तंबूची राखरांगोळी झाली ना? जातों मी आतां."

"झाली. सफाई झाली! जा."

महाराजी विचार करीत पुढें निघाला. तो मनांत म्हणाला, "जें कृत्य करावयास मला छाती होईना, तें ह्यानें एका क्षणांत करून दाखविलें. उद्यांच्या भीतीचा या क्षत्रियानें निकाल केला. आतां हा निःसंग झाला. याचें मन लढाईच्या कामांत निःशंक निमग्न राहील. हा एकटा शंभरांचा समाचार घेईल!"

दोन तीन स्त्रियांशीं एक पुरुष बोलत होता. एक स्त्री म्हणाली-"अहो, मी सांगतें तें ऐका. त्यांत तुमचें व आमचें कल्याण आहे." दुसरीनें सांगितलें "तुम्हीं नाहीं म्हटलें, तर आम्हीं काय करावें?" तिसरी म्हणाली "यावरून इतकें स्पष्ट ठरतें कीं, तुमच्या मनांत त्या रानटी लोकांकरितां आम्हांस ठेवून जावें, असें आहे!"

पुरुष म्हणाला :"माझ्या लाडक्यांनो, तुम्हांस ठार मारावें, असें माझ्या मनांत येत नाहीं. माझें अंतःकरण दगडाचें नव्हे."

पहिली स्त्री म्हणाली " भित्र्या, तुला शरम नाहीं ? माझे माता-पित्यानें तुझ्यासारख्या पुरुषाशीं माझें लग्न केलें, त्यापेक्षां मी झालें तेव्हांच नख लावून ठार मारिलें असतें, तर हे हाल आज मला पहावे लागले नसते ! आणा इकडे ती तरवार ! " असें म्हणून तिनें डाव्या हातानें आपल्या केशांचा बुचडा धरिला आणि उजव्या हातानें मानेवर तरवारीचा असा एक वार केला कीं, त्याबरोबर तिचें शीर धडापासून नोकळें होऊन पुरुषाच्या पायांवर पडलें !!

दुसऱ्या स्त्रीनें सांगितलें " तुम्हांला एक तरवारीचा वार करावयास हिंमत होत नाहीं, तर कशाला तरवार हातीं धरितां ? आतां पहा ! " असें म्हणून तिनें धाडकन् आपलें मस्तक त्या पुरुषाच्या पायांजवळ जमिनीवर आपटलें. तिचा प्राणवायुही तेव्हांच निघून गेला !

तिसऱ्या स्त्रीनें सांगितलें " रजपुतांच्या जातीचें असेंच शौर्य व पातिव्रत्य असतें, समजलां? तुह्मांला लाज वाटत नाहीं? आतां तरी ती तरवार घ्या आणि या मानेवर ठेवा. दुष्ट म्लेंच्छांकडून आमचें पातिव्रत्य भंग करवूं नका." असें ह्मणतां ह्मणतां तिनें त्याच पुरुषाच्या कमरपट्यांतील कट्यार पटकन् काढून सटकन् आपल्या छातींत खुपसून आत्मघात केला !

अत्याश्चर्य करीत, महादाजी पुढें निघाला, तो आपले तंबूजवळ आला. बाहेर कुत्र्यांचें ओरडणें चालू होतें. त्या तंबूपासून तीनशें हातांवर बाजारांत ओरडाओरड व धांदल चालली होती. बंदुकांचे आवाज सुरू होते. लुटालूट चालू होती. डाव्या बाजूस कलावंतिणींच्या गायनाची बहार

चालली होती. "इनाम! इनाम! हुजूरकी दौलत जादा." "वाहवा! वाहवा! **मुनाजान**, तूं इंद्राची अप्सरा आहेस आणि कुबेराची लक्ष्मी आहेस. तुला द्यावें तितकें थोडेंच. चालूंद्या. स्वर जसा काय कोकिले-चा आवाज!" असें कित्येक बोलले. गाण्या-नाचण्याचा तेथें रंग उडत होता.

**महादाजी** तंबूंतील दिणाणखान्यांत गेला. त्यानें एका नोकरास हाक मारून खजानजीस बोलावून आणा-वयास सांगितलें आणि '**इळमास**,' अशी हाक मारिली.

'हुजूर' ह्मणत एक नौकर आला.

**महादाजी**—अरे, जनानखान्याच्या गाड्यांकरितां किती उंट आहेत?

**इलमास**—सरकार, सर्व वीस होते; त्यां पैकीं पां-च मेले.

**महादाजी**—आणि रथ व पालकी?

**इलमास**—पांच पालक्या आणि दहा रथ होते. परंतु, दोन रथाचे बैल व चार पालक्यांचे भोई आहेत.

**महादाजी**—उंटाचें सामान वगैरे?

**इलमाल**—ठीक आहे.

**महादाजी**—**इलमास**, आतांच्या आतां सर्व स्त्रियां-स जाऊन सांग कीं, तुम्ही आपलें जड-जवाहीर घेऊन तयार रहा. त्यांची सर्व सिद्धता झाली ह्मणजे तूं त्यांस एक प्रहर रात्रीस उंटावर बसीव. मोठ्या राणीस चांग-ल्या उंटावर बसूंदे. पालक्या व गाड्या तळावरच असूंदे-

त. दास व दासी चालतील. सर्व भोई, आरब व चाकर बरोबर घे; आणि मराठे-लष्करानें कुच करण्याचा नगारा वाजविला व तें निघालें, म्हणजे तुम्ही त्याच्या मागून निघा. आम्ही डाव्या बाजूस निघूं. आमचा पराभव होतो असें दिसलें कीं, तुम्हीं छावणीकडे येऊं नका. शत्रु आमच्या पाठलागावर गुंतले म्हणजे तुम्ही पूर्वदिशा पकडा. कोठपर्यंत समजलें ? यमुनानदी लागेपर्यंत. तेथून दक्षिणेकडे वळा आणि देव तुम्हांस जो सरळ मार्ग दाखवील, त्यानें वाट फुटेल तिकडे हुशारीनें व संभाळून चला. होतां होईल तितकी त्वरा करा आणि दिल्ली गांठा. इलमास, काय सांगतों तें लक्ष्यांत राहील ? सर्वांची जबाबदारी तुजवर आहे; समजलास ? मी मेलों तर गेलोंच; पण, याद राख; वांचून आलों, आणि तुझें गैरवर्तन ऐकलें, तर माझ्याशीं प्रसंग आहे. तुझी चामडी लोंबवून त्यावर मिठाचें पाणी ओतून जेरबंदानें बडवीन; समजलास ? आणि तूं आस्थेनें सर्वांस सुरक्षीत आणिलेंस, तर मागशील तें बक्षीस देईन.

इलमास—मालिक, मी तुमचें अन्न खाऊन लहानाचा मोठा झालों. कोणाच्याही एका केंशास धक्का लागेल, तेथें माझें शीर पडेल! मी जिवंत आहें तोंपर्यंत सरकारानीं काळजी करूं नये.

इलमास गेला. महादाजीनें खजानजीस सर्व जवाहीर व मौल्यवान दागदागीने आणावयास सांगितले. त्यापैकीं कित्येक आपल्या जनानखान्याबरोबर पाठविले व कित्येक आपल्या हमिनींत भरले. इतकें झाल्यावर सालोत्री व विजली म्हणून त्याच्या दोन चलाख घोड्या

होत्या त्यांच्या श्रमपरिहारार्थ त्यांना चांगला माल-मसाला द्यावयाची आज्ञा करून तो हत्यांराचे तयारीस लागला. सर्व तयारी होतांच त्यानें थोडीशी मोहाची दारू व मांस सेवन केलें.

---

## प्रकरण २८ वें.

### सुभ्याची छावणी.

**लालन** ज्याच्याबरोबर जात होती, त्या लोकांस उजव्या बाजूनें जावयाचें होतें. मराठे कुरुक्षेत्राकडे जात असतां मुसलमान जिकडून त्यांचे मागें लागले होते, त्याच दिशेनें ह्यांस जावयाचें होतें. बऱ्याच अंतरावर आल्यानंतर तिला वाटलें कीं, मुसलमानांची छावणी एकीकडे व आपण भलतीकडेच जात आहों. तिनें आपल्यापुढें उंटावर बसलेल्या मनुष्यास ह्मटलें, "अरे, हा शहाच्या लष्कराकडे जावयाचा रस्ता नव्हे. तूं आम्हांस कोठें नेत आहेस?"

**सारवान**—आम्ही सरळ रस्त्यानें जाऊं, तर शत्रूच्या हातीं सहज सांपडूं. आतां जेथें लखनौच्या सुभ्याची छावणी आहे, तेथेंच आम्ही जात आहों.

जातां जातां जेथें उजव्या बाजूस पाण्याचे पाट व मातीच्या भिंताडांच्या मशीदी त्यांच्या नजरेस पडल्या, तेथें ते उभे राहिले. सारवानानें उंट खालीं बसविला. एका, पुढें गेलेल्या वाटाड्यानें सुजाउद्दवलगाच्या लोकांस सूचना केली. तेव्हां ते म्हणाले, "ठीक आहे. इकडे या."

इतक्यांत "तिकडे कोण आहे?" असा शब्द झाला. मी "वेणीमाधुसिंग. नबाबसाहेबांचा चाकर." इतका त्याचा जबाब होता. इतकें होत आहे तों पांचशें घोडेस्वारांसह उटीखान त्या वाटेनें आला.

उटीखान जवळ येतांच "उंटावरच आडवे व्हा, निजा." असें वेणीमाधुसिंगानें सांगितलें.

लालन धाहिपतगावाच्या हातावर आडवी झाली.

उटीखान—ठाकोर, काय खबर?

वेणी०—कांहीं नाहीं, खानसाहेब. शत्रूंच्या छावणींत गडबड आहे; परंतु ती नेहमींचीच. त्यांत कांहीं विशेष नाहीं. आह्मी जवळ जातों, तर जास्त खबर समजती; परंतु गारदी लोक जिकडे तिकडे फिरत होते; ह्मणून आह्मी पुढें गेलों नाहीं.

उटी०—बरोबर आहे. आणि अधिक-उणें कांहीं असेल, तर सकाळीं जासूद खबर आणीलच. तें उंट कोणाचें? कोणी कैदी पकडून आणिला आहे वाटतें?

वेणी०—आह्मीं पकडलेल्या उंटांपैकींच तें एक आहे. त्यावरील धनी पळण्याचा प्रयत्न करीत होता; पण त्यास आह्मीं ठार मारिलें. त्याकडे कागदपत्र कांहीं नव्हतें.

उटीखान उभा होता तेथून उंटाशिवाय कांहींच दिसत नव्हतें. अंधःकारामुळें लालन व तिचे सोबती त्याच्या दृष्टीस पडले नाहींत.

उटीखान—तुह्मीं वाईट केलें ठाकोर! त्याला मारावयाचें नव्हतें. तो जिवंत असता, तर कांहीं हकीगत समजती.

**वेणीमाधु०**—झालें, तें आतां परत तर येत नाहीं. तो घाईत होता, आणि त्याबरोबरचे लोक निघतांच तो लष्करांत मिसळला असता.

**उटीखानानें** विशेष पुस-तपास केला नाहीं. तो तेथून गेला. **लालन** तंबूच्या दारापर्यंत आली. **सुजाउद्दवल्याच्या** छावणीचें विशेष वर्णन करण्याचें कारण नाहीं. परंतु, त्यांत सांगावयाचें तें इतकेंच कीं, शिया मुसलमानांप्रमाणें त्याचे तंबूंत पंजा होता, आणि हजाम दिवे घेऊन इकडून तिकडे घिरट्या घालीत होते.

**वेणीमाधुसिंगानें** 'आंत वर्दी दे.' असें तेथील रखवालदारास सांगितलें. तो आंत गेला. त्यानें नबाबास **मिरझाजानबाझ** आल्याची वर्दी दिली. **भाऊकडून** जो कोणी येईल, तो त्याकडील आहे असें समजण्याकरितांच **मिरझाजानबाझ** या नांवाची योजना झाली होती. असो. आंत गेलेला गृहस्थ बाहेर येऊन सांगूं लागला "**नबाब** साहेब कामांत गुंतले आहेत. **हाफिजराहिमत** व **नजीबउद्दवला** हे आज त्यांकडेस मेजवानीस येणार आहेत. मी **काशीरायास** भेटलों. त्यांनीं सांगितलें कीं, **मिरझाजानबाझची** चांगली व्यवस्था ठेवा. इतक्यांत आपण तिकडे येतों."

**वेणीमाधु०**—( **महिपतराव** वगैरे मंडळीस ) तर मग, तुह्मी त्याबरोबर चला. मी येथें राहतों.

"माझ्यामागून या" असें ह्मणून **नबाबाच्या** मनुष्यानें **मराठे** लोकांस कनातीच्या आंत नेलें. त्या तंबूच्या समोर लाल स्तंभ होता. तेथें अपराध्यांस शिक्षा

करीत. दरवाजाच्या एका बाजूस घोडे बांधीत. दुसऱ्या बाजूस एका स्तंभावर एक प्रेत लटकत होतें. तेथून पुढें सरकारस्वारीबरोबर जाणाऱ्या खासगी घोड्यांचा तबेला होता. तेथें कितीएक हत्यारबंद शिपाई पहाऱ्यावर होते. **लालन**च्या बरोबर आलेले घोडेस्वार तेथेंच राहिले व ती **महिपतराबासह** पुढें गेली.

**लालन** तंबूच्या दरवाजांत पाय ठेविते इतक्यांत रस्ता दाखविण्याकरितां एक हजाम दिवा घेऊन आला. त्यानें "**मिरझाजानबाझ**" असा पुकार केला. तेव्हां आंतून "आंत येऊं द्या" असा जबाब मिळाला. इतक्यांत "मला प्रथम; माझें अमीरउलउमरावाजवळ फार जरूरीचें काम आहे, ठाकूर." असें कोणी भलत्यानें ह्मटलें **महिपतरावास** रजपूत समजून तो ह्मणाला "मुला झ्झा किजीये (क्षमा करा) मला रस्ता द्या." असें सांगत तो आंत जाऊं लागला. **लालन** त्यास वाट देण्याकारितां बाजूस झाली. एका क्षणांत दोघेंही दिव्याच्या उजेडांत आलीं. त्यांनीं परस्परांस पाहिलें. **लालन** पुरुषवेषानें होती. दुसऱ्या इसमानें कमरेस धोतर गुंडाळलें होतें व डोकीवर पागोटें आणि हातांत ढाल-तरवार घेतली होती; असें असून त्यांनीं परस्परांस ओळखिलें! **लालन** समजली कीं, हा दगलबाज, बेइमान व घातकी **जाट**! **जाटा**नेंही तिला ओळखिलें. कारण, त्यांनीं ह्यापूर्वी परस्परांस पाहिलें होतेंच.

**जाट** तसाच तडक पुढें निघून गेला. परंतु, **लालन** मनांत चरकली. तिला वाटलें, हें पाप पुनः आपल्या पाठीशीं कोठून आलें?

बिरबल (जाट) बाहेर जातांच "आंत या" असा शब्द झाला. तेव्हां लालन आंत गेली. ज्या इसमापुढें लालन आली, तो ठेंगणा, सडपातळ व काळा असून देखणा होता. त्याचे नेत्र काळे व विशाळ होते. जवळ कित्येक लहानमोठे कारकून लिहीत बसले होते. त्याच्या डोकीस कांहींच नव्हतें. शेंडीस गांठ देऊन तो लिहीत होता. त्याच्या पुढें एक घडवंची आणि त्यावर एक दिवा होता. त्या दिव्यांत पांच-सात वाती पेटत होत्या. तेथील लोकांनीं हिंदुस्थानी पोशाख केले होते. परंतु, त्यांतील कित्येक गृहस्थ दाक्षिणी ब्राम्हण असावे, असें सहज ओळखतां येई. बहुतेक लाल बरूच्या लेखणीनें लिहीत होते.

"मिरझासाहेब, तुमांला दखनी गोस्ट येती?" लालन सलाम करून उभी राहते न राहते तोंच वरील-प्रमाणें एका कारकुनानें विचारिलें. भाऊच्या छावणींत राहिल्यापासून लालनची महाराष्ट्रभाषा जरी चांगली सुधारली होती, तरी तिनें ह्मटलें "नहीं."

कारकून— चांगले नहीं येती? फारसी गुफतेम? (पारशी भाषा येते?)

लालन कांहींच बोलली नाहीं. आणि न बोलणें हेंच तिचें उत्तर होतें.

तो बहुभाष कारकून मनांत कांहीं समजला. त्यानें आपल्या जवळच्या कारकुनांस तेथून घालविलें आणि ह्मटलें "मिरझासाहेब, तुह्मी फार चांगले आहां. तु-ह्मांला तुमची स्वतःची भाषा किंवा धन्याची भाषा समजत

नाहीं, ह्यावरून मला वाटतें कीं, तुह्मांस हिंदी समजत असेल."

लालन—जी सरकार; होय.

कारकून—( महिपतरावाकडे हात दाखवून ) तुह्मांबरोबर जो गृहस्थ आहे, तो विश्वासु आहे?

लालन—मी, तसेच ते.

कारकून—तुह्मी कोणाकडून आलां आहां?

लालन—भाऊसाहेबांकडून.

कारकून—( संशयानें इकडे तिकडे पाहून ) हळू बोला आणि कोणाच्या नांवाचा उच्चार करूं नका. तुह्मी कोठून आलां हें आह्मांस समजलें आहे. तुह्मांकडे कांहीं कागद-पत्र आहे?

लालन—क्षमा असावी, सरकार. मी आपला ताबेदार आहें. मला नवाबसाहेबांशिवाय दुसऱ्याच्या हातीं कागद देण्याची सक्त मनाई आहे.

कारकून—तुह्मांला माझें नांव माहीत आहे?

लालन—नाहीं, सरकार.

कारकून—मी काशीराय.

लालन—हुजूरचें नांव जगजाहीर आहे. परंतु, तुम्याशिवाय दुसऱ्याच्या हातीं मला कागद देतां येत नाहीं.

काशीराय हा सुजाउद्दवल्याचा विश्वासु दिवाण होता. याच काशीरायानें सोनपत पानपतच्या लढाईचें चटकदार वर्णन लिहिलें आहे. त्या वेळीं तो फार कामांत

होता. त्यानें कांहीं वेळ विचार करून " तुह्मी येथेंच नसा " असें ह्मणून लालन ज्या दरवाजानें आली होती, त्याच वाटेनें तो बाहेर गेला.

# प्रकरण २१ वें.

## पेला संपूर्ण भरला.

फार वेळ गेला नाहीं तोंच सुजाउद्दवला स्वतःच तेथें येऊन आपल्या पराक्रमी नायिकेपुढें उभा राहिला. त्याचा चेहरा शोभिवंत दिसे. त्याच्या अंगावरील जवाहिरांचा व हिऱ्या-मोत्यांचा चकचकाट अवघ्या तंबूंत फांकला. त्याच्या चिन्हांवरून तो दारूच्या कैफांत धुंद असून बेपर्वा झाला आहे असें दिसत होतें. त्याच्या मागून त्याचा विश्वासु ब्राह्मण दिवाण आला.

सुजाउद्दवला—येथें कोण आहे? तुह्मांस आणखी कांहीं वेळ येथें रहावयास सवड आहे कीं लौकर गेलेंच पाहिजे? मला येथें येण्याचे कामीं किती खटपट करावी लागली, तें एक मौला जाणत असेल!

लालननें सलाम केला आणि भाऊचें पत्र त्याच्या हवालीं केलें. पत्र हातांत घेऊन सुजाउद्दवला भीत भीत ह्मणाला " तुह्मी नेहमींचे मीरझाजानबाझ नव्हे. तुह्मी कोण आहां? " तो तिजकडे सूक्ष्म दृष्टीनें पाहून विचार करिता, तर त्यास वरील प्रश्न करण्याची आवश्यकता राहिली नसती. परंतु, तो आपल्या गडबडींत असल्यामुळें तिजकडे त्यास बारकाईनें पहातां आलें नाहीं.

**लालन**—सरकार, मी कोण, आणि मजवर जें विश्वासाचें काम सोंपविलें, तें मीं बराबर बजाविलें आहे किंवा नाहीं, याची साक्ष हें पत्रच देईल.

**सुजाउद्दवला** दिव्याजवळ गेला; त्यानें तें पत्र उलट सुलट पाहिलें व फोडलें. त्यावरील **भाऊची** खुणा पहातांच त्याच्या मनाचें समाधान झालें असें दिसलें. तें पत्र त्यानें वरवर वाचलें. नंतर त्यानें तो कागद लगबगीनें **काशीरायाच्या** हातीं दिला, आणि त्यास पुनः वाचावयास सांगितलें. **काशीरायानें** तो कागद वाचला आणि दुःखानें "राम राम, काय संकट हें!" असे उद्गार काढिले.

**भाऊसाहेबाच्या** पत्रांतील मजकूर पुढें लिहिल्याप्रमाणें होता.

"बंधु-श्रेष्ठ, विश्वासपात्र, सुदैवी **सुजाउद्दवला** यांस-संकटग्रस्त **सदाशीवरावभाऊ**कडून—मनुष्य जर आपलें वचन पाळणार नाहीं, तर आकाश कोणाच्या आधारावर राहील? पूर्वापार आपला जो संबंध आहे, तो मनांत आणिला, तर विशेष लिहिण्याची आवश्यकता नाहींच. आम्हां दोघांत ईश्वर साक्षी आहे. परस्परांच्या कल्याणाचा उभयतांनीं विचार करणें रास्त आहे. झालें तें परत येत नाहीं. आतां आमचा पेला भरून चुकला. त्यांत आतां पाण्याचा एक थेंबही जास्त रहाणार नाहीं. आमच्या नशिबाची परीक्षा उद्यीक प्रातःकाळीं होईलच पुढें तुमच्या मर्जीप्रमाणें तजवीज करा. ' सुकन मरदान जहान दारेद (मनुष्याचा शकुन अवघ्या दुनियेपेक्षां जास्त आहे.) विश्वासघातकाचें तोंड काळें होवो."

सुजाउद्दवल्यानें काशीरायाकडे पाहिलें. तोही त्याकडे पहात होता. नंतर ते तंबूच्या एका कोनांत गेले आणि तेथें कांहीं वेळ बोलले. तेथून सुभा एकटाच लालन होती तेथें आला. परंतु, त्याची वर्तणूक बदलली असें दिसलें. अंतःकरणांतील जखमेनें त्यास विव्हळ केलें होतें. आपण शांत व राजकीय-कापट्य-प्रवीण असें तो आपल्यास समजे. पण, ह्या वेळीं त्याची चित्तवृत्ति अगदीं बदलून जाऊन त्यानें विचारिलें "पत्रांत काय लिहिलें आहे तें तुम्हांला माहीत आहे मीरझा?"

लालन—नाहीं, सरकार. तें मला मोहोरबंद करून दिलें.

सुजाउद्दवला—भाऊसाहेब ह्मणतात कीं, आपण सकाळीं मुसलमानांवर हल्ला करणार; तें खरें?

लालन—सूर्योदयापूर्वीच लष्कर लढाईस निघेल. मला वाटतें कीं, तशी आज्ञाही झाली असावी. त्यांनीं केशरी केले, हें तर मीं पाहिलेंच.

सुजाउद्दवल्यानें काशीरायास नेत्रसंकेत करून विचारिलें, "मीं काय करावें असें भाऊसाहेबांचें ह्मणणें आहे?"

लालन—देव तुह्मांस बुद्धि देईल तें, अथवा ज्यांच्या पागोट्यांची अदलाबदल झाली, त्यांजकडून जें होईल तें.

सुजाउद्दवला—उद्यां मीं त्यांस मिळावें किंवा अलग रहावें, हेंच तुमचें ह्मणणें कीं नाहीं?

लालन—होय; मिळावें हें चांगलेंच. परंतु, तें नाहीं तर अलग तरी रहावें.

सुजाउद्दवला—माझा बंधु मला किती दुष्कर कर्म करूं सांगतो, हें तुम्हांस माहीत नाहीं. मी खात्रीनें सांगतों कीं, ही लढाई धर्माकरितां नसती, तर मी खुषीनें साह्य करितों. परंतु, हें धर्मयुद्ध पडलें; माझा नाईलाज आहे. समर्थी, मी जरी तुम्हांस मिळालों, तरी माझें सैन्य माझी आज्ञा मानून तुमच्या मदतीस येईल, असें मला बिलकुल वाटत नाहीं. फार कशाला? ते लोक मजबरोबर लढाईस उभे रहाणार नाहींत किंवा ते आपल्या जातीवर हत्यार उचलणार नाहींत.

लालन—तें मी जाणतें. तुमच्या सेनेचा अर्ध्यापेक्षां जास्त भाग हिंदूंचा आहे. बाकीचे लोक मुसलमान आहेत हें खरें; परंतु, ते हिंदुस्थानांतील मुसलमान. त्यांत शिया पंथांतील लोक फार. ते हिंदूपेक्षां पठाणांचा तिरस्कार फार करितात. सरकारस्वारीनें मनावर घेतलें, तर आपल्या सेनेंतील हिंदु व शिया धन्याच्या मागून कुत्र्याप्रमाणें येतील, ह्यांत मुळींच शंका नाहीं.

सुजाउद्दवला—फार मोठें संकट! मोठीच जोखीम! मीरझा, हें भयंकर संकट!

लालन—अफगाणांस मदत करून संकट चुकेल असें सरकारास वाटत असेल, तर आमचा नाइलाज आहे. नजीबउद्दवला दिल्लींत घुसेल, हाफीजरहिमत तुमच्या सरहद्दावर अंमल करील, भाऊसाहेब किंवा शिंदे तुमच्या मदतीस नाहींत असें समजतांच् होळकर तुमची वाट लावल्याशिवाय राहाणार नाहीं, ते परकी इंग्रज व्यापारी तर गिधाडासारखे टपले आहेतच. हें लहान संकट वाटतें?

**सुजाउद्दवला**—हें तुमचें म्हणणें अक्षरशः खरें आहे. ते काफर बंगाल्यांत धुमश्चक्री उडवीत आहेत. इकडे तर नजीबउद्दवला व त्याचे साथीदार अफगाण!

**लालन**—मग, सरकारला कोठें जागा रहाणार? सफदरजंगाच्या पुत्रास वजिरीही नाहींच.

**सुजाउद्दवला**—(दीर्घ श्वास टाकून) तुम्हीं म्हटलें कीं, मराठ्यांमागें होळकर रहाणार; याचें कारण काय?

**लालन**— अहो, नजीबउद्दवला होळकराचें संरक्षण करणार, आणि तो त्याच्या तंत्रानें वागणार, हेंच.

**सुजाउद्दवला**—परंतु, अफगाण-लोकांच्या तडाक्यांतून तो वचावेल तेव्हां ना? मला वाटतें कीं, होळकराचा नजीबउद्दवल्याशीं कितीही संबंध असला, तरी लढाईच्या वेळीं त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं. किंवा होळकरासही उघडपणें त्याच्या तंत्रानें चालतां येणार नाही. तुम्ही मला जसें अलग रहा किंवा मदत करा असें सांगतां. त्यांतीलच होळकराचा प्रकार. त्याच्यानें अलग रहावणार नाहीं किंवा शत्रूस मदतही करवणार नाहीं.

**लालन**—होळकरास लढलें तर पाहिजेच. परंतु, तो लढला तरी तुम्ही तो जें करणार नाहीं म्हणतां, तें तो खचीत करील.

**सुजाउद्दवला**—(कपाळावर हात ठेवून) प्रसंग मोठा कठीण आला आहे. बरें; आतां तुम्ही जाऊन माझ्या वतीनें भाऊसाहेबांस असें सांगा कीं, लढाईचा हुकूम रद्द करा. समयीं, डाव सुधारण्याचा संभव आहे.

आम्ही असें ऐकतों कीं, नानासाहेब नर्मदेच्या अलीकडे आले आहेत.

लालन—तें सांगणें निरर्थक. पेशवे येत असले, तरी त्यांच्या मदतीची आणखी एक महिना तरी वाट पाहिली पाहिजे. आणि आज भाऊसाहेबांची तर अशी अवस्था आहे कीं, तीस दिवस लांबच होत; पण, तीस तास जातील तर त्यांस शीर द्यावें लागेल.

सुभा पुनः स्तब्ध राहिला. त्यानें तंबूंत येरझार करण्यास सुरवात केली आणि सांगितलें, "मला चांगला विचार करून काईम उत्तर देण्यास वेळ मिळाला पाहिजेच. तुम्ही माघारे केव्हां जाणार?"

लालन—आम्हांस निदान पहांटेच्या प्रहररात्रीं तरी गेलेंच पाहिजे. नाहींतर एकदम लष्कराचा कूच सुरू होईल.

सुजाउद्दवला—बरें आहे. तुम्ही येथें निर्भयपणें रहा. तुम्हांस पाहिजे असेल तें मी देववितों. मी एक दोन तासांत येतों आणि उत्तर देतों.

## प्रकरण ३० वें.

### जासुदाचा संशय.

मीरझाजानबाझ आणि त्याचा रजपूत साथीदार ह्यांस बिछाने व पाणी वगैरे देण्याचा हुकूम करून सुजाउद्दवला मेजवानीच्या तंबूंत गेला. तेथें मेजवानीचा थाट चालला होताच.

एका टेबलावर सफेत कपडा आंथरला असून त्यावर कित्येक रिकाम्या झालेल्या बाटल्या आणि बीर, आनी व जरदानीच्या रकाब्या पडल्या होत्या. त्या चाकर नेऊन पुनः भरून आणीत.

**नजीबउद्दवला** मद्यप्राशनानें तर्र होऊन विडा खातां खातां हुक्का आणण्याविषयीं चाकरावर रागावत होता. त्यांतच शिव्यांचाही सुकाळ चालू असे. **हाफीजरहिमत** तर कलावंतिणीच्या नादांत गुंग. तबलजी दारू पिऊन मनःपूत वाजवीत सुटला होता. एकंदरीत गोंगाट, धांदल, ओरड, थट्टा-मस्करी इत्यादि नीच कर्मांनीं तें मेजवानीचें रंगस्थल अव्यवस्थेचें मुळस्थान बनलें होतें.

**सुजाउद्दवला** तरी त्यांचाच सोबती. पण, **लालन** आल्यामुळें त्यास सवड नव्हती. "**जासुदास** होईल तितक्या लौकर पुनः भेटलें पाहिजे, उद्यां लढाईचा प्रसंग आला तर समरंगणांत उभें रहावें लागेल, थोडीशी निद्रा मिळेल, तर प्रातःकाळीं हुशारीनें उठतां येईल" हे विचार त्याच्या मनांत घोळत होते. ह्यामुळें आतां जास्त दारू घ्यावयाची नाहीं, असा विचार करून तो **काशीरायास**ह खासगी तंबूंत गेला. तेथें त्यांनीं मसलत करून **भाऊसाहेबांस** कसें पत्र पाठवावें याचें खलबत केलें; आणि पत्र लिहिलें तें, "**नबाब वजीर** विश्वासु मित्र आहे. तो विश्वासघात करून **भाऊसाहेबांस** फसविणार नाहीं. तेव्हां तुम्ही हल्लीच करणार, तर आम्हांकडून होईल तितकी मदत करण्याचा प्रयत्न करूं. आम्ही तुम्हांस कोणत्या रीतीनें मदत करूं, हें पत्रीं लिहून बद्ध होत

नाहीं. परंतु, विशेषतः होळकराकडे नजर ठेवूं. होळकर निमकहराामपणानें वागला, तर भाऊसाहेबांच्या सुदैवाचा तारा सुप्रकाशित होईल, ह्यांत संशय नाहीं."

अशा मजकुराचें पत्र लिहून तें काशीराय घेऊन जात होता. परंतु, तितक्यांत सुभ्यानें त्यास थांबविलें, आणि तें पत्र स्वतः घेऊन तो लालनच्या तंबूकडे निघाला. असें करण्यांत त्याचा काय हेतु होता, तें जगदीश जाणे. समयीं काशीरायाविषयीं त्याच्या मनांत अंदेशा आला असावा; अथवा मीरइमाम तोंडीं कांहीं सांगावयाचें असेल म्हणून त्यानें तसें केलें, हें समजत नाहीं. जातां जातां त्यास दुसऱ्या तंबूंत कित्येक लोक कुजबुजत आहेत, असें समजलें. म्हणून त्यांचें भाषण ऐकण्याकरितां तो तेथेंच उभा राहिला.

**एक गृहस्थ**—खोजारोपन, मी सांगतों ती तीच स्त्री. ती माझ्या प्रीतींतील होती. मी तिला चांगली ओळखतों. विनाकारण वेषांतर करून भाऊच्या छावणींतून ती इकडे येईल, असें बिलकुल होणार नाहीं. काय कारण तें मात्र समजत नाहीं. आतां एका तासांत माझा पुतण्या हणमंता भाऊच्या छावणींतून येईल, तेव्हां चटसारें समजेल. सुभ्याचा मराठ्यांकडे फार ओढा दिसतो.

**दुसरा गृहस्थ**—तें कांहीं सांगावयास नकोच; दिसतेंच आहे. रोहिल्यांच्या लढाईंत सफदरजंगाच्या मदतीस अजमिराहून जयापा शिंदा निघाला, तेव्हां शिंद्याच्या घोडेस्वारानें माझ्या बापास व बंधूस ठार मारिलें.

तेव्हांपासून मराठ्यांचा व आमचा वेबनाव. त्यांचा सूड उगविण्यास ही संधि फक्कड आहे.

**खोजारोपन**—तुमची खातरी आहे, तर. तुम्ही आपल्या धन्यास कां सांगत नाहीं बरें? मी जातों ह्मणतों, तर मला तरी जाऊं द्यावें. त्यांस हें समजतें, तर तिला येथेंच किंवा मराठ्यांच्या छावणींत जातांनाच पकडलें असतें. धन्यास हें वर्तमान समजेल, तर तो आमचे खिसे मोहरांनीं भरील.

**प० गृहस्थ**—उतावळिपणा करण्यांत कांहीं हांसल नाहीं. समयीं, ती आज जाणार नाहीं; आणि ती आहे तेथून तिला पकडून नेणें तर फार मुष्किल. बहुधां ती प्रातःकाळपर्यंत येथून जाणार नाहीं; आणि गेलीच, तर आपण तिला पकडूं. ती येथें राहिली, तर आम्हांस बरीच खबर समजेल. इतक्यांत हणमंताही येईल. तो तिच्या येण्याचें खरें कारण सांगेल. धीर धरा भाई; मग पहा कशी मजा उडते ती!

**सुजाउद्दवल्यानें** कमरेची तरवार काढून हळूच तंबूची कनाथ चिरली आणि आंत पाहिलें तों, तिघे गृहस्थ चिलीम फुंकीत पडले आहेत असें त्याच्या दृष्टीस पडलें. जवळ एक परसा पेटत होता. ते जानेवारींतील कडक थंडीचे दिवस. परशाच्या उजेडांत त्यानें प्रख्यात गुप्त हेर (जाट) बीरबलास ओळखिलेंच. सुभ्याचें मन त्यामुळें फारच घोटाळ्यांत पडलें. त्याची मानसिक चिंता फार वाढली. न जाणो आपल्या कारस्थानांतील एक शब्द जरी बीरबलास समजला, तरी तो अफगाण शहास किंवा आपला प्रतिस्पर्धी नजीबउद्दवला यांस सांगेल;

आणि मग आपल्या **वाजिरीस** धोका बसून कोणता प्रसंग कसा येईल याचा नेम नाहीं. तशांत **भाऊचे** गुप्त हेर आपल्या तंबूंत आहेत, ही पंचाईतच. आपला **भाऊशीं** पुष्कळ पत्रव्यवहार चालतो हें **अहमदशहास** जरी चांगलें माहीत आहे, तरी आजपर्यंतचा सर्व पत्रव्यवहार शहाच्या हिताचा किंवा त्याच्या इत्तल्यानें लिहिलेला. हातांतील पत्राविषयीं त्यास बिलकुल माहिती नाहीं. तशांतही, कित्येक गुप्त पत्रव्यवहारांची आपण त्यास दादही लागूं दिली नाहीं. आज हातीं पत्र आहे त्याचा मतलब शहास समजला, तर **मुसलमानांचा** सर्व नाश. मला बातमी समजली असून ती मीं न सांगतांना **बीरबलनें** सांगितली ह्मणजे तर सर्वच फजिती. **मीरज्ञा** स्त्री आहे, हें **बीरबलास** माहीत. तो तिला पकडण्याच्या खटपटींत होता व आहे. तेव्हां जर कदाचित् त्याच्या कर्मास यश आलें, तर कागद बिनचुक सांपडणार. समयीं, **मराठ्यांचा** हल्ला कोणत्याही कारणानें थांबला आणि **बीरबल** यशस्वी झाला, तर तोंड दाखविण्यासही जागा रहाणार नाहीं. इत्याद्यनेक लफड्यांनीं—संकटांनीं—**सुभ्यास** कांहींच सुचेना.

इतक्यांत **बीरबल** ह्मणाला, "देव करो आणि **नजीबउद्दवला** दारू पिऊन तर्र न होवो. तो थोड्या शुद्धींत असला, तरी मी त्याला उठवीन, आणि आपण विचार करूं" हे शब्द कानीं पडतांच **सुजाउद्दवल्याची** पांचावर धारण बसली. तो घामानें चिंब भिजला. शेवटीं, कागद पाठवूं नये, तोंडीच जबाब देऊन मीरज्ञाची एकदम रवानगी करावी, शहास ताबडतोब वर्दी द्यावी,

असें त्यानें आपल्या मनाशीं ठरविलें. उद्यांच्या लढाईचा जसा परिणाम होईल, तसें आचरण ठेवावें. असा विचार तो करितो आहे, तों दूर कोणी ओरडला, "वीरबल! वीरबल काका तुह्मी कोठें आहां?"

वीरबल—हा पहा हणमंत आला. इकडे आहे; बाळ, इकडे ये.

सुजाउद्दवल्यास दे माय धरणी ठाय झालें. त्याचे सर्व विचार जागच्या जागीं थबकले. हातांतील पत्राचे तेथेंच त्यानें हजारों तुकडे तुकडे केले. तो तडक लालन होती त्या तंबूंत आला आणि उतावळीनें ह्मणाला, "मीरझा जानबाझ, आतां वेळ दवडण्यांत अर्थ नाहीं. मी तुह्मांस पत्र देत नाहीं. कारण, तुह्मांस पकडण्याचा घाट चालला आहे, असें मी ऐकतों. तेव्हां ताबडतोब चला, आणि माझ्या बंधूस सांगा कीं, "मला सर्व समजलें. देवाची कृपा झाली, तर मी तुमच्या हितार्थ प्रयत्न करीन. परिणाम कोणाच्या स्वाधीन नाहीं. परंतु, मी खातरीनें सांगतों कीं, ह्या लढाईत अफगाणांचा पराभव होऊन मराठे विजयी होतील. याहून जास्त माझ्यानें कांहीं सांगवत नाहीं, किंवा वचनही देववत नाहीं." आतां तुह्मी निघा. तुमची मला फार भीति आहे. तुह्मांस कोणी पकडलें, तर संकट. तुह्मांस 'चोरवाटेनें घेऊन जा' असें मी वेणीमाधवास सांगतों. पुढें अल्ला हाफीज! (ईश्वर संरक्षण करो.)"

लालनची रवानगी करून सुभ्यानें काशीरायास बोलाविलें आणि सांगितलें, "वेणीमाधवास बोलवा आणि सांगा कीं, मीरझा जानबाझ ह्यांस होईल तितक्या

लौकर उटीरखानाच्या तळापुढें पोंचवा. आणि मोतद्दा-रास कळवा कीं, माझ्या घोड्यावर जीन ठेवून तो ताबडतोब घेऊन ये."

काशीराय—गरीब परवर, कांहीं विशेष वर्तमान आहे?

सुजाउ०—आतां मला बोलावयास सवड नाहीं. मीं सांगितलें तितकें लौकर करा. चला लौकर. इतक्यांत बहुधा सर्व समजलें असेल. बोलूं नका; मला होईल तितकें लौकर शहाकडे गेलेंच पाहिजे.

लालनबरोबर जाणाऱ्या लोकांचा तपास न करितां सुभा घाईनें पोषाख करूं लागला. घोडा दारांत खडा होताच. त्यावर स्वार होऊन तो घाईनें पूर्वेकडील तंबूकडे निघतो तों, प्रभातकाळचे तारे चमकूं लागले आणि नगारा वाजला.

---

## प्रकरण ३१ वें.

### पुनः सुटका.

झमरूद एकदम लुतुफउल्लाकडे गेला. त्या वेळीं लुतुफ तन दुरुस्तीमुळें व तारुण्यांत असल्याकारणानें गाढ झोंपी गेला होता. त्याला झमरूदनें अकस्मात उठविल्याबरोबर त्यानें आपल्या हत्यारास हात घातला. परंतु, झमरूदास ओळखल्यावर मागें हात घेऊन तो पुनः निजूं लागला.

झमरूद—(अतिशय घाईनें) मालिक, धनी साहेब! बीरबल तुम्हांस लौकर बोलावीत आहे.

गाढ निद्रेंतून कोणी उठविलें म्हणजे मनुष्य जसा संतापतो आणि त्रासानें बोलतो, तसा लुतुफ म्हणाला "कां, कशाला?"

झमरूद—मालिक, तें मला माहीत नाहीं. परंतु, फारच अगत्याचें काम असावेंसें वाटतें.

लुतुफ—जा, त्यालाच इकडे घेऊन ये. (इतकें होत आहे तों बीरबल (जाट) एकदम आंत आला. त्याला पाहून) बीरबल, कायरे? माझी झोंप मोडं केलीस, तेव्हां कांहीं तरी विशेष काम असावें!

बीरबल—माझ्याजवळ आतां एकेक लाखाच्या अशा दोन बातम्या आहेत. त्या बैरागिणीस मीं आतां पकडून दिली, तर तुम्ही मला काय द्याल? सांगा झटकन्!

लुतुफ—(एकदम झोंपेंतून उठून) मी तुझा खिसा मोहरांनीं भरीन. आतां ती आमच्या दृष्टीस पडेल, तर कसी जाते तें पाहूं! पण ती आहे कोठें?

बीरबल—आहे कोठें? सुजाउद्दवल्याच्या छावणींत.

लुतुफ०—(अत्याश्चर्यानें) ती बटकीची तिकडे कशी गेली?

बीरबल—ती पुरुषवेशानें सुभ्याच्या छावणींत भाऊचें पत्र घेऊन आली आहे. मी नजीबउद्दवल्याबरोबर होतों, तेव्हां तेथें तिला पाहिली.

लुतुफ—आतां ती कोठें आहे, आणखी बरोबर कोण आहे?

बीरबल—मी इकडे येईपर्यंत ती सुभ्याच्या तंबूंतच होती.

**लुतुफ**—अँः कांहीं फिकीर नाहीं. मी तिला **सुभ्या**-च्याच काय पण त्याच्या बापाच्या छावणींतूनही आणीन. ती आमची पळून गेलेली दासी आहे. आमच्या हवालीं करा असें सांगतांच ती त्याला नाक घांशीत द्यावी लागे-ल. समजलास? (**झमरुदा**कडे पाहून)

**झमरूद**, माझीं हत्यारें आण. आणि **घोसमहमदास** सांग कीं, वीस हत्यारबंद लोकांसह तयार रहा.

**झमरूद** जाऊं लागतांच, **बीरबला**नें त्याचा हात धरला आणि म्हटलें "जाऊं नको."

**लुतुफ**—हें काय! भल्या गृहस्था, सांगतोस काय आणि करतोस काय?

**बीरबल**—अहो, तिच्याकरितां **सुभ्याच्या** तंबूंत जाण्याचें कारण नाहीं. आणखी अर्ध्या तासांत ती **म**-**राठ्यांच्या** छावणींत जावयास तेथून निघेल. तिच्या तपासावर मीं **हणमंता**स ठेविला आहे. आम्ही तिला मार्गांतच पकडूं. पण, आणखी एक गोष्ट सांगावयाची राहिली!

**लुतुफ**—ती काय? तुझें कांहीं ना कांहीं लफडें असतेंच.

**बीरबल**—तिनें **सुभ्यास** अशी खबर दिली कीं, मराठे निःसंशय उद्यां लढाई करणार. आणखी **हणमं**-**ता**नें देखील मला असेंच सांगितलें.

**लुतुफखान** तेथेंच चित्रासारखा तटस्थ झाला. त्या ला जाटानें शुद्धीवर आणिलें. तेव्हां तो म्हणाला, "असें असल्यास **सुभा** हें वर्तमान शहास सांगावयास गेला असेल, हें उघड आहे."

**वीरबल**—नाहीं. तो भाऊम मिळून आम्हां सर्वांच्या नाशास प्रवृत्त होतो कीं काय कोण जाणे! अथवा त्यांत ही गोष्टच नसेल. काय आहे तें समजत नाहीं. मध्यरात्रीचे पूर्वीं मराठ्यांचा जामूद तेथें आला होता; आणि तोंपर्यंत सुभा शहाकडे गेला नव्हता, हें मी शपथेवर सांगेन.

**लुतुफ**—तर मग, आतां कसें करावें?

**वीरबल**—आम्ही शहास हें वर्तमान सांगूं; म्हणजे तो मला बक्षीस देईल, आणि तुमचा दर्जा वाढवील.

**लुतुफ**—आह्मी तिकडे गेलों, तर आमची खोटी होणारच. मग **लालन** आमच्या हातीं कशी लागते?

**वीरबल** स्वथ होता. पण, **सुजाउद्दवल्याप्रमाणेंच लुतुफउल्लाची** अवस्था झाली. कर्तव्यानें व अबरूनें एका बाजूस व प्रेमानें दुसऱ्या बाजूस त्याला ओढिलें. शेवटीं नेहमींच्या पद्धतीप्रमाणें प्रेमाचा जय झाला.

**लुतुफ**—माझी माशुक गेली, तर मला काय आग लावावयाची आहे? **वीरबल**, तूं स्वतः जाऊन शहास सांग आणि सन्मान व इनाम मिळीव. हें वर्तमान शेंकडों अमीर त्यास सांगतील. आपल्यास काय? पन्नास लढाया असल्या, तरी मी **बैरागिणीची** पाठ सोडणार नाहीं. पण थांब. आतां **हणमंता** कोठें बरें मिळेल?

**वीरबल**—तुह्मी पूर्वेच्या दरवाजानें जा, आणि **हणमंता, हणमंता**, ह्मणून तीनदां हांका मारा; ह्मणजे तो तुह्मांस मिळेल. मी जातों तर.

**लुतुफ**—हो, बेपक! अरे **घोसमहमद**, वीस विश्वासु

व हिंमतदार लोक तयार कर. अरे, **सैतानजादा बनरोझी**, घोड्यावर सामान चढवून लौकर आण.

**नोकर**—लोक आणि घोडे तयार आहेत. हुजूर, इतक्यांत ते येथें येतील.

**लुतुफउल्लानें** पोषाख केला. सर्व शस्त्रास्त्रें घेतलीं. इतक्यांत **घासमहमद** व घोडे आले. **लुतुफखान** एका घोड्यावर बसला. त्यानें **झमरुदास** घस्त घालावयास बोलाविलें व तो तयार झाला. आतां **खानसाहेब** घोडा पिटाळणार इतक्यांत एक **स्वार** दौडत आला, आणि **लुतुफउल्लास** दुरून पाहून मोठ्यानें ओरडून ह्मणाला, "मी आलों थांबा" तरी **लुतुफखानानें** घोडा दामलाच. तेव्हां तो **स्वार** पुनः ओरडून ह्मणाला "अहो, तुह्मी **लुतुफउल्लाखान** असाल, तर तुह्मांस दुनियेच्या **खाविंदांनीं** आतां असाल तसेंच बोलाविलें आहे."

**लुतुफखानास** नाइलाजास्तव घोडा फिरविणें भाग पडलें. इतक्यांत एक मनुष्य मोठ्यानें ह्मणाला "काका, अहो काका," "हरामखोर, कां उगाच ओरडतो आहेस?" हे **लुतफचे** रागाचे शब्द ऐकतांच, ओरडणारा इसम धांवून फार दमल्यामुळें त्याच्या तोंडानें जरी शब्द निघत नव्हता, तरी पण पोपलझाई सरदाराच्या प्रश्नाचें त्यानें उत्तर दिलें. तो ह्मणाला, "ती **स्त्री-बैरागीण**-मवांत्र तेथून गेली.

**लुतुफ**—( आपल्याशींच ) सर्व मसलत फसली. नशीब दोन पावलें पुढेंच! आतां **अहमदशहाचा** हुकूम अमान्य करावा, तरी पंचाईत. न जावें, तर संधि जाते. काय करावें?

यांप्रमाणें लालन लुतुफच्या हातून तीनदां सुटली. तेव्हां तो दांत ओंठ चावीत शहाच्या तंबूकडे निघाला.

# प्रकरण ३२ वें.

## युद्धारंभप्रभात.

ते दिवशीं बादशहा मध्यरात्रपर्यंत जागा होता. निजावयास जातांना त्यानें आपल्या लोकांस ' पहांटेस लवकर उठवा ' असें सांगितलें होतें. त्याप्रमाणें पांचांच्या सुमारास प्रातर्विधि आटपून बादशहाची स्वारी नित्यनेमाप्रमाणें लाल तंबूंत ईश्वराची प्रार्थना करावयास गेली. अशा वेळीं सुजाउद्दवला तेथें जाऊन पोंहचला. निमाज पढावयास किंचित अवकाश असल्यामुळें शहानें त्याची खबर शांतपणें ऐकली. परंतु, मराठ्यांच्या सरसेनापतीचा कागद पहातांच त्याचें मन दचकलें. तथापि त्यानें आपल्या लष्करास एकदम तयार होण्याचा हुकूम दिला. अमीर-उमरावांस आमंत्रण पाठविलें. सुभ्याबरोबर लाल तंबूंत कसाबसा निमाज पढून उभयतांही तेथून निघाले. त्या वेळीं अरुणोदयाचा सुमार झाला होता. परंतु, हिंदुस्थानच्या ऋतुप्रमाणें दहिंवर पडल्यामुळें फार दूरचें कांहींच दिसत नव्हतें. जवळच्या छावणींतील नगारा मात्र ऐकूं येत होता. इतक्यांत लुतुफखान तेथें आला.

अहमदशहा—आतां तेथें फार वेळ राहणें ठीक नाहीं. मला कोणी हुक्का आणून देईल काय? मी अजून हुक्का प्यालों नाहीं. चला आपण रणस्तंभाकडे जाऊं.

"अरे हुक्का, अरे हुक्का; जगाच्या धन्यासाठीं कोणी हुक्का आणतो आहे काय?" असें कितीएक एकदम ह्मणाले.

कोणी हुक्का आणीत नाहीं, असें पाहून लुतुफउल्ला-खान हुक्का घेऊन आला.

लुतु०—घोसमहमद, तुमचे लोक घेऊन पुढें चला; आणि जिकडे तिकडे खबरदारीनें रहा. अंधार आहे. खांचखळ्गे संभाळा बरें!

तेथें जमलेली मंडळी सर्व तयारी करावयास जाणार इतक्यांत कितीएक अफगाण लोक शस्त्रास्त्रें, शेले, शाली, दुपेटे वगैरे लूट घेऊन आले. त्यांच्या मागून बायका-पोरां-चा हलकल्लोळ चालला होता!

बायकांस छावणींत आणण्याचा शहा फार तिरस्कार करीत असे. परंतु, तो आणीबाणीचा प्रसंग असल्यामुळें, ह्या वेळीं त्यानें तिकडे अलक्ष्य केलें, आणि आलेल्या लोकांस विचारिलें "मराठ्यांकडील काय खबर आहे?"

अफगाण—बादशहा सलामत, देव अशीच आपली बढती करो. काफर पळून जात आहेत. आह्मी त्यांच्या तपा-सावर होतों. तीन वाजल्यापासून कर्नाल रस्त्यावर लोकां-ची फार रहदारी आहे. तेथूनच आह्मीं लूट आणिली व आणखी दुसरे पुष्कळ आणीत आहेत. जहांपन्हास के-वळ सूचना करण्यास आह्मी आलों.

बादशहा—(सुजाउद्दवल्याकडे वळून) नबाब-साहेब, हें असें कसें? मराठे लोक लढाईस येणार असें तुह्मी खात्रीनें सांगतां; आणि हे सांगतात कीं, ते निघाले. ह्यांत खरें काय समजावें?

**सुजाउद्दवला**—मला जें समजलें, तें मीं सांगितलें.

इतक्यांत इब्राहीम (प्रधानपुत्र) याच्या पायदळावर गोळ्यांचा वर्षाव होऊं लागला. तेव्हां शुजाउद्दवल्याचें ह्मणणें खरें, अशी शहाची खातरी झाली.

**सुजाउद्दवला**—दयासागर, ऐका.

**अहमदशहानें** हुक्क्याची नळी एकीकडे केली आणि हंसत ह्मटलें "तुमचें सांगणें खरें साहेब. अल्ला हो अकबर, त्यांचें आगमन फायदेशीर होवो!"

बंदुकांच्या वर्षावांत सूर्योदय झाला. **उटीखान** शहाकडे येऊं लागला. भालेवाले **मराठे**, त्यांच्या मागें लागले होते. गार्दी लोकांनीं, तोफखान्याची व्यवस्था केली आणि लोकांचे आवाज ऐकूं येऊं लागले.

आपल्या सेनेस समरक्षेत्रांत येण्याचा हुकूम करून **शहा** पुनः लाल तंबूंत गेला. आपल्या रक्षकांस त्यानें कामावर नेमिलें. आणि एका हातांत दुर्बीण व दुसऱ्या हातांत हुक्का घेऊन तो **मराठ्यांची** हालचाल पाहत हुक्का पीत राहिला.

तो हुक्क्याचा दुसरा धूर सोडितो आहे तों मैदानांत लोक जमले. **उटीखान** व त्याचा बाप **शहावली** हे फौजेची देखरेख करीत होते.

# प्रकरण ३३ वें.

## दोन्ही सेनेची स्थिति.

दोन्ही सेना युद्धव्यापारास उत्सुक झाल्या होत्या. मराठे आपला तळ हालवून यमुना नदीकडे चालत जाण्याचा मार्ग आपल्या स्वाधीन ठेवणार नाहींत, तर त्यांस मागें फिरतां येणार नाहीं; अशी अहमदशहाची समजूत होती. इतक्याकरितांच ते आहेत तेथेंच त्यांवर हल्ला करावा, असा शहानें विचार केला. युद्धारंभापूर्वींच हा विचार ठरला असल्यामुळें, मुसलमानांनीं पहिल्या तडाक्यासच आपला हेतु सिद्धीस नेला.

लढाईची जागा छावणीपासून एक हजार हातांच्या अंतरावर होती. ती स्वाधीन करून मराठ्यांस नदीकडे जावयास सांपडूं नये अशी तजवीज करावी, अशा इराद्यानें मुसलमान पुढें गेले. तेथून शहाचा तंबु फक्त दोनशें हातांवर होता. रोहिले उजव्या बाजूस होते. त्यांचें आधिपत्य बरखुदारखान, उमरबेग, धोंडीखान, हाफीजरहिमत व अहमदखान बंगस ह्यांकडे होतें. हे लोक अशिक्षित परंतु दृढनिश्चयी होते. मारावयाचें किंवा मरावयाचें इतकेंच त्यांस माहीत. त्यांच्या मागें कडाबीन, तेगा, भाले, तरवारी व ढाली यांहीं सज्ज असें पायदळ होतें. पायदळामागें वजीर शहावलीखान होता. त्याच्या ताब्यांत फक्त अफगाण लोक असून त्यांत घोडेस्वार फार होते. त्यांना नादीरशाही तालीम मिळाली असून त्यांतील कित्येक लोक मोठमोठ्या लढायांत विजय संपादन

केलेले होते. त्यांच्या मागें जुन्या पद्धतीच्या मोंगल लष्करासह नबाब वजिराची फौज होती. तिनें खांड, पिस्तोल, भाला व बर्ची ह्या आयुधांसंबंधांचें चांगलें शिक्षण मिळविलें होतें. त्यांत पुरभय्या लोक फार असून त्यांकडे तरवारी होत्या. ते एका सपाट्यांत स्वारासह घोड्यास ठार करीत.

लष्कराच्या डाव्या बाजूसही उजव्या बाजूप्रमाणेंच रोहिले लोक होते. त्यांचें आधिपत्य नजीबउद्दवल्याकडे होतें. रोहिले तरवार, बंदुक व संगीन ह्या हत्यारांच्या कामांत निष्णात. त्यांनीं पाण्याच्या झऱ्याजवळची जमीन बळकाविली होती.

त्या लोकांच्या डोकीस लोखंडी टोप होते. मानेवर चादर बांधिली होती. सुजाउद्दवल्याच्या, अहमदश-हाच्या किंवा मराठ्यांच्या तयारीपेक्षां नजीबउद्दवल्याची तयारी तारीफ करण्यालायक होती.

नजीबउद्दवल्याच्या मागचा उजव्या बाजूचा व सुभ्याच्या डाव्या बाजूचा भाग शहा पसंदखानाकडे होता. त्याच्या ताब्यांत पांच हजार घोडेस्वार व पुष्कळ पायदळ होतें. लुतुफउल्लाखान, अल्लादादखान, तोघुलबेग उसबक आणि उमरखान यांचें युसफ-झाईचें लष्कर कठीण प्रसंगीं आपल्या उपयोगीं पडावें ह्मणून अहमदशहानें आपल्या नजरेखालीं ठेविलें होतें.

मराठे हल्ला करिते, तर मुसलमानांच्या फक्त ३५ तोफा त्यांस सांपडत्या. बाकीच्या सर्व तोफा त्यांनीं व्यवस्थेनें लाविल्या होत्या. सुभ्याच्या लष्कराजवळ

हत्ती असून त्यांवर तिरंदाज व बंदुकवाले होते. मुसलमानांची एकंदर फौज नव्वद हजार व तोफा ८० होत्या.

"दीन, दीन" असा शब्द होईपर्यंत मुसलमान स्वस्थ होते. मराठ्यांचीं रणवाद्यें सुरू होतीं. वारंवार विजयध्वनि होत आणि बंदुका सुटत.

मराठ्यांकडे सत्तर हजार घोडेस्वार, तीस हजार पायदळ व एकशेंपन्नास तोफा होत्या. छावणींत पन्नास तोफा ठेवून ते हळू हळू मुसलमानांकडे येऊं लागले. इब्राहीमखानाचें सैन्य पुढें होतें. दमाजी गायकवाड उटीखानाच्या मागें लागला. त्यानें आपल्या दहा हजार लोकांच्या चार टोळ्या केल्या. दोन पुढें आणि दोन मागें. त्यांच्यामध्यें घोड्यावरील तोफखाना होता. त्याच्या मागें लहान घोडेस्वार. मध्यें उंटावरील तोफखाना. त्या मागें विंचुरकर व मराठ्यांची बहादर खासपागा असून ती सदाशिवराव व विश्वासराव ह्यांच्या स्वाधीन होती. त्यांजवळ भगवा झेंडा फडकत होता. जवळच यशवंतराव पवार समशेरबहादर व दुसरे लहानमोठे सरदार होते. त्यां मागें मल्हारराव होळकर आणि होळकराच्या पिछाडीस जनकोजी व महादाजी शिंदे हे होते.

मराठ्यांच्या कवायती घोडेस्वारांशिवाय समशेरबहादराचे घोडेस्वार, रजपूत लष्कर आणि महादाजीच्या ताठ्यांतील मुसलमानी लष्करांतील घोडेस्वार व पायदळ एकत्रच होते. त्यांनीं त्याचे निरनिराळे भाग केले नव्हते. घोडेस्वार व पायदळ एकत्र चाले. त्यांजपाशीं बंदुक, तरवार, भाले व ढाला होत्या. एकंदरींत दोन्ही फौजेंची तुलना केली, तर मुसलमानांपेक्षां मराठ्यांचें सामर्थ्य कमी

होतें. परंतु, त्यांची सहनशीलता व शस्त्रे चालविण्याची कुशलता स्तुतिपात्र होती.

---

## प्रकरण ३४ वें.

### जयभवानी.

अफगाणी लोकांनीं कडेकोट तयारी केली असें पहातांच मराठ्यांनीं छापा घालण्याचा विचार तहकूब करून प्रथमतः सेना रचनेंत फेरबदल केला. त्यांचा मुख्य भाग हळूहळू पुढें जात होता. त्यामागें जे लोक होते, ते उजव्या बाजूस वळले आणि तिकडेच एक रांग लागली. उजव्या बाजूस उंटावरील तोफखाना नेला; आणि मोठमोठ्या तोफांची आग सुरू झाली. परंतु, दोन्ही फौजा परस्परांपासून दूर असून त्यांमध्यें किल्ल्याकोटाची कांहींच दगदग नव्हती. मराठे पुढें चाल करीत होतेच; ह्यामुळें प्रथमचा बेत दोन्ही फौजांस बदलावा लागला. तरी त्या धांदलींत उभयपक्षांचें सांगण्यासारखें नुकसान झालें नाहीं. तोफांच्या धुरांत मराठ्यांचें कवायती पायदळ रोहिल्यांपासून सहाशें हातांवर आलें.

तेव्हां इब्राहीमखान गारदी आपलें स्थळ सोडून भाऊसाहेबांकडे आला. सदाशीवराव व विश्वासराव हत्तीवरील हौद्यांत बसले होते. त्यांस ऐटीनें सलाम करून व शत्रूकडे हात दाखवून खान म्हणाला " परशुराम अवतार, मी मुसलमान आहें, मराठा नव्हे. माझे लोकही

परदेशी आहेत. तुमचे कित्येक लोक आम्हांशीं कुडाभाव धरितात; आणि त्यामुळें तुमच्या कित्येक सरदारांचे वात्राण मला सहन करणें भाग पडलें. तथापि, हा सर्व कलंक धुऊन टाकण्याचा प्रसंग आज आला आहे. माझ्या ताव्यांतील लोकांच्या हक्कासाठीं किंवा पगाराविषयीं मी तुह्मांला वारंवार त्रास देत आलों; पण त्याचाही मोबदला देण्याची वेळ आज परमेश्वरानें आणिली, ह्मणून मी त्याचा फार आभारी आहें. मौला मालिक! आतां तुह्मी पहाल कीं, आह्मांस दिलेला पैसा पाण्यांत जात नाहीं. आह्मांस त्याचें सार्थक्य करावें लागतें. मला लढावयास हुकूम आहे? "जगदंबेचें नांव घ्या आणि लढाई करून जय मिळवा." असें ह्मणून भाऊनें आज्ञा दिली.

"जय भवानी" असे विश्वासरावच्या तोंडचे शब्द ऐकतांच सर्व सेनेनें जयजयकार केला. इब्राहीमखान आपल्या जागीं जाऊन त्यानें हलका तोफखाना पुढें आणिला आणि एकदम रोहिल्यांवर मारा चालविला.

गार्द्यांचा मार रोहिल्यांस सहन करवेना! ते मागें हटले आणि त्यांच्या पिछाडीस जे लोक होते, त्यांत घुसूं लागले.

भयंकर हाणामारी सुरू झाली. रणवाद्यांनीं कानटाळ्या बसल्या. तोफांच्या धडाक्यांनीं भूमी कंपायमान झाली. धुरानें दाहीदिशा धुंद झाल्या. जाग्यावरून हालूं नका, असें रोहिल्यांच्या वरिष्ठानें सांगितलें. परंतु, इब्राहिमाच्या तडाक्यापुढें त्यांचा बिलकुल निभाव ला-

गेना. इतक्यांत बरखुदारखान व अमीरबेग आपली जागा सोडून स्वसेनेचा बचाव करण्याकरितां धांवले. परंतु, इब्राहिमाच्या लोकांपुढें त्यांचाही दम निघेना. हाफीजरहिमत व अहमदखान बंगस तेथून सुमारें एकशेंसाठ हात अंतरावर होते. तेही आपल्या फौजेसह तेथें आले. त्यांची व्यवस्था चांगली होती. त्यांनीं "दीन् दीन्" ह्मणत खानावर हल्ला केला. त्या सपाट्यांत त्यांनीं खानाचे कित्येक घोडे व तोफखान्यावरील लोक ठार मारिले. इब्राहिमाचा घोडा ठार झाला. आणि त्याच्या अंगावर येणाऱ्या इसमास जर दुसऱ्या शिपायानें ठार मारिलें नसतें, तर खानाचीं शंभर वर्षे भरलींच असतीं. आपल्या स्नेहास शत्रूनें मारिलें ह्मणून दुसरा अफगाण त्यास मारण्याकरितां आला. परंतु, इब्राहिमानें त्यावर पिस्तोल झाडिलें. गोळी छातींत बसतांच तो पडला. "तोफा व बंदुका सुरू ठेवा आणि संगीन घेऊन पुढें व्हा" असा इब्राहिमानें हुकूम केला. पिछाडीचा तोफखाना बंद करून हाफीजरहिमत व बरखुदारखान पुढें आले. परंतु, इब्राहिमाचा मार त्यांसही असह्य झाला, ह्मणून ते मागें हटले. तेव्हां जयघोष करीत दमाजी गायकवाडानें आपलें सैन्य पुढें नेलें. अफगाणांची उजवी रांग ढांसळली. त्यांतील पुष्कळ लोक मेले व घायाळ पडले. कित्येक पळून जात असतां त्यांस मराठ्यांच्या भाल्यांनीं ठार केलें.

जय, आशा व उत्साह यांच्या योगानें अंतःकरण प्रफुल्लित झाल्यामुळें सदाशीवराव व विश्वासराव शुजावलीशीं मोठ्या निकरानें लढूं लागले.

रोहिल्यांची पिछेहट झाली. आतां उजवी बाजू सफाई आहे असा विचार करून इब्राहीमखान आपल्या लष्कराची सुधारणा करूं लागला. दमाजी गायकवाड मागें न फिरतां अफगाणांवर हल्ला करिता आणि त्याच्या मदतीस इब्राहीम जाता, तर तोफांच्या मारानें व भाऊसाहेबाच्या हल्ल्यानें वजिराचा सर्वथैव पराभव झाला असता. असो; आतां काय होईल तें होवो पण मागें हटावयाचें नाहीं, असा दृढ निग्रह करून अफगाण लढत होते. शत्रूप्रमाणें मराठे फार त्वरेनें पुढें गेले नव्हते. तरी त्यांची चाल चांगल्या जोमाची होती. अफगाणांप्रमाणेंच त्यांचाही हेतु मरूं किंवा जय मिळवूं असा होता. ते देहभानावर नव्हते. पुढें सांपडेल त्याचा प्राण घ्यावा, इतकेंच त्यांस सुचत असे. कित्येकांचीं पागोटीं गळ्यांत आलीं होतीं. पण, त्याविषयीं त्यांनीं मुळींच पर्वा केली नव्हती.

सर्व मराठ्यांच्या गळ्यांत हार होते. सर्वांनीं केशरी केले होते. सूर्याच्या दिव्य तेजानें धुकें नाहींसारखें झालें. धुरानें व धुरळ्यानें एकच गर्दी केली. इतक्यांत मराठे जयगर्जना करीत व रणवाद्यें वाजवीत शहा वजिराशीं लढण्यासाठीं पुढें सरसावले.

दोन्ही फौजा अगदीं जवळ आल्या; तरी धुरळ्यामुळें स्पष्ट कांहींच दिसत नव्हतें. तरवार, भाले, वर्च्या, बंदुका आणि तोफा ह्यांची खणाखणी चालू झाली! दोन्ही पक्ष एकत्र झाले. शत्रु कोण व मित्र कोण, हें ओळखवेना. "हरहर महादेव! या अल्ला! दीन! अल्ला हो अकबर! जय भवानी!" असे वारंवार शब्द होत.

मराठे, घुराची व धुरळ्याची बेपर्वा करून लढतां लढतां मुसलमानांच्या छावणीकडे वळले. त्याबरोबर मुसलमान खवळले. त्यांनीं आपली पराकाष्टा केली. परंतु, त्यांच्या जाज्वल्य हत्यारांस न जुमानितां आणि त्यांच्या शौर्याची व सामर्थ्याची पर्वा न ठेवितां फळी फोडून मराठ्यांनीं अफगाणांस मागें हटविलें. "जय! जय! म्लेंच्छांस ठार मारा! धरा! मारा!" अशा वीरश्रीच्या शब्दांनीं तें रणमैदान अगदीं दणाणून गेलें होतें.

आपले लोकांची पिछेहट झाली असें पहातांच, शहावली दांतओंठ चावूं लागला. त्यानें आपली दाढी तोडिली. शिव्याशाप दिले. मणगट चावून रक्तबंबाळ केलें. त्याच्या मुलानेंही चांगला पराक्रम केला; परंतु व्यर्थ. मराठ्यांची झुंड "हरहर महादेव!" ह्मणत झंजावातासारखी आंत घुसून समोर सांपडेल त्यास ठार मारूं लागली. तेव्हां उदीखानाचे लोक "पळा, पळा! येथें रहाल तर मराल! मार्ग सांपडेल तिकडे पळा!" असें ओरडून पळूं लागले.

इतक्यांत "नबाब वजीर" असा शब्द ऐकूं आला. तो मागें पहातो तों काशीराय.

वजीर—तुह्मी कोणाला पहातां? तुह्मी लढावयास आलां, कीं तुमचे जातभाई आमचा पराभव करितात तें पहावयास आलां? उझ बिलाही मीनखस सैतान! (देवा, ह्या सैतानांच्या हातून सोडीव.)

काशीराय—नबाब वजीर, तुमच्या स्थितीचा विचार करावयास सुभ्यानें मला पाठविलें आहे.

वजीर— (संतापानें) स्थिति ! माझी स्थिति फार खराब आहे. पण, ईश्वर मालक आहे. तो सत्यसंरक्षक आहे. त्याला सांगा कीं, तूं जातीचा मुसलमान असशील, तर ह्या वेळीं मला मदत करशील व भाऊवर हल्ला करशील ! जा.

इतकें बोलून वजिरानें मागें फिरलेल्या लोकांस उत्तेजन देण्याकरितां आपला घोडा तिकडे फिरविला. परंतु तेथें लोकांची संख्या फारच वाढली. आणि त्यांच्या मागें सदाशिवराव व विश्वासराव लागले. ते हत्तीवर होते "जय भवानी" आणि "म्लेंच्छांस ठार मारा" ह्या वाक्यांची गर्जना सुरू होतीच.

वजीर घोड्यावरून उतरला आणि जवळ पडलेल्या घायाळांकडे पाहून ह्मणाला "बच्चाजी, देवाचें स्मरण करा. येथून काबूल फार दूर आहे. तुह्मी पळून कोठें जाणार !"

वजिराचें भाषण ऐकण्यास घायाळांशिवाय कोणी राहिलें नाहीं. ज्याला जिकडे वाट मिळाली, तिकडे तो गेला.

विश्वासराव—पहा, ते पहा पळतात-मारा ! हाणा! हाच समय आहे.

उटीखानानें आपल्या हातांतील भाला टाकून दिला आणि पित्यास धरून सांगितलें "खुदाखातर माझ्या घोड्यावर बसा." वजिरानें मागें फिरून पाहिलें, तों आपल्या पित्यास घोड्यावर बसविण्याची खटपट उटीखान करीत होता. पण, इतक्यांत विश्वासरावानें बंदु-

क झाडिली. त्याबरोबर उटीखानाच्या हातून अंगरखा सुटला आणि त्याचा पिता जमीनदोस्त झाला.

"वजिराम संभाळा !" असें जवळचा एक शिपाई मोठ्यानें ह्मणाला. मराठ्यांच्या तडाक्यांत वजीर सांपडला. परंतु, त्यास कोणी मागें ओढिलें. तव्हां विश्वासरावाचे लोक अफगाणांस मेंढरांप्रमाणें कांपीत होते. शेवटीं अफगाणांचा मोड होऊन त्यांस मागें परतावें लागलें.

---

## प्रकरण ३५ वें.

### जंगी लढाईचा शेवट

मराठ्यांचा पहिला हेतु सफल होऊन यमुनेकडील मार्ग मोकळा झाला. विजयदेवीनें इतका वेळ त्यांस कृपा दृष्टीनें पाहिलें. अशाच संपानें व जुटीनें ते हल्ला करिते, तर अफगाणांस उजवी बाजू सोडून डाव्या बाजूस जावें लागतें इतकेंच नव्हे, पण लढाईचें मैदानही सोडणें भाग पडतें. त्यांच्या उजव्या बाजूच्या तुकडीचा पराभव झाला तरी ते लढत होते; परंतु, त्यांनीं जी जागा बळकाविली होती ती सोडून प्रथम ते जेथें उभे होते तेथपर्यंत मागें हटले. सदाशीवराव व विश्वासराव उत्तर दिशेस केवळ युद्धाच्या तोंडीं होते. त्यांनीं चांगल्या जोमानें हल्ल्यावर हल्ले करून शत्रूंस पश्चिमेच्या बाजूस हांकून लाविलें. परंतु, लढाईचा परिणाम सुजाउद्दवल्याच्या लष्करावर अवलंबून होता. दोन्ही सेना चमत्कारिक

रीतीनें परस्परांशीं लढत होत्या. साधारण नुकसान होऊन मराठ्यांस जय मिळेल, असें नबाब वजिरास वाटत होतें. मल्हारराव आणि त्याचा पगडी-भाऊ नजीबउद्दवला ह्यांत असा संकेत ठरला होता कीं, मल्हाररावानें तिऱ्हाइताप्रमाणें वागावें आणि त्यास पळून जातांना नजीबानें हरकत करूं नये. ह्या कपटप्राचुर्य संकेतावरून असें ह्मणतां येईल कीं, हे दोन्ही पुढारी औदासिन्यानें, अनास्थेनें व निष्काळजीपणानें आपलें काम करीत होते. लढाईस गेलें तर हातपाय तरी हालविले पाहिजेत, ह्मणून ते मागें जात, पुढें येत. गोळागोळीचा प्रसंग आलाच, तर आकाश मोकळें. फारसें पुढें जावयाचें नाहीं आणि मागें ही हटावयाचें नाहीं. पण हे योद्धे अशा प्रपंचानें वागत होते, ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. होळकरासारखे सर्वच लोक नव्हते. त्यांत कित्येक स्वराज्यनिष्ट व अभिमानी पुरुषांचीं शस्त्रें चमकत होतीं. त्यांना कीर्तीची आवड होती. त्यांनीं चांगल्या उमेदीनें दोन तीन वेळ हल्ले केले. परंतु, त्यांचें व्हावें तसें चीज झालें नाहीं.

वजिराचें सैन्य जेथें लढत होतें, तेथें फक्त खासपागा, हत्ती व भगवा झेंडा लढत होता. पण, जयापजयाविषयीं कांहींच समजलें नाहीं. युद्धाच्या खऱ्या निकालाविषयीं सुजाउद्दवला घोंटाळ्यांत पडला. कोणता पक्ष विजयी झाला व कोणता पराभूत झाला, हें त्यास यथार्थ समजलें नाहीं. त्याचा निकाल समजावा, इतक्यासाठीं त्यानें काशीरागास पाठविलें होते. त्यानें सर्व हकीकत सांगितली आणि पळपट्या लोकांस पहातांच सुजाउद्दवल्याची खातरी झाली.

तेव्हां दोन्ही डगरीवर हात ठेवणाऱ्या किंवा वडवाग्नुळाप्रमाणें आचरण ठेवणाऱ्या कावेबाज, मतलबी व स्वार्थसाधु सुजाउद्दवल्यानें भाऊसाहेबाकडे दुसरा संदेश पाठविला. त्यांतील मतलब इतकाच होता कीं, "तुह्मी जय मिळविला ह्मणून मी तुह्मांस हजारों धन्यवाद देतों. आणि माझी खातरी चाळगाल व माझें मित्रत्व विसरणार नाहीं, अशी मला फार आशा आहे." जासूद निरोप पोंचवून आला, तरी आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें तो पाव तास विचार करीत होता. आपल्या शहाणपणाची व धूर्ततेची तो मनांत तारीफ करीत आहे, इतक्यांत युद्धाचा पूर्व रंग बदलला. त्यास एक पाऊल मागें किंवा पुढें टाकावयास धैर्य नव्हतें. पुढें कसें करावें अशा विचारलहरींत गटकळ्या खात असतां मल्हारराव होळकराच्या सेनेनें पिछेहट करण्याचा बावटा लाविला. होळकरानें मागें पाय काढिला, तरी सुजाउद्दवल्यास पक्की खातरी पटेना. त्याच्या फौजेंतील मोठमोठ्या सरदारांनीं त्यास होळकराचा पाठलाग करा असें सुचविलें; तेव्हां तो आपली असाधारण युक्ति पार पाडण्याकरितां तेथेंच राहिला. वजिराच्या फौजेस मागें हटवीत मराठे शहाच्या लाल तंबूजवळ आले. तेथें प्रसंगीं उपयोगीं पडावें ह्मणून जें बरेंच सैन्य शिल्लक ठेविलें होतें, त्याशीं मराठ्यांचा हातघाईचा प्रसंग आला. सदाशीवरावानें मातबर लढाई दिली. तो तोंडानें "म्लेंच्छांस ठार मारा!" ह्या मंत्राचा जप करीत होता आणि हातानें त्याचीं मारक शस्त्रें शत्रूंचा संहार करीत होतीं. त्यानें धुराची पर्वा केली नाहीं, धुरळ्यास जुमानलें नाहीं,

किंवा क्षणेक विश्रांति घेतली नाहीं; जिकडून तिकडून तो संकटांत होता, तरी त्याविषयीं त्यास बिलकुल फिकीर नव्हती. तो आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजावीत होता. इब्राहिमाच्या सेनेनें विपक्षाचा पराभव केला, तरी त्याचीही खराबी बरीच झाली होती. दारुण युद्धानें ते लोक थकले आणि तेथेंच स्वस्थ राहिले. भाऊसाहेबाच्या मदतीस जावयास त्यांस मुळींच सवड नव्हती. यमुनेकडे वळणाऱ्या रोहिल्यांच्यामागें लागून दमाजी एक मैल दूर गेला. आपण कोणत्या स्थितींत आहों, आपल्याजवळ कोण आहे किंवा आपल्या मदतीस कोण येण्याचा संभव आहे, हा विचार भाऊनें पाहिलाच नाहीं. लढाईच्या त्वेषानें तो जिकडे मार्ग सांपडेल तिकडे निघाला. खरोखर आपल्या स्थितीचा तो विचार करिता, तर त्याची अशी पंचाईत होती ना. पाण्यांत बुडणारा मनुष्य लाटांस धरून जसा आपला बचाव करूं पहातो, तशीच सदाशीवरावाची अवस्था झाली. भाऊ घोटाळ्यांत होता. तेव्हां त्याकडे सुजाउद्दवल्याचा जासूद आला. सुजाउद्दवल्याच्या सांगण्यावर भाऊनें सर्व विश्वास ठेविला. सुभ्याच्या लष्कराजवळून होळकरास जाऊं द्यावें, व आपण शहाच्या मदतीकरितां शिल्लक ठेविलेल्या सेनेवर हल्ला करूं तेव्हां मदत करावी, असा भाऊचा विचार झाला. त्या वेळच्या लढाईचा विचार केला, तो प्रसंग मनांत आणिला, ती स्थिति पाहिली, तर भाऊचा बेत सर्वांशीं योग्य आणि फायदेशीर होता. आणि मल्हारराव होळकर निमकहलालीनें वागतां, त्यानें विश्वासघात केला नसता, तर पानिपतच्या दारुण

युद्धक्षेत्रांत मराठ्यांच्या शक्तीची कीर्ति अजरामर होती. भाऊचे सर्व हेतु सफल होते व अफगाणांचा नायनाट होता. भाऊच्या लौकिकास मग सीमाच नव्हती. पण, करितात काय? नशीबानें हात सोडिला! लाल तंबूंत खुरासानचा बादशहा हुक्का पीत दुर्बीण लावून बसला होता. मराठ्यांच्या कीर्तिसूर्यास ग्रासणारा तो केतु तेथूनच सर्व हालचाल पहात होता. गार्द्यांचा हल्ला पाहून त्यानें त्यांस मान दिला. रोहिल्यांच्या पळापळीकडे धिःकारानें पाहिलें आणि दमाजी छावणीकडे न येतां परस्पर गेला ह्मणून समाधानही मानिलें. आपल्या लोकांचें लढाऊ सामर्थ्य, त्यांची शस्त्रास्त्र निपुणता, त्यांची टापटीप इत्यादि सर्व प्रकार तो बारकाईनें पहात होता. आपल्या लोकांच्या पराजयानें त्याचें चित्त खवळलें. तो रागानें लाल झाला. दांतओंठ चावूं लागला. त्यानें दुर्बीण बाजूस ठेविली आणि नेत्रांनींच काय तें पहावें, अशा इराद्यानें तो तेथून उठला. इतक्यांत मराठ्यांनीं त्याच्या लोकांस दाबून टाकिलें, तरी त्यानें मदतीची सूचना केली नाहीं. शहावली मागें हटला. त्याच्या लोकांनीं मदतीसाठीं विनंति केली. तेव्हां शहा ह्मणाला "ह्या गोष्टींत तुमचे सल्ल्याची मला जरूर नाहीं; त्याचा विचार मी करीन. देवाच्या मर्जीप्रमाणें तो करील. तुह्मी आपल्या जागीं जा आणि लढाईचा हुकूम होतांच लढण्याची तयारी करा."

इतक्यांत दुसरा एक स्वार भरधांव घोडा टाकीत आला. तो व त्याचा घोडा धुरळ्यानें भरला होता. बादशहास पहातांच स्वार खालीं उतरला. त्यानें सलाम केला आणि

लगबगीनें आपल्या जखमा दाखवून सांगितलें "जगत्पति, ईश्वराच्या नांवावर वजीर मदत मागत आहे. उटीखान मरण पावला."

शहा ह्मणाला "तर मग, तो स्वर्गीं गेला. त्यानें आपल्या मातेची कूस धन्य केली. शाबास!" पुनः तो हुक्का ओढूं लागला. त्यानें पुनः दुर्बीण उचलून डाव्या बाजूस लावून पाहिलें. तिकडेही रणकंदन माजलें होतेंच. तोफांच्या आवाजावरून व धुरावरून त्यानें तर्क केला कीं, तिकडे महादाजी व जनकोजी नजीबउद्दवल्याशीं लढत असावेत. इतक्यांत मदतीकरितां शिल्लक ठेविलेल्या लोकांवर हल्ला करण्याची मराठे लोक तजवीज करीत आहेत असें त्याच्या अवलोकनांत आलें. सुजाउद्दवला काय करीत आहे, हें त्यास धुरामुळें व धुरळ्यामुळें दिसेना. इब्राहीमखानही उजव्याबाजूस आपल्या लटपटीत व्यवस्थेत होता. परंतु, तो फार तर पांचपन्नास गोळ्या शिलकी लष्करावर टाकील, त्याच्या हातून विशेष कांहीं होणार नाहीं, असें बादशहास वाटलें. दोन्ही बाजूंच्या विपक्षविध्वंसक मोठमोठ्या तोफा जेथें नजीबउद्दवल्याबरोबर शिंदे लढत होते, तेथें होत्या. पण, तिकडे शांत होतें. शत्रु-मित्र एकत्र झाले. सुजाउद्दवल्यानें तोफखाना बंद केला. तेव्हां, पुढें जाण्याच्या घाईत मराठ्यांनीं आपल्या तोफा पुढें न नेतां मागेंच ठेविल्या. पण, भाऊसाहेबाजवळ भालेवाले मराठे जमले.

बादशहा साशंक होता. इतक्यांत नजीबउद्दवल्याकडून सूचना आली कीं, "ह्या बाजूची फीकीर करूं नका. इनशाअल्ला! आह्मीं त्यांस मारून काढिलें, त्यांचें तोंड

काळें केलें! मल्हाररावाकडून एक स्वार आला. त्यानें मला सांगितलें कीं, मीं मागें फिरण्याच्या तयारींत आहें. तो यमुना नदीकडून मागें फिरेल. त्यास दुःख देऊं नये. खाविंदांस माहीत आहेच कीं, होळकराचा मजवर फार विश्वास आहे आणि मीही त्याशीं इमानेंइतबारें वागतों. जगत्पति बादशहानें माझ्या सल्लामसलतीनें वागावें."

आतां ज्या सेनेची स्थिति सांगितली, तिकडे अहमदशहानें पाहिलें. तेव्हां होळकराची फौज मागें फिरत होती आणि इब्राहीमखानाचीही तुकडी मागें वळत होती. त्यास तितकेंच पाहिजे होतें. त्यानें दुर्बीण खालीं ठेविली आणि घोडा आणावयास सांगून ह्मटलें "शहापसंदखानास सांग कीं, तूं वजिराच्या मदतीस जा. तांधूलबेगउझबकास माझ्या सहाय्यास राहूं दे. शहावलीस मदत करण्याची ज्यांची उमेद आहे, त्यांस तो तिकडे पाटवील. महमदअझीझ, तूं दौडत जा आणि सुजाउद्दवल्यास सांग कीं, तूं चांगल्या रीतीनें वागणार नाहींस, शत्रूंस मदत करूं लागशील, तर नादीरची व माझ्या मुलांची शपथ वाहून मी सांगतों कीं, मी तुला दुष्मन समजेन."

अशा सूचना करून शहा शिलकी लष्कराच्या मदतीस गेला.

# प्रकरण ३८ वें.

## दोन्हींकडून फसला.

ह्या लढाईच्या हकीगतीनें मागील चार प्रकरणांत बरीच जागा अडविली; तेव्हां आतां हात अटोपावा हें बरें. भर दोनप्रहरचा समय. सूर्यकिरणमालेनें आपलें प्रखरतर रूप प्रकट केलें. उन्हानें जमीन तापली. तिचें शांतवन रक्तप्रवाहानें होईना. धुरळ्यानें कहर उसळला. लढाईच्या अतिश्रमानें दोन्ही फौजा थकल्या. रक्ताच्या पाटांत घामाचा पूर मिळाला. तृषेनें लोकांच्या गळ्यास कोरड पडली. घायाळांस तर आपले जीव नकोसे जाहले. जे जखमी नव्हते, त्यांच्या घशांत दारूचा धूर भरून कोंडमारा झाला. भाले आणि तरवारींच्या मुठी चोखून तहान भागविण्याची वेळ आली. पाण्याच्या नांवानें जिकडे तिकडे कहर उसळला. कोणाची दाद कोणी घेईना. हाणामारीशीं प्रसंग! "धरो! मारो! पकडो! जय भवानी! अल्लाहो अकबर! हरहर महादेव" इत्यादि शौर्योत्पादक शब्द बंद पडले. इतक्यांत लहान पिस्तोल व बंदुका सुटूं लागल्या. त्यांच्या ईर्षेनें तोफखाना पुढें झाला. हत्ती-घोड्यांच्या पायाखालीं शेंकडों घायाळ इहलोकाच्या वस्तीस मुकले. कित्येक कण्हत-कुंथत होते; त्यांचें भयंकर स्वरूप पहातांच अंगावर रोमांच उठत. दुःख, शोक, भीति व आक्रांत यांनीं दाही दिशा भरल्या. कोणी कोणास ओळखीना. मराठ्यांनीं द्वंद्वयुद्धांत जो लौकिक मिळविला होता, तो तेथेंच राहिला. पळपट्या शत्रुमित्रांच्या गर्दींत

त्यांस आपले भाले चालवितां येईनात. तेव्हां, त्यांनीं धूप व कुट्टी हीं हत्यारें पुढें केलीं. अफगाणांचे पाठाळ व मजबूत घोडे मराठ्यांच्या काठेवाडी व भीमथडी घोड्यांस दुगाण्यांनीं मारूं लागले. अफगाणांनीं गुर्ज व गुवर हीं शस्त्रें सज्ज केलीं. तरी मराठे लोक बिलकुल भ्याले नाहींत. ते आपल्या शिकस्तीनें लढत होते. 'मारीन किंवा मरेन जय मिळवीन किंवा तोंड दाखविणार नाहीं.' या त्यांच्या निश्चयांत बदल झाला नाहीं. मराठ्यांची संख्या जास्त होती. त्यांची लढण्याची पद्धत चांगली होती. जयाच्या आशेनें व आजचा दिवस आपला आहे, अशा उत्साहानें ते मगरूर होते.

दृढनिश्चयानें ते शत्रुसंहार करीत. तशांत प्रथम दोनप्रहरपर्यंत जय झाल्यापुळें त्यांचा अभिमान व उच्छृंखलपणा हीं वृद्धिंगत पावलीं. शत्रूंस ठार मारण्यापेक्षां पुढें चाल करणें चांगलें, असा त्यांचा समज होता. आणि पुढें चाल करणारे घोडेस्वार भाल्यांनीं व बर्च्यांनीं शत्रूंचा पाठारा उडवीत होते. अफगाणांच्या बहुतेक पायदळाची त्यांनीं वाट लाविली. अफगाणांचा धीर खचला. त्यांस कांहींच सुचेना. त्यांनीं जयाची आशा सोडिली. प्राण वांचला तर पुरे, अशा निरुत्साहसागरांत ते गर्क होते. तरी, धर्मयुद्धाच्या नांवावर हातपाय हालविणं त्यांस भाग. मराठे तर उन्मत्तपणें अफगाणफौजेंत शिरत होते.

परंतु, ही स्थिति फार वेळ टिकली नाहीं. सदाशीवराव्याच्या हत्तीजवळच विश्वासरावाचा हत्ती होता. विश्वासरावानें ओरड केली. अफगाणलष्कराकडे भाऊनें पाहिलें. तों लुतुफउल्ला, अल्लाहदादखान गिलझाई

व उमरखान युसफझाईच्या हाताखालील शिलकी लष्कर दीन! दीन! करीत डाव्या बाजूनें आलें. ही वेळ अशा आणीबाणीची व निकराची होती कीं, तेव्हां डोळ्यांत तेल घालून जपलें पाहिजे होतें. एक निमिष अलक्ष्य करणें आणि निव्वळ मृत्यूच्या स्वाधीन होणें बरोबर.

मल्हारराव होळकर त्या नव्या दमाच्या लोकांशीं लढता तर त्यास सवड होती. परंतु, त्याचा मतलब पडला निराळा. तो इब्राहीमखानाच्या कवायती तुकडीमागें पूर्वेस निघाला. तेव्हां भाऊसाहेब दांतओंठ खाऊं लागला. परंतु निरर्थक. तो मोठ्यानें ओरडून ह्मणाला 'आनंदराव निंबाळकर, मल्हाररावास एकदम इकडे या असें सांगा आणि तें ऐकत नाहीं असें वाटलें, तर मीं जें करावयास सांगितलें आहे, त्याचें स्मरण ठेवा असें कळवा.'

विश्वासरावास डाव्या बाजूच्या लष्कराची व्यवस्था सांगून व शहाच्या शिलकी लष्काराशीं युद्ध करावयास गुंतवून भाऊ, आनंदराव मल्हाररावास भेटेपर्यंत उत्सुकतेनें पहात राहिला. हाच त्याचा शेवटील प्रयत्न होता. होळकर लज्जित तरी होईल, असें भाऊस वाटलें होतें. पण, तो कसचा लज्जित होतो! आनंदराव त्याला भेटला. त्यानें भाऊचा निरोपही त्याला कळविला असेल. परंतु, होळकरानें जनाची व मनाची लाज सोडिली होती; तेव्हां तो तिकडे दाद घेतो कशाला? त्यानें इकडे तिकडे पाहिलें तों "या अल्ला या हुसेन" करीत मुसलमान आले. तें सुजाउद्दवल्याचें सैन्य होतें. सुजाउद्दवला इतका वेळ गंमत पहात होता. परंतु, बादशहाचा निरोप समजल्यावर त्याचें मन बऱ्याच घोंटाळ्यांत पडणें स्वाभाविक होतें.

होळकरानें सुजाउद्दवल्याचें सैन्य ओळखलें. तेव्हां होळकरासही वाटलें असेल कीं, ह्याचा विश्वास कोणी धरूं नये; आणि धरील तो फशीं पडल्याशिवाय रहाणार नाहीं! असो. सुजाउद्दवल्याच्या सेनेबरोबर आमुदउल्ला होता. तो उजव्या बाजूच्या फौजेवर पडला व दोन्हीं-कडून फसला. भाऊनें महातास सांगितलें "विश्वासरावा-कडे चल." इतका वेळ विश्वासराव वीरश्रीनें युद्ध करीत होता. परंतु, सदाशीवरावाकडील वर्तमान समजतांच त्याची उमेद खचली. तो मरणास तयार होऊन हौद्याबाहेर येऊन लढूं लागला. तो ह्मणाला "काका, तो सर्व खटपट फुकट! येथें रहावें ह्मणजे शुद्ध पिंजऱ्यांतल्या पोपटाची दशा. आतां प्राण जावयाचा वेळ आला. नानासाहेबा-चा एक पुत्र व एक बंधु आज नाहींसे होणार! बेहत्तर आहे. लवकरच आपण सूर्यमंडल फोडून स्वर्गी जाऊं. तुह्मी खालीं उतरा. शूर वीराप्रमाणें हातांत तरवार घ्या आणि शत्रूंचा संहार करा.

भाऊ—दोन घोडे लवकर आणा. (इतक्यांत कोणी घोडे आणून भाऊपुढें खडे केले.)

भाऊ—'दुःखाश्रु पुसून' बाळ, मला प्रथम मरूंदे. या सफेत अरबी घोड्यावर तूं स्वार हो; आणि पळ काढ. तुझें वय लहान आहे. तुझ्या अंगीं पराक्रम आहे. तूं त्या दगलबाज होळकराबरोबर चालता हो. तो तुला सुरक्षित नेईल.

विश्वासराव—छीः छीः माझ्या हातून तसें कदापि होणार नाहीं. आह्मी सपाट्यांत सांपडलों आहों. फिकीर

नाहीं. अशांतूनही ईश्वर पार पाडील. बरें, तसें न होतां विपरीत दैवच ओढवलें असलें, तरी देह रणांगणीं पडणें हाच आह्मां वीरकुलोत्पन्न पुरुषांचा मोक्ष! धारातीर्थीं मरण पावणें यापेक्षां दुसरा मोक्ष तो कोणता? 'विश्वासराव लढाईच्या मैदानांतून कुत्र्यासारखा पळाला' असा कलंक लावून घेण्यापेक्षां पराजय झाला, तर मी तुमच्याबरोबर मरेन. आपण प्रतिज्ञा केलेली ती विसरलां काय?

महातानें हत्ती खालीं बसविला. चुलते-पुतणे कडकडून परस्परांस भेटले; आणि हातीं तरवारी घेऊन उभयतांही घोड्यावर स्वार झाले. इतका वेळ लढून त्यांनीं जी कीर्ति संपादन केली होती, त्यास शोभा देण्याकरितां रणांत तरवार गाजवून मरावें, अशा निश्चयानें ते अद्वितीय वीरशिरोमणी युद्धास प्रवृत्त झाले.

या वेळीं आपण भीतींत आहों हें मराठे फौजेस स्पष्ट दिसत होतें. त्यांत दोघे मुख्य सरदार हत्तीवरून घोड्यावर स्वार झाल्यामुळें विशेष भय वाटूं लागलें. मराठ्यांनीं आपली होती तितकी शिकस्त केली. परंतु, त्यांचा शत्रूंच्या शस्त्रांपुढें दम निघेना. लखनौच्या सुभ्याचे लोक ताजेतवाने व नव्या दमाचे होते. त्यांनीं सांग व खांड अशा शिताफीनें चालविली कीं, मराठ्यांस 'देमाय धरणी ठाय' झालें. तितक्यांत लुतफउल्ला व अल्लाहदादखान ह्यांच्या तैनातींतील फालतु फौज व युसफझाईचें पायदळ पर्जन्यवृष्टीस मागें सारील, असा तीरांचा वर्षाव करूं लागलें. बादशहा स्वतः त्यांस उत्तेजन देई आणि उत्साहानें त्यांस पुढें पाठवी. हिंदु

व मुसलमान एकत्र झाले. मराठ्यांस पळून जावयास सवड नव्हती; किंवा शस्त्रांचा उपयोगही करितां येईना. तरी मागें हटून मरण्यापेक्षां किंवा पाठीवर वार घेऊन ठार होण्यापेक्षां पुढें होऊन मारतां मारतां मरावें असा निश्चय करून ते सज्ज झाले. इतक्यांत युसफझाईची गोळी विश्वासरावाच्या छातींत बसली. त्याबरोबर त्याच्या हातांतील तरवार खालीं पडली व तो घोड्यावर आडवा झाला. तेव्हां सदाशीवरावानें त्यास विचारिलें "बाळ, तुला गोळी लागली काय?"

त्याच्या छातींतून रक्ताचा पूर वाहूं लागून तो अंगावरील कपड्यांतून घोड्याच्या जिनावर उतरूं लागला. तेव्हां विश्वासराव मोठ्या संकटानें ह्मणाला "माझें आयुष्य संपलें" इतके शब्द निघतांच त्याचा श्वास बंद झाला व तो घोड्यावरून खालीं पडून त्याचें प्राणोत्क्रमण झालें.

"होळकराचें तोंड काळें होवो! त्याच्या कुळाचा नाश होवो!" असे निर्वाणीचे शब्द मुखावाटे काढून भाऊनें घोड्यास टांच मारिली; आणि सुजाउद्दवल्याचें निशाण सिंहाच्या चिन्हाचें होतें तिकडे तो निघाला. सफेत अरबी घोडा पांचव्या उडीस सुजाउद्दवल्याच्या चिलखती सेनेंत आला. भाऊनें सुजाउद्दवल्यास पाहिलें. परंतु, हातघाईस येण्यासारखी सवड नव्हती. ह्मणून त्यानें पट्ट्यांतून जंगी पिस्तोल काढिलें आणि "बेवफा! डुक्कर, दगलबाज, बेइमान" असें ह्मणून सुजाउद्दवल्यावर झाडिलें.

**सुजाउद्दवल्यानें भाऊचा शब्द ओळखला.**

निरुत्साह, निराश व दुःखाच्या प्रसंगांत भाऊचा नेम चुकला. इतक्यांत कित्येक लोक भाऊच्या अंगावर धांवले.

सुजाउद्दवला ह्मणाला "त्याला मारूं नका. तो सदाशीवरावभाऊ आहे "

परंतु, तिकडे लक्ष्य न देतां वेणीमाधवसिंग भाऊच्या अंगावर धांवला; आणि त्यानें खांड मारून त्याला घोड्यावरून खालीं पाडिलें. तें पहातांच "भाऊसाहेब पडले! भाऊसाहेबांचा शेवट झाला. तुह्मी आपले प्राण वांचवा! धांवा! पळा!" याप्रमाणें मराठ्यांच्या सेनेंत एकदम हाहाःकार उसळला. यक्षिणीची कांडी फिरली. मराठ्यांची पुढें जाण्याची गति खुंटली. ते तोंड खालीं करून हत्यारें फेंकीत पानिपत व आपल्या छावणीकडे धावूं लागले.

---

## प्रकरण ३७ वें.

### लढाईचा शेवट.

मराठ्यांच्या आकस्मिक हल्ल्यानें अफगाणांची धांदल उडण्यापूर्वी अर्धा तास सुजाउद्दवल्यानें लालनची रवानगी केली. ती सरळ छावणींत येती, तर मराठे युद्धास प्रवृत्त होण्यापूर्वीच तेथें येती; आणि भाऊचा तिला भेटण्याचा उद्देश सफल होता.

भाऊनें अवघी रात्र लालन केव्हां कागद घेऊन येते ह्या विचारांत काढली, त्या दिवशींच लढाई करावी,

असा निश्चय ठरलेला. त्यांत फेरबदल करितां येण्यासारखा नव्हता. ह्मणून बहुधा आपल्या विश्वासु जासुदास मार्गांत कांहीं तरी विघ्न उद्भवलें असावें, असा तर्क करून त्यानें लष्करास लढाईचा हुकूम दिला. लालनची तेथें बराच वेळ खोटी झाली. आणखी सुजाउद्दवल्यानें तिजविषयीं जें वर्तमान ऐकलें, त्यामुळें तिची जास्त खोटी होणें स्वाभाविक होतें. तसें झालें नसतें, तर ती वेळेवर तेथें येती. तिला किंवा तिच्या बरोबरच्या लोकांस लढाईची मुळींच खबर नव्हती. लोकांची जा-ये मात्र फार होती. कारण, त्यांस लौकरच युद्ध करावें लागणार, हें समजलें होतें. आणि 'तिला संभाळून न्या' असें सुजाउद्दवल्यानें सांगितल्यामुळे दूरच्या वाटेनें त्यांस यावें लागलें. लोकांच्या हालचालीवरून लालननें किंवा तिच्या बरोबरच्या लोकांनीं लढाईचा कमजास्त अंदाज केला असेलच. असो. आपली पराक्रमी नायिका थंडींतून, दहिंवरांतून आणि अंधःकारांतून निघाली.

लालन आतूर झाली होती. मोठ्या लष्कराचा, त्याच्या स्थितीचा व रस्त्यांतील अडचणींचा तिला चांगला अनुभव होता. तिनें जें ऐकिलें व पाहिलें, यावरून जाण्याचा परिणाम चांगला होणार नाहीं, असें तिला वाटलें. स्वार्थपरायण मनुष्यावर विश्वास ठेवणें ह्मणजे शुद्ध वेडेपणा. तेव्हां स्वतः काय तें करावें, असा तिचा निश्चय ठरला! माहिपतराव तिच्या जवळच होता. लढाईची सूचना ऐकतांच तो ह्मणाला "राम, राम,!" वेणीमाधवानें घोडा उभाकरून विचारिलें "हें काय?" इतक्यांत इब्राहीमखानाच्या कडक तोफखान्याचा आ-

वाज वाऱ्याच्या लहरींबरोबर चांगला ऐकूं आला. तेव्हां तो ह्मणाला "लढाइस आरंभ झाला"

राहून राहून तोफा सुटत. धुकें कमी होऊं लागलें. मनुष्यास मनुष्य ओळखतां येऊं लागलें.

तेव्हां वेणीमाधव ह्मणाला "आतां मला मागें गेलें पाहिजे."

सूर्यप्रकाश पडला. मराठ्यांच्या तोफा त्यांस ऐकूं आल्या. त्यावरून ते फार दूर नाहींत, असा महिपतरावानें तर्क केला वेणीमाधवास जाणें भाग आहे असें वाटतांच, त्यांनींही त्यास आग्रह केला नाहीं. महिपतरावास आपल्या शक्तीची धमक होती, आणि लालन सांगेल तिकडे नेण्यास आपणास कांहीं जड जाणार नाहीं असेंही त्याला वाटत होतें.

होईल तितक्या त्वरेनें महादाजी शिंद्यास भेटावें, असा लालनचा इरादा होता.

वेणीमाधव गेला. महिपतराव, लालन आणि चार मुसलमान शिपाई मराठ्यांच्या छावणीकडे येऊं लागले. युद्धशक्ति वाढत होती. तरी, "लष्कराच्या उजव्या बाजूस महादाजी आहे, तिकडे जाऊन त्यास तावडतोब भेटावें." अशा हेतूनें त्यांनीं तेथें एक तास खोटी केली.

लढाईची पहिली खबर, मोठ्या लढाईंत गर्भगळित झालेल्या एका पळरत्या शिपायानें त्यांस सांगितली. तो ह्मणाला "महादाजी व जनकोजी शिंदे ह्यांची पिछेहट झाली. त्यांनीं दोन वेळ मोठ्या निकरानें हल्ला केला; परंतु त्यांस मागें यावें लागलें. ते आतां तिसऱ्या हल्ल्याची तयारी करणार, तोंच मुसलमानांची बाजू मजबूत

झाली. आणखी त्यांस नवी कुमक मिळाली. तितक्यांत मला गोळी लागली. मी इकडे आलों. पण, डाव्या बाजूस इब्राहीमखानानें मोठा पराक्रम करून जय मिळविला असें ह्मणतात. भाऊसाहेबानें वजीरास कापून काढिलें, असें मीं ऐकिलें."

महिपतराव आपल्या टोळीसह पुढें गेला. तेथून त्यांस मोठी लढाई चांगली दिसत होती.

पहिल्या पळपट्यानें जें वर्तमान सांगितलें, तें खरें. कारण, उजव्या बाजूचें शिंद्यांचें सैन्य इकडे तिकडे फिरत होतें. मागें जावें, पुढें यावें, हा त्याचा क्रम सुरू होता. मराठ्यांचा तोफखाना बहारीनें शत्रूस मागें हटवीत होता. नजीबखानाच्या तोफा सुरू होत्या. रणवाद्यांचा कडाका चालू असून त्यांत तोफांचा आवाज मिसळत होता. धुरानें व धुरळ्यानें जिकडे तिकडे अंधार!
कित्येक घायाळ पाण्याकरितां तळमळत होते. कित्येक विश्रांतीसाठीं मागें फिरत होते. हिय्यानें पुढें न जाणाऱ्यांस लाथा-बुक्यांचा मार बसत होता. कित्येक मोठ्या धैर्यानें छाती पुढें करून लढत. कित्येक गोळागोळींनें पटापट मरत. कित्येकांच्या देहाच्या चिंधड्या आकाशांत उडत. हे सर्व प्रकार आपली नायिका पहात होती. पण, इतक्यांत ते प्रकार एकाएकीं बंद पडले आणि त्या लोकांनीं मागें पाय घेतला असें तिला दिसलें.

महिपतरावासारख्या जुन्या लढवय्यास तो प्रकार काय झाला, हें समजणें कठीण नव्हतें. तो ह्मणाला "हे लोक फार वाईट करितात." परंतु, डाव्या बाजूच्या लढाईचा परिणाम संतोषकारक होता. धुरानें दिशा धुंद

होऊन गेल्या होत्या. तरी पण, बंदुका व तोफा सोडून युद्धव्यापार बंद न पाडतां तो सुरू ठेवून आपलें स्थान संभाळावयाचें होतें. लालनचा विचार महादाजीस एकदम भेटावें असा होता. परंतु, महिपतराव तिला तसें करूं देईना. त्यानें भाऊसाहेब कोठें आहेत हा शोध आणावयास एक शिपाई पाठविला. त्यानें चांगली बातमी आणिली. परंतु, सुभ्याचा निरोप भाऊस समजतो कसा? त्याच वेषानें लालन समरक्षेत्रांत जावयास तयार होती. पण, महिपतराव तिला प्रतिबंध करूं लागला. तो तिचें ह्मणणें ऐकेना. शेवटीं तिला रावाचें ह्मणणें कबूल करणें भाग पडलें. आणि तिलाही वाटलें कीं, सुभ्याचा निरोप लटपटीत व केवळ प्रपंची आहे. तो सांगितला आणि न सांगितला तरी फल सारखेंच. तशांत कागद नाहीं कीं पत्र नाहीं. तोंडीं निरोप! तो कोणीही सांगितला तरी अर्थ एकच. तेव्हां त्यांनीं एका शिपायास तो निरोप सांगून भाऊकडे पाठविलें. तो, धुळ उधळत होती तेथपर्यंत गेला असें दिसलें. पण, तो मागें फिरला नाहीं. समयीं त्यानें भाऊस तो सांगितला असेल, आणि भाऊनें सुजाउद्दवल्यावर चांगला विश्वासही ठेविला असेल, किंवा काय झालें तें जगदीश जाणें!

लालन व तिच्या बरोबरचे शिपाई वहानावरून उतरून मोहाच्या झाडाखालीं बसले. लढाईतून पळून येणारे लोक वारंवार त्यांस भेटत आणि कांहीं हकीकत सांगत. परंतु, त्यांची मानसिक चिंता त्यांस स्वस्थ बसूं देत नव्हती. न जाणो, प्रसंग केव्हां कसा येईल

ह्याचा नेम नाहीं, असा विचार करून महिपतरावानें पळपट्या लोकांतील एकाचा घोडा जवळ केला. उंटावरून जाण्यापेक्षां घोड्यावरून लालन कोठेंही सुखानें जाऊं शकेल, इतकाच त्याचा घोडा मिळविण्यांत हेतु होता. असो; अशा रीतीनें लालनबरोबरचे लोक दोनप्रहरपर्यंत तेथेंच पडून होते.

---

# प्रकरण ३८ वें.

---

## पलायन.

त्या दिवशीं शिंद्यानें आपल्या नांवालौकिकाप्रमाणें तरवार गाजविण्यास बिलकुल कमी केलें नाहीं. वारंवार हल्ले करून मराठ्यांचा पराक्रम कसा आहे, बहाद्दर घोडेस्वार कसा हल्ला करितात, त्यांची तिखट तरवार व भाला यांची कुशलता कशी आहे, ते पुढें कसे तुटून पडतात, तोफा कशा डागतात, त्या सोडण्याची चपलता कशी, बंदुका कशा धरतात, त्या मारतात कशा, शत्रूंची फळी फोडून ते कसे जातात, त्यांचे डाव-पेंच कसे, हे सर्व प्रकार त्यानें शत्रूंस चांगले दाखविले. परंतु, मोंगलसेनापतीनें जी तयारी केली, तीच ईश्वरनिर्मित अडचणीप्रमाणें त्यांच्या हानीस कारण झाली. या युद्धांत मराठ्यांनीं अनास्था, अव्यवस्था व निष्काळजीपणा केला असा अर्थ नाहीं. केवळ दुर्दैवानें त्यांची पाठ पुरविली, असेंच ह्मणावें लागतें. त्यांचें पायदळ किंवा घोडेस्वार

अफगाणांवर चाल करून जाऊन त्यांच्या बंदुकांचा व तोफांचा मारा सहन करण्यासारखे होते. परंतु, नजीबउद्दवल्याच्या सेनेशीं लढण्याचा प्रयत्न करणें मात्र अनहितकारक होतें. कारण, त्यानें स्वसेना लांकडी व मातीचे कोट करून त्यांत सुरक्षित व व्यवस्थित ठेविली होती. कदाचित हल्ला आपल्यावर झालाच, तर ती सहज मागें फिरविण्यास त्यास मुळींच फिकीर नव्हती. तशांत मराठ्यांच्या मागें फिरणाऱ्या लष्कराचा उत्तड मैदानांत चांगला समाचार घेतील, असे त्याकडे कित्येक जबरदस्त सरदार होते. पराजयाचा वेळ आलाच, तर बादशहाच्या शिलकी सेनेकडून पाहिजे तशी मदत मिळण्याचा संभव; ह्यामुळें मराठ्यांची डाव्या बाजूची व मधील तुकडी उजव्या बाजूस वळूं लागली. तेव्हां नजीबानें उजव्या तुकडीवर जो हल्ला केला, त्यामुळेंच तीस मागें हटावें लागलें. पानिपतच्या लढाईच्या युक्तीची किल्ली मराठ्यांस साहजिक सांपडली असून त्यांनीं मध्येंच अर्धी फौज माग वळविण्याचा प्रयत्न केला. इतक्यांत सुजाउद्दवल्यानें त्यांशीं अकस्मात युद्ध आरंभिलें. फालतु लष्करानें एकदम नव्या जोमानें त्यांजवर हल्ला केला, आणि मल्हारराव होळकरानें जी भली थोरली किंवा घोडचूक केली, त्यामुळें मराठे लोक निराधार झाले.

कांहीं वेळ निराशेंत, भीतींत व दुःखांत काढल्यानंतर महादाजी जनकोजीस विचारूं लागला "घोडेस्वारांस थोडी विश्रांति मिळण्याकरितां मुसलमानांशीं

लढण्यास पायदळ पुढें करूं?" हा विचार महादाजीस जर प्रथम सुचता, तर निःसंशय पुष्कळ फायदा होता.

कवायता पायदळाकडून शेवटचा हल्ला करवावा आणि पायदळच्या बचावास घोडेस्वार ठेवावे असा विचार करून शिद्यान एकदम हुकम अमलांत आणिला. फार थोड्या अवकाशांत घोडेस्वार डावे उजवे होऊन त्यांतून तरवारबहाद्दर पायदळ पुढें आलें तेथें जंगी लढाई जुंपते तों महादाजीनें भाऊची दशा अवलोकन केली. भाऊ महत् संकटांत असून त्याला मदतीची अत्यावश्यकता असल्यामुळें महादाजीस आपल्या लोकांना मुखाग्रानें सदाशीवरावाच्या संरक्षणास चला अशा इशारत करावी लागली. इतक्यांत सुजाउद्दवल्याच्या चिलखती स्वारांनीं भाऊस ठार केलें. तेव्हां हिंदुस्थानांतील मराठी राज्याचा व लढाईचा भावी परिणाम महादाजीच्या डोळ्यापुढें मूर्तिमंत उभा राहून त्यानें आपल्या सेनेस मागें फिरण्याचा हुकूम केला. तो ह्मणाला "भाऊसाहेब पडले! तुह्मी आपला बचाव करा-पळा-धांवा-चला."

महादाजीनें इकडे तिकडे पाहिलें. तेव्हां त्याची छाती भीतीनें, शरमेनें व वैषम्यानें धडधडूं लागली, आणि तो डोळे लाल करून तेथून निघाला.

मराठे पळण्याचा प्रयत्न करूं लागले. परंतु, त्यांवर नजीबउद्दवल्यानें चाल करून बहुतेकांस ठार मारिलें.

महादाजीच्या मागें त्याचा पुतण्या व सर्वोत्तम शस्त्रास्त्रकुशल सहाशें घोडेस्वार होते. पण, त्यांसही

भीति पडली. कारण, त्यांतही पुष्कळ फुटाफुट झालेली होती.

**महादाजी**—बाबा, सर्व मसलत फसली. हे लोक आपणास एकटे टाकून जातील; ह्यांच्या पुढें आपण जाऊं!

**जनकोजी**—कोठें, पानिपतांत?

**महादाजी**—पानिपतांत! मेंढवाड्यांत सिंह शिरला ह्मणजे जशी अवस्था होते, त्याप्रमाणें मरावयास? छीः तिकडे नको. मुसलमान लोक आमच्या मागें लागावयास अद्याप बराच अवकाश आहे. आह्मी रणक्षेत्राकडून डावा रस्ता पकडूं; ह्मणजे जमलें तर नव्याणवदहिशानें **इब्राहीमखानाच्या** सेनेस मिळूं. तो अजून लढत असेल, नाहींतर **दिल्लीच्या** मार्गास लागूं. **गार्द्यांचा** मारा ऐकूं येत आहे.

**जनकोजी**—तोफांचे आवाज घनघोर ऐकूं येतात.

**महादाजी** रिकिबीवर उभा राहून आपल्या शिपायांकडे तोंड फिरवून सांगूं लागला. "मी सांगतों तें ऐका. त्या बेवकुफांप्रमाणें तुह्मी पानिपतांत जाऊं नका. तिकडे गेलां कीं आजच कापून काढतील; किंवा अन्नाविणें मरावें लागेल. यमुनेकडे चला, यमुनेकडे. गार्दी व **दमाजी** जिकडे जातो, तिकडे चला."

त्या दुस्तर प्रसंगीं **महादाजीच्या** मतास सर्व अनुकूल झाले. तें मत साधें व खुलासेवार असल्यामुळें त्यांनीं चटकन् पसंत करून "आम्ही तुमच्याबरोबर येतों" असा सर्वांनीं जबाब दिला.

"पुढें चला, पुढें चला. **यमुना** नदीकडे चला." असें सांगून **यमुना** नदीकडे जावयाचा रस्ता **महादाजी** व **जनकोजी** ह्यांनीं सुधारला. त्यांच्या उजव्या बाजूस जे लोक होते, त्यांतून त्यांनीं आपले घोडे भरधांव काढिले. त्यांच्या बरोबर कित्येक लोक निघाले. त्यांची मोठी टोळी जमली. तेव्हां कित्येक लोक छावणीकडे पळत असल्यामुळें **महादाजीस** तरवारीनें रस्ता साफ करणें भाग पडलें. **महादाजीस** कोणीकडे जावयाचें होतें हें तुमच्या ध्यानांत नीट येण्याकरितां इतकें सांगितलें ह्मणजे बस्स होईल कीं, **सदाशीवरावाच्या** ताब्यांतील लोक जिकडे पळत होते, आणि **इब्राहीमखान** जेथें उभा होता, तिकडेच तो चालला होता. परंतु, तिकडे "या अल्ला या मौला" असे ध्वनि ऐकूं येतांच तेथेंही दुष्मन आहेत असा त्यांनीं तर्क केला. तथापि आपल्यामागें **सुजाउद्दवल्याचे** लोक लागले आहेत, हें त्यांस माहीत नव्हतें. शत्रु अगदीं जवळ आले असें पाहून **महादाजी** आपल्या लोकांस ह्मणाला "आतां पळून उपयोगी नाहीं. येथें शत्रूंचे मुडदे पाडल्यावांचून ते आपल्यास जाऊं देणार नाहींत, तर आतां पहातां काय?" हे शब्द ऐकतांच गोलाकार लोकांचा जमाव शत्रुसेनेंत शिरला. पण, इतक्यांत एका घोडेस्वाराची झडप **महादाजीवर** असल्यामुळें त्यानें रागानें **महादाजीवर** तरवार उगारली. आणि आतां तो घाव मारणार, तों **जनकोजीनें** त्यावर वार केला व त्यास कापून काढिलें.

त्याच्या शेवटच्या शब्दांवरून **जनकोजी** व इतर **मराठ्यांनीं** तर्क केला कीं, तो **वेणीमाधव** असावा.

तेव्हां, त्यांनीं तरवारीनें त्याचें शीर कापून ते बेधडक पळत सुटले. पण, त्याच्या शिरकमलाचें बक्षीस कोणा-लाच मिळालें नाहीं!

# प्रकरण ३९ वें.

## प्रीतिपात्राची भेट.

महादाजीबरोबरचे लोक अफगाणटोळीची फळी फोडून उजव्या बाजूस निघाले. एका अडचणींतून ते पार पडले; पण दुसरी तयार होतीच. कमनशीब एकदां हात धुऊन मागें लागलें ह्मणजे मग अडचणी, संकटें व दुःखें किती पाहिजे तितकीं तयार! त्यांस आमंत्रण दिले-लेंच असतें. दुःखामागून दुःख प्रसवतें. असो; खास-पागेची कत्तल करून रक्तानें भरलेल्या शस्त्रांसह अफगा-णांची एक टोळी मराठ्यांस प्रतिबंध करण्यास नव्हे वेढा देऊन ठार मारण्यास येत होती.

ती टोळी भयंकर लढाईच्या वेळीं चिलखतवाल्या लोकांच्या मागें दुसऱ्या तुकडींत होती. आपण ज्या लोकांवर जातों त्यांची संख्या किती मोठी असेल, हा विचारच तिनें केला नाहीं. ते लोक जयाच्या धुंदींत होते. आणखी मराठे इकडे येणार नाहींत, असा त्यांचा समज. ही टोळी, महादाजीबरोबर जी टोळी होती त्या-पेक्षां संख्येनें फार कमी होती.

मराठ्यांस पाय ठेवावा तेथें भय होतेंच. महादाजी-ची टोळी समजत होती कीं, आह्मी पळपटे नव्हे. मोठ्या लढाईंत पराभव झाला, तरी आतां येतांना आह्मीं जय मिळविला आहे. आणि विरुद्ध पक्षाचा जमाव थोडा आहे. आतां आपण अर्ध गोलाकार होऊं आणि शत्रूंस मागें टाकूं; ह्मणजे आपला सहज बचाव होईल.

सुजाउद्दवल्याच्या लढाईंत हत्यार चालविण्याची मारामार पडली! अफगाण लोक जवळ भिडले होते. 'मारूं किंवा मरूं' अशा निश्चयानें मराठ्यांची टोळी पुढें चालली. तेव्हां, लुतुफउल्लानें महादाजीस ओळखिलें. ते एकमेकांचे शत्रु. दृष्टादृष्ट होतांच ते परस्परांस मर्मभेदक शब्द बोलूं लागले.

लुतुफ छातीस बंदुक लावून ह्मणाला "मूर्तिपूजकाच्या कुत्र्या, तुझा काळ आला! तुझ्या कपटाचा सूड उगविण्यास आज मला संधि सांपडली. तुझ्या नरडीचा आतां घोंट घेतों. आणि ती दासी-वेश्या नव्हे-व तुझ्या जनानखान्यांतील सर्व स्त्रिया यांस माझ्या दासी-बटकी-गुलाम करितों! मुसलमान, काफर आणि बेइमानाचा मोबदला घेणार!"

महादाजी ह्मणाला, "सुअरखाऊ, डुकरखाऊ बटकीच्या पोरा, तरवारीजवळ ये; ह्मणजे तुला दाखवितों सपाटा! कोणाचा काळ आला, तो पहा! आमची बेअबरु करून तूं अबरूनें वांचशील?"

दोन्ही बाजूचे लोक आपल्या सरदाराचा बचाव करावयास सिद्ध झाल्यामुळें परस्परांस हातघाईवर याव-

यास सवड होईना. शेवटीं त्यांच्या त्वेषानेंच त्यांस पुढें आणिलें. इतक्यांत **घोसमहमद** मध्यें आला आणि त्यानें **महादाजी**वर चढाई केली. **लुतुफउल्लास** **पोपलझाई** रागानें ह्मणाला "तूं मागें जा. त्या बेवकुफाचा समाचार मी घेतों."

पूर्वी उभयतांत जेव्हां द्वंदयुद्ध झालें, तेव्हां आपल्या सरदाराची हार झाली होती. तेव्हां त्या फिकीरीमुळें तो महत्संकटांत होता. परंतु, ती **घोसमहमदा**ची अखेरची घडी होती. दोघांच्या चकमकींत **महादाजी**चा पहिला झपाटा त्यानें ढालेवर संभाळला. परंतु, **जनकोजी** मागें होताच. त्यानें त्यास सरळ मार्ग दाखविला! **जनकोजी**चा सूड उगाविण्यास **लुतुफउल्ला** व **खोजारोषन** तातारी हे पुढें आले. त्या दोघांनीं **जनकोजी**वर एकदम वार केले. तेव्हां **जनकोजी** खालीं पडला. **महादाजी** सज्ज होताच.

दोहोंच्यामध्यें **घोसमहमद**चा घोडा होता. ह्यामुळें परस्परांची हातघाई जमेना. आणि घोडा तेथून हालूं दिला नाहीं ह्मणजे आपलें संरक्षण होईल, असा **महादाजी**चा निश्चय. **महादाजीनें** आपली घोडी फिरवितांच **लुतुफउल्ला** व **जंगीशहा** नांवाचा एक शिपाई हे **महादाजी**वर आले. तितक्यांत **जंगीशहा**वर कोणी अचानक पिस्तोलाची गोळी झाडिली. ती त्यास मर्मीं लागतांच तो घोड्यावरून जो खालीं पडला तो पुनः उठला नाहीं! जंगीशहा मरतांच **महादाजी** **लुतुफउल्लां**कडे वळले. तेव्हां वाक्पांडित्याची लढाई नव्हती. **लुतुफ**ची **बैरागिणी**वर अचल श्रद्धा होती. ती त्याच्या हातून सुटून

**महादाजी**कडे गेल्यामुळें **महादाजी** आपला कट्टा दुष्मन आहे, असें **लुतुफउल्ला** समजत असे. **महादाजी**चा विचार तसाच होता. सारांश, स्त्रियांच्या भानगडींत पडलेले लोक निकरावर आल्याशिवाय रहात नाहींत; त्यांतीलच हा प्रकार. दोघांचाही हेतु एकमेकांस ठार मारावयाचा. त्यांनीं तेथें दारुण युद्ध केलें. एखाद्या रानटी मनुष्याप्रमाणें ते लढत होते. शस्त्रप्रहारांनीं अग्नीच्या ठिणग्या निघूं लागल्या. **लुतुफखान** विजयी होतो, असें दिसूं लागलें. दोघांचेही घोडे थोडथोडे जखमी झाले. **महादाजी**चें अवसान खचलें. त्यानें **लुतुफ**वर वार करून घोडी विजेप्रमाणें फिरवून त्याचा वार चुकविला. आतां मागें जावें कीं पुढें हें त्यास सुचेना. तर्कशक्ति लटपटली. बुद्धीचा अस्त झाला, आणि तो फारच बुचकळ्यांत पडला. इतक्यांत **लुतुफ**नें दुसरा वार केला. तो त्याच्या तरवारीवर बसून ती खालीं पडली. तेव्हां तर **महादाजी** निराधार व निःशस्त्र झाला!

**लुतुफ** ह्मणाला "बेइमान, बोल. काफर, आतां कोणाचा काळ आला?" असें ह्मणून त्यानें **महादाजी**वर शेवटचा वार केला.

कुंभाराचे सर्वच घडे भाजतात असा नेम नाहीं. **महादाजी**नें ढाल पुढें केली, तरी त्याच्या मांडीस जखम झाली. पण, तो बचावला हें खरें. घेरी येऊन तो पडणार इतक्यांत त्यानें घोड्याचे केंश धरिले. आतां एका सपाट्यानें काम, घोडी व स्वार यांस एकदम ठार करावें असें मनांत येऊन **लुतुफ** पुढें जाणार, तोंच कोणी त्यास एकदम घोड्यावरून खालीं लोटिलें आणि तो त्याच्या

छातीवर सुरा घेऊन उभा राहिला. आतां आपला उपाय चालणार नाहीं, अशी लुतुफची पूर्ण खातरी झाली. तेव्हां तो 'दगा! दगा!' असें ओरडला.

"हरामखोर, मला तूं ओळखत नाहींस? दाऊद युसफझाई तो मीच; समजलास? त्या माशुकवरितां मला तूंच दुःख दिलेंसना? भोग आतां केल्या कर्माचें फळ!" आपल्या शत्रूस ओळख दिल्याशिवाय मारूं नये अशा विचारानें तो ह्मणाला, "मी तुझा काळ दाऊद युसफझाई."

लाल्न, पेशव्यांच्या सैन्याकडे येत असतांना तिला पकडणारा हाच तो दाऊद. अहमदशहानें त्यास शिक्षा दिली वगैरे हकीकत आतां तुमच्या ध्यानांत सहज येईल. महादाजीबरोबर लुतुफउल्ला युद्ध करण्याच्या भानगडींत निमग्न आहे असें पहातांच त्यानें आपला डाव साधिला. दाऊदानेंही आपल्या शत्रूस पाहिलें नव्हतें. आपण आज कृतार्थ झालों अशा विचारांत तो आहे इतक्यांत लतुफच्या छायेप्रमाणें वागणारा गुलाम झमरूद उठला, आणि त्यानें एका तडाक्यांत एका दाऊदाचे दोन दाऊद केले.

जगदीशानें कृपा केली असें महादाजी ह्मणत आहे तोंच खोजा रोपन त्यावर धांवला. इतक्यांत दोन नवीन स्वार महादाजीकडे आले. एक स्वार खोजाशीं लढूं लागला; आणि दुसरा महादाजीच्या घोडीचा लगाम पकडून त्याच्या अंगावर एक हात टाकून ह्मणाला, "माझ्या प्राणा, तुला काय झालें. या पायाच्या दासीकडे एकदां तरी पहा, अहो शेवटीं एकदां तरी!"

महादाजी थोड्या बेशुद्धींत त्याकडे पाहून ह्मणाला, "तूं इकडे कोणीकडे? कोण तूं?"

स्वार ह्मणाला "नाथ, मी आपल्या पायांची दासी लालन! मजकडे पहा तर खरे!"

महादाजीनें शुद्धींत येऊन विचारिलें "तूं इकडे कशी आलीस? तूं घोड्यावर स्वार आहेस. पळ, होईल तितक्या लौकर पळ!"

लालन निग्रहानें ह्मणाली "तुमच्याशिवाय नाहीं. प्राणनाथ, अथें शरीर ठेवून मी जाईन असें तुह्मांस वाटतें काय?"

महादाजी—अग, तें व्यर्थ आहे. प्रसंग बिकट दिसतो! मी निःशस्त्र व जखमी झालों. जनकोजी, भाऊसाहेब व विश्वासराव गेले! मला वांचून काय करावयाचें? आतां मराठेवंशास जगांत असें निर्लज्ज तोंड राखविण्यास जागा नाहीं.

"प्राणप्रीय, माझ्याकरितां इतकी कृपा करा; नाहींतर, मला मरावें लागेल." असें ह्मणून लालन महादाजीजवळ गेली. तिनें मस्तकावरील फेटा फाडून शिंद्याच्या मांडीस बांधिला. ती पुरुषवेषानें होतीच. तिजकडे जी तरवार होती, ती महादाजीस देऊन ह्मणाली "ही तरवार आणि हें पिस्तोल घ्या. पिस्तोल भरलेलें असल्यामुळें त्यांतील एका गोळीनें तुमच्याबरोबर जो दुष्ट लढत होता, त्यास मीं ठार मारिलें. हिंमत धरा. प्राण, अबला स्त्रियांसारखे मरूं नका." तिनें जखम बांधावयास

फेंटा फाडतांच तिचे काळे कुळकुळीत लांब केश तिच्या पृष्ठभागीं रुळूं लागले. तिकडे **महादाजी**ची दृष्टी गेली, तेव्हां तो अतिशय उत्साहानें ह्मणाला "आहा! तूं सामान्य स्त्री नव्हेस! खरोखर अप्सरा किंवा चंडी आहेस! तुझी वीरश्री, तुझें शौर्य, समयसूचकता, प्रसंगावधान व धार्ष्ट्य पाहिलें तर असें वाटतें कीं, निःसंशय तूं देवी आहेस! तुझ्या विशाल नेत्रांकडे पाहिलें, तुझ्या मोहक पुरुषवेषाकडे पाहिलें आणि तुझ्या धैर्याचा व साहसाचा विचार केला, तर मन थक्क होतें. तुझ्या उत्साही व मधुर शब्दांनीं मनास अत्यद्भुत उमेद वाटते. माझी नेहमींची तरवार माझ्या हातीं आली. आतां माझें बळ व आशा शतपट वाढली. तुझ्या प्रेमानें मी मेलेला वांचलों. तुझ्या वचनामृतानें माझ्या जखमेची मला पर्वा नाहींशी झाली. धन्य! **लालन, जगदीश** तुला सौख्यांत ठेवो!" असें ह्मणून त्यानें आपली बिजली घोडी फिरविली आणि आसपास कोणी शत्रु आहे कीं काय हें पाहिलें.

'**खोजारोषन**बरोबर मराठा कोण लढत आहे?' असा तो प्रश्न करणार इतक्यांत त्यानें **महिपतरावास** ओळखिलें.

"सरकार, तुह्मी आपला बचाव करा. चला-पळा; नाहींतर, हे चांडाळ दगा देतील! पळा." असें **महिपतराव** सांगत आहे तोंच **खोजारोषन** व **झमरुद्द महिपतरावा**शीं भिडले. तरी, रावानें मागें पाहून ह्मटलें "लौकर पळा!"

लुतुफखानाच्या दुसऱ्या तुकडीचा मुख्य यासीनखान यानें लालनकडे पहातांच तिला ओळखिली. तो ह्मणाला, "वैरागीण! मी मेलों तरी बेहत्तर; पण, हिला आतां सोडीत नाहीं."

"अरे एक घोडा आणा! मला एक घोडा द्या! झमरूद, गध्या! सैतान! घोड्यावरून खालीं उतर." हे आपल्या धन्याचे रागाचे शब्द ऐकतांच खोजारोपन महिपतरावाबरोबर लढत होता त्यास तिकडेच सोडून झमरूद लुतुफखानाकडे आला.

तेव्हां महिपतरावाचें सांगणें खरें, असें महादाजीस दिसलें. बहुतेक मराठे लोक यमुनेकडे जात होते. महादाजीच्या टोळीचा सर्वांशीं संहार झाला. कित्येक छावणीकडे जाणाऱ्या लोकांनीं आपला पहिला मार्ग सोडून यमुनेचा रस्ता धरल्यामुळें पळपट्या लोकांची त्या मार्गांत फारच गर्दी जमूं लागली. त्यांच्या मागें लुतुफउल्लाची टोळी लागली. बाकीचे कित्येक अफगाण छावणीपासून दूर होते. त्यांनीं, मराठ्यांच्या मागें लागण्यांत कांहीं अर्थ नाहीं असा विचार करून मराठ्यांच्या पिछाडीच्या लोकांवर तरवार गाजविली. तेथेंही मोठी लढाई सुरु झाली.

महादाजी, महिपतरावास सांगण्याकरितां जाणार व लालनबरोबर गेलेल्या स्वारांपैकीं कोणी मदतीस मिळतो कीं काय हें पहाणार, इतक्यांत एक अफगाण स्वार आपल्या भापेंत ओरडत आला. "वहावा! तीच स्त्री! पुनः तीच! आतां ती हटकून माझें इनाम!" त्यानें लालनच्या घोड्यावर पिस्तोल झाडलें. त्याबरोबर तो खबरदार व इमानी घोडा सरळ पुढें जाऊन मागें पडला.

लालन भीतिग्रस्त झाली. खुदायार पुढें येऊन त्यानें तिला पकडली असें पहातांच महादाजीनें बिजली मागें फिरविली, आणि अचुक पिस्तोल उडविलें. त्याची गोळी खुदायाराच्या मस्तकांत बसली आणि तो ठार झाला! तेव्हां लालन महादाजीकडे चालत येऊन ह्मणाली, "प्राण, मला वांचवा!" तिनें महादाजीच्या घोडीची रिकीब धरून सांगितलें, "आपल्या निराधार दासीचें रक्षण करा! कारण, खुदायार प्राणास मुकतो आहे."

इतक्यांत झमरूदच्या घोड्यावर बसलेला लुतुफ ओरडून ह्मणाला, "ती पहा चालली! तिला पकडा."

महादाजीनें हात पुढें करून ह्मटलें, "प्रिये, वर ये. उडी मार. माझ्या मागें बैस. मला घट्ट धर. बिजलीच्या देहांत प्राण आहे तोंपर्यंत भीति नाहीं. ती आह्मां दोघांस खचीत दूर नेईल."

महत्प्रयासानें लालन घोडीवर बसली. महादाजीनें काठेवाडी घोडीस थापटून थोपटून हुशार केली, आणि भरधांव पुढें चालविली.

---

## प्रकरण ४० वें.

### गार्द्यांची पिछेहट.

महादाजी व लालन, यमुना नदीकडे जाणाऱ्या लोकांबरोबर खुल्या मैदानावरून निघालीं. क्षणभर त्यांचें मन शांत झालें. आपण मोठ्या सुदैवानें व शिताफीनें

काळाच्या तोंडून वांचलों, असें तीं ह्मणूं लागली. त्यांनीं आजूबाजूस दृष्टी फेंकिली तेव्हां त्यांस आपल्या लष्करांतील उजव्या बाजूचे शेंकडों मुसलमान पळून आहेत व त्यांच्यामागें शत्रूचे कोणी लोक नाहींत, असें दिसलें.

रोहिल्यांचा पराभव झाल्यावर इब्राहीमखानाच्या लोकांशीं युद्ध करावयास कोणी नव्हतें. खानाचें फार नुकसान झालें हें खरें; तरी त्यास बराच अवकाश मिळाला. आपल्या लोकांस धीर देण्यास सवड सांपडली. व्यवस्था करावयास वेळ मिळाली, आणि श्रमांचा थोडा परिहारही झाला. कपटी मल्हारराव मागें फिरला. आतां, मधील सेनेची फजीती होईल असा विचार करून इब्राहीमखानानें स्वसेनेस उत्तेजन दिलें व कित्येक लोक भाऊच्या मदतीस पाठविले. खानाच्या या उपयुक्त प्रयत्नानें मराठ्यांस यश आलें असतें; परंतु, त्यांच्या दुर्दैवानें त्याचा यत्न सिद्धीस गेला नाहीं. त्यास त्याचा नाइलाज ! त्या युद्धांत इब्राहीमखान जखमी झाला, तरी त्यानें मागें फिरण्याची उत्तम व्यवस्था केली; आणि ती लौकरच अमलांत आणिली. इब्राहीमखान हळूहळू मागें येत होता. तो व त्याचे लोक असें समजत होते कीं, सुरक्षित पळून जावयास सर्वांत उत्तम मार्ग मुसलमानी छावणीच्या उजव्या बाजूनें दिल्लीकडून यमुनेकडे जावें हाच होय. तिकडेच मल्हारराव व दमाजी जात होते. शिंद्यास शत्रुसेनेंतून जाणें भाग पडलें; परंतु इब्राहिमाचा प्रकार तसा नव्हता. आपल्या विजयाच्या जाग्यांवरून मोकळ्या मैदानांत येण्यास त्यास सवड होती. त्यानें भाऊस मदत करण्याकरितां पुढें जातांना आपलें

पहिलें स्थळ सोडून दुसऱ्याचें अवलंबन केलें होतें. तेथून निघावयास त्यास अडचण नव्हती. मध्यभागांतील भाऊ-च्या जवळचें लष्कर सफाई नाहींसें करण्यांत अफगाण गुंतले होते. तितक्या वेळांत इब्राहिमास घोडेस्वारांच्या लहानशा तुकडीशिवाय कोणी हरकत केली नाहीं. त्या तुकडीस पिटाळून लावण्यास दहापांच गोळ्या बस्स होत्या. परंतु, शहा युद्धाच्या दगदगींतून रिकामा होतांच त्याची दृष्टी तिकडे गेली. त्यानें इब्राहीम व्यवस्थेशीर मागें फिरतो व दुसऱ्यास चांगल्या रीतीनें मागें फिरण्यास मदत देतो असें पहातांच त्यास असें वाटलें कीं, आपल्या हातीं सांपडणारे लोक अशा पद्धतीनें निघाले, तर बिल-कुल हातीं लागणार नाहींत. त्यानें पानिपतकडे जाणाऱ्या घोडेस्वारांस एकदम प्रतिबंध करून इब्राहिमाकडे जाव-याचा हुकूम दिला.

एकदां आपली रांग फुटली ह्मणजे आयुष्याची दोरीच तुटली, हें खान पक्कें समजून होता. अफगाणी घोडेस्वारां-शीं तो मजबुतीनें व धैर्यानें लढूं लागला. सपाट्याबरोबर त्यानें अफगाणांवर तोफखाना सोडिला. तेव्हां अफगाणां-स जय मिळण्यासारखा असून ते भयानेंच मागें हटले आणि वाट सांपडेल तिकडे पळूं लागले. कर्मधर्मसंयो-गानें तितक्यांतच इब्राहिमास आकस्मिक मदत मिळाली. तींत पानिपतकडे जाणारे दुःख, अज्ञान व भीतिग्रस्त लोक व कित्येक जनावरें होतीं. आणि दुसरी मदत शिं-द्यासारख्या यमुनेकडे जाणाऱ्या बहादुर व पराक्रमी लो-कांची. स्वाभाविक रीतीनें हे लोक बादशाही छावणीकडू-न जाणाऱ्या मार्गानें इब्राहिमाच्या डाव्या बाजूकडून

जात होते. आणि प्रसंगच घेतला, तर ते शत्रूंशीं चार हात करावयास मागें पुढें पहाणारे नव्हते.

प्राण घेऊन पळणाऱ्या टोळीची स्थिति चमत्कारिक दिसे. त्या लोकांच्या मुखश्रीवरील औदासीन्य, प्राणभयानें दाही दिशा अवलोकनाची तऱ्हा, मनाचे नाना तरंग इत्यादि प्रकारांविषयीं सांगावें तितकें थोडेंच. तरी, ती आपला बचाव करून निघाली. तिच्या समोरची बाजू मोकळी झाली. कित्येक लोकांनीं ती दिशा सोडिली. ते दुसऱ्या बाजूकडे वळले आणि कित्येक गायकवाडास व होळकरास मिळाले. ह्यावरून ते किती त्वरेनें पळाले हें सांगावयास नकोच! शेवटीं त्यांची इतकी गर्दी जमली कीं, हें एक पळपटें लष्करच झालें! त्या लोकांना आपल्या दोन बाजूंचें रक्षण करणें भाग होतें.

पळपट्या लोकांच्या मागें नेहमीं भीति असतेच. ते कावरेबावरे होतात, व त्यांची मति गुंग होते. त्यांत, विचारानें पळणारा कसातसा आपला बचाव करून घेतो; पण, अविचारी असला ह्मणजे त्यास फार वेळ पळावें लागत नाहीं. इब्राहीम पळत होता. त्याच्या बाजूस विजयी अफगाणांच्या पुष्कळ टोळ्या एकत्र झाल्या. तरी त्याची चाल खुंटली नव्हती. त्याकडे मोठ्या तोफा होत्या. त्या, शत्रूंची गति बंद पाडण्यास पुरेशा होत्या. त्या त्यानें सुरू केल्या. जो तो आपल्या बचावाची तजवीज पहात असे. आपण आहों त्या जाग्यावरून हालावयाचें नाहीं, असा त्यांचा विचार झाला. मुसलमानांचा जमाव मोठा होता. त्यांनींही गोळागोळीस प्रारंभ केला. तेव्हां पुढचे

लोक पुढें पळूं लागले. कित्येक जमिनीवर पडले आणि आह्मी पुढें जात नाहीं, येथेंच मरतों, असें ह्मणूं लागले.

इब्राहीम डगमगला नाहीं. शत्रु नव्या दमाचे होते, तरी तो युक्तीनें आपली बाजू संभाळून मागें हटत होता. लढाईचा प्रसंग आला, तरी त्याची तयारी होतीच. आतां, ती तयारी साधारण होती हें उघड दिसतें. कारण, तोफखान्याचे घोडे मेलेले व जखमी झालेले. तोफखान्यावरील लोकांचा विचार, शत्रूंचा जोर जसजसा जास्त होईल, तसतशी एखादि दुसरी तोफ टाकून पुढें जावयाचें, असा होता. इतक्यांत त्यांजवर अफगाणांच्या छावणीवरील मोर्चांतून तोफा सुटूं लागून पळपट्या लोकांचा व गार्द्यांचा धुव्वा उडूं लागला. तरी भाऊसाहेबास ज्या तुकडीचा अभिमान होता, तिनें एकसारखा बंदुकांचा भडिमार करून उत्तर दिशेकडील घोडेस्वारांस दूरच्या दूर ठेविलें.

सारांश, गार्दी निमूटपणें मागें फिरणाऱ्या लोकांमध्यें आले. त्यांच्यामागें शत्रु हात धुऊन लागले होतेच. ह्याचवेळीं महादाजी व लालन हीं तिकडे जात होतीं. महादाजीची खातरी होती कीं, शत्रूच्या हल्ल्यास मराठे जुमानणार नाहींत.

दोन्ही हातांत शस्त्रें घेऊन इब्राहीमखान टोळीच्यामध्यें उभा होता. त्यानें कपाळास फेंटा बांधला होता. त्याची अर्धी दाढी जळली होती. उजव्या पायाची जखम त्यास चालूं देत नव्हती. रागानें व तिरस्कारानें तो वारंवार शत्रूंकडे पहात असे. त्वेशानें तो ओंठ चावीत होता. तोंडांतून फेंस येत होता तरी आपल्या लोकांस उत्तेजन देण्यास तो सिद्ध होता. त्याजवळ बिगुलवाला उभा होता.

बंदुकांचा मारा करावा असें त्यास वाटलें ह्मणजे तो बिगुलवाल्यास सांग; आणि बिगुलवाला बिगुल वाजवून इशारत देई. त्या टोळीच्या दुसऱ्या बाजूवर शत्रु तुटून पडल्यामुळें त्यांस सर्व हालचाल दिसे. मेलेले व घायाळ झालेले लोक त्या टोळीच्यामध्यें होते आणि बाकीच्यांनीं गोळीबाराची तयारी केली होती. महादाजी तिकडून जात होता. तो इब्राहिमाचा शूरपणा व हिंमत पाहून स्वस्थिति विसरून ह्मणाला, "शाबास! इब्राहीमखान, बहाद्दार शौर्य! याचें नांव धैर्य! धन्य आहे तुझी इब्राहीम! तुझा जयजयकार होवो!!"

इब्राहिमानें इकडे तिकडे पाहिलें. आपली तारीफ कोण करितो हें त्यानें ओळखलें आणि हंसत ह्मटलें "शाबास! रावसाहेब, शाबास! लढाइंत पराभव झाला त्यास इलाज नाहीं; पण, आतां मराठे गार्द्यांची थट्टा कधींही करणार नाहींत व लागट बोलणार नाहींत. तुह्मी मध्यें येणार?"

"नाहीं! भाई, नाहीं! मी तुमची सर्वांत जास्त तारीफ करितों. पण, आज मराठ्यांचा किल्ला त्यांचें जीनच होय. आल्लेबेली (ईश्वर राखो.) खानसाहेब!"

"त्याची मर्जी, रावसाहेब!" हें इब्राहिमाचें भाषण ऐकतांच महादाजी पुढें निघाला. इतक्यांत, मागून दीन! दीन! करीत लुतुफउल्ला व त्याचे साथीदार आले.

आपल्या नायक-नायिकेस शत्रूचे हृदयविदारक शब्द ऐकूं येत होतेच. पण, गार्द्यांच्या बाजूस मोठी लढाई जुंपल्यामुळें महादाजीस तिकडे जावयास कठीण पडलें. त्यानें आपल्या घोडीवर व दैवावर भरंवसा ठेविला. दिल्लीकडील रस्त्याचा शत्रूनें घेरलेला शेवटचा भाग

सोडून तो पुढें निघाला. इतक्यांत, त्याच्या पिछाडीस तोफांचे व बंदुकांचे आवाज होत होते ते एकाएकीं कां बंद पडले हें पहावयास त्यानें घोडी फिरविली. तेव्हां अवघा रस्ता मराठ्यांनीं भरला. सुभ्याच्या नव्या लोकांनीं इब्राहिमाच्या कवायती स्वारांवर हल्ला केला. गार्द्यांची पायमाल झाली आणि मराठ्यांच्या धास्तीचा निकाल झाला, असें त्यांस वाटलें.

तरी, अद्याप महादाजीच्या मागें दीन! दीन! लागला होताच. लुतुफ ह्मणाला, "ती तिकडे चालली. मला ती पाहिजे." महादाजीनें हे शब्द ऐकले तेव्हां त्याला नव्या भीतीची शुद्धि आली. लुतुफखान त्याच्या पाठलागावर होताच.

महादाजीनें तरवार हालवून घोडीस लौकर चालण्याची इशारत करितांना ह्मटलें, "बच्चाजी, बिजलीवर दुप्पट भार आहे, तरी तिला गांठतां गांठतां तुझ्यासारखे दोन मरतील! कां बिजली, असेंच ना?"

बिजली तिरासारखी चालूं लागली हेंच तिचें उत्तर.

---

# प्रकरण ४१ वें.

## जिवंतमृत.

आपल्यापुढें कित्येक मराठे वगैरे स्वपक्षांतील लोक पळत आहेत असें पहातांच, महादाजीच्या जिवांत जीव व प्राणांत आशा उत्पन्न झाली. रस्त्यावर जसे

अनेक देखावे दिसत होते, तसेच त्याच्या मनांत नाना तऱ्हेचे तर्क-कुतर्क येत जात असत. त्याचें मन शांत झालें. तो मनांत ह्मणाला, "आपलें प्रीतिपात्र जवळच आहे. शस्त्रास्त्रें सज्ज आहेत. प्रभातकाळीं जनानखाना गेला असला आणि **रोहिल्यांच्या** तावडींत सांपडला नसला, तर इतक्यांत तो **मल्हाररावास** भेटेल. विजली जिवंत आहे तोंपर्यंत उभयतांची चिंता नको."

विजली भरधांव चालत होती. एक तास गेल्यावर **महादाजी** ह्मणाला, "**लालन**, मागें शत्रु दिसतात कीं, नाहीं, तें पहा बरें!"

**लालन** आश्चर्यानें ह्मणाली "प्राण, पुष्कळ लोक सुमारें अर्ध्या कोसावर दिसतात."

विजली युद्धप्रसंगांत थकली होती. तिला लहान मोठ्या जखमा झाल्या होत्या. आणि तिजवर दुप्पट वजन असूनही ती निमकहलाल भरधांव पळत होती. जरी ती बेजार होती, तरी आणखी कितीएक तास तशाच स्थितींत काढती. तिला थोडा तरी विसावा मिळेल, अशा हेतूनें **महादाजीनें** तिला उभी केली. आणि कदाचित **लालन** मागच्या मागें पडेल ह्मणून आपल्या शेल्यानें तिला आपल्या कमरेस घट्ट बांधिली. इतक्यांत शंभर घोडेस्वारांसह **लुतुफउल्ला** जवळ आला.

लढाईनंतर बिजलीनें पहिला श्वास घेतला असेल नसेल इतक्यांत तिला शत्रूंची चाहूल समजली. तेव्हां ती खिंकाळून पाय आपटूं लागली व मान उंच करून शत्रु जवळ आले असें सुचवूं लागली. 'आपल्यास लौकर

चालवा' असें महादाजीस ज्या उपायानें सुचवितां आलें, तितके उपाय तिनें केले. महादाजी तेव्हांच समजला आणि तीनशें हातांवर शत्रु आहेत तों त्यानें बिजलीस भरधांव काढिली.

बिजली महादाजीस घेऊन जोमानें निघाली.

पुनः शत्रु व महादाजी ह्यांत अर्ध कोसाचें अंतर पडलें. महादाजीचा जीव बिजली! तो तिला जपेल, तर ती त्याचें रक्षण करणार. त्यानें पुनः तिला श्वास घेऊं दिला आणि मागें पाहिलें. शत्रूंची संख्या २५।३० असेल, असा त्यानें अंदाज केला. त्याचा तर्क खरा होता. कारण, लुतुफखानाबरोबरचे बहुतेक लोक लुटालूट करण्याकरितां मागें राहिले आणि कित्येक व्यर्थ पाठलागांत हांसल नाहीं असें समजून मागें फिरले होते. लुतुफखान आपल्या मानसिक त्वेषानें लालन पकडणार ह्मणून मागून येत होता.

बिजली दुःखभाराक्रांत झाली होती. नाकांतून फेंस निघूं लागला. तिला श्वासोच्छ्वासाची पंचाईत पडूं लागली. तरी, महादाजीचा इशारा होतांच आपल्या उमद्या जातीगुणांचा प्रकाश पाडण्यास ती बिलकुल माघार घेत नसे. ती आपल्या धन्यास सूचना करी, त्यास धीर देई आणि आपल्या प्राणाची बेपर्वा करून मालकाचे प्राण वांचविण्यास तत्पर होत असे. लुतुफचा घोडा चांगला होता. परंतु, त्याची चाल बिजलीच्या मानानें फार कमी होती.

महादाजीनें आसपासच्या पळपट्या लोकांस लुतुफखानाचा समाचार घ्यावयास सांगितलें. पण, तेव्हां कोण

कोणाचा धनी? आणि कोण कोणाचा चाकर? जो तो आपल्या प्राणाच्या रक्षणांत दक्ष. अफगाणांच्या भयानें ते भ्यालेले, कित्येकांनीं हत्यारें टाकलेलीं; अशा स्थितींत ते काय करणार? घोडेस्वार शत्रूपासून दूर जाण्याच्या भानगडींत. पायांनीं जाणारे नदी-नाल्यांत किंवा झाडी-झुडपांत प्राण धरून रहाण्यास तयार. तरी एका अरबानें महादाजीचें सांगणें मान्य केलें आणि ओढ्यांतून गोळी सोडिली. तिनें एक ठार झाला व एक जखमी केला. तेव्हां लुतुफबरोबरचे दहा पंधरा स्वार तिकडे वळले.

कित्येक मोहाच्या झाडीकडे जात होते. कोणी झील व मातीच्या झोंपडांकडे, कोणी नदीनाल्याकडे, झऱ्यांकडे, आंब्याच्या व चिंचेच्या झाडांकडे, कोणी धर्मशाळेकडे, आणि कोणी कोणी वाट सांपडेल तिकडे पळत होते. जावें तिकडे व पहावें तेथें पळपटे लोक. मेलेल्या घोड्यांनीं रस्ता भयाण दिसे. कित्येक जखमी घोडे कल्पांत करीत. कित्येक मालानें लादलेले व रिकामे उंट नाल्यांत ओरडत होते. भाले, बंदुका, बर्च्या व तीर जिकडे तिकडे पडलेले होते. 'कित्येक घायाळ निरामय जागा वाटेल तेथें कण्हत-कुथत होते. पाण्याच्या झऱ्याजवळ घोड्यांचीं हजारों पावलें उमटलेलीं होतीं. निराधार स्त्रिया व बालकें भिंतीमागें व वृक्षांआड लपून रहात. कित्येक भयानें व दुःखानें एकसारखीं ओरडत. त्यांपुढें नर, मल्हारराव व दमाजी यांनीं रोहिल्यांचा जेथें संहार केला होता, तेथें मुसलमानांच्या प्रेतांचा कचकल पडला होता. दरएक गांवांत भीतीवाद्य वाजत होतें.

प्रत्येक गांवच्या लोकांनीं आपला यथाशक्ति बचाव केला आहे, असें दिसे. जिकडे तिकडे कावळे, कुत्रे व गिधाडें फिरत होतीं. त्यांच्या जमावाकडे पाहिलें किंवा त्यांच्या आनंदाचा विचार केला, तर असें वाटे कीं, असा वेळ पुनः येईल किंवा नाहीं ह्या संशयानें ते मनसोक्त कर्म करीत असावेत! कोल्हे, लांडगे, वाघ व सिंह इत्यादि अनेक हिंसक पशूंची रात्रीं खरोखरच धांदल उडत असेल! दिवसाचे ते तोफा व बंदुकांच्या आवाजानें दूर पळाले होते.

रोहिल्यांचीं प्रेतें संपल्यानंतर मराठ्यांची टोळी पुढें निघाली. तिनें यमुनेवरून दिल्लीकडे जाण्याचा रस्ता जेथें फुटतो, तेथपर्यंत मार्ग आक्रमण केला. संध्याकाळचा सहा घटका दिवस होता. सूर्य पश्चिमेकडे चालला होता. सूर्याचे घोडे थकले, तेथें मग महादाजींची घोडी काय करणार!! त्यास वारंवार घोडी थांबविणें भाग पडे. तशांत लतुफखान व महादाजी यांमधील अंतर थोडें होत आलें. दोघांचीं वहानें ठोकर खात जेमतेम जातीगुणांप्रमाणें चाललीं. उत्तरेच्या घोड्यापेक्षां दक्षिणेच्या घोडीनें अद्याप चांगला टिकाव धरिला. महादाजीस पुढें मोठमोठे धुरळ्याचे लोट दिसूं लागले तेव्हां तो मनांत समजला कीं, ही होळकराची सेना असावी! मल्हाररावानें नजीबउद्दवल्याशिवाय कोणाचा विश्वास धरिला नव्हता. आणि होईल तितकें लौकर ज्यास फक्त पलायनच करावयाचें, तो सहज इतका दूर॰ येईल!

महादाजीनें तराव्या खेपेस लगाम खेंचून विचारिलें. "प्रिये, भ्याली नाहींस ना?"

"जगदीश समर्थ आहे. तुह्मी जवळ असतांना भीतीचें नांव कसचें?"

"त्या यमदूतांच्या तडाक्यांतून आह्मी लांब जाऊं तितकें चांगलें." महादाजींची शिरांत्रें वाळत चाल्लीं. शत्रु पाठलागावर आणि आपल्या हातून कांहींही होत नाहीं, यामुळें मोठा कष्टी होऊन तो ह्मणाला. "तुला कसें वाटतें?"

"नाथ, हिंमत धरा. प्रसंगाचा नेम नाहीं. हिंमत सोडूं नका." इतक्यांत लुतुफउल्ला जवळ आला. सूर्यास्त झाला. संधिप्रकाश नाहींसा होत चाल्ला. पळपट्या लोकांनीं चिलीम ओढण्यास जो विस्तव तयार केला होता, तोच रस्त्याच्या शोधार्थ उपयोगीं पडला. तो देखावा दिल्लीच्या भावी स्थितीचा प्रदर्शकच होय.

लुतुफखान व महादाजी ह्यांस तो प्रवास कंटाळवाणा व दुःखदायक झाला. बिजलीच्या अंगांतून घामाच्या धारा वाहत होत्या तोंड फेसानें भरलें. मान खालीं वांकली. तिला एक पाऊल चालण्याचीही शक्ति राहिली नाहीं. तरी, लुतुफ जवळ आला असें समजतांच महादाजीच्या सूचनेचा अवकाश! ती जीव जाईपर्यंत पळावयास तयार. पुन त्या दोघांत चार पांचशें हातांचें सहज अंतर. लुतुफखानास पक्कें माहीत होतें कीं, एकदां आपला घोडा थांबविला ह्मणजे कापला तरी पुढें पाय टाकणार नाहीं; ह्मणून तो त्यास एका चालीवर धरून होता.

महादाजीच्या मनांत एकदां काय तो निकाल होईल तर बरें, असें आलें. पण, हजार विघ्नें त्याच्यापुढें तयार!

लुतुफबरोबर आतां दोन तीन इसम होते. तरी ते महादाजीस भारी होते. सरजान मालकम ह्यांस जेव्हां महादाजीनें ही हकीकत सांगितली, तेव्हां तो देखावा मूर्तिमंत त्याच्यासमक्ष चालला आहे असा त्यास भास झाला. महादाजी ह्मणाला "भयानें मी व्याकुळ होतों. तशांत माझ्यामागें एक लकडें! तरी, मीं शत्रूवर सर्पाप्रमाणें नजर ठेविली होती साहेब, तुह्मास काय सांगूं! बहुधां आमरण तो प्रसंग मी विसरणार नाहीं. चार आठ दिवशीं त्या स्मरणानें मी स्वप्नांत भ्यालों नाहीं किंवा ओरडून उठलों नाहीं, असें होतच नाहीं. स्वप्नांत माझें शरीर रोमांचित होतें, मी घामाघुम होतों, मला कंप सुटतो आणि आतां मी ठार मेलों असें वाटतें. अहो, तो घोडा नव्हे; खरोखर राक्षस! माझ्यामागून तो वीस कोस एकसारखा धांवत होता; पण, मध्यें कोठें थांबला नाहीं किंवा त्याला घामही आला नाहीं!"

महादाजीजवळ लुतुफउल्ला आला व ऐटीनें ह्मणाला "अरे काफर, संभाळ. आतां पकडलीच."

आतां धडगत नाहीं व लुतुफच्या हातून आपली सुटका होणें कठीण, असें लालनच्या मनांत येतांच "जगदीश सत्याचा जय करील" हा नियम तिला सुचला. आणि तिनें आपल्या मनाचें समाधान करून महादाजीच्या कानांत सांगितलें "सरकार, घोडी थकली. ती फार वेळ आतां टिकाव धरील असें दिसत नाहीं. माझी मान कापा आणि मला फेंकून द्या; ह्मणजे समयीं तुमचा प्राण वांचेल!"

हिंदुस्थानच्या इतिहासांत ह्या गोष्टी सामान्य आहेत.

कारण, असे प्रकार इकडे विपूल घडतात. महादाजी लालनवर फार प्रीति करी. त्यानें इतका वेळ तिच्या उत्साहवाक्यांनीं समाधानींत काढिला; आणि आतां तिला मारावें असें त्याच्या मनांत कसें येईल? तो ह्मणाला, "माझ्या हातून तसें होणार नाहीं. मेलों तर दोघें मरूं आणि वांचलों तर दोघें वांचूं."

लालन स्वस्थ राहिली. अंधःकार झाला. समोर झाडें-झुडपें व एक नाला दिसूं लागला. घोडी पळत होती. लुतुफउल्ला जवळ आला. फार तर शंभर हात अंतर असेल नसेल. तेव्हां "खबरदार, काफर! मीं तुला पकडलें." असे शब्द लालनच्या कानीं आले. आतां आपला बचाव होत नाहीं, असें तिला दिसलें. तिनें दांत-ओंठ चावले, दैवाची निर्भत्सना केली, कमरपट्ट्यांतून सुरी काढिली आणि आत्महत्त्या करण्याचा निश्चय केला. पुनः तो तिचा विचार फिरला, व ह्मणूनच ती वांचली. आपलें आयुष्य प्रियकरास देतां येतें, तर तिनें तसेंही केलें असतें.

लुतुफउल्ला बराच जवळ आला. तो आतां लालन पकडणार; परंतु "मनांत असतें एक व दैव करतें भलतेंच!" घोडा लौकर चालावा ह्मणून त्यानें त्यास टांच मारिली; आणि "काफर, आतां कोठें जाशील?" असें ह्मणत तो पंचवीस हातांवर आला.

विजली मृत्युमुखांत होती, तरी ती जीव घेऊन पळूं लागली. पण, तिचा दम निघेना. लुतुफ तिच्यामागें लागला. इतक्यांत नाल्याच्या बाजूनें कोणी गोळी झाडिली. ती अचुक लुतुफच्या घोड्यास लागून तो जमिनीवर पडला. घोडा फारच दमला होता आणि

स्वाराचीही तीच दशा झाली होती. घोडा मरतांच लुतुफ निराधार झाला! आतां आपण वांचत नाहीं, असा त्यानें अजमास केला. पुनः लालन हातीं सांपडलेली जाते हा विचार सुचतांच त्यानें गोळी कोठून आली ह्याचा तपास करून येण्याकरितां एका स्वारास पाठविलें.

महादाजीस ठार मारून लालन न्यावी, अशा हेतूनें लुतुफउल्लानें पिस्तोल झाडतांना ह्मटलें "वैरागीण, संभाळ!"

देवाच्या मनांत आलें तर तो महत् संकटांतूनही पाहिजे तसा वांचवितो. "देव तारी त्यास कोण मारी" ही ह्मण अशाच अर्थाची द्योतक आहे. लुतुफचें पिस्तोल सुटावयास व विजली बसावयास एकच गांठ पडली. लुतुफचा नेम चुकून विजलीस लागला. एकदां विजली बसली ती बिचारी पुनः उठली नाहीं! तिनें मरेपर्यंत आपला निमकहलालपणा गाजविला. शिंदा खालीं येतांच लालन सुरी घेऊन तयार झाली; आणि तिनें त्या शस्त्रानें आपला बंद तोडिला.

महादाजीनें गेलेल्या स्वाराची थोडा वेळ वाट पाहिली; आणि आतां काय होणार तें होवो असा निश्चय करून तो ह्मणाला, "अरे, दोघांचीही स्थिति सारखीच आहे. तूं लढाईत जय मिळविलास व मीं स्त्री मिळविली; इतकेंच विनाकारण भांडून मरण्यांत हांसल नाहीं. आल्या वाटेनें खुशाल जा. मी तुला जीवदान देतों." असें ह्मणत ह्मणत त्यानें लुतुफच्याबरोबर जो एक स्वार होता, त्यावर अचुक गोळी टाकिली आणि त्यास जमीनदोस्त केलें.

लुतुफ महादाजीवर पिस्तोल मारणार, इतक्यांत महादाजी तरवार घेऊन त्यावर धांवला. त्याचा तडाका पिस्तोलाच्या हातावर उलटा बसला आणि पिस्तोल खालीं पडलें. तेव्हां लुतुफउल्लानें " काफर, संभाळ! " असें ह्मणत तरवार उपसली.

दोन्ही पक्षांचा विचार केला तर आतां महादाजीचें सुदैव होतें, असें ह्मणावें लागेल. कारण, द्वंद्व युद्धांत तो लुतुफखानास दाद देता ना. परंतु, त्याच्या मांडीची जखम त्यास फार दुःख देत होती. तरी त्यानें तिची बेपर्वाच केली. तो ह्मणाला " डुक्करखाऊ, हरामखोर, बेइमान, घे लालन! "

" अरे जा! तुझ्यासारख्या शेंकडों लोकांचा मी काळ आहें. तिला नेईन तरच जातीचा अफगाण! "

दोघांच्याही तरवारी चमकूं लागल्या. लुतुफचा पहिला तडाका व्यर्थ गेला. महादाजीनें त्याच्या डाव्या हातास निमटता वार केला पुनः खानानें शिंद्यास एका पेंचांत अडविलें. शिंद्यानें तो पेंच उडवून खानास दुसरे पेंचांत अडविलें. तेव्हां खानाचा नाइलाज होऊन त्यानें डाव्या हातानें सुरी काढिली. ती तो महादाजीच्या पोटांत खुपसणार, इतक्यांत लालन अफगाणस्वाराची तलवार घेऊन आली आणि तिनें डाव्या हातावर एक तडाका मारिला. याप्रमाणें खान दोन्हीकडून कचाट्यांत सापडतांच महादाजी शिंद्यानें त्यास लालनच्या व जगाच्या प्रेमांतून मोकळें केलें!!!

प्रेमाचा सपाटा जबरदस्त आहे. त्याच्या तडाक्यांतून कोणी सुटला नाहीं. लुतुफउल्लाबरोबर शंभर स्वार होते.

परंतु, प्रसंगीं त्यांपैकीं त्याला एकही उपयोगीं पडला नाहीं. ज्या विषयास विष समजावयाचें, त्याला अमृत मानून तो मागें लागला; आणि आशेनें पुढें धांवला. परंतु, त्याची आशा निष्फल होऊन तो व्यर्थ मरण पावला !

महादाजी निर्वोर झाला. आज आपण मोठा जय मिळविला आणि त्यांत आपल्या प्रियेनें शौर्य—साहसाची कमाल केली ह्मणून तो प्रेमानंदानें तिला भेटला. तरी, लुतुफचा घोडा कोणाच्या गोळीनें मेला, मेलेला स्वार कोठें गेला आणि तो काय संकट आणितो किंवा स्वतःच संकटांत पडतो इत्यादि विचारानें त्याचें मन साशंक होतें. तो ह्मणाला " प्रिये, जगदीशाची कृपा मनुष्यमात्रांवर कशी असते हें समजणें कठीण! तूं तेव्हांच आत्महत्त्या करतीस, तर मी निराधार होऊन येथें मेलों असतों ! आज तूं माझे प्राण वांचविलेस ! तुझ्यासारखी स्त्री मिळण्यास मीं अनंत जन्म तपाचरण केलें होतें, असें वाटतें. तुझें धैर्य व शौर्य स्तुतिपात्र आहे. मला वाटतें, तूं प्रत्यक्ष देवीच माझ्या रक्षणास आलीस. शाबास ! याचें नांव प्रेम आणि हिचें नांव स्त्री ! "

लालन—प्राण, मीं काय केलें? उगीच मला चढवायला नको ! माझें कर्तव्य मीं केलें. परंतु, गेलेल्या स्वाराची काय अवस्था ? नाहींतर आणखी महत् संकट येईल !

महादाजी—लाडके, संकट आलें तरी देव समर्थ आहे. संकट आणणें व त्यांतून रक्षण करणें त्याच्या मर्जीची गोष्ट ! पण, आतां पुढें जावें कसें ?

असें महादाजी सांगत आहे तोंच "तिकडे कोण?" असा प्रश्न करीत कित्येक स्वार आले. त्यांच्या भाषणावरून महादाजीचा संशय दूर झाला. आणि त्यानें त्यांस विचारिलें "तुह्मी कोण?"

"मराठे. सरदार पानिपतकडील नारोशंकरचें शेवटील ठाणें. तुह्मी कोण?"

"महादाजी शिंदे."

मराठे—होळकरांचें लष्कर आतांच पुढें गेलें. तुमचा भिस्ती राणाखान आमच्याबरोबर आहे. आतां आह्मीं घोड्यांच्या टापांचा शब्द ऐकून गोळ्या सोडिल्या त्या तुह्मांपैकीं कोणास लागल्या नाहींत ना? तुमच्याबरोबर किती लोक आहेत?

महादाजी—राणाखानास इकडे पाठवा. तुह्मींच गोळ्या सोडिल्या काय? त्यांनीं आमचें नुकसान तर झालें नाहीं, पण फायदाच झाला. आह्मी दोघें आहों. तिकडे कोणी एक स्वार गेला होता?

मराठे—होय. त्या मुसलमानास आह्मीं ठार मारिलें.

महादाजी—शाबास! चांगलें केलें!

नारोशंकरचे लोक शिंद्यास भेटले. राणाखान आला. त्यानें एक घोडा आणिला, तोही चांगला होता. त्यावर पुनः महादाजी व लालन हीं स्वार झालीं आणि आनंदानें पुढें निघालीं.

राणाखानानें महादाजीवर अशा प्रसंगांत फार उपकार केले ह्मणून तो खानास बंधुपेक्षांही फार मान देत असे. पुढें महादाजीनें त्यास मोठ्या योग्यतेस चढविलें.

# प्रकरण ४२ वें.

## लढाईचा शेवट.

ज्या लढाऊ मराठ्यांनीं पानिपतचा आश्रय केला, त्यांस अवघी रात्र अफगाणांनीं वेरा घातला. दुसरे दिवशीं प्रातःकाळींदेखील घेरा होताच. अफगाणांनीं अतोनात लूट मिळविली. पानिपतसारख्या मजबूत छावणींतील व्यापारी, स्त्रिया, इतर लोक व मुलांबाळांसही त्यांनीं लुटून फस्त केलें. आधींच अफगाण लोक निर्दय; त्यांत ते जयाच्या धुंदीनें केवळ उन्मत्त राक्षसवत् बनलेले. दयेचा लवलेश नाहीं, तशांत मनास वाटेल तसें आचरण केलें तरी कोणी विचारपूस करणार नाहीं. मग काय? सांपडेल त्यास पाहिजे त्यानें लुटावें! स्त्रियांच्या व लहान बालकांच्या हालअपेष्टेस पारावार नाहींसा झाला. कित्येक स्त्रीपुरुषांस त्यांनीं दासी व गुलाम केलें. हजारों लोकांचा दावणींतील गुरांप्रमाणें बांधून वध केला. लष्करी लोकच असें निंद्य आचरण करीत असा अर्थ नाहीं. अफगाण बादशहा लाल तंबूंत बसून प्रत्येक हिंदूच्या शिरास बक्षीस देत होता. त्याच्यापुढें हिंदूच्या शिरकमलांचा एक मोठा ढीग पडला होता. त्यावर माशा घोंगावत आणि कावळेकुत्रे व गिधाडें वारंवार झडप घालीत. एखाद्या व्यापाऱ्याच्या दुकानावर जसी ग्राहकांची गर्दी घिरट्या घालिते, त्याप्रमाणें बादशाही सावकाराकडे शेंकडों लोक जात येत होते. तितक्यांत एक अफगाण स्वार आला आणि सांगूं लागला "खाविंद, हें विश्वासरावाचें प्रेत!"

बादशहा ह्मणाला "ओहो! काफरच्या राजाचा मुडदा!! दावा. मुकवा, जयाच्या निशाणीकरितां आपण तो काबुलास नेऊं."

मराठ्यांनीं मुसलमानांस पुष्कळ त्रास दिला होता. त्यांस हा जीव व हा लोक नको असें वाटत असे. परंतु, ते हिंदुस्थानांतील मुसलमान. जंगली अफगाणांप्रमाणें दुष्ट, क्रूर, अविचारी व फारसे आडदांड नव्हते. आणि त्यांसही वारंवार असे प्रसंग येणार, ही भीति होतीच. त्यांस शहाचें निंद्य कर्म पहावेना. ते निस्पृहतेनें बोलत नव्हते; पण. मनांत तळमळत होते. मराठ्यांनीं रोहिल्यांची त्रेधा उडविली, त्यांची नायनाट व धुळधाणी केली; तरी मराठ्यांविषयीं त्यांच्या अधिपतीच्या मनांत पूज्यबुद्धि होती. तो शुजाउद्दवल्याकडे गेला आणि सांगूं लागला, "जय आणि पराजय कोणाच्या स्वाधीन नाहींत. आपली आज अशी स्थिति आहे; पण उद्यां नानासाहेब किंवा राघोबाभगारी आला तर आमची काय दुर्दशा करील, हें सांगवत नाहीं! आह्मी विश्वासरावाचें प्रेत शहाकडून घेऊं आणि हिंदुधर्माप्रमाणें त्याची उत्तर क्रिया करवूं."

"आह्मी हिंदुस्थानांत रहाणारे आहों. जयापजयाचा प्रकार स्वतंत्र आहे; पण मृत मनुष्याचा विचार निराळा. त्यानें आह्मीं काय पाहिजे तें केलें, तरी तें आह्मांशीं भांडत नाहीं हें खरें. परंतु, तुह्मीं ह्मणतां त्याप्रमाणें केलेंच पाहिजे." असें ह्मणून शुजा उद्दवला शहाकडे गेला आणि ह्मणाला "खाविंद, आह्मी लढाईत जिवंत प्राण्यांचे घेपक शत्रु आहों. पण, मेलेल्यांचे मात्र नाहीं!"

खुरासानच्या बादशहानें लखनौच्या सुभ्याचें भापण ऐकून काशीरायप्रभृति मंडळीकडून मोठ्या समारंभानें विश्वासरावाच्या प्रेताचा संस्कार करविला.

इब्राहीमखान समरंगणांत पडला नाहीं. तो मरणोन्मुख जखमी असतां त्यास सुजाउद्दवल्याच्या फौजेनें पकडलें. "आपल्याकडे इब्राहीम आहे" ही गोष्ट लखनौचा सुभा शहास छपवूं पहात होता. पण, ती उघडकीस आली. एका मुसलमानानें आपल्या जातभाईशीं युद्धास प्रवर्त होणें ह्मणजे अफगाणांच्या विचारानें निंद्य —मोठा अन्याय—पण हिंदुस्थानांतील यवन तसें समजत नव्हते; इतक्याकरितांच इब्राहीम वांचला. कित्येकांचें असें मत आहे कीं, शहानें त्यास मागून घेऊन त्याचा शिरच्छेद केला. कित्येक ह्मणतात कीं, त्याच्या जखमांवर विप लावून त्याचे हाल केले आणि त्यांत तो मेला!!!

भाऊसाहेबाचें शीर सांपडलें नाहीं, असें कित्येक इतिहासकारांचें ह्मणणें आहे. न जाणों सुजाउद्दवल्यानें त्याचें प्रेत गुपचुप जाळिलें असेल! हल्लीं नानासाहेब पेशव्याविषयीं जशी लोकवार्ता आहे, तसेच भाऊसाहेबाविषयींही निरनिराळे लोक निरनिराळे तर्क करितात. परंतु त्याचा पत्ता लागला नाहीं, हें निर्विवाद खरें दिसतें.

जनकोजी रणक्षेत्रांतच पडला. तीच उत्तम गति यशवंतराव पवार व अंताजी माणकेश्वर ह्यांस मिळाली. समशेरबहादर फारच जखमी होता. पण तो लढाईच्या मैदानांतून पळून जात असतां मारला गेला.

ळकराच्या राज्याची व्यवस्था चांगली ठेविली. ती राज्यकारभार पहात असे. तिचे सर्वोत्तम गुण हासज्ञांस अवगत आहेतच. अहिल्येनें तुकाजी ा नांवचा एक पुरुष दत्तक घेतला. असो; सदाशीव-राव भाऊसाहेबाचा शाप मल्हाररावास भोंवला कीं काय समजत नाहीं!

*    *    *    *    *

सुजाउद्दवला रणांतून आल्यावर फार दिवस वांचला नाहीं. दिल्लीच्या आधीनतेंतून तो स्वतंत्र झाला खरा; पण, शेवटीं इंग्रजांनीं त्याचें राज्य बळकाविलें!

*    *    *    *    *

वारनहेस्टिंगच्या बेशरमी व निष्कारण ह...ज्यांत हाफिजरहिमतच्या राज्याची धुळधाण झाली! ...कीर्ति विद्वान् व परोपकारदक्ष बर्कनें इंग्लंडांत ग... नजीबउद्दवलाही आपल्या झबातीखान नामक ... दिल्लीची वजिरी देऊन लौकरच मेला!

*    *    *    *    *

काशीरायानें तेव्हांचा सर्व इतिहास ध्यानांत ठेविल... मोहनप्यारीकडून बरीच माहिती मिळविली, ... सोनपत पानपतच्या लढाईचा सविस्तर वृत्तांत लि... मोहनप्यारी कोण, हें सांगावयास नकोच. ल... परम कठीण भानगडींतून ती वांचली; परंतु ला... दुःखानें वेडी झाली. अफगाणांस तिला गुला... येईना व ठार मारावें असेंही वाटेना. कार... ...नेनी

(right margin fragments: चाकट, भाऊ, त्रि-, ांचा, ...नथे, ां., या, त्य, ारी, ...ढून, ...ण हें, घेतलें., ...। अफ-)

*

बीरबल-जाट-वांचला. पण, त्याचा पुतण्या
ता मारला गेला. अफगाण गेल्यावर तो सुरजमल्ल
चाकरीस राहिला. पुढें भरतपूरच्या लढाईत त्यानें
मोठा पराक्रम केला.

* * * * *

ह्या युद्धाच्या राजकीय परिणामाविषयीं सखोल विचार करण्याची ही जागा नव्हे. इतर राष्ट्रांनीं आपली अवनति जावी आणि उन्नति यावी ह्मणून जसे प्रयत्न केले, तसेच आपल्या हिंदुस्थानानेंही केले. प्रयत्न करणें हें आपलें काम. फलदाता जगदीश! परकीयांनीं हल्ला केला ... त्याचें निवारण करण्यास मोंगलांचें ... शर्त. त्याचा नाश झाल्यावर मराठ्यांच्या अंगीं ...रानें ती शक्ति ठेविली होती. पण, पानिपतच्या ... संग्रामक्षेत्रांत मराठ्यांनीं ती सफाई घालविली. ...त्या वृद्धीस जशी पाहिजे तशी प्रजा पाहूं लागलें ... आपल्या हिंदुस्थानांत मराठ्यांशिवाय दुसरी कोण... सांपडणार नाहीं. मराठे जसे तरवारबहाद्दर, चलाख, ...र, गुणग्राहक, साहक, शक्तिवान, मसलती व चतुर तसेच लबाड, हात राखून खर्च करणारे व दगल- ...त. लढाऊ व राजकीय रीतीची सुधारणा करावी हिंदुस्थान एकच संयुक्त राज्य करावें अशी त्यां- ... इच्छा होती. परंतु, दैवानें—काळानें—वेळ ...स इलाज नाहीं. नाहींतर त्यांनीं फार पहाण्यासारखें पुष्कळ करून दाख... वारनहेस्टिं- ... करून ...

चटसारीं कपटी आचरणें कोठच्या कोठें नाहींशीं . टाकिलीं असतीं व वेलस्लीचें बुद्धिकौशल्य गुं-ळून ठेविलें असतें. त्या वेळच्या स्थितीचा विचार केला, तर तूर्त जपानाची जशी स्थिति तशीच मराठ्यांची होती. आणि मोंगल, चिनांतील लोकांप्रमाणें होते. आ-पली नीचावस्था जावी व उच्चावस्था प्राप्त व्हावी ह्मणून महाराष्ट्रराज्यसंस्थापक श्रीशिवाजीनें जो मार्ग दाखविला, तोच मराठ्यांनीं उचलला. त्यांस आपली सुधारणा कशी होईल, हीच नेहमीं चिंता असे. परंतु, पानिपतच्या मैदा-नांत—कुरुक्षेत्रांत—कौरव पांडवांच्या दारुण युद्धानें कौ-रवांचा जसा सर्व नाश झाला, तसाच प्रकार मराठ्यांचा. पराभवानें तर नाश झालाच; परंतु, त्या नाशक अग्नींत कलहघृत पडतांच सर्व नाश झाला! राहिलेल- ज्याचे पांच सहा तुकडे झाले. आणि इसापनीतींतील प्रमाणें मोळींतील काठ्या मोकळ्या होतांच जशा पटाप-डल्या, तसेंच मराठी राज्याचें झालें. मराठे ज्यांस णसें ह्मणत, त्यांनींच मराठ्यांच्या राजांस धुळीचे खात पाठविलें! भविष्यकाळीं काय होईल, तें स मानवशक्तीबाहेरचें काम. उन्नतीमागून अवनति- नतीपुढें उन्नति—चढतीमागून पडती—पडतीपुढें —उदय झाला कीं अस्त—अस्तामागून उदय व्हा तूर्त असे दिवस आले, तरीही आनंद मानणें भ मराठ्यांची हीनावस्था आहे. प्रभुसत्ता असेल ... नको! मनुष्याची

पूर्वी होतें तसेंच आतां आहे. आणि आतां तसेंच पुढेंही रहाणार. जगदीश, तुझी इ बलवान् आहे !

## सोनपत पानपतच्या रणकंदनावर पोवाडा.

शिवाजी महाराजांचे नातू शाहू छत्रपति यांचे कारकीर्दींत पेशवे प्रथमतः उदयास आले. बाळाजी विश्वनाथ ह्यांस पेशवाईचीं वस्त्रें स० १७१४ त मिळालीं. पुढें त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे पुत्र बाजीराव बल्लाळ हे पेशवे झाले. त्यांनीं स० १७२१ पासून स० १७४० पर्यंत पेशवाई चालविली. त्यांचेमागून त्यांचे पुत्र बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब हे स० १७४० पासून पेशवाईचें काम पाहूं लागले. हे पेशवे असतां स० १७६० त मराठे व दुराणी लोक यांचेमध्यें पानिपत येथें घोर संग्राम झाला, त्याचें कारण असें:—

घरांतील वैमनस्यामुळें बाजीराव बल्लाळ यांचे धाकटे बंधु चिमणाजी अप्पा यांचे पुत्र सदाशिवराव भाऊ यांचे मनांत नानासाहेब पेशव्यांचे पुत्र युवराज विश्वासराव यांस दिल्लीचे तक्तावर बसवून आपण त्यांचा कारभार करावा, आणि पुनः पुण्याकडे पाहूंदेखील नये असें होतें. स० १७६० मध्यें अहमदशहा अबदाली गिलच्यांचा मोठा भरणा घेऊन हिंदुस्थानांत आला. आणि उत्तरेकडील मराठ्यांचीं ठाणीं घेऊं लागला. त्या गिलच्यांचें आणि उत्तरेकडील इतर शत्रूंचें पुरें पारिपत्य करावें या हेतूनें अफाट सैन्य जमवून भाऊंची स्वारी पुण्याहून निघाली. आपला देश व आपलें राज्य सोडून परक्याचे राज्यांत किंवा हद्दींत शिरून लढाई देणें हें काम अत्यंत कठीण असूनही भाऊंनीं तें अंगावर घेतलें. भाऊ हे रावणदुर्योधनादिकांसारखे मानी होते. अफ-

गाण लोकांसारख्या कडव्या लोकांशीं लढून जीव बचावून येणें फारच अवघड असतांही भाऊंनीं त्यांस टक्कर दिली. या युद्धापासून मराठ्यांची अत्यंत नासाडी होऊन त्यांस पुन: वर डोकें काढणें अत्यंत मुष्किलीचें झालें. असें घोर रणकंदन मराठेशाहींत पूर्वी कधींच झालें नव्हतें. हा महाप्रसंग महाराष्ट्राच्या वैभवाचा मध्य मानला असतां चालेल. याच्यापर्यंत मराठ्यांस जिकडे तिकडे यशच येत गेलें; व यापासून पुढें त्यांच्या सत्तेच्या ऱ्हासास आरंभ झाला. हें महायुद्ध होऊन गेल्यास आज शंभरांहून अधिक वर्षें जरी होऊन गेलीं, तरी अद्याप या देशांत आबालवृद्धांस त्याचें स्मरण बुजालें नाहीं. असो; तर असला महाप्रसंग इकडील शाइरांनीं कसा गाइला. याविषयीं सर्व शोधक मनुष्यांस मोठी उत्कंठा झाल्याशिवाय राहणार नाहीं. हें जाणून पुढील पोवाडा आह्मीं उतरून घेऊन साद्यंत छापिला आहे. याचे एकंदर अठरा चौक आहेत. भाऊसाहेबांची स्वारीवर नेमणूक होऊन ते दिल्लीवर गेल्यापासून तों शेवटचा मोड होऊन सगळी धुळधाण होईपर्यंत झालेला सर्व मजकूर यांत आणला आहे. या लढाईंत गाजलेले जे जनकोजी शिंदे, समशेरबहादर, गोविंदपंत बुंदेले, बळवंतराव मेहेंदळे वगैरे वीर, त्यांचें यांत प्रथक प्रथक वर्णन केलेलें आहे. हें महाराष्ट्रदेशीय भाटांच्या तोंडून कांनीं पडून गेल्या शंभर वर्षांत किती वीरांचे बाहु रणावेशानें स्फुरण पावले असतील !

**चाल**—वारी संकट हरि दामाजीचें । कौतुक देवाचें ॥

अमृतराय—

भाऊसारखा मोहरा । आह्मांवर कां रुसला पंचीप्यारा ॥
ध्रुवपद ॥

बहुत दिवस झाले शाहूला । जावें निजभवनाला ॥
नाना रावांतें तुह्मिं राज्याला । शिक्का दिधला त्याला ॥
अष्टप्रधान भाऊ बाजूला । हवालले राज्याला ॥
मुलूख मारुन केला चकचूरा । दुसमान कांपे थरथरा ॥
भाऊसारखा० ॥ १ ॥

बारा वर्षें झालीं राज्याशीं । कळून आलें त्याशीं ॥
धाड पडो रे त्या मुलखाशीं । कुणिकुन आली इवशी ॥
भाऊनें हकारलें राव सकळांशीं । कुळ दक्षिण भाईशीं ॥
दिली नौबद गेला दिल्लीशीं । हालीवलें तक्ताशीं ॥
रणखांब रोवुनि मारितो तलवारा । काशी तीर्थ अवधारा ॥
भाऊसारखा० ॥ २ ॥

तक्त फोडुनि केली धुळधाणी । असा नाहीं झाला कोणी ॥
राया प्रभुरायाची करणी । नांव गेलें राहुनि ॥
विश्वासराव बसविले नेऊनी । लिहिलें होतें कर्मी ॥ घडले
टांकसाळि रुपये आणि मोहरा । दिला अवघ्यांशीं रोजमुरा ॥
भाऊसारखा० ॥ ३ ॥

पहिली लढाइ झालि कुंजपुऱ्यावर । सकळ घेउनि दळभार ॥
म्होरें रोखले कमाण तीर । मार होती चौफेर ॥
कुतुबशाहा मारुनि केला चकचूर । त्याचें कापिलें शिर ॥
आला दक्षिणचा राजा धुरंधर । भाऊसारखा वीर ॥

सुटला अबदालीशीं दरारा । ह्मणे आतां सल्ला करा ॥
भाऊसारखा० ॥ ४ ॥
सल्ला ऐकेना झाला विघोड । अबद्या मुलुख सोड ॥
रुपये देत होता दोन कोड । धरिली भाऊंनीं आड ॥
तुजला मारिन मी करिन वेड । कंधार पाहिन पुढें ॥
रोवला रणखांब होती धडाधड । नदि जमुनेच्या कडे ॥
खेत्री हाणा ह्मणती रणशूरा । कुळक्षेत्रीं धरिला थारा ॥
भाऊसारखा० ॥ ५ ॥
पहिली लढाइ झाली फार ठीक । केले मोर्चे तकीब ॥
भोवतीं खागलासे खंदक । मधें भाऊचे लोक ॥
कुणिकुन आला खंडिचा घातक । होती बातमी ठिक ॥
दोन वेळां फिरविला माघारा । गिलचा केला घाबरा ॥
भाऊसारखा० ॥ ६ ॥
एक दिवस नेमला मरणाचा । वखत निर्वाणीचा ॥
भाऊनीं पैगम केला सकळांचा । धंवशा वाजे त्याचा ॥
एशी हजार खासा नांवाचा । धुरंधर भाऊचा ॥
एकाएकीं आला सामोरा । दिला कुचाचा नगारा ॥
भाऊसारखा० ॥ ७ ॥
प्रथम पडला गोविंदपंत बुंदेला । केला भाऊनीं हल्ला ॥
विसा हजारांशीं गिलचा आला । हुजरातीवर पडला ॥
मग साहिना बळवंतरायाला । ढिगांत जाउनि पडला ॥
भाऊ विनवितो बहादरा । रणीं राहिला बिचारा ॥
भाऊसारखा० ॥ ८ ॥
विश्वासराव शिपाई रणशूर । भले राजकुमार ॥
मारितो फौजा हातीं तलवार । रणांत होउनि धीर ॥
भोंवती गोळ्या वर्षति अपार । मध्यें उभे सरदार ॥

गिलचा कापला बेसुमार। भाऊ ह्मणे मागें फिर ॥
अवचित गोळि लागली धुरंधरा । मुखीं बोलला हरिहर ॥
भाउसारखा० ॥ ९ ॥

जनकोजी शिंदे रणशूर रणगाजी । चढती तुरंग तेजी ॥
त्याला भाऊसाहेब होती राजी । औंदा राखा बाजी ॥
मग फुरारले राव जनकोजी । शिरीं छत्र भावजी ॥
नित्य नेम गिलचा कापते चरांचरां। शिर थाडिनो पहानजरा॥
भाऊसारखा० ॥ १० ॥

सोनजी भापकर मानजी पायजोडे । रणीं टांकिले घोडे ॥
तुकोजी शिंदे पडले पायांपुढें । जसे अग्नीचे हुडे ॥
आणखी दमाजी गायकवाड । होळकर रणाभिडे ॥
अवघ्या शाहीवर आली धाड । अवचित झाला मोड ॥
एकाएकीं आला सामोरा । दिला कुचाचा नगारा ॥
भाऊसारखा० ॥ ११ ॥

समशेरबहाद्दर रणशूर रणगाडा । रणीं वाजे चौघडा ॥
हटकुन गिलचे हाणितो धडाधडा । ढाल तरवार जमदडा ॥
ज्याणें रणीं अडविला तीस घोडा । सन्मुख दावी मुखडा ॥
जसा बाजीचा पुत्र हिरा । येती जखमाच्या लहरा ॥
भाऊसारखा० ॥ १२ ॥

चेतली जणुं खुप झालि लढाई । मार होति सवाई ॥
त्याचा रंग बारगीर बिलाई । गिलचा करितो घाई ॥
ला मोड पळतां कुळशाही । पालखिस गणती नाहीं ॥

एकएक पळून आले माघारा । रणीं राहिला बिचारा ॥
भाऊसारखा० ॥ १३ ॥

काशि गत झालि गड्यांनों भाऊला । जनकोजी शिंद्याला ।
लोक पुसती एकुनेराला । आह्मीं नाहिं पाहिला ॥
भाऊसारखा मोहरा हरपला । काय सांगावें नानाला ॥
भाऊला नाहिं कोणाचा आसरा । वेढा घातला चौफेरा ॥
भाऊसारखा० ॥ १४ ॥

ज्याला पडली भाऊची भ्रांत । ते राहिले रणांत ॥
फितुरी पळुनि आले दखणांत । वांचविली दौलत ॥
त्यांचा ईश्वर करिल सत्यनाश । यश दिलें गिलचांस ॥
भाऊची भ्रांत पडलि नारिनरां । सकळ जना लहान थोरां ॥
भाऊसारखा० ॥ १५ ॥

कागद आला राव नानाला । होते उजन्या नगराला ॥
कागद वाचितां आंग टाकि धरणीला । मोठा अतिशोक केला ॥
आह्मांवर श्रीहरि देव कोपला । विक्षोभ आणिला राज्याला ॥
दाटला गहिंवर गोपिकाबाईला । अति कहर वर्षला ॥
नाना फिरुनि चालले माघांरा । दिला कुचाचा नगारा ॥
भाऊसारखा० ॥ १६ ॥

भाऊसाठीं झुरती जनावरें । जंगलचीं पांखरें ॥
राघू मैना आणि खबुतरें । टाहो करिती फार ॥
कुणिकडे गेला आमचा मनोहर । सपन झालें खरें ॥
पैसा मिळेना ह्मणती सारे । बंद झाले सावकार ॥

फुटला पर्वतीशीं घाम दरदरां । वाडा गजबजला सारा ॥
भाऊसारखा० ॥ १७ ॥
आह्मीं पद बांधिलें वैताग । जिवास केला त्याग ॥
कोणीकडे गेले भाऊ श्रीरंग । नानाचे जिवलग ॥
कधीं भेट देईल आह्मासंग । जिवा होईल खुषिरंग ॥
यथुन झाला पदाचा अभंग । ह्मणे महादु कविरंग ॥
रामा सटवा ह्मणे दातारा । वाट पाहतो खरोखरा ॥
भाऊसारखा० ॥ १८ ॥

समाप्त.